म. ग्रं. सं. ठाणे

विषय

संग्रहालय क्रमांक

लेखक

पुस्तकाचें नांव

ग्रं.क्र.१००६

सं. क्र. १०७८

# ग्रंथकर्त्याची प्रस्तावना.

सांप्रतकाळीं विद्यावृद्धि होऊं लागल्यापासून मराठी भाषेचा उत्कर्ष चांगले प्रकारें होत चालला आहे. यामुळें नाना प्रकारचीं मनोरंजक व नीतिपर पुस्तकें दिवसानुदिवस ज्यास्तीच होत असून तीं वाचण्याची अभिरुचि बहुतेकांस लागल्यानें अशा प्रकारचीं पुस्तकें लिहिणारांस विशेष उत्तेजन येऊन त्यांविषयीं ते परिश्रम करीत आहेत. हें पाहून हा दुसरा ग्रंथ लिहावा असें मनांत आलें. परंतु माझी अल्पमति असल्यानें पो ग्रंथाची थोरवी केवळ विद्वान् ग्रंथकर्त्यांप्रमाणें होऊन वेळेचें व इतिहासाचें अवधान सारखें राहील असें वाटेना. तरी, मनांत आलेले उभारणीचा भंग होतो जाणून मीं ह्या ( **विश्वासराव** नामक ) कल्पित कादंबरीची यथाशक्ति रचना केली आहे.

मनुष्यमात्राचे अंगीं धैर्य, धौर्यादि गुण व निश्चयात्मक योग असला ह्मणजे कशींही संकटें आलीं असतां तीं निवारण करण्यास त्यास कसें सुलभ पडतें, तसेंच स्त्रियांचे अंगीं एक खरें पातिव्रत्य असल्यानें त्यांजवरील आलेल्या महत्प्रसंगांची निवृत्ति कशी होते, व त्याचप्रमाणें अनीतीनें वर्तन करणारांचा शेवट कसा होतो, हेच मुख्य उद्देश मनांत आणून मीं हा ग्रंथ लिहिण्यास हात घातला.

आतां वरील हेतु या ग्रंथांत किती सिद्ध झाले आहेत हा निर्णय करणें हें आमचे मार्मिक व रसिक विद्वान् वाचकांकडेच आहे.

पूर्वीचे पुस्तकांत संस्कृत शब्दांचा विशेष संग्रह ... से शब्द नसण्याविषयीं कित्येकांचें मत दिसलें. ... सांप्रतकाळीं आपल्या सभ्य स्त्रियांस देखील विद्येची ... मनोरंजक पुस्तकें वाचण्याची त्यांची फार उत्कंठा ...

...पुकताच ...ना ? ह्मणून ...ळेस हैद- ...शिरपेंच ..., व त्यांचे ...घेऊन ...

त्यांस वाचण्यास सुलभ पडण्यासाठीं, होईल तितकें करून या वेळेस प्रचारांतील शब्दांचा उपयोग केला आहे. तथापि, कांहीं ठिकाणीं सांप्रत चालू असलेले भाषेंतील ओघानुसार शब्द लिहिले गेले आहेत, त्यांजकडे आमचे सुज्ञ वाचक विशेष लक्ष देणार नाहींत.

या ग्रंथांत कोठें कोठें काना, मात्रा, अनुस्वारादि छापतांना कमज्यास्ती पडलें असेल, तें वाचते वेळीं सहज लक्षांत येण्याजोगें असल्यामुळें याचे शेवटीं शुद्धिपत्र घातलें नाहीं.

पूर्वी केलेले '**मंजुघोषा**' पुस्तकास जसा सर्वांकडून महदाश्रय मिळाला, तसाच याही पुस्तकास पुढील उत्तेजनार्थ मिळेल अशी आशा बाळगतों. यांतील दोषोदकाचा त्याग करून विद्वज्जनहंसांनीं गुणरूप पयाचा आवडीनें स्वीकार करावा, ही माझी प्रार्थना आहे.

नारो सदाशिव रिसबुड.

# तिसऱ्या आवृत्तीची सूचना.

ह्या ग्रंथाची पहिली आवृत्ति खपून ग्रंथ फार दुर्मिळ झाला व ग्रंथाविषयीं लोकांची फार मागणी येऊं लागली. ग्रंथकर्ते दुर्दैवानें मयत झाल्यामुळें त्यांजकडून ग्रंथ पुनः छापून निघण्याला मार्ग राहिला नाहीं. ह्यास्तव सर्व लोकांच्या फायद्याकरितां आह्मी मयत ग्रंथकर्ते यांचे बंधु रा. रा. गणेश सदाशिव रिसबुड ह्यांचे परवानगीनें दुसरी आवृत्ति छापून प्रसिद्ध केली. तिला लोक चांगला मिळून तीहि आवृत्ति खपल्यामुळें ग्रंथकर्त्याचे बंधूंच्या परवानगीनेंच हल्लीं ही तिसरी आवृत्ति काढली आहे. तर पूर्वींच्या आवृत्त्यांप्रमाणेंच ह्या आवृत्तीसही लोकांचा उदाराश्रय मिळेल अशी उमेद आहे.

दुसऱ्या आवृत्तींत ज्या चुका होत्या त्या हल्लीं शुद्ध केल्या आहेत.

भाऊ गोविंद सापकर,

ज्ञानचक्षूचे मालक.

# विश्वासराव.

## भाग १ ला.

एके दिवशीं अस्तमानचे चार घटका दिवसाचे सुमारास **गुलछनाबाद** नगरींत कोणी एक श्रीमान् गृहस्थ **नारायणराव** अप्पा हुजुरपागवाळे सावकार यांचा मुलगा **विश्वासराव** आपले दिवाणखान्यांत कोंचावर अभ्यासाचीं पुस्तकें वाचीत बसला असतां, एकाएकीं त्यास उदास वाटून करमेनासें झालें. ह्मणून चमत्कारिक घड्याळादि यंत्रांस व पेट्यांतील सुस्वर वाद्यांस किल्ल्या देऊन त्या नादांत निमग्न आहे, इतक्यांत त्याचा जिवलग मित्र **गोपिनाथ** तेथें आलासें पाहून त्यास ह्मणाला; कां **गोपिनाथराव** अलीकडे कामामुळें भेटीस येण्याची फुरसत होत नाहींसें वाटतें ! एक दिवसही भेटल्यावांचून राहवत नाहीं, असें असून आज तीन दिवस झालेना ! बरोबर आहे ! **वेणीधर महाराजांच्या** नूतन जोडलेल्या संगतीपुढें आमचें मित्रत्व तुच्छ झालें, अशी ही मधील अवधि खात्री करते. हें ऐकतांच **गोपिनाथास** वाईट वाटून तो ह्मणतो, **नानासाहेब**, खाशी आतां ! !यापुढें तर तोंडच उरलीं नाहीं. आपण थोर असल्यामुळें जें ह्मणाल तें साजेल. दोन प्रहरही अजून लोटले नसतील. नुकताच्च प्रातःकाळीं प्रहर दिवसाचे सुमारास मी भेट घेऊन गेलोंना ? खूण देतों हवी असेल तर. आपले वडील **अप्पासाहेब** ते वेळेस हैदराबाद सरकारचे दिवाणाकडून आलेलें जवाहीर आणि शिरपेंच यांची परीक्षा करीत कचेरीचे ओटीवर बसले होते, व त्यांच शेजारीं आपणही तक्याशीं त्या जिनसा हातांत घेऊन पहात बसलां होतां कीं नाहीं ? आणि आपणच ह्मणालां कीं, मी एन्हां

घोड्या गडबडींत आहे. दोनप्र...

महाराज कांहीं तरी आपले बुद्धीस विष... .असावा, यांत संशय नाहीं.

हो खूण पटतांच **विश्वासराव** खजिला होऊन ह्मणतो, असें तर खरेंच. मला हें कांहींच स्मरण नाहीं. आज वेड्यासारखें झालें आहे. हें कारण तुला सांगितल्यानें कांहीं तरी तोडजोड निघेल, पण गुप्त ठेव हो! आज दोनप्रहरीं एकदोन सरदारांकडील कारकून येऊन **अप्पासाहेबांस** भेटले. दोन घटका एकांतीं बसून परत जाते समयीं त्यांस मी सहज विचारतां ते ह्मणाले, जांवईबोवा, तुमचेच लग्नसमारंभाची ही घटवटना चालू आहे. बहुतकरून मार्गशीर्षमासीं मुंगीपैठणचे सरनायबाची कन्या आपली वधु होते; त्यांजकडून आह्मी आलों आहों. आज एक वर्षभर ही योजना तुह्माविषयीं चालू आहे; टिपण जमून हुंड्या पांड्याचेंही नेमांत आलें आहे. असें बोलून ते गेले, तेव्हांपासून माझे मनाचा हिर्मोड होऊन कांहींच सुचत नाहीं. या कामीं जर **अप्पासाहेबांचा** रुकार पडला असेल, तर असत्य होणें नाहीं.

**गो०**—मग यांत वाईट तें काय? अहो, परमेश्वर कृपेनें ब्रह्मसूत्र एकत्र होण्याचा हा प्रसंग आला असून तुह्मी असे खिन्न कां?

**वि०**—हें सर्व खरें. पण काय सांगूं? कशीही मुलगी रूपवान असली तरी जिनशीवाले सावकाराचे मुलानें मला एक तसबीर आणून दिली, त्याप्रमाणें बहुधां दुसरें वधुरत्न मिळणें दुर्लभ. माझे तर मनाचा पक्का निश्चय झाला आहे कीं, लग्न करीन, तर तिच्याशींच करीन, ती बहुतकरून हिंदुस्थानांतीलच कोणा सावकाराची कन्या असावी. या कामास **अप्पासाहेब** कदाचित् रुकार देतील; परंतु त्यांच्यापुढें ही गोष्ट काढावी कोणी? आणि आज त्यांनीं असा रुकार त्या कारकुनास दिला आहे; यामुळें माझे चित्तवृत्तीस स्थिरता नाहीं. बरें, हें असो; याचा विचार पुढें करतां येईल. चला खालीं, अरबी घोड्यांचा रथ तयार

आहे, शहराबाहेर हवा खाण्यास जाऊं. असें ह्मणून ते दोघे रथांत बसून जातांना मार्गांतील जागोजाग पुष्पवाटिकेंतील गुलाब, शेवती, मोतिया, मदनबाणादिकरून प्रफुल्लित झालेले ताटव्यांवरील पुष्पांचे गुच्छ व त्यांचे तऱ्हेतऱ्हेचे रंग खुलत असून, त्यांचा सुगंध, वायूचा स्नेह धरून, सहल करीत फिरतांना मार्गांत अवचित् यांचे घ्राणरंध्रांस भेटून अतिशय संतोष देता झाला. या नवीन जोडलेल्या स्नेह्यासहवर्तमान आनंदांत ते दोघे बोलत शहराबाहेरील संतोषकारक हवा घेत घेत रथाचे वेगानें अस्तमानचे सुमारास तेथें असलेल्या टेंकडीवरील रमणीय सरोवरीं येऊन पोंचले. दोघेही खालीं उतरून हातांत हात घालून मजा पहाण्याचे उंच ठिकाणीं गेले. त्या सरोवराची जलपूरीत उचंबळलेली शोभा, आणि बदकें, कांसवें व वेगवेगळाले जातींचे मच्छांचे रंग, व प्रफुल्लित हात असलेल्या नीलोत्पल चंद्रविकासिनी व कांहीं अकुंचित् होणाऱ्या सूर्यविकासिनी कमलर्नावरील भ्रमरांचे गुंजारवसहित क्रीडाचमत्कार दृष्टीस पडून सभोंवती घेरांत असलेले सुरू, आम्र, अशोक, पोफळी, बकुळ, नारळी आदिकरून दाट वृक्षांवरील कोकिला, मयूर, रावे, अशा अनेक जातींच्या पक्ष्यांचे मधुर स्वर ऐकूं येत आहेत. इतक्यांत **गोपिनाथ** ( स्मरण होऊन ) ह्मणतो, **नानासाहेब**, इतका वेळ आपल्यास सांगण्याचें स्मरणच नाहीं. मला माझे एका मित्राचें पत्र आजच मिळालेलें हें पहा माझे खिशांत आहे, त्यांत एक पुढें होणाऱ्या दरबारचा चमत्कार लिहिला आहे, असें ह्मणून तें खिशांतून काढून त्याचे हातीं देतो.

तो मजकूर पाहून हूँ ठीक झालें; आतां माझा मनोमयसंकल्प सिद्ध होण्यास हें कारण सयुक्तिक दिसतें. माझ्या रुकारास तुझें मात्र सहाय पाहिजे. मी पुष्कळ दिवस बाहेर पडण्याचा हेतु धारण केला आहे; पण **अप्पासाहेबांचा** रुकार कोठेंच जाण्याचा दिसत नाहीं. आतां या वेळेस कसेंही असो; घेतोंच परवानगी. तुझें मात्र पूर्वींचें वचन खरें असूंदे.

**गोपिनाथः**—**नानासाहेब**, असें उसनें कां बोलतां? तुमचे मज-वरील उपकार फेडण्यासाठीं मीं हा देह संकल्पानें तुम्हास जन्मभर विकला आहे. सुईमागें दोरा. तुह्मावांचून वेगळें होणें हें मला मोठें दुःखकारक वाटतें, अनुभव आहेच; सांगणें नको. या भाषणानें पूर्वीपेक्षां **विश्वासरावा**च्या मनाची खात्री होऊन ह्मणाला; बाळपणापासून तुझें प्रेम मजवर कसें आहे, हें मी जाणतों. बरें तर, कार्तिक शुद्ध पौर्णिमेस **औरंगाबाद वलकेसुभा खुदस्ते-बुनियाद** येथें रात्रौ मोठा दीपोत्सव, दारूचीं झाडें व तऱ्हेत ऱ्हेचे देखाव्यांचे चमत्कार पाहण्यांत येतील. तेथें मोठमोठाले विद्वान्, श्रीमान्, सभ्य, चतुर गृहस्थ, कित्येक अष्टउमराव, मानकरी, प्रधान राजांसहवर्तमान येतील. अशी मौज लाखों रुपये खर्च करून पाहूं ह्मटलें तरी मिळणें दुर्लभ. हा एक योगच समजला पाहिजे. निदान तेथपर्यंत जाण्यास दहा दिवस लागतील. दोन चार दिवस तरी अगाऊ गेलें पाहिजे. आतां पौर्णिमा ती कितीशी लांब? आजचेसुद्धां पंधरा दिवस. आजच प्रतिपदा; मजकडून उद्यांदेखील तयारी आहे. ( तुमचे **अप्पासाहेबांनीं** सरकारांत कागदोपत्रीं खऱ्या रीतीचा पुरावा दाखवून आमचे **तात्यासाहेबांवर** राजकीय कामासंबंधी प्राणनाश करणारा आलेला आरोप दवडून, शिवाय भांडण भांडून, त्यांनीं खोटें जाहीर करणारापासून अब्रूचे जाबाबदल पन्नास हजार रुपये आह्मांस देवविले; व तुमचा आह्मा स्नेहही अकृत्रिम; यामुळें ) तुमचे बरोबर कोठेंही येण्यास आमचे **तात्यासाहेबांची** मला कांहीमात्र हरकत नाहीं.

असें **विश्वासरावानें** ऐकतांच फार चांगलें आहे, असें ह्मणून त्या मित्रासह मोठ्या आनंदानें अस्तमानीं फिरत फिरत आपले घरीं येणें केलें. त्याच रात्रीं त्याचे वडील **अप्पासाहेब** दुकानांतून येऊन संध्या फराळ झाल्यावर दिवाणखान्यांत एकटेच बसले आहेत, असें पाहून **विश्वासराव** त्यांजपाशीं नित्याप्रमाणें जाऊन ह्मणाला, **अप्पासाहेब**, आपण जर रागावणार नाहीं,

तर मी कांहीं मनांत आणलें आहे हें सेवेशीं निवेदन करीन.

( **विश्वासराव** स्वभावानें फार चांगला आणि कधींच आज्ञेबाहेर गेला नाहीं; तसाच अत्यंत प्रीतींतील असल्यावरून ) ते ह्मणाले, अशी काय गुजगोष्ट आहे? सांग! मला राग कधीं येणार नाहीं. ( बापाचा सुप्रसन्न चेहरा पाहून ) **विश्वासराव** ह्मणाला, मी कधींच हें शहर सोडून बाहेर लांब गेलों नसून या जगतांतील अद्भुत चमत्कार माझ्या पाहण्यांत आजपर्यंत आले नाहींत. आज एके पत्रांत असें वर्तमान वाचलें कीं, **औरंगाबाद** शहरांत बादशाहाचे दरबारांत चमत्कारिक नानातऱ्हेच्या वस्तूंचा अपूर्व देखावा कार्तिकी पौर्णिमेस असून, दीपोत्सव व दरबारही मोठा होणार आहे. तेथें मोठमोठाले श्रीमान्, संभावीत व देशोदेशींचे बडे लोकही जमतील. असा चमत्कारिक समारंभाचा थाट पाहण्याची अंतर्यामीं मला फारच उत्कंठा प्राप्त झाली आहे. हा हेतु आपणावांचून कोण पुरविणार? मजबरोबर माझा मित्र **गोपिनाथ**ही येण्यास सिद्ध आहे. पण हें सर्व आपले आज्ञेवर!

हे लाडके शब्द ऐकतांच **अप्पासाहेब** प्रथम कांहीं दोन घटकापर्यंत विचारांत पडून शेवटीं फार बरें आहे असें बोलून त्यास ह्मणाले कीं, तुला कधींच प्रवास ठाऊक नाहीं, आणि तें शहरही येथून बरेंच दूर आहे; इतक्यावर विचार पुरतेपणी करून जाण्याचेंच असल्यास माझ्यानें तुला ना ह्मणवत नाहीं. मात्र मागची शुद्ध ठेवून पुनः लौकर परत येण्याचें करावें. तुझें अल्प वय असल्या कारणानें सहज कोणी नादी लावील; हाही विचार तुला केलाच पाहिजे. एरव्हीं तूं हुशार व सुज्ञ आहेसच; पण न जाणो, बरोबर मोतदार, ब्राह्मण, दोन शिपाई, आणि आरबी घोडे घेऊन जा. हे शब्द बापाचे तोंडांतून निघतांच बरें ह्मणून आज्ञा घेऊन **विश्वासराव** आनंदानें निजावयास गेला.

दुसरे दिवशीं प्रातःकाळीं मुखमार्जनविधि आटोपून आपल्या **श्रीमती** आईची याचप्रमाणें गोड बोलून परवानगी घेतली.

मग लागलीच दिवाणखान्यांत येऊन **गोपिनाथास** बोलावून आणवून वडिलांची आज्ञा मिळाली, निघण्याचा बेत आतां लौकर करावा असें सांगितलें, तितक्यांत त्याचे उपाध्ये **वचंभट**बावांही सहज दिवाणखान्यांत आले. हें पाहून **विश्वासरावानें** त्यांस आपला जाण्याचा हेतु दर्शविला, आणि सुमुहूर्त कधीं आहे ह्मणून विचारलें. त्याजवरून त्यांनीं सांगितलें कीं, उदईक बुधवारीं अनुराधा नक्षत्र, अमृतसिद्धियोग आहे; गर्गाचार्यांचे मुहूर्तानें प्रयाण केलें असतां इच्छिलें कार्य सिद्धीस जाऊन मनोरथ शेवटास जातील. असा मुहूर्त मुद्दाम पाहूं गेलें असतां मिळावयाचा नाहीं. मग तर फारच आनंद होऊन या वेळेस आपल्याला सर्व ग्रह अनुकूल आहेत, असें **विश्वासराव** ह्मणतांच **गोपिनाथ** ह्मणाला, मलाही आपणावरोबर येण्याची घरची परवानगी मिळाली. बरें, मी जातों तर आतां; सर्व तयारी करून ठेवितों, तुह्मी याल, ते वेळेस मी सिद्ध आहेंच; असें बोलून आपले घरीं गेला.

इकडे लागलीच **विश्वासराव**ानें कारकून, मोतदार, ब्राह्मण यांस उदईक जाण्याचा बेत आहे तुमची तयारी असावी; असें सांगून बरोबर नेण्याचे दोन प्रीतींतले घोडे आणि त्यांचे मोतदारांसह तयारी करविली. पुढें आपले इष्टमित्रांस आह्मी लौकरच परत येऊं असें सुचविलें. सर्व दिवस तर याच गडबडींत गेला. रात्र होतांच बरोबर नेण्याचें उंची सामान, पोषाख व कांहीं अमोल्य जवाहिराच्या पौंच्या व कंठ्या आदिकरून भूषणें एका उत्तम संदुकींत घालून घेतलीं. पुस्तकें वगैरे सामानाची नीट व्यवस्था करून दिवाणखान्यांतील आपले खाजगत खोलींतल्या कपाटांत ठेवून कांहीं बरोबर घेतलीं. त्या रात्रीं भोजनादि प्रकार त्यास कांहींएक गोड लागेना. वडिलांची आज्ञा घेतल्याप्रमाणें केव्हां देशावरास चमत्कार पाहण्यास जाईन असें होऊन गेलें. सर्व रात्रभर अनेक विचारांत तळमळ लागून कांहीं झोंप आली न आली इतक्यांत पाहटेचे तीन वाजले. मग कशाचें

काय ! लागलाच उठून शौचमुखमार्जनादि विधि आटोपून पोषाख चढवीत आहे, तों मोतदार, खिजमतगार, ब्राह्मण वगैरे आमची सर्व तयारी आहे, निघण्याचें करावें, असें सांगत आले, तों पांच वाजले. हींच गर्गाचार्यांचे मुहूर्ताची संधि असें जाणून ती राखण्यासाठीं जलदीनें पुढें अगोदर **गोपिनाथास** निरोप पाठवून लागलाच **विश्वासराव** वडिलांस विचारण्यास चालला. तों उभयतां वडीलही तो मुहूर्त माहित असल्यावरून ओटीवर नुकतेच आले होते, त्यांना पाहून **विश्वासराव** सद्गदित होऊन त्यांचे पायांवर डोकें ठेवून ह्मणाला; मला आशीर्वादोक्त आज्ञा असावी. आज्ञेप्रमाणें चमत्कार पाहून मी लौकर माघारी येतों. ( **विश्वासराव** त्यांच्यापासून कधींच दूर झाला नसल्यानें ) त्यांना त्या वेळेस फार वाईट वाटलें. डोळे अस्खलित अश्रूंनीं दाटून येऊन ह्मणाले, बा **विश्वासराया** ! जातो आहेस पण लौकर ये हो ! जवळ खर्चास हें घे, असें ह्मणून बापानें कांहीं जवळ असलेल्या हुंड्या त्याचे स्वाधीन केल्या व याहून कारणपरत्वें आणखी लागल्यास पत्र पाठवावें ह्मणजे त्याप्रमाणें पाठवून देईन असें सांगून त्यास आज्ञा दिली.

**विश्वासराव** त्या हुंड्या आपले जवळ सदोदीत वर राहण्यासाठीं अंगांतील कवज्याचे चोरकप्यांत ठेवून बरोबरील सामानाची संदुक मोतदाराकडून आणवून, येतों असें पुसून वडिलांसमक्ष घोड्यावर बसला, व पूर्वी सांगितलेल्या थाटानें निघून जातांना त्यास वाटेंत **गोपिनाथ**ही तयार असलेल्या घोड्यावर बसून येऊन भेटला; आणि दोघेही मनोत्साहेंकरून मार्गस्थ झाले.

याप्रमाणें ते दोघे सावकारपुत्र, गांवोंगांवची रहाटी, भाषा, रीति, पहात जात असतां वाटेनें एके दिवशीं दीड प्रहर दिवसाचे सुमारास एके मैदानांत गर्द आंबराई असून त्या ठिकाणीं एक मोठी जलपूरीत बारव आहे, असें पाहून तेथून गांवही दोन तीन कोसांचे अंतरावर असल्यानें व उन्हानें ग्लानी येऊन क्षुधाही

लागली होती, यास्तव त्या ठिकाणीं ते विश्रांतीस्तव उतरले. ती रमणीय, शीतल जागा पाहून स्नानसंध्या भोजन झाल्यावर, त्या गार हवेंत एका गर्द आम्रवृक्षाचे बुंधाखालीं गालीचे टाकून उभयतांनीं शयन केलें. **विश्वासरावास** गाढ झोंप लागली, परंतु **गोपिनाथ** कांहीं झोंपेंत कांहीं जागा आहे, इतक्यांत एकाएकीं कांहीं झाडावरून सरसर उतरल्याचा मोठा अवाज त्याचे कानीं आला. ह्मणून दचकून डोळे उघडून पहातो तों एक मोठा विस्तीर्ण भयंकर सर्प **विश्वासरावा**भोंवतीं वेढा घालून त्याचे अंगावर फणी काढून मोठमोठ्यानें फूत्कार टाकीत बसला आहे. **विश्वासरावास** तेथून बाहेर पडण्यास मार्ग उरला नाहीं, हें पाहून **गोपिनाथ** अतिशय घाबरा होऊन त्यास उठवावें, असें त्याचे मनांत आलें; परंतु तसेंही योग्य वाटेना. कारण हा निद्रिस्थच आहे हें बरें. जागृत असता तर हा काळसर्प त्याचे प्राणाचें आकर्षण करण्यास एक क्षणाचीही अवधि लागूं न देता. त्याचें विक्राळ रूप पाहून **गोपिनाथ** ह्मणतो, आज याचा निःसंशय प्राण राहणें कठिण. हरहर ! ! काय हा विपरीत प्रसंग, ज्यानीं मनीं स्वप्नीं नसतांही एकदम आमचे कर्मानें पुढें ओढ घेतली. कोणत्या उभारणीनें माझा प्रिय मित्र मला बरोबर घेऊन आला ? मी बरोबर असल्यानें **अप्पासाहेबां**स विशेष कठिण न वाटून त्यांनीं त्यास धाडिलें कीं, आमचा **विश्वासराव** फार अनिवार आहे, तूं बरोबर जसा घेऊन जातोस तसाच सांभाळून वाटेनें फार जपून लौकर या आमच्या प्राणास परत घेऊन ये. आतांच कांहीं विपरीत झालें, तर त्यांस मी आपलें अपेशी तोंड काय नेऊन दाखवूं ? यापेक्षां यानें मला गांठलें असतें, तरी चिंता नव्हती. काय करूं ? या वेळेस माझी तलवारही **विश्वासरावाच्या** गालीच्यावर गुंतली आहे. कसा मी असा हतभागी ! असें ह्मणून वेढावून जाऊन उकसाबुकसी रडूं लागला. त्या सर्पाचे भयेंकरून चाकरमाणसेंही दूर पळालीं. मग

**गोपिनाथानें** विचार केला कीं, ही वेळ दुःख करण्याची नव्हे. माझा प्राण गेला तरी चिंता नाहीं, परंतु **विश्वासरावास** कसेंही करून या घोर संकटांतून पार पाडावें. ह्मणून लागलींच सर्वांगास व दोन्ही हातांस वस्त्रांचे पुष्कळ लपेटे देऊन बरोबर असलेला स्वारवेशाचा गुडघ्यापर्यंत पुरणारा जोडा पायांत चढवून हातांत एक जाडी सडगें घेतलें. नंतर **विश्वासरावाची** कांहीं जागृतपणाची चंचळता पाहून त्यास धोका न होण्यासाठीं, युक्तीनें अगोदर ओरडून ह्मणाला, सावध असलां तरी कांहीं हालचाल न करितां निद्रिस्थाप्रमाणें अहांत तसेच पडून राहां. **विश्वाराव** ! तुमचे भोंवतीं महान सर्पाचा वेढा पडला आहे. तुम्ही जर आतां उठाल, तर तुमचा नाश होईल. हें संपूर्ण ऐकून भीतीनें **विश्वासरावानें** किंचित् किलकिले डोळे उघडून पाहिलें तों काळपाशांत मी पडलों आहें, आतां कशाचें उठणें होतें ! सर्व सुखास अंतरून या दुर्गतीनें यमधानीप्रत खचित् जातों ! असें पक्कें वाटून नेत्रास अंधारी येऊन उगीच पडला. आतां तो त्यास डसणार इतक्यांत **गोपिनाथ** जलदी करून सडगें घेऊन अंगावर धांवला. मग काय विचारावें ! आधींच दुष्टजाती सर्प, त्यांत अत्यंत चपल, आणि शरीर विस्तीर्ण; पहातांच डोळ्यांस आंधारी आणणारा; तो लागलीच फूं फूं करीत चवताळून मोठ्या आवेशानें धांवून **गोपिनाथाचें** कंटस्थळ धरणार, तों त्याणें धैर्यानें संधि राखून त्याचे झपेसरसें दोन्ही हातांनीं मानेपासून मुंडकें एकदम गच्च धरून आवळून मोठ्यानें ओरडून ह्मणाला, मित्रा ! सावध होऊन येथून उठून पळून जा. आपले प्राण वांचीव. आतां माझ्या प्रारब्धानें जें होणें असेल तें होईल, तुझी सुटका झाली. हें त्याचें अघोर कृत्य पाहून **विश्वासरावाचें** अंगास कांटा आला, आणि अगोदर एकीकडे होऊन ह्मणाला; मजकरितां हा आपले प्राणावर उदार झाला, त्याअर्थी मला तरी वांचून काय करावयाचें आहे ? माझेंही

कांहीं होवो, ह्मणून त्यानें धैर्यानें, असलेली तलवार हातीं घेऊन, तो त्यास साह्य झाला. परंतु **गोपिनाथास** सर्पानें पायांपासून वेढून जखडून बेजार केलें होतें. इतक्यांत त्याच्या चाकरमाणसांनींहि शरमून तेथें आपल्या शस्त्रांसह धांव घेतली. तेणेंकरून **गोपिनाथ** जरी व्याकूळ होऊन त्याच्या वेधनेमुळें सोडण्याच्या बेतांत होता, तरी साह्य पाहून पुनः त्यास धैर्य आलें. त्याच्या सर्व अंगांतून घामाच्या धारांचे पाट चालले होते, जीव एकवटल्यानें नेत्रांतून रक्तबिंदु दिसूं लागले. जरी त्यानें त्यास इतकें बळकट धरिलें होतें, तरी कोणाच्यानें त्याचे अंगावर जाववेना. तो वरचेवर शेंपटीचे तडाखे हाणी, ते असुडाप्रमाणें लागून त्याचे अंगावर वळ उठत. तेव्हां **गोपिनाथास** ग्लानी येऊन तो ह्मणाला, घाबरूं नका. एक अगोदर काहडणी आणून याचें डोकें वर खुलें आहे, त्यास घट्ट बांधून, शेंपटी उचलली कीं, त्याचे शस्त्रानें तीन तुकडे करा. मग लागलीच त्यांनीं त्याचें मस्तक आवळून संधि राखून तीन तुकडे केले. तेणेंकरून तो अगदीं जर्जर झाला. मग एकदम दोहों बाजूंनीं दोऱ्या घट्ट धरून सर्वांस दूर होण्यास सांगून त्यास जमीनीवर टाकलें. असा तो गुंतल्यावर करतो काय ? लागलीच एकानें त्याचे मस्तकावर एक मोठा दगड टाकून त्यास ठार केलें. नंतर सर्व स्वच्छ स्नानें करून आज प्राण वांचले ह्मणून शेषशाई नारायणाचें अंतरयामापासून स्तवन करून खटल्यानिशीं चालते झाले.

पुढें दरकुच दरमुक्काम करीत **औरंगाबाद** शहरीं समारंभास तीन दिवस पुढें होते तोंच अगाऊ येऊन एक वाडा भाड्यानें घेऊन आपले लव्याजम्यानें तेथें राहिले. सहरांत जिकडे तिकडे गर्दी होऊन राजेरजवाडे, शेटसावकार आदिकरून लोक आपापले थाटांनीं येऊन उतरले. शहराबाहेर एक मोठा मंडप खुले पटांगणांत देऊन दरबाराची जागा मोठी रमणीय केली होती, ती उभयतां हवा खाण्यास जाऊन सहज पाहून आले.

आधले दिवशीं व्यवस्थापक कारभाऱ्यानें कोण कोठे उतरले आहेत, याचा शोध ठेवून बादशाहाचे आज्ञेवरून त्यांचे इतमामाप्रमाणें नीट बिनबोभाट बंदोबस्त ठेविला; व दरबारांत येण्याच्या नेमिलेल्या तिकिटा नांवनिशीवार वांटल्या. त्यांत **विश्वासराव** आणि **गोपिनाथ** यांसही दुसऱ्या प्रतीच्या तिकिटा मिळाल्या. नेमलेल्या वेळेस दरबारच्या जागीं सर्व मंडळी जमली. या ठिकाणीं मध्यें एक खुलें मैदान असून सभोंवतीं घेरांत उंच ठिकाणीं नंबरवारीनें मश्रूनें मढविलेल्या खुर्च्या व कोंचें मांडलेलीं होतीं. प्रत्येक ओळीच्या बंदोबस्तास वेगवेगळाले कारभारी असून ते मंडळीच्या तिकिटा पाहून योग्यतेप्रमाणें त्यांना बसवीत असत. सभोंवतीं गर्दी व दंगा न होण्यासाठीं आरबांचा पाहरा सावधपणानें उभा होता. याप्रमाणें अस्तमानचे प्रहर दिवसाचे सुमारास सर्व मंडळी जमल्यावर सरकारस्वारी तेथें येऊन पोंहोचली. ते वेळेस तोफांची सरबत्ती झाली. मधून मधून भालदार पुकारून सभेस उत्तेजन आणीत आहेत; तेथें मजा पाहण्याकरितां हजारों लोकांची गर्दी झाली असून बाहेरील मैदानांत हत्ती, घोडे यांची एकच धुमश्चक्री चालू आहे. बक्षिशीचे जाहिरातीप्रमाणें हजारों लोकांनीं देशोदेशींच्या नामांकित व कधींही कोणाच्या पाहण्यांत नाहींत, अशा तऱ्हेतऱ्हेच्या वस्तु चित्रविचित्र फळफळावळ, भाज्या, ओडफळें, तशींच जनावरें, जळमाणसें, कितीएक नूतन उत्पन्न झालेलीं दोन दोन मस्तकांचीं जुळीं मुलें, चार जिभांच्या मागें पुढें तोंडाच्या गायी, म्हशी, शेळ्या, मेंढरें, बकरीं, चमत्कारिक रंगांचे आंबे, गोकाकचीं कृतीचीं फळें, एकास चार प्रकारचीं पानें अशीं कलमी झाडें, त्यांतील कित्येकांस निरनिराळ्या रंगांचीं फांद्याफांद्यांनीं पुष्पें, तसेंच प्रत्येकाचे सुवास भिन्न भिन्न, अशा चमत्कारिक अनेक जिनसा घेऊन आलेल्यांस त्यामधील साधलेल्या चवथ्यावर ठरावाप्रमाणें अंत घेतलें. सर्वांनीं त्या नवीन तऱ्हेतऱ्हेच्या जिनसा पाहिल्यावर सरकारांतून

त्यांच्या आणण्याच्या परिश्रमाप्रमाणें त्या सर्वांस बक्षिसें मिळून त्यांना जाण्यास परवानगीही मिळाली. तों लागलीच अस्तमान झाला. पूर्वींचे संकेताप्रमाणें जिकडे तिकडे शहरांत जाण्याचे मार्गांत रोषनाई होऊन, हजारों दीप लागून चोंहीकडे चकचकाट झाला. त्या देखाव्याचे मैदानांत पूर्वींच रोवून ठेवलेलीं तऱ्हेतऱ्हेच्या फुलांच्या रंगाचीं दारूचीं झाडें सोडण्यास आरंभ करून, हिंगणें व मोठमोठाले बाण आकाशपंथीं सणाणत जाऊन त्यांचे तेजस्वी तारे तुटून खालीं पडत आहेत. याचप्रमाणें चंद्रकांती नखतेलांचे गगनचुंबीत जाणारे दिवे उडवून हजारों रुपयांची दारू, झाडें सुटत आहेत. तें पहाण्याचे गर्दींत बंदोबस्त असतांही कित्येकांचे पाय चेंगरत असून पागोटीं पडत आहेत. कित्येकांचे जोडे फाटून कित्येक गर्दींत पडून रगडून जाऊन ओरडत आहेत. असा अद्भुत चमत्कार पाहून सर्व आपापले बिऱ्हाडीं दहा वाजतां परत आले. त्यांत हे दोघेही आपले इतमामाप्रमाणें घोड्यांवर बसून आले. दुसरे दिवशीं याच थाटाचें दरबार भरून हेही येऊन आपले जागीं बसले. तेथें राज्यसंबंधी कायद्याचे ठराव होऊन देशसुधारणुकेचींही भाषणें झालीं. कित्येकांनीं सरकारास आपआपले योग्यतेनुसार नजराणे दिले, तसेंच सरकारानींही कित्येकांस वंशपरंपरा चालणाऱ्या पदव्या व जहागिरी बंद असलेल्या चालू केल्या, मग पानसुपारी, हार, गजरे, तुरे होऊन दरबार विसर्जन होतेसमयीं तेथेंच लागलीच सरदार, मानकरी, आदिकरून मंडळीस योग्यतेप्रमाणें पोशाख देऊन कचेरी बरखास्त केली. दुसरे दिवशीं राजाज्ञा घेऊन सर्वजण आपापल्या गांवीं निघून गेले.

## भाग २ रा.

या प्रकारें दरबाराचा थाट पाहून **विश्वासरावास** आनंद झाला. पुढें दुसरे दिवशीं **गोपिनाथानें** विचारलें कीं, कां राव-साहेब, आतां बरेच दिवस इकडे येऊन झाले; घरीं निघण्याची एकदोन दिवसांतच तयारी करावी. हें ऐकून त्यास **विश्वासराव** ह्मणाला:होहो, हें खरेंच, पण मी सांगतों हें ऐकतोस ? इतक्यांतच तिकडे परत जाण्याविषयीं माझें मन धांव घेत नाहीं. अनायासें वडिलांची आज्ञा मिळून, आपण बाहेर पडलों आहोंत; व वडिलांनीं दिलेल्या पैशाखेरीजही मजपाशीं आपण चैनीनें आणखी पांच वर्षें प्रवास केला, तरी पुरण्याजोगा ऐवज आहे. तर आतां कांहीं पृथ्वींतील मोटमोठालीं शहरें व अनेक ठिकाणचे अद्भुत चमत्कार पाहून येण्याची योजना मनांत आणून एकदोन दिवस मी याच विचारांत आहें. तुझा या कामीं सल्ला पडेलच, अशी या अंतःकरणांत उमेद आहे. मग कसें ? **गोपि०**—तुझें मन तेंच माझें मन. जो बेत झाला आहे, त्यास आणखी एक योग्य कारण आहे, तें असें कीं, एकदोन महिन्यांनीं अनायासें सर्वपर्वश्रेष्ठ महोदयपर्व आलें असून प्रयागराजतीर्थीही येथून आपले भाग्योदयानें बरेंच जवळ आहे, तर जगदोद्धारणी गंगादित्रिवेणी-संगमस्नानास चलावें. हें ऐकून **विश्वासरावास** अधिकच आनंद होऊन ह्मणाला, फार उत्कृष्ट झालें. अधींच हा नरदेह, त्यास ही कल्पना तत्वज्ञानाची; तर मग आतां उद्यांच निघण्याचें करावें. याप्रमाणें उभयपक्षीं बेत ठरल्यावर ते दुसरे दिवशीं सुमुहूर्तानें आपापले घोडे, ब्राह्मण, मोतद्दारांसह सरंजामानिशीं पर्वणीचे स्नानार्थ आनंदानें मार्गस्थ झाले. वाटेनें कित्येक ठिकाणीं रमणीय स्थलें, बागा, सरोवरें, तीर्थें, देवालयें, जलमंदिरें, भोयारें, लेणीं असे अद्भुत चमत्कार पाहून मनोदयानुरूप त्या त्या स्थळीं कांहीं विश्रांति घेत घेत मार्गानें दरकुच दरमुकाम करीत चालले.

एके दिवशीं अस्तमान होण्याचे सुमारास कांहीं अंतरावर झाडींत एका शहरचा उंच दुर्ग दिसत असून, मोठमोठाल्या उंच हवेल्यांवरील रमणीय हवाशीर बंगले, देवालयांचे कळस, व चमत्कारिक नक्षीदार तेजस्वी मनोरे, तशाच सभोंवतीं कितीएक बागा, नारळी, पोपळी, पेरू, दाडिंबी, बिही, चकोत्रे, आननस, द्राक्षी, अंजिरादि फलवृक्षांनीं प्रफुल्लित असून गर्द आंबराई सुशोभित दिसत आहे. हें पाहून या शहरांत एकदोन दिवस मुक्काम करून आनंदानें येथील कांहीं चमत्कार पाहावे, असें त्यांचे मनांत आलें. मग तसेच पुढें शहराकडे जात असतां कितीएक पाटस्थलावरील उदिमाचे कामीं लोक सक्त झाले आहेत, कितीएक ठिकाणीं गुऱ्हाळें लागलीं असून कोणी तेथें रसपान करीत आहेत; व तसेच कितीएक चैनी लोक इष्टमित्रांसहवर्तमान रथांत बसून तेथें येत आहेत; असें दृष्टीस पडलें. कितीएक श्रीमान् लोक पुष्पफलेंकरून प्रफुल्लित असलेल्या हवाशीर बागांतील सुरम्य बैठकींतून हवा खात आनंदानें गोष्टी बोलत बसले आहेत. रस्त्यानें व्यापारीलोकांच्या किराणा वगैरे सामानाच्या भरपूर गाड्या आंत येत आहेत. गाईम्हैशींचीं खिल्लारें शहरांत गर्दीनें जात असून त्यांचे दळवटीनें धुरळा उठून अंधःकार झाला आहे. घोडेस्वार, घोडे मंडळावर धरून दोहों बाजूंनीं हातांत काठ्या घेऊन खुळखुळ्याचे नादांत इच्छिल्याप्रमाणें कसरतीनें घोडे फुरफुरवून शिकवीत आहेत. कितीएक पांथस्थ लोक, श्रमित झालेले पादचारी, कोणी घोड्यांवरून, तसेंच कोणी रथांतून, मेण्यांतून व कितीएक जलदीनें जाणारे साडणींवर स्वार होऊन शहरांत जाणाऱ्या अनेक रस्त्यांतून जात आहेत. हातांत कुबडी, गाठी बंडी असून ओझ्यानें मान वांकलेले कापडी आवडीनें खांद्यावर कावडी घेऊन मोठ्या तातडीनें शहरांत जात आहेत. असें पहात पहात ते दोघे त्या **मथुरापुरींत** स्वस्थ मन करून वस्तीस जातांना पेटेपेठेंतून जवाहीर, सोनें, रुपें, मोतीं, कापड

भांडीं व गंधीसामान भरपूर असलेलें, तसेंच हलवाई, तांबोळी आणि किराणा आदिकरून दुकानांतून देवघेवीचा व्यापार गर्दीनें चालू आहे. बडेबडे सरदार, मानकरी, सावकार, कारभारी, संभावित गृहस्थ, हत्तीवरून, घोड्यावरून, कोणी पालखींतून, कोणी मेण्यांतून बसून आपआपले लवाजम्यानिशीं देवदर्शनास जात आहेत कोणीं देवदर्शन करून मालदार पुकारीत येत आहेत. तशीच दरबारांतील कामगार व राजकीय कामासंबंधी वकीलादिकरून अंगावर उंची उंची पोषाख असलेली मंडळी आपआपले उद्देश बोलत बोलत रस्त्यानें जातांना कितीएकांचे नमस्कार होत आहेत. देवालयांतून पुराण सांगून मोठमोठ्या कांठांचे धोतरजोडे नेसलेले पुराणीक खांद्यावर शालजोड्या उडवीत, रुमालानें वारा घेत घरोघर जात आहेत, व त्यांचेमागून शिष्यशाखा श्रीमद्भागवतादि पुस्तकें बगलेंत घेऊन चालली आहे पुराण श्रवण करणाऱ्या धार्मिक, वृद्ध व भोळ्या स्त्रीपुरुषांचे समाज पुराणांतील इतिहासांचें व पुराणिकांचें वर्णन मोठ्या आनंदानें करीत घरीं चालले आहेत. व त्यांतील कितीएक स्त्रियांच्या हातांतून पुराण ऐकतांना केलेल्या त्रिपुरवाती व फुलवातींचीं जुडगीं असून, कोणीं आज हजार, कोणीं पांचशें तयार झाल्याचें एकमेकींस सांगत आहेत. कितीएक छाकटे लोक त्यांचे बळेंच मर्म काढून, मागून त्यांची व पुराणिकांची कुचेष्टा करीत हंसत चालले आहेत. कितीएक बेपर्वा असून निर्भिड झालेले तरुण विषयी पुरुष व स्त्रिया रस्त्यांतून जातांना एकमेकांस लाघविक भाषणें, व नेत्रकटाक्षादि हावभावसंज्ञा करिताहेत. हौदावरील खुले पटांगणावर स्वच्छ जागेंत नेमिष्ट विप्रांची संध्येची व स्तोत्रपाठांची गडबड चालू आहे. पेठापेठांनीं दिवे लागून चोंहीकडे लखलखाट झाला आहे. कितीएक भिक्षुक असून अड्यावर गटारबातम्या व पुल्याचे बेत एकमेकांस विचारीत बसले आहेत. देवालयांतून, तसेंच मानकरी लोक व सरदार यांचे नेमणुकीच्या

नगारखान्यांतून सुस्वर तालावर नित्यनेमाचे चौघडे झडत आहेत, केतीएक आंधळे, पांगळे, रोगी, फकीर, सवाल करून याचना करीत रस्त्यानें फिरत आहेत. कितीएक ठिकाणीं रमणीय बंगल्यांतील, पुष्पवाटिकेचे बगीच्यांतून हजारी कारंजीं जोरानें उडत आहेत. असे अनेक चमत्कार पहात गरीब लोकांस धर्म करीत, ते उभयतां एका धर्मशाळेंत खटल्यानिशीं येऊन पोहोंचले. रात्रौ उभयतांनीं आपलें ब्रह्मकर्म आटोपून मिष्टान्नभोजन करून, पानसुपारी खाणें झाल्यावर किंचित् घोड्यांची देखरेख केली, नंतर ते चार घटका गोष्टी व उद्देश बोलून बंदोबस्तानें निजले.

त्याच रात्रीं अडीचप्रहर रात्रीचे सुमारास एकाएकीं धर्मशाळेंत मोठा दंगा होऊन लोक बाहेर पळाले. तितक्यांत एकजण मोठ्यानें ओरडून ह्मणाला, लवकर कोणी धांवा! विश्वासघात झाला. हें ऐकून **गोपिनाथ** घाबरून उठून पाहतो, तों बिछान्यावर **विश्वासराव** नाहीं. त्यामुळें त्याचें धैर्य खचून जाऊन श्वासोच्छ्वास टाकीत त्यानें मोठ्यानें आरोळी मारली. तितक्या गर्दींत बरोबरील मोतद्दार व शिष्यमंडळीही जागी होऊन त्यांणीं उभयतांचे शब्द व ओरडणें ऐकलें. मग ते लागलीच यजमानांचा घात झाला ह्मणून देहभान विसरून सर्वजण त्यांचे मागें धांवत गेले. तों पुढें कांहीं त्यांची चाहूल दिसेना. मग मनास येईल तिकडे धांव घेऊन पुष्कळ शोध करून श्रमित होऊन आपले ठिकाणीं पुनः परत आले, तों घोडे जसेचे तसेच जागेवर बांधलेले आहेत. **विश्वासरावास** कोणी दुष्टानें धरून नेलें, अथवा प्राणनाश केला, याचा कसा शोध लागेल, या विचारांत पडून **गोपिनाथाच्या** डोळ्याचें पाणी तुटेना. सर्व शहरभर शोध केला, परंतु कांहींच थांग लागेना. नंतर आठचार दिवस दुःखांत काढून शेवटीं निराश होऊन सर्व खटलें आपले गांवाकडे लावून, **गोपिनाथ** त्याचा कांहीं तरी ठिकाण लावावा, या हेतूनें एकटाच उदास होऊन गांवोंगांव सुगावा काढीत व शोध करीत चालला.

इकडे **विश्वासराव** त्या रात्रीं जे वेळेस धर्मशाळेंत दंगा झाला त्याचे पूर्वीं नुकताच पलीकडचे बाजूस रस्त्यांत कांहीं अंतरावर तद्देशीय कृष्णरासलीलेचा खेळ चालला असून त्यांतील रासधारी गाणारी मंडळी उत्तम सुरावर टुंबऱ्या, पदें वगैरे ह्मणत असतांना ( मुळींच त्यास कांहीं विचारांत असल्यामुळें झोंप लागली नसून ) तो मधुर स्वर कानीं येतांच **गोपिनाथास** झोंप लागली आहे; त्यास कशास उठवावें, ह्मणून एकटाच डोकीस भर्जरी पटका बांधून, हातांत छडी घेऊन चैनीनें त्यापासून कांहीं अंतरावर त्या खेळाचा चमत्कार पहात उभा राहिला. चार घटकांनीं पुनः परत येऊन पहातो तों घोडे, व त्यांचा सरंजाम मात्र धर्मशाळेंत आहे, परंतु कोणीच मंडळी दिसत नाहीं; हें पाहून चकित झाला. इतक्यांत मोठ्या पहांटेस मार्गक्रमणारे कांहीं उतारूलोक आपले सरंमजामानिशीं घोडे आवळून, पुढील गांवांकडे जाण्यास निघाले. त्यांस **विश्वासरावानें** विचारतां त्यांणीं सांगितलें कीं, कांहीं तरी दंगा होऊन तुमचे मंडळींतील कोणा एकाचा तरी दंगखोरानें नाश केला असावा, या कारणानें सर्व लोक मोठ्यानें ओरडत त्या दंग्यामागें गेले, ते पुनः परत आले नाहींत. काय तें पक्कें कोणास माहित नाहीं. असें ऐकतांच **विश्वासराव** घाबरा होऊन ह्मणतो, माझ्या जिवलग **गोपिनाथाचा** कोणी नाश केला, अगर काय विपरीत झालें कोण जाणें ! असा शोक करीत करीत तसाच घोडे व सरंमजामाची शुद्ध न राहतां, पहाटचे दोन घटका रात्रीचे सुमारास त्याचे शोधार्थ पुनः निघून शोध करूं लागला. तें शहर मोटें असल्यानें कांहीं ठिकाण लागेना; तो सुमारें दहा घटका दिवसाचे सुमारास एके टिकाणीं कांहीं श्रीमान् लोक एके मोटे सावकाराच्या वाड्यांतील पुढील चौकांत जमले असून तेथें कांहीं जवाहिरी उंची दागिन्यांची परीक्षा चालली आहे; इतक्यांत मित्राचे शोधार्थ हाही त्या मंडळींत जाऊन उभा राहिला. तों त्याचे सौंदर्य व ऐश्वर्याचें तेज सर्वांवर पडून सर्व लोक त्याजकडे वारंवार

टकटका पाहूं लागले. त्या ठिकाणीं कितीएक जवाहिरे, रत्नपारखी एका मोठ्या व्यापाऱ्याजवळून कांहीं खरे रत्नखचित दागिन्यांची किंमत पंचानुमतें ठरवून सौदा करीत आहेत. त्यांत सर्वांत श्रेष्ठ हिऱ्याच्या पदकानें युक्त एका उत्तम रत्नखचित् चंद्रहाराची किंमत परीक्षक पंचानुमतें पांच लक्ष रुपयेपर्यंत होऊन, तो ज्या वाड्यांत ही परीक्षा झाली, त्याच वाड्यांतील सावकार आपले आवडते नातीसाठीं किंमत देऊन सही करून घेणार,तों तें विश्वासरावास वाईट वाटून त्याचें ठकून व्यर्थ नुकसान न व्हावें, म्हणून एकाएकीं मधून ओरडून म्हणाला कीं, सगळ्यांचीच दृष्टि एकदम आंधळी कशी झाली? हा व्यापारी प्रत्यक्ष तुमचे डोळ्यांत माती टाकून, हा दागिना देऊन ठकवून पैसा घेऊन जाणार केवढी ही आश्चर्याची गोष्ट पहा! प्रत्यक्ष या चंद्रहाराच्या पदकांतील जो मुख्य तेजस्वी हिरा दिसत आहे, हा शुद्ध गारेचा कृत्रिमानें रूपास आणलेला आहे. आतां एवढें मात्र खरें कीं, या हिऱ्यास प्रत्यक्ष तेज आणून हुबेहूब रूपास आणणाऱ्या कारागिराचें मी फारच वर्णन करितों. हें ऐकतांच सर्व परीक्षक चपापून निरखून पाहूं लागले; तों तो कोणास कांहीं तेजहीन वाटूं लागला; परंतु काय तें पक्कें ध्यानांत येईना. इतके दिवस रत्नपरीक्षेत नांव मिळवून आज घालविलें; आमचे धिक् जिणें. असेंही त्यांतील कितीएक मर्मज्ञांस वाटूं लागलें. हें ऐकून तो व्यापारी खिशाणी झाला खरा, परंतु अब्रू व नुकसानीसाठीं मोठ्यानें दरडावून म्हणाला, कायरे, तूंच एक रत्नपारखी? सगळे मूर्ख आहेत कीं काय? जर ही गारगोटी नसली, आणि खरा हिरा ठरला तर या थोरथोर परीक्षकांचें अब्रूचा जवाब देणें तुला भाग पडून जन्मभर कैदेंत राहवें लागेल, याचा बोलतांना विचार केला नाहींस काय?

असें मगरुरीचें बोलणें ऐकतांच **विश्वासराव** म्हणाला, फार बरें आहे. प्रत्यक्षास प्रमाण कशास पाहिजे? हें पहा मजपाशीं कसोटीचें कलम आहे. जर या कलमानें या हिऱ्याचा नाश न होतां

बचावला, तर सर्वांदेखत सांगतों कीं, मी तुमचा जन्मभर चाकर हो- ऊन जें सांगाल तें काम करीन; नाहीं तर तुह्मास मजपाशीं चाकरीस राहणें लागेल. हें ऐकून तो चपापून जाऊन विचाराअंतीं ह्मणाला कीं, बरोबर! मी केवळ तुजप्रमाणें पुरा परीक्षक आहे असें नाहीं. कदाचित् तुझे म्हणण्याप्रमाणेंही नसेल कशावरून? परंतु याचें खरें मर्म मला कांहीं पक्कें माहित नाहीं. आतांच या मोठ्या दागिन्याचा कलम लावून नाश केला, तर या कामांत माझें सर्वस्वी नुकसान हो- णार आहे. झांकली मूठ सवालाखाची, कां होईना? घरचे यजमा- नाची मर्जी हा दागिना घेण्याची नसेल, तर माझाही विशेष आग्रह नाहीं. मलाही याचा काय तो पक्का निर्णय बंदराहून लिहून आणून केला पाहिजे. हें ऐकतांच तेथील सर्व मंडळींनीं त्या **व्याहरगि- लाल** अडत्याची छीः थू करून फार निर्भत्सना केली, आणि **विश्वासरावाची** स्तुति करून तेथील परीक्षकांनीं आपले अंगीं हीन- त्व घेतलें. नंतर त्या **त्रिलोचन** सावकारानें **विश्वासरावाचा** मोठा आभार मानून त्या मंडळींत त्यास आपले शेजारीं लोढाशीं मोठ्या इतमामानें बसवून फार प्रशंसा केली, आणि ह्मणाला: आज मी हा दागिना घेऊन त्या व्यापाऱ्यास रुपये दिले असते, तरी माझें केवळ कमीं झालें असतें असें नाहीं. परंतु खोटा दागिना फसून घे- तला, ही अपकीर्तिसर्पिणी माझे सुकीर्तिमुखास डसून तिच्या विषानें कालिमा आली असती. असें बोलत आहे, तों इकडे जि- जकरितां तो चद्रहार खरेदी होत होता ती त्याच्या लाडक्या लेकी- ची आवडती अति लावण्य रुपवरकन्या त्या ओटीसमोरील दिवाण- खान्याच्या मधल्या खिडकींत बसून धुराच्या पडद्यांतून हा सर्व चमत्कार पहात होती. ती **विश्वासरावाचें** शहाणपण, सभाधीट- पणा व अप्रतिम मोहक सौंदर्य, यांस अगदीं वेडावून जाऊन सर्वथैव तिचें तन मन धन त्याजकडेसच लागून राहिलें. आणि मनांत ह्मणूं लागली कीं, सर्व जगतांवर मला वरण्यास काय तें पुरुषरत्न हेंच योग्य आहे. हें जर मला प्राप्त होईल तर मजसा-

रखी या भूमंडलावर भाग्यशाली कोण आहे! तितक्यांत ती चतुरस्त्र सर्वविद्यानिपूण असल्यानें तिनें लागलींच पेटींतून यंत्रें काढून, जसा बसला होता, तशा थाटानें **विश्वासरावाची** हुबेहुब तसबीर गुप्तपणें काढून घेतली. आणि मंडळी जाण्याचे गर्दीत कोणास न समजतां खिडक्यांचे पुढील सज्जाचे गच्चीवर कांचेच्या पेल्यांतून सुगंधिक व शोभायमान फुलझाडें व पांच, दवणा, मरवा, असलेल्या ठिकाणीं, पुष्पें तोडण्याचे मिषानें मित्राचे विरहेंकरून संतप्त झालेल्या **विश्वासरावाचे** दृष्टीस एकवार ओझरता आपल्यामुखचंद्राचा पूर्णोदय दाखवून दृष्टिआड झाली. पूर्वीच **विश्वासरावाची** त्या रमणीय सुवर्णचित्ररेखांकित दिवाणखान्याची अद्वितीय शोभा पहाण्याकडे नजर असल्या कारणानें एकाएकी त्याची दृष्टि पोंहोचली न पोंहोचली इतक्यांत ती दिसेनाशी झाली. तेव्हां लागलीच (पूर्वी सावकारपुत्रानें दिलेली तसबीर इचीच खचीत) असें मनांत येऊन पुनः एकवार तरी ती दृष्टीस पडेल अशा विचारांत तो होता. परंतु येऊन फार वेळ झाल्यामुळें आणि मित्रविरहदुःखाचे योगानें त्यानें जाण्यास सावकाराजवळ लागलीच परवानगी मागितली. सावकाराचा अति आग्रह पडल्यामुळें त्यास भोजनास राहणें भाग पडलें; परंतु **गोपिनाथावांचून** कांहींच गोड लागेना. त्या सावकाराबरोबर स्नान, संध्या, पूजन, भोजनादि प्रकार उत्तम प्रकारें होऊन, त्या दिवाणखान्यांत पानसुपारी घेण्यास ते उभयतां आले. ते वेळेस त्या मृदुगात्रीनें मोठ्या नम्रतेनें विड्याचें तबक आणून देऊन जरी आजाची जरब फार होती, तरी त्याची नजर चुकवून जातेसमयीं बरोबर लिहून आणलेली चिट्ठी **विश्वासरावाचे** मांडीवर हळूच टाकून लागलीच परत गेली. **विश्वासरावही** ती येतांच अगदीं भांबावला, तत्रापि अनुस्तव तिच्याकडे न पहातां पुढें जें होणें असेल तें होईल, असें ह्मणून ती चिट्ठी घेऊन सावकारास विचारून चालता झाला.

पुढें **गोपिनाथ** कोठें असेल, आणि मला केव्हां भेटेल, अशी उत्कंठा लागून शहरांत पहात चालला आहे. इतक्यांत एके ठिकाणीं कोणी एका गृहस्थानें त्यास हांक मारून माडीवर बोलाविलें. येथें कांहीं तरी **गोपिनाथा**चा शोध असावा ह्मणून आशेनें **विश्वासराव** तीन चार दारें टाकून माडीवर गेला; तों एकाएकीं दोन काळे धटिंगण आले. व त्यांणीं त्याच्या मुसक्या बांधून माडीचे आंतील "जेथून रडणें ओरडणें बाहेर ऐकूं न येई, अशा ठिकाणीं" अंधारकोठडींत नेऊन त्यास कोंडून ठेविलें; आणि ते कुलूप घालून निघून गेले. जातांना **विश्वासरावानें** त्यांची पुष्कळ काकुळती केली, परंतु कोणीच त्याशीं न बोलतां एकजण मात्र ह्मणाला कीं, बाबारे, आमचे मनांत तुजविषयीं पुष्कळ दया येते, पण उपयोग काय? बहुतकरून तुझा प्राणांत येथेंच होईलसा वाटतो. असो. आतां तुझें ईश्वरच रक्षण करो! हें ऐकून तो अतिशय घाबरून रडूं लागला. अशींच प्रसंग नसून आप्तवर्गमित्रापासून दुरावला असल्यानें एकदम असा अनिवार्य प्रसंग आलेला पाहून त्या निरपराधी प्राण्याची काय दशा झाली असेल, हें वाचकांच्या सहज लक्ष्यांत येईल.

ते गेल्यावर तेथें दुसरें कोणी नसून दिवस असतांही बाहेरील दारें बंद असल्या कारणानें काळोख पडून कांहींएक न दिसून भयानें अंग कांपूं लागलें; व फारच घाबरा होऊन त्या सुकुमार **विश्वासरावास** अतिशय रडें कोसळलें. त्या वेळेस आईबापांचें व घरांतील सर्व सुखाचें स्मरण झालें. तरी निरुपायास्तव त्यास त्या अंधारकोठडींत बसणें प्राप्त पडलें. दैव थोर, ह्मणून तेथें एक बिछायतीचें जाजम तरी होतें. त्यावरील केरकचरा हातानें काढून ईश्वरचिंतन करीत त्यावर स्वस्थ निजला. तरी चैन कोठून पडणार? वरचेवर दाराशीं कानोसा घेई कीं, कोणी तरी येऊन मला काढील; पण व्यर्थ. तसाच सर्व रात्रभर तळमळत पडला,

परंतु ते दिवशीं कोणींही येऊन त्याचे खाण्यापिण्याची व्यवस्था पाहिली नाहीं. नित्यशः दिवसांतून तीन चार वेळां मिष्टान्न खाण्याची संवय असल्यामुळें अतिशय व्याकूळ होऊन तसाच दुसरे दिवशीं अस्तमानपावेतों विवळत पडला. आतां अन्न-पाण्यावांचून एकदोन दिवसांत या ठिकाणीं माझे प्राण राहात नाहींत, असें वाटून अधिकच दुःखी झाला. दिवेलावणीस दिवा हातांत घेऊन कोणीं एकजण तेथें आला; व त्यानें त्या खोलीचें कुलूप काढून दार उघडलें; आणि ह्मणाला, तुला कांहीं खाण्या-पिण्यास पाहिजे कीं नाहीं? या वचनानें त्यास थोडा धीर आला, व त्यास ह्मणाला, मला स्नान केल्याशिवाय भोजन करणें प्रशस्त वाटत नाहीं. आणि यासमयीं तर मला उठण्याचीही शक्ति नाहीं, तरी कृपा करून एक झारीभर पाणी आणि थोडें फराळाचें आणून दिल्यास मी आपला मोठा आभारी होईन; व तुमचे कल्याणार्थ ईश्वरास आळवीन. असें त्याचें दीन वचन ऐकून त्यास दया येऊन तो ह्मणाला, देतों आणून, स्वस्थ बैस. मग त्यानें बोलल्याप्रमाणें लागलीच तजवीज करून त्याचे खाण्यापिण्याची व्यवस्था केली. आणि जातेसमयीं ह्मणाला, या दुष्टाचे हातीं तूं निरपराधी सांपडलास, हें मला फार वाईट वाटतें. असो, जोंपर्यंत मी येथें आहें, तोंपर्यंत मी तुझे खाण्यापिण्याची व्यवस्था चांगली राखीन. येथून तुझी सुटका मात्र माझ्यानें करवणार नाहीं. हे दयाळु शब्द त्या वेळेस त्याचे दुःखानें तप्त झालेले अंतःकरणास वटच्छायेवत् शीतल करते झाले. त्या वेळेस विश्वासरावानें मोठ्या संतोषानें आपले हातांतील एक हिऱ्याची अमोलिक आंगठी त्यास बक्षीस दिली. मग तर तो फारच खुष होऊन त्याचे हितार्थ रोजचेरोज झटूं लागला. त्या खोलीचे पाठीमागें हवा येण्याची एक गुप्त खिडकी होती, ती तो कधीं कधीं रात्रीं उघडी ठेवून आपणही चारचार घटका कांहीं त्याच्या करमणुकीसाठीं त्याजबरोबर बुद्धबळें खेळून कांहीं मनोरंजक गोष्टी वगैरेंनीं त्याचें मन रंजवीत असे. परंतु, जरी

**विश्वासराव** आपणास असें कोंडण्याचें कारण त्यास नेहमीं विचारी तरी यजमानाच्या जरबेमुळें त्याच्यानें ती गोष्ट त्यास सांगवेना.

अशाही दुःखांत ईश्वरकृपेनें तो गुजराथी ब्राह्मण **माणिकलाल** साह्य होऊन त्याचें दुखलेंभागलें पहात असे. पुढें अतिसहवासानें एके दिवशीं त्यास सांगावें, असें वाटून तो ह्मणाला, रावसाहेब, **ज्याहरीलाल गोकुळशेट** आडत्या आमचा यजमान मोठा जवाहिराचा व्यापारी असून त्याची तुह्मी चंद्रहाराचे कामीं मोठीच नुकसानी करून कवडीची अब्रू केली; यामुळें त्यास अतिशय राग येऊन त्यानें अशी तुमची ही दुर्दशा केली. हा त्याचाच वाडा, आणि मीही त्याचा गुमस्ता पिढीजात कारभार पहात आहे. तेच दिवशीं त्याणें तुमचा घात केला असता, परंतु तुमचें आयुष्य सबळ होतें, ह्मणून त्यास त्या वेळेस तशी बुद्धि न होतां तुह्मास कोंडून ठेविलें. असो, पुढें काय होईल तें पहातां येईल. या वचनानें **विश्वासरावाचे** अंगास शहारे येऊन ह्मणाला, ईश्वरानें मोठी खैर केली ! कालगतिच विपरीत ! निरपराध हा मला बाध येऊन मी या अगाध दुःखांत पडलों! काय पहा ! त्या सावकाराचें विनाकारण हा दुष्ट ठकवून नुकसान करीत होता, ह्मणून त्या ठिकाणीं परोपकारार्थ आणि पुढेंही लोकांनीं कोणतीही वस्तु कधीं घेणें, ती दुसऱ्याचे भपकीवर न घेतां विचार करून घ्यावी; यासाठीं व याचप्रमाणें एकाद्याचें त्यास समजत नसतांही मोठा परीक्षक ह्मणून सर्वांत नांव गाजतें, व त्याणें खरा जिन्नस असून खोटा, अथवा खोटा असूनही खरा ह्मटला तरी तें त्याचें ह्मणणें लौकिकामुळें विचार न होतां लोकांत मान्य होतें; असा कोणताही प्रकार अविचारानें कधीं न होण्यास हा एक सर्वांस मीं कित्ता दाखविला; असें असतां परमेश्वरानें हा प्रसंग मजवर आणिला काय ? अस्तु कोणत्याही गोष्टींत उपकार असो अथवा नसो, त्यांत मध्यें तोंड न घालतां, "मौनं सर्व साधनं" ह्या ह्मणीप्रमाणें, उगेंच राहवें यांतच बरें. असें ह्मणून

आतां पुढें परिणाम काय होईल, या काळजीनें कांहींएक गोड न लागतां तो झुरणीस लागला.

---

## भाग ३ रा.

इकडे **गोपिनाथ विश्वासरावाची** कोणी कांहीं खूण अथवा अमुक ठिकाणीं एकादा सकुमार त्यासारिखा मुलगा आहे; असें सांगितल्यास तसाच तिकडे मार्ग काढून जात असतांही कोठेंच शोध लागेना. त्यामुळें तो अतिशय हिंमुटी होऊन फिरत फिरत **उज्जनी** नगरींत उदासपणानें **क्षिप्रा** नदीतटाकीं स्नानसंध्या करून एके मठांत राहिला. कोणी एक मनुष्य **गोपिनाथाचें** ज्या ठिकाणीं वास्तव्य होतें, तेथील राहणारा असून त्याचे त्या मठांत नेहमीं येण्याजाण्याचे परिपाटामुळें त्या उभयतांचा अत्यंत स्नेह पडून ते नित्यशः दोनदोन घटका सुखदुःखाच्या गोष्टी बोलत असत. एके दिवशीं प्रहररात्रीचे समयास ते दोघे एकांतीं बसले असून कांहीं तत्वज्ञानसंबंधीं उभयतांचा वादविवाद होत असतां एकाएकीं त्या गृहस्थाचे हातांतील देदीप्य रत्नमुद्रिका दीपप्रकाशानें झळकून तिचें तेज हात वर करतांना त्याचे गालावर पडलें. हें पाहून अशीच एक तेजस्वी मुद्रिका माझ्या **विश्वासरावाचे** हातांत आहे, तीचही असेल काय? असा थोडासा **गोपिनाथास** संशय येऊन निरखून पाहतो, तों खचितच तीच आहे; असें तिचे खुणेनें व सलगीचे चिन्हावरून, ओळखतांच त्याचे नेत्र अस्खलित अश्रूंनीं भरून येऊन, लागलीच **विश्वासरावाची** मूर्ति एकदम त्याचे नेत्रापुढें उभी राहिली. या परदेशीं नूतन जोडलेल्या स्नेह्याची अशी अवस्था पाहून, त्या **छगनलालास** वाईट वाटून तो त्यास म्हणाला, तुम्हास एकाएकीं असें अनिवार दुःख कशानें झालें? हें स्नेहभावानें मला सांगावें. कारण, या ठिकाणीं तुम्हास सुख अथवा दुःख झालें तर, त्याचा परिहार कोण करणार आहे? प्र-

स्तुत तुमचा माझा स्नेह पडल्यानें मला मात्र वाईट वाटतें. कदाचित् तुमचें दुःख माझे हातून परिहार होण्याजोगें असल्यास मी हरप्रयत्नानें करीन. त्याचे हे दयाळू शब्द ऐकून **गोपिनाथ** म्हणाला, हें दुःख दुसऱ्याच्यानें दूर होणार नाहीं. कदाचित् या कामांत तुमचें माझें वितुष्टही पडेल; जाणून सांगण्यास थोडीशी भीति वाटते. **छगन**०—महाराज, आपणास काय ह्मणावें! असें विपरीत कांहीं एक मनांत आणूं नये. माझा स्वभाव अजून पुरतेपणीं तुह्मास माहित नसल्यानेंच हे असे शब्द निघतात. हें ऐकून व त्याचे पूर्वीचे सहवासानें **गोपिनाथाची** पक्की खात्री झाली होती ह्मणून, तो ह्मणाला, बरें तर, मला या अभयापेक्षां आणखी अधिक काय पाहिजे? ही मुद्रिका ज्याची आहे, तो माझा प्राणमित्र असून त्याच्या भेटीचे विरहानेंच हा परदेश मला भोगावा लागत आहे. तुह्मी जर त्याची भेट अगर शुद्धि माहित असल्यास परोपकारार्थ लावून दिली, तर तुह्मांस प्राणदान दिल्याचें श्रेय निःसंशय लागेल. पहा, तो एके मोठे सावकाराचा एकुलता एक अति लावण्य सुकुमार कुमार असून, अल्पवयी आहे. तो व मी पृथ्वींतील चमत्कार पहावे, या हेतूनें मोठे संकटानें थोडे दिवसांची परवानगी घेऊन उमेदीनें प्रवासास निघालों. तों एके शहरांत त्याची व माझी चुकामूक होऊन, मी असा भटकत फिरत आहें. आज तुमचे हातांतील मुद्रिकेनें त्याची कांहीं शुद्धि सांगितली. त्याजवांचून त्याचे आईबाप निःसंशय प्राण टाकतील; व माझीही तीच आवस्था होईल; जाणून कृपा करावी. हें काम केल्यास व्यर्थ जाणार नाहीं. ही मुद्रिका तरी सुमारें तीन महिन्यांचे आंतच त्याजपासून वेगळी झाली असावी. काय खरें असेल तें लौकर सांगा!

**छगनलालास** ती मुद्रिका सुमारें नुकतीच एक महिन्यांत मिळाली असून तिची खूण पटतांच, त्या सावकारपुत्राचे योगानें पुष्कळांचा प्राणनाश होणार, असा हृद्गत कळवळा येऊन तो

ह्मणाला: मी सर्व तुमचें यथास्थित करीन; परंतु ही गोष्ट गोप्य ठेवावी. तुमचे मित्रानें एके व्यापाऱ्याचें सुमारें पांच लक्षांचें नुकसान करून खेरीज त्याच्या पिढीजात मिळविलेल्या अब्रूची नाचक्की केली. याकरितां त्यानें तुमचे प्रिय मित्रास एकांत ठिकाणीं माडीवरचे अंधारकोठडींत नेऊन ठेविलें आहे. इतकेंच भाग्य समजा कीं, अजूनपर्यंत त्याचे जीवास धोका नाहीं. असें विपरीत ऐकतांच गोपिनाथाची शुद्धि जाऊन त्यानें धाडदिशीं धरणीवर अंग टाकिलें! असा त्याजविषयीं त्याचा अकृत्रिम स्नेह पाहून हाही विव्हळ झाला. नंतर त्याचे नेत्रांस उदक लावून सावध करून त्यास ह्मणाला: आतां आपण कांहींएक काळजी न करितां स्वस्थ असावें. माझ्या सख्ख्या भावानें तुमच्या स्नेह्याच्या सद्गुणांचें पत्रीं वर्णन करून त्याचे मित्रानें संतोषानें कारागृहांत त्यास दिलेली ही अंगठी तिकडून मजकडे नुकतीच आली आहे, माझा भाऊ त्या सावकाराचा पूर्ण विश्वासुक पिढीजात कारभारी आहे. तुमचे स्नेह्याचे रक्षणार्थ त्याजवांचून दुसरें त्या ठिकाणीं कोणी नाहीं. जरी तो बंदींत आहे, तरी माझ्या भावाचा व त्याचा अत्यंत ऋणानुबंध असल्यानें त्यानें त्याचे खाण्यापिण्याची टापटीप श्रीमंताप्रमाणें आंतलेआंत ठेवली आहे. चला, तुह्मासाठीं तेथपर्यंत येऊन त्यांची व तुमची हरयुक्तीनें भेट करवितों. माझा भाऊ माझे अगदीं वचनांत असून परोपकारीही आहे. आपले घरची घुरल्याची गाडी घेऊन उद्यांच प्रात:काळीं निघण्याचें करूं.

हें वचन गोपिनाथास अमृततुल्य वाटून विश्वासराव बंदींत पडल्याचें दु:ख व तशीच त्याची सुखांत असल्याची शुद्धि, व भेटीची आशा ह्यांचा आनंद होऊन ह्मणाला कीं, मला या वेळेस दु:खाब्धींतून पार करणारें तारूं तुह्मी आहांत. याहून विशेष माझ्यानें बोलवत नाहीं. असें उभयतांचें सुखद भाषण झाल्यावर आतां रात्र बरीच झाली आहे, आपण निजावें, मीही घरीं नि-

जावयास जातों, असें ह्मणून **छगनलाल** निजावयास गेला. इकडे **गोपिनाथास** झोंप कशाची येते ! उजाडेल केव्हां आणि केव्हां मित्राचे भेटीस मार्गस्थ होईन; अशा विचारांत त्यानें ती रात्र मोठ्या तळमळीनें काढली. तों **छगनलालानें** पहांटेस उठून वाटचालीपुरतें बेगमीचें सामान घेऊन बरोबर थोडें खर्चासही घेतलें. आणि गाडी सज्ज करून सर्व तयारीनें मठांत आला; तों **गोपिनाथही** त्याजकडे येण्याचे तयारींत होताच. हा अगोदरच आपलेकडे आला हें पाहून तो ह्मणाला, मजपेक्षांही तुह्मास काळजी अधिक आहे, यांत संदेह नाहीं. असे ते उभयतां गाडींत बसून भोजनादि प्रकार वाटमार्गी रोजचेरोज वेळचे वेळीं सारून नेमलेले दिवशीं अस्तमानीं त्या शहरीं सुखरूप येऊन पोहोंचले. फार दिवसांनीं आपला भाऊ भेटीस आल्याचा **माणिकलालभाईस** फारच आनंद वाटला, व त्यानें त्याचें व त्याचे मित्राचें भोजनादिक प्रकारानें आतिथ्य उत्तम प्रकारचें केलें. हें पाहून उभयतांसही संतोष झाला. त्या रात्रीं ते त्रिवर्ग एकांतीं मोठ्या आनंदानें गोष्टी बोलत असतांना **माणिकलालभाईनें** आपले भावास मोठ्या नम्रतेनें विचारलें कीं, मध्यंतरीं या आपले स्नेह्यासहवर्तमान आज फार दिवसांनीं अवचित येऊन भेटीचा लाभ दिला, हें कसें ! नुकतेंच घरची मंडळी सर्व क्षेम असल्याचें आपलें पत्र आलें, त्यांत तर इकडे येण्याचें कांहींच लिहिलेलें नव्हतें. यावरून कांहीं गुजरत कामाकरितां आपलें प्रस्तुत येणें झालें असावें.

**छगनलाल.**—हो हो ! बरें विचारलेंस. तसेंच कांहीं कारण पडल्यावरून येथें मित्रासह तावडतोब निघून आलों. तें कार्य तुजवांचून कोणासही साध्य व्हावयाचें नाहीं. आणि तें तूंच करशील, अशी आमची खात्री आहे.

**माणि॰**—दादा, आपण असें उत्तेजन देऊन सांगावयास नकोच. जें माझे हातानें होणारें असेल, तें मी आपणासाठीं साध्य करून आपणास संतोष देईन. वडील बंधूची आज्ञा पित्या-

समान आहे. जो तिचा अव्हेर करील, त्यासारिखा कृतघ्न व पातकी दुसरा कोण आहे? काय असेल तें त्वकर बोला. माझेच आधिन तें काम आहे, असें आपण निश्चयानें सांगतां; त्या अर्थी तें मी ईश्वरकृपेनें केव्हां करीन, असें मला होऊन गेलें आहे.

**छगन**०—तुझा जो मित्र तुझे स्वाधीन यजमानाचे येथें अटकेंत आहे त्याचे विरहानें या माझ्या प्राणमित्राचे नित्यशः प्राण व्याकुळ होऊन अन्नपाणीही तुटत चाललें आहे. त्याच्या दुःखेंकरून आयुष्य असून यास काळसर्पानें बहुतकरून ग्रासलें आहे. परंतु याचे पूर्ण आयुष्यसद्भाग्यानें तूं आज यास वैद्यराज भेटलास. आतां हा रोगी निःसंशय तुझे कृपादृष्टीनें बरा होईल. परोपकारार्थ आत्महित साधून हें काम शेवटास न्यावें. हें ऐकून एक घटकापर्यंत तो **माणिकलालभाई** या कामीं मोठ्या विचारांत पडला. त्याचे मनांत आलें कीं, **विश्वासरावास** गुप्तपणें मोकळें केल्यास अंगीं कृतघ्नता येऊन कदाचित् आपली सतत चालणारी नौकरीहि बंद होईल व आपण धन्याचे अविश्वासी ठरूं. परंतु पुनः त्यास असें वाटलें कीं, या दुष्ट यजमानानें आपणच खोटेपणानें दुसऱ्यास ठकविण्यास प्रवर्तक होऊन, ज्या **विश्वासरावानें** परोपकारार्थ यथान्याय खोटेपणाचा अन्याय उघडकीस आणला; व जो अगदीं निर्दोष असून पूर्वसंचितप्राप्तसौख्याचा उपभोग घेत होता, त्यास सर्व बंदींत असतांही अन्यायानें आपले बंदींत ठेविलें. अशास मोकळें केल्यास ही गोष्ट ईश्वराचे घरीं रुजू होऊन बंधुआज्ञाही रक्षण होईल. शेवटीं हेंच मनास बरें वाटून तो ह्मणाला, आपली आज्ञा शिरसावंद्य आहे. त्याजवर यजमानाची सक्ती असतांही भक्तिपुरस्सर युक्तीनें व तो माझा जिवलग मित्र असल्या कारणानें थोडक्याच काळांत यजमानाचा टपका न घेतां त्यास मी मोकळें करतों. परंतु दादा, यांचें नांव काय? यांस त्याजवांचून इतकें दुःख करण्याचें कारण काय? व आपली यांची गांठ कशी

पडून **विश्वासरावा**चा पत्ता कसा समजला ? तुह्मी आपलेकडून तर ही गुप्त गोष्ट कोणास सांगणार नाहीं, असें माझें अंतःकरण खात्री करितें; तर ह्याविषयीं मला कृपा करून सांगितल्यास मनाचें सांत्वन होऊन त्याची सुटका करण्यास मला अधिक उत्तेजन येईल. असें बोलतांच ( त्याचा हेतु जाणून ) **छगन०**— ह्याचें नांव **गोपिनाथ.** हा व तो सावकारपुत्र आहेत. देशावलोकनार्थ वडिलांची आज्ञा घेऊन हे उभयतां हौसेनें कांहीं मुदतीनें निघाले असतां मार्गांत एके दिवशीं याच शहरीं दुर्दैवानें उभयतांची ताडातोड झाली. तेव्हांपासून हा त्याचे शोधार्थ भटकत फिरत आहे. कोठेंच ठिकाण लागेना, जाणून आपले उज्जनी नगरींत **पुरुषोत्तमबोवा**चे मठांत स्नानसंध्या करून हा निरीच्छ राहिला होता. याचा व माझा स्नेह पडल्यानें एके दिवशीं तुह्मीं पाठविलेली आंगठी माझे हातांत पाहून एकाएकीं हा दुःखग्रस्त होऊन रडूं लागला. आणि ह्मणाला, ही आंगठी माझ्या प्राणमित्र **विश्वासरावा**ची आहेसें वाटतें; त्याची जर भेट करून द्याल, तर मला जीवदान दिल्याचें तुह्मास श्रेय येऊन मजवर मोठे उपकार होतील. हा फार चांगला व गंभीर स्वभावाचा असल्यानें मी यास अभय देऊन घेऊन आलों आहे.

नित्यशः **विश्वासराव** ज्या **गोपिनाथा**चें स्मरण करून दोन दोन घटका व्याकुळ होत असतो, तोच हा आहे, असें निःसंशय **माणिकलालास** वाटून, त्यानें आपले भावास व **गोपिनाथास** अभय देऊन सांगितलें कीं, आतां ही मी तजवीज लौकर करतों. नंतर फार रात्र झाल्यामुळें सर्व एके ठिकाणीं निजले. प्रातःकाळीं आपले यजमानाचे वाड्यांत **माणिकलाल**भाई नित्याप्रमाणें जाऊन अगोदर **विश्वासरावा**कडे गेला. आणि ह्मणाला, बाबारे! तूं ज्या मित्राविषयीं ध्यास घेतला आहेस, तो महान् प्रयत्नानें येथें तुझे भेटीस येऊन तुला या बंधांतून मुक्त करून सौख्यानें आपले घरीं लौकरच घेऊन जाणार आहे. तुझे नष्ट दिवस गे-

त्यानें आतां तूं कष्टरहित लौकरच होशील. हे त्याचे मनोत्साहक व प्रमोददायक वदनाब्जास टवटवी आणणारे शब्द ऐकतांच **विश्वामरावास** आनंदाचें भरतें येऊन तो ह्मणाला, काय काय! माझा जिवलग मित्र **गोपिनाथ!** मजसाठीं महान् क्लेश भोगून दीन वेष धारण करून सुखाचा लेश न मिळतां एक परेश मनांत ध्याऊन शोध लावून भेटीस आला आहे? हर! हर! किती मजविषयीं त्याचा कनवाळूपणा हा! असा स्नेही विरळा. असें ह्मणून त्याचे नेत्रांतून प्रेमाश्रु वाहूं लागले. तो केव्हां भेटेल, अशी उत्कंठा होऊन घाबरा झाला. कांहीं केल्या हुंदका आवरेना. मग **माणिकलालानें** त्याचें सान्त्वन करून, लौकरच भेट होईल असें बोलून, त्याचे अंतःकरणास स्वस्थता दिली. आणि ह्मणाला, जरी मजवर या कामीं यजमानाची अवकृपा झाली, तरी मला त्याचें दुःख नाहीं. ज्या योगानें तुझी येथून सुटका होऊन तूं आपले मित्रास संतोषानें भेटून तुह्मी उभयतां आपले घरीं जाल त्यांतच मी अधिक सुख मानतों. परंतु तुमची या ठिकाणाहून सुटका करण्याची युक्ति अद्यापपर्यंत माझे मनांत चांगली येत नाहीं.

**वि०**—जरी मी मोकळा झालों नाहीं, तरी आतां तुमचे संगतीनें या बंदींतील क्लेश मला कांहींच वाटत नाहींत; मात्र तुमची कृपा असली ह्मणजे पुरे. कदाचित् तुह्मीं हें केलें असें **व्याहरीलालास** समजलें, तर तो तुमचें फार नुकसान करील. एक मात्र करा कीं, त्या प्राणदात्या **गोपिनाथाची** व माझी भेट लौकर करून द्या. ह्मणजे आमचे सर्व दुःखांचा परिहार होईल; आतां त्यास भेटल्यावांचून एक घटकेचीही अवधि वर्षाप्रमाणें जाणार आहे!

**माणिक०** (हे त्याचे उद्गार ऐकून सद्गदित होऊन)—जसा **गोपिनाथाचा** तुजविषयीं मित्रत्वांत विषमभाव नाहीं, तसाच माझाही नाहीं. जरी या दुष्ट यजमानानें तुझेखातर मला नौकरींतून दूर केलें तरी परमेश्वरकृपेनें अन्नवस्त्र मिळण्यापुरतें

साधन मजपाशीं आहे. ओलीकोरडी भाकर निवळ घरबसल्या जन्मभर मिळेल. ह्मटलें आहे: "परोपकाराय दुहंति गावः परोपकाराय फलंति वृक्षाः॥ परोपकाराय वहंति नद्यः परोपकारार्थमिदं शरीरं॥" ह्मणजे, परोपकारासाठीं गायी दूध देतात; वृक्ष सुफलित होतात; नद्या वाहतात; तसेंच हें शरीर परमेश्वरानें प्राणिमात्रावर उपकार करण्यासाठीं निर्माण केलें आहे. असें असून, जो याविषयीं विचार करीत नाहीं, त्यास चतुष्पद ह्मटलें तरी चालेल. हो! एक बरी युक्ति सुचली. ती अशी कीं, ही पहा समोरचे कोनाड्यांत जमीन मोजण्याची लोखंडी कड्यांची सांखळी सुमारें शंभर हात लांब असून कोणाची गहाणवट पडलेली अनायासें तुझे दैवानें येथेंच आहे.

ही या मागील मजबूत सज्ज्याचे मधील खांबाचे कडींत अडकावून या खिडकीबाहेर सुमारें अकरा वाजतां रात्रीं मनुष्यांची कांहीं सामसूम होत आहे तोंच सोडून देऊन एक एक कडीनें बागेंत उतरून भिंतीबाहेर पडावें. आणि लागलीच ही बाहेर आलेली सांखळी पुनः भिंतीचे आंत बागेंत टाकावी, ह्मणजे दुसऱ्याचा रिघाव आंत होणार नाहीं. त्या संधीस तेथें मी परवांचे दिवशीं येऊन उभा राहीन, ह्मणजे लागलीच युक्तीनें तेथून चोरवाटेनें मी तुह्मास आपले घरीं घेऊन जाऊन तुमचे मित्रास भेटवीन. आतां मी परवानगी घेतों. वेळेचें स्मरण ठेवून अदमासानें बाहेर पडण्याचें करावें. मी उद्यां आजारी असल्याचा यजमानास निरोप पाठवून वाड्यांत येणार नाहीं. तुमचे नित्य बंदोबस्तासाठीं सुज्ञ मनुष्यास पाठवीन. ही खिडकी पूर्ववत् त्या वेळपर्यंत बंदच असूं द्यावी. अशी मसलत सांगून तो निघून गेला.

संकेताप्रमाणें **विश्वासराव** योजिलेल्या युक्तीनें तेथून निघून गेल्यावर प्रातःकाळीं बागेंतील माळ्यानें येऊन **त्याहारीलाल** सावकारास उठवून वर्दी दिली कीं, शेटसाहेब! आपले वाड्याची, बागेच्या बाजूची माडीवरील नेहेमीं बंद असलेली खिडकी उघडून

तिचे कटड्यास लोखंडी सांखळी बांधून त्या योगानें कांहीं तरी चोरी करून कोणी निघून गेला असावा. चला उठा. मी समक्ष दाखवितों कीं, खिडकीस बांधलेली सांखळी बागेंत लोंबत पडली आहे. हें ऐकतांच तो सावकार घाबरा होऊन अगोदर माडीवर जाऊन खोलीस कुलूप होतें तें काढून पाहतो, तों, अंत **विश्वासराव** नतून माळ्यानें सांगितल्याप्रमाणें सांखळीसह ती खिडकी उघडी आहे. मग आपले जागीं मोठा पश्चात्ताप पावून विचारपूस करतांना त्यास कांहींच कोणी याविषयीं सांगेना. दोनच दिवस आपला जामदार अनारी आहे तोंच असा दुसऱ्याचे हातून बंदोबस्त नसल्यानें दगा झाला. असो. याविषयीं विचार पुढें करितां येईल. असें ह्मणून चीजवस्त पाहतांना सर्व जागचेजागीं कायम आहे. याचाच संतोष मानून मनांत विचार केला कीं, इतके दिवस तर मीं त्यास बंदींत ठेवून त्याचे हाल केले; हीच शिक्षा त्यास बस आहे. तेच दिवशीं दोनप्रहरीं **माणिक**लाल, प्रकृतीस थोडासा आराम पडलासें दाखवून डोकीस रुमाल बांधून वाड्यांत आला. तेव्हां त्यास सर्व हकीगत सांगून सावकार ह्मणाला, कोणच्या मसलतीनें तो पुनः आपल्या हातीं लागेल? आपलेविषयीं तिळप्राय यजमानाचे मनांत संशय नाहींसें पाहून **माणिकलाल** ह्मणाला: ईश्वरानेंच त्यास ही संकटांतून पार पडण्याची युक्ति सुचविली असावी. इतकेंच धन्य माना कीं, तो उत्तम कुळांतील संभावित सद्गृहस्थ असल्यानें तुमचें कांहींएक त्याजकडून नुकसान झालें नाहीं. त्यानें केलेल्या कृत्यास हीच शिक्षा फार झाली. अजूनही त्याचें सौख्य बुडविण्याची इच्छा आपणांस आहेचना? आतां त्याचा नाद मुळींच सोडून द्यावा हें मला बरें वाटतें. असें ह्मणून त्यानें त्याचें समाधान केलें.

इकडे **विश्वासरावाची** आणि **माणिकलालाची** त्या रात्रीं कोटाबाहेर गांठ पडून दोघेही घरीं गेले. तों तितक्यांत **छगनलालही** एकटाच हिंमुष्टी होऊन तिसरेप्रहरापासून **गोपिनाथ**

नाहींसा झाल्यामुळें शोधास गेलेला, त्याचा कोठेंच ठिकाण लागेना ह्मणून परत आला. मित्राचे भेटीस उत्सुक झालेल्या **विश्वासरावास** हें समजतांच त्याचे विरहेंकरून एकदम देहभान नाहींसें होऊन तो शोकग्रस्त झाला. ज्या माझ्या प्राणमित्रानें मजसाठीं महान् प्रयत्न करून अशाही संकटांतून आज मला मुक्त करून आणलें, ज्यास मजविषयीं रात्रंदिवस ध्यास लागून जो निरिच्छतेनें उदास होऊन तापसवेषानें शोध लावीत फिरत आहे, ज्यानें मजसाठीं प्राणावर उदार होऊन काळसर्पाचे हातून मला सोडवून कनवाळपणानें जीवदान दिलें, तोच माझा प्राणसखा **गोपिनाथ** मला भेटण्यास अति उत्कंठित असतांना, एकाएकीं नाहींसा कसा झाला? पूर्वी याच शहरांत तो मला नाहींसा झाल्यापासून त्याची जीवंत असण्याची आशा मला अगदीं नव्हती. परंतु दैवयोगानें पुनश्च भेटीचा आज प्रसंग आला होता. पण या हतभाग्याचे कपाळीं तें सौख्य कोठून लागणार!! हर हर! आतां त्याची माझी कशाची भेट होते! त्यास कांहीं तरी विपरीत झालें असावें; बाकी मी आजच या वेळेस येणार, असें त्यास पक्कें माहित असून, तो जेव्हां अद्याप आला नाहीं, त्याअर्थी असेंच खरें. तथापि, कदाचित् शहर मोठें असल्या कारणानें कोठें रस्ता चुकला असेल तर सकाळीं येईल. ही कांहीं आशा वाटून सर्वांनीं दम धरला होता. परंतु उपयोग काय? दुसराही दिवस गुजरला; तरी ठिकाण नाहीं. **विश्वासरावाचें** दुःख पाहून या दोघांसही फार वाईट वाटलें. हा अगदीं वेडा होऊन वारंवार रडूं लागला. पुढें अगदींच त्याजवांचून करमेना ह्मणून त्याचे शोधास जातों; मला आज्ञा असावी; असें त्या दयाळू दोघे लालांस विचारतांच त्यांनीं प्रामाणिकपणानें **विश्वासरावाची** ह्मणून **गोपिनाथानें** ठेवलेली मोहोरबंद संदूक जातेसमयीं त्यास देऊन ते ह्मणाले, तुमचें यांत काय असेल तें पाहून घ्या. हा त्यांचा विश्वासुकपणा पाहून **विश्वासरावास** आश्चर्य वाटलें, आणि ह्मणाला, पृथ्वीवर तुमचेसारिखे प्रामाणिक प्राणी आ-

होत ह्मणूनच सर्व व्यवस्थित होत आहे. हे तुमचे उपकार माझ्या- च्यानें कधीं फिटणार नाहींत. या संदुकींत काय तें माझें जवाहिर आहे. असें ह्मणून त्यानें त्यांतील सुमारें दहाहजार रुपयांचा ऐवज काढून संतोषानें त्यांस देऊन मोठ्या दुःखानें गहिंवरून तो निघाला.

---

## भाग ४ था.

पुढें **विश्वासराव** मित्रशोधार्थ कित्येक दिवस फिरत असतां त्याचा कोठेंच ठिकाण लागेना. एके दिवशीं प्रातःकाळचे सुमारास **हस्तनापुरा**संनिध आला आहे, तों शहराबाहेर एक उत्तम जल- भरित रमणीय व शोभायमान असलेलें सरोवर सभोंवतींचे गर्द व उंच वाढलेल्या वृक्षांनीं आच्छादित असून त्यांतील सूर्यविकासी कमळें आपआपलीं मुखें प्रफुल्लित करून आंतील आरक्तता सूर्यकिरणांसह मिश्रित करून त्या जलाशयावर आपली कांति पसरीत आहेत. याचप्रमाणें, चंद्रविकासिनी कमलिनी, लज्जित होऊन आपआपलीं मुखें आच्छादित करून मकरंदेच्छु भ्रमरांस बाहेर न पडण्याविषयीं प्रतिबंध करीत आहेत. त्यांतील स्वच्छ उदकाचे योगानें सभोंवतींचे तटावरील अनेक जातींचे मोठमो- ठाले डेरेदार उंच वृक्षांचे खांद्यांवरील पक्ष्यांसह त्यांत प्रतिबिंब पडून, जणूं काय आंतून उलटे वृक्षच हारीनें लावले आहेत असें दिसूं लागलें. अशीच अनेक तऱ्हेची जलांतील जलचरांची तशीच बाहेरील शेतें, मळे, प्रफुल्लित बागा, व सभोंवतीचे, डोंगरांवरील हिरवीगार वनश्रीची शोभा पहात पहात जातांना, शहराबाहेर कितीएक श्रीमान् लोकांचीं लहान लहान मुलें हरणा- च्या व बोकडाच्या छबुकड्या गाड्यांतून बसून हवा खाण्यास निघालीं आहेत. असा त्या शहरांतील अनेक तऱ्हांचा चमत्कार पहात दहा घटका दिवसाचे सुमारास बरोबरील शिष्यासह **विश्वास- राव** एके मोठे मठांत येऊन वेगळीच स्वच्छ जागा पाहून उतरला.

कितीएक दिवस त्याही शहरांत त्यानें आपले मित्राचा शोध केला; परंतु ठिकाण कोठेंच नाहींसें पाहून चित्त उदास होऊन त्यानें विचार केला कीं, घरीं जावें. आईबापांस आपली काळजी लागून आपल्यावांचून ते अगदीं क्षीण झाले असतील. पुन: मनांत आलें कीं, घरीं जाऊनही उपयोग नाहीं. घरीं जातांच **गोपिनाथाचे** आईबाप अगोदर मला येऊन विचारतील, तेव्हां मीं त्यांस या लाजिरवाणे मुखानें काय उत्तर द्यावें? याचप्रमाणें, सर्व शहरांतील आप्तवर्गमित्रांस काय सांगावें? तर न जावें, हेंच बरें दिसतें. येथेंच कोठें तरी शोध लागेपर्यंत या शहरांत राहून कांहीं मनाप्रमाणें रोजगार मिळाल्यास बरें; नाहींपेक्षां ईश्वरस्तवन करून स्वस्थ राहावें. असा विचार करून नित्यश: निष्ठेनें श्री व्यंकटेशाची श्रीमंती थाटानें पूजा करून, कोठें कांहीं दिवस फारसा बाहेर न जातां तेथेंच राहिला. सहज एके दिवशीं अस्तमानचे दोन घटका दिवसाचे सुमारास डोकीस शुभ्र दुपेटा बांधून **विश्वासराव** देवदर्शन करून मठांत येत असतां, राजवाड्याचे गजेंद्रदरवाज्यासमोर हवाशीर बगीच्यांत एक रमणीय हजारी कारंजें जलपूरित असून त्याचे फंवारे उडत होते; त्यांचे बाजूस एक नूतन पक्केरसईचें अत्युत्तम पक्वान्नांचें दुकान सुरू होतें; त्या ठिकाणीं त्या दुकानाचे पुढील पडवींत हौदासंनिध येऊन तो बसला आहे; इतक्यांत दरबार बंद करून गजेंद्रदरवाज्याचे सज्ज्यांत अष्टप्रधान व मानकऱ्यांसहवर्तमान तेथील **वंशवर्धन** राजा शहरांतील चमत्कार पहात आहे; व खालीं वाट पहात असलेल्या कितीएक लोकांचे मुजरे घेत आहे; व इकडे कांहीं राजकीय गोष्टी बोलत आहे; इतक्यांत एकाएकीं राजाची नवीन दुकानाकडे नजर जाऊन **विश्वासरावाचीही** नजरानजर झाली. राजानें त्याची इभ्रत व थोरपणा पाहून कांहीं मनांत आल्यावरून त्याजकडे कळत नकळत एक बोट केलें. त्याचीही त्यावर नजर पोहोंचून चतुरतेनें त्याजला दोन बोटें दाखवून **विश्वासराव** लागलाच उठून गेला. हें कृत्य त्यांतील

मुख्य दिवाणानें पाहून यांत कांहीं तरी योजना असावी, असा तर्क बांधून, आपले जवळील हुजऱ्यास संज्ञेनें सुचविलें कीं, हे अपरिचित गृहस्थ कोठें राहतात, याचा याच पावलीं शोध घेऊन येऊन कळीव. त्याप्रमाणें त्याणें त्याचे पाठोपाठ जाऊन आनंदस्वामीचे मठांत त्याचें वास्तव्य आहे असें कळविलें. नंतर प्रहररात्रीं फराळ आटोपल्यावर अंगावर शालजोडी घेऊन साध्या वेषानें तो मुख्य प्रधान त्या मठांत जाऊन पाहतो, तों सोन्याचे-प्रभावळींत श्री व्यंकटेशाची मूर्ति बसविली असून तिची, सुवासिक पुष्पें तुळसीदळयुक्तमंजिऱ्या इत्यादिकेंकरून षोडशोपचार पूजा बांधली आहे; दोहों बाजूंनीं घृतपूरित सुवर्णनिरांजनें व समया प्रज्वलित केल्या आहेत; तशाच उंची अगरवत्या, कापूर हालकारत्या, व दशांग गोळ्या लाविल्या असल्यानें चोहोंकडे त्यांचा परिमळ दरवळून गेला आहे; शिष्यमंडळी वरचेवर वाती सारीत आहे; पुढें वस्त्राच्छादित नैवेद्यांचें ताट अडणीवर नुकतेंच आणून ठेविलेलें सिद्ध आहे; त्या पुढें आसनावर **विश्वासराव** ध्यानस्थ बसलेले आहेत; असें पाहून प्रधानानें शिष्यांस विचारलें कीं, महाराजांची ध्यानपूजा कोठपर्यंत होणार? आह्मास दर्शन घेऊन प्रसाद घेणें आहे. ते ह्मणाले, ध्यानविसर्जन होऊन **श्रीव्यंकटेशास** नैवेद्य समर्पण करण्याचा आतांच संधि आहे; आपणांस प्रसादाची इच्छा असेल तर क्षणभर बसावें. असें ते सांगत आहेत, इतक्यांत **विश्वासरावांनीं** आपले मुखावरील शालजोडी झट्कन काढून हात जोडून देवास प्रथमतः साष्टांग नमस्कार घातला; आणि लागलीच नैवेद्य अर्पण करून अर्ती केली. अशी त्याची श्रीव्यंकटेशचरणीं दृढभक्ति पाहून प्रधानाचें अंतःकरण साल्हादित झालें. नंतर तो प्रधान **विश्वासरावास** साष्टांग नमस्कार घालून हात जोडून पुढें उभा राहिला. **विश्वासराव** फार धूर्त असल्यानें त्यानें ताडलें कीं, हा कोणी मोठा मनुष्य असून कांहीं तरी कारणास्तव इतका नम्र-

झाला आहे. मग त्यास तीर्थप्रसाद देतांच प्रधान त्याचे ईश्वरी ऐश्वर्याचें तेज पाहून मोठ्या भक्तीनें आर्जवपूर्वक त्यास ह्मणाला, चरणाजवळ किंचित् माझी प्रार्थना आहे; आज्ञा झाल्यास बोलतों.

वि०—येथें व्यंकटेशद्वारीं काय प्रत्यवाय आहे?

प्रधान०—आज्ञा, आपलें वास्तव्य कोणचे स्थलीं, व आपला इकडे येण्याचा उद्देश कोणता असावा?

वि०—आमचें राहणें जनस्थानीं असून, मुख्य पूज्यस्थान गुरुघराणें श्री व्यंकटेशगिरीवर आहे. आह्मी गादीवर बसल्यापासून कितीएक शिष्यस्थानें, तशींच गुरुबंधूंचीं घराणीं पाहाण्यांत आलीं नाहींत यास्तव तीं पाहून प्रसाद द्यावा या हेतूनें व तीर्थयात्रा, देवस्थानें घडावीं या उद्देशानें इकडे आलों आहोंत. कांहीं दिवस येथेंच व्यंकटेशाचें वास्तव्य व्हावें असा आग्रह पडल्यावरून राहणें भाग आलें.

प्रधा०—आपली संगती कोणास सुखावह होणार नाहीं! जेथें आपलें वास्तव्य होईल, तें स्थल व तो देश पवित्र आहे; यांत संशय नको. सत्संगतीचा महिमाच असा. माझें तरी भाग्य मोठें, ह्मणून आज महाराजांचें दर्शन झालें. बरें, प्रस्तुत आपणास कोण्या पुण्यपुरुषानें राहून घेतलें आहे?

वि०—वंशवर्धन राजानें.

प्रधा०—राजाचा व आपला कांहीं नात्याचा संबंध आहे?

वि०—ईश्वरी नातें. आमची श्रीव्यंकटेशाची गादी, व तेंच राजाचें गुरुबंधुस्थान; त्याजवरून उभयतांचें गुरुबंधूचें अतिप्रेमाचें नातें आहे. येथें सदोदित राहून दर्शन व्हावें, असा राजाचा विशेष आग्रह दिसला; तथापि तें युक्त वाटत नाहीं. एकांतीं दोन तीन दिवसांनीं मात्र आमची उभयतांची भेट होत असते.

प्र०—आज अस्तमानाचे वेळेस आपण गजेंद्रदरवाज्या स-

मारील हजारी कारंज्याचे समीपचे दुकानीं बसलों असतां, राजानें एक बोट दाखविल्यावरून आपण जी त्यांस दोन बोटांची खूण केली, त्यांतील हेतु काय असावा? हें समजण्याविषयीं हा दास अत्युत्सुक आहे, तर कृपा व्हावी.

**वि०**—( न ओळखलेंसें करून ) विचारता ह्मणून सांगावें इतकेंच, बाकी ही गोष्ट सांगण्यासारखी नाहीं. परवांचे दिवशीं सरकारची आणि आमची एकांतीं भेट झाली; ते वेळेस राज्यस्थितीविषयीं कांहीं गोष्टी निघाल्या. त्यांत अष्टप्रधानांचे मताशिवाय राज्यांत कोणतीही गोष्ट होत नाहीं, असा त्यांचे बोलण्याचा भाव दिसला. त्यावरून आमचे तोंडांतून सहज आलें कीं, केवळ इतकें अंकितपणानें वागणें हें आपल्यास योग्य दिसत नाहीं. कांहीं तरी त्यांवर आपली जरब असावी; ह्मणजे प्रधानादि लोक नम्र वागून सदोदित धाकांत असतात. हें ऐकतांच आवेश येऊन त्यांनीं उत्तर केलें कीं, माझे एकट्याचे अंगीं सर्व राज्य चालविण्याचें सामर्थ्य आहे. आतां एकाही प्रधानाची मला जरूर नाहीं. पहा मी ह्यापुढें त्यांचा कसा बंदोबस्त ठेवतों. ते असें बोलून व्यंकटेशास नमस्कार करून स्वारी राजवाड्यांत गेली. जातांना एका प्रधानाचें मात्र साह्य ठेवीन असें ह्मणाले होते. त्याच खुणेनें त्यांनीं एक बोट दाखविलें. ही गोष्ट आह्मास फार वाईट वाटून कोणीकडून विचारलें असें झालें. तत्रापि दोन तरी असू द्यावे, असेविषयीं आह्मी ती दोन बोटांनीं त्यांस संज्ञा केली.

**प्रधा०**—( असा कायम झालेला संकेत कळतांच काळिजांत एकदम धस्स होऊन आपणाशीं ह्मणाला, हें तर आपणावरच आलें. एकवार प्रधानपद गेल्यावर पुनश्च प्राप्त होणें कठिण. असें जाणून अति नम्रभावानें प्रार्थना करून) महाराज, मीच मुख्य प्रधान आहें. माझें पद जेणेंकरून भ्रष्ट न होईल, असें अभय मिळावें. इच्छेप्रमाणें श्रीव्यंकटेशपूजा यथाशक्ति मजकडून होईल. आपली कृपा होऊन माझें हें कार्य होईलच, अशी मी खात्री बाळगतों.

वि०—पूजा तुळसीपत्राची. याहून काय पाहिजे? व्यंकटेश-द्वारीं रिद्धिसिद्धि रावत आहेत. एकवार मनांत आलें पुरे कीं जें पाहिजे तें लागलीच सिद्ध.

**प्रधान०**—( अत्याग्रहानें बरोबर आणलेल्या पांच लक्षांच्या हुंडीचिठ्या पुढें ठेवून) महाराज, या तुळसीपत्राचा स्वीकार व्हावा. माझें पद कायम असल्यास एक दिवसांत या पायांचे प्रसादानें याहूनही अधिक द्रव्य मिळवीन.

वि०—ईश्वरीच्छा. या वेळेस ही तुमची सेवा घेऊन कार्य करावें, असेंच त्याचे मनांत दिसतें. असो, आतां निष्काळजी राहावें. परंतु एक आमचें सांगणें आहे. तें असें कीं, ही गोष्ट राजास समजूं नये. समजल्यास तो व्यंकटेशास दोष लावील. तर हें लांछन न देतां नित्यशः देवदर्शन एकवार घेतल्याखेरीज राहूं नये. मग प्रधान, आज्ञा असें ह्मणून—दिलेला प्रसाद नमस्कारपूर्वक ग्रहण करून गुप्तपणानें आपले वाड्यांत जाऊन स्वस्थ निजला.

दुसरे दिवशीं तो दरबारांत गेल्यावर सहज कांहीं घरगुती कामावरून राजाची मर्जी रुष्ट होऊन ते दिवशीं तो कोणापाशीं कांहींएक बोलला नाहीं. त्यावरून मुख्य प्रधानाचे मनांत खूण पटली. पुढें ही गुप्त वार्ता एकमेकांत कर्णोपकर्णीं पसरून सर्व प्रधानांनीं आपआपलें पद कायम राहावें ह्मणून **विश्वासरावाकडे** जाऊन त्यानें कांहींएक न घेण्याची इच्छा दाखविली असतांहि बळेंच आर्जवानें कोणीं दोन लक्ष, कोणीं एक लक्ष, अशी जशी जशी ज्याची योग्यता,त्या त्या प्रमाणें द्रव्य देऊन त्यांनीं श्री व्यंकटेशाची पूजा केली. आणि नित्यशः दर्शनास येण्याचें कबूल करून पृथक् पृथक् एकमेकांस समजूं न देतां अभय घेऊन गेले.

अशा योगानें **विश्वासरावास** बरेंच द्रव्य प्राप्त होऊन नित्यशः सर्व प्रधान व्यंकटेशाचा प्रसाद घेऊन जात असल्यानें

मानकरी, कारभारी आदीकरून सर्व लोकांत त्याची कीर्ति पसरली. रोजचेरोज मठांत दर्शनाची गर्दी होऊं लागली. पुढें सर्वांस समजलें कीं, जें पाहिजे तें काम श्रीव्यंकटेश महाराजांचे हातून होणार आहे. ह्मणून ज्यांचा गांव, जहागिरी, इनाम, वर्षासनें कांहीं फार दिवसांपासून व कांहीं नुकतीं सरकारांत जप्त झालीं आहेत, व तसेंच ज्यांस नूतन मिळण्याची आशा आहे, त्याप्रमाणेंच ज्या लोकांचे मामले, हजारीपणा, सरनौबती आदीकरून रोजगार बंद झाले आहेत, व ज्यांस नवीन संपादन होण्याची उमेद आहे; असे हितेच्छु लोक कितीएक दिवस श्रीव्यंकटेश महाराजांची एकांतीं गांठ घेण्यास झटूं लागले. आणि भेट झाल्यावर आपआपला कार्यभाग साध्य करून घेण्यास्तव पूजनाबदल कोणी एक वर्षाचें, कोणी सहा महिन्यांचें उत्पन्न देण्याचे संकल्प करूं लागले. अष्टप्रधानादि सर्व मंडळी अंकित असल्यानें कोणतीही गोष्ट केल्यास उघडकीस येणार नाहीं, आणि या वेळेस मातीचें सोनें होण्यासारखी दैवाची अनुकूलताही दिसत आहे, असें मनांत आणून विश्वासरावानें दहापांच लक्षांचे उत्पन्नाचीं एक दोन मोठमोठीं कामें हातीं घेतलीं. आणि एके दिवशीं नित्याप्रमाणें मुख्य प्रधान देवदर्शनास आल्यावर एकांत संधि पाहून त्यास ह्मटलें कीं, दोन ब्राह्मणांच्या जहागिरी सरकारांत फार दिवस जप्त असून ते नित्यशः व्यंकटेशदर्शनास येत असतात, व त्यांची अंतःकरण पुरःसर भक्ति पाहून जहागिरी सुटतील, असा त्यांस प्रसाद मिळाला आहे; जाणून तें श्रय घेण्याचें मर्जीप्रमाणें व्हावें.

प्र०—( हात जोडून ) मी केवळ निमित्त मात्र आहें. असेंच ईश्वराच्या मतांत आल्यावर ही अवज्ञा मजकडून होईल तरी कशी?

वि०—हें जाणूनच वाणी खर्च केली.

प्र०—माझे हातून हीं कामें श्रीव्यंकटेश कृपेनें होऊन यश येवो. असें ह्मणून त्यानें जाण्याची परवानगी घेतली. याचप्रमाणें

युक्तीयुक्तीनें सर्व दरबारी लोकांचा नम्रतेचा रुकार विश्वासरावां-नें भिन्नभिन्नपणें घेतला.

पुढें त्या लोकांकडून अर्जासह सनदा दरबारांत आणवून चौ-कशी सुरू केली. मुख्य प्रधानाचें मत पडल्याप्रमाणेंच सर्वांनीं आप-आपले अभिप्राय देऊन जलदीनें दाखले दप्तरांतून काढले. व जे कारणिक दाखले सरकारदप्तरांत मिळण्यासारखे नव्हते, त्यांविषयीं अनुकूलसे साक्षीपुरावे मसलतीनें घेऊन ठरविलें कीं, यांचा जहागिरी-वर हक्क खरा पोहोंचत असून यांच्या पूर्वजांनीं त्या सनदा मिळवि-ल्या आहेत. त्यांनीं सरकारचीं कामें इमानेइतबारें करून प्रसंगीं फार मदत केल्यामुळें वंशपरंपरा जहागिरी चालूं देऊन कोण्याही राजवंशजानें त्यांस प्रतिबंध करूं नये असें मागील लेखांवरून स्पष्ट होतें. परंतु त्याच ठरावांत एक अटक लिहिली आहे, ती अशी कीं, यांतून जर कोणीं या राज्यांत कपटानें फितूर होऊन दंगा करण्याचा इरादा बाळगून राज्यास अपाय आणील, तर मात्र त्याच्या दिलेल्या सनदा रद्द होतील. त्या ठरावाप्रमाणें वाग-णूक झाली नाहीं व फितुर दिसला ह्मणून दिलेल्या जहागिरी जप्त केल्या आहेत. परंतु हल्लीं चौकशीअंतीं या गोष्टीचा पुरतेपणीं यथान्याय पुरावा पाहातां असें दिसतें कीं, जाणूनबुजून नुकसान व्हावें या हेतूनें यांचे प्रतिपक्षकारांनीं सरकारास खोटीच त्यांची रुवारी दर्शवून सनदा रद्द करविल्या आहेत; असें सर्व कागद-पत्र, व साक्षीपुराव्यावरून पंचानुमतें न्यायदरबारांत ठरतें. आतां ही गोष्ट सरकारास खरी समजल्यावर जहागिरी न सोडणें हें न्याय नव्हे, यासाठीं न्यायसभा पुनः असा ठराव करते कीं, या जहागिरी संपादकांचे औरस वंशज गोविंद शंकर राजोपाध्येय व रामचंद्रपंत सुभेदार यांच्या जप्त केलेल्या जहागिरी परत द्याव्या व पूर्वींचे सनदेप्रमाणें आजपासून सरदेशमुखी, शेंकडा सहोत्र्यासुद्धां ज्यांच्या त्यांच्या त्यांजकडे चालू कराव्या. आणखी एक असा ठराव करणें जरूर दिसतें कीं, या गोष्टीस आज पंधरा

र्थे झालीं, लढाईचे कामांत फितुर करणारे ह्मणून यांचे वडिलांस संग्रामांतून नजरबंद करून परत लाविलें; तेव्हांपासून जप्त केलेल्या जाहगिरींचा वसूल सरकारांत जमा आहे, त्यापैकीं सरकारनजराण्याबद्दल पांच सालचा वसूल वजा घालून बाकी शिलक राहिलेले दहा दहा लक्ष रुपये प्रत्येकानें आपआपली पावती देऊन आजच घेऊन जावे. याप्रमाणें सर्वांचा अभिप्राय पडलासें पाहून राजानेंही तें मंजूर करून त्या ठरावबंदावर आपले सहीची शिक्कामोर्तब केली. आणि लागलीच सन्मानानें त्यांचे हातीं ठरावासह सनदा देऊन पैसा देवविला. त्यांतील निम्मे पैसा बोलल्याप्रमाणें त्यानीं **श्रीव्यंकटेश**चरणीं समर्पण केला. आणि दोघेही आभार मानून आनंदानें तीर्थप्रसाद घेऊन कृतकृत्य होत्साते चालते झाले.

वर लिहिलेल्या युक्तीनें कितीएकांचीं कामें करून सुमार एक वर्षांत **विश्वासरावानें** पांच कोटींची संपदा मिळविली. जी गोष्ट काढावी, ती सर्वांस मान्य होऊन एकदम अष्टप्रधानांचें मत पडत असल्यानें अशींच अनेक प्रकारचीं मोठमोठालीं कामें होत असत. अशी दिवसानुदिवस कृती होत चालली, तेव्हां **विश्वासरावानें** विचार केला कीं, ही गोष्ट आतां कधीं तरी उघडकीस येणार; तर सर्व लोकांची अनुकूलता करून त्यांस आपले अंकित करून घेतल्याशिवाय चांगला परिणाम नाहीं. जाणुन राजाश्रित शास्त्री, पंडित, न्यायाधिश, मौलवी, सरदार, मानकरी, अमीर, उमराव,स्वार, शिबंदी, तोफखान्यावरील व हत्तीखान्यावरील आदीकरून सर्व लोकांस आंतून योग्यतेनुरूप वरचेवर बक्षिसें देऊन वेतनेंही चालू ठेविलीं. मग तर दुर्घट गोष्टही साध्य होण्यास करतलमल झालें. सर्वांस पूर्ण भक्ति लागून जी जी ज्यांस दुर्मिळ वस्तु प्राप्त होई, ती ती ते आनंदानें श्री व्यंकटेश महाराजांस अगत्य असावी, या हेतूनें आणून देत असत. पुढें प्रधानादीकरून सर्वांचे मनांत आलें कीं, श्री

व्यंकटेशास मंदिर नाहीं, तें बांधून द्यावें. त्यावरून भरवस्तींत एक प्रशस्त जागा घेऊन मंदिराचें काम जलमंदिरासह सुरू करण्याचा बेत केला. व मोठमोठाले प्रसिद्ध शिल्पविद्यानिपुण कामगार लोकांकडून त्याचे अप्रतिम तऱ्हेचे नकाशे तयार करविले. आणि तें काम उत्तम होण्यासाठीं त्यांकडेसच तें पुरें करून देण्याचें सोंपविलें. व जागोजागचे नामांकित शिल्पशास्त्रज्ञ कारागीर लोक, उत्तम चंदनाच्या व शिशवीच्या विनडाक तुळया व जें जें तत्संबंधी उंची निवडक सामान, ज्या ज्या ठिकाणीं होतें त्या त्या ठिकाणचे कामगारांस हुकूम लिहून नेमले मुदतींत आणविलें. इकडे राज्यांत नवीं नवीं कामें काढून व त्यांचे आकारणीच्या कामाचे दर ज्यास्ती देऊन त्या फसरींत सामानाची खरेदी करविली. याचप्रमाणें ज्या ज्या कारखान्यावरील कारागीर व मजूरलोक आणले त्यांची हजिरी तिकडेच चालू ठेविली. सारांश व्यंकटेशद्रव्याचें जेणेंकरून जितकें रक्षण होईल याविषयीं सर्वच जपूं लागले. नमुन्याप्रमाणें तीं कामें इच्छेनुरूप एक वर्षाचे आंत सर्व तयार करविलीं. जे वेळेस मंदिरास काम लाविलें, तेव्हांच सभोंवतीच्या वाडीचें संगमरवरी पाषाणमय काम सुरू केलें. आणि आंतील चित्रविचित्र रंगाचे फरसबंदीमधील जलमंदिराचे सभोंवतालीं नानातऱ्हेच्या देशाच्यांचे सुरू, पोफळी, नारळी, आदीकरून वृक्ष; तसेच माळी लोक ठेवून सुगंधी फुलझाडांचे ताटवे, व मधून मधून नामांकित फळझाडें लावून मंदिराचें काम पुरें होण्याचे संधिसच सर्वांस प्रफुल्लता आणविली. मंदिराचे पुढील चौकांतील मुख्य दिवाणखाना पृथक् बैठकीचा दरबारमहाल ह्मणून जो तयार केला होता त्याचें वर्णनच करितां येत नाहीं. नाना तऱ्हेचे मसाले कमवून त्याचे आंतील व बाहेरील बाजूंस गिलाव्याचीं पुटें देऊन त्यांवरून उत्तम कारागीर चितान्यांच्या हातून इन्द्रभुवनादि अप्सरानृत्यासह सुवर्ण शाईनें रेखांकित केलेलीं मोहक अत्युत्कृष्ट

देखाव्याचीं चित्रें जीं पाहण्याबरोबर कितीही मन उद्विग्न असलें तथापि तें स्थिर होऊन सौख्य वाटून तेथून हलावेंसें वाटूंच नये; अशा प्रकारचीं काढलेलीं होतीं. व अस्सल सौगंधिक मैलागिरी चंदनाची खोदीव जाळीदार कोंदणयुक्त कांचनमय केलेली बरीक बिनरेष तक्तपोशी चमकत होती. तसेंच आंतील बिलोरी सामान ठिकठिकाणीं विलसत होतें. जागोजाग बैठकीच्या जागेतून प्रत्येक दालनाच्या बेतानें केलेल्या परांच्या रुजाम्यांवरून उंची गालीचे शोभत होते. सभोंवतालच्या नकशीदार जाळीच्या खिडक्यांच्या व झरुक्यांच्या तावदानांमधून तऱ्हेतऱ्हेच्या रंगांचा प्रकाश पडत असे. दोहों बाजूंनीं चक्राकार मोटमोठाले रुंद जिने काढलेले असून, त्यांतून चढतां उतरतां पायांस न रुतण्यासाठीं ते गजनींच्या गाद्यांनीं मढविले होते. याचप्रमाणें चौफेर तीन मजलेपर्यंत एकसारखी रचना केली असून, आरशाप्रमाणें घोटीव उंच जोत्याचे चार चौक करविले होते. मधील चौकाचे मध्यभागीं श्रीव्यंकटेशाचें मंदिर गंडिकेच्या शिळेचें प्रतिबिंब दाखविणारें अष्टपैलू अपूर्व रचनेचें तयार केलें असून, मधून मधून स्फटिकमय कागदाच्या जाळ्याप्रमाणें खोदीव नक्षीदार जाळ्या काढल्या होत्या. श्रीव्यंकटेशाचे मुख्य गाभाऱ्यांत रत्नखचित् सुवर्णमय सिंहासन करविलें होतें. त्यावर श्रीव्यंकटेशाची मूर्ति सुमुहूर्तानें जलादिभास करून स्थापन केली. तिजला तेजस्वी हिऱ्यांचा मुगुट, भरजरी पोषाग, कंठांत पाचूचें पेंडें व मौक्तिकहार, आणि अंगावर भूषणें घालून उत्सव केला. आणखी एक साधणूक अशी करविली होती कीं, सूर्योदय होतांच सूर्यकिर श्रीव्यंकटेशाचे मुगुटासह मुखावर पडून त्याचें प्रतिबिंब त्या जडावाचे सिंहासनावर पडावें. तें तेज एकवटून चौफेरचे बिलवरी, पैलूदार सोनेरी चौकटीच्या आयन्यांवर पडून सर्व गाभाऱ्यांत अनेक गाभारे दिसावे व तशाच त्यांतून चोहोंकडे मूर्तिही दिसाव्या. त्या तेजावर कोणाचीही नजर न ठरतां वरचेवर नेत्रांस अंधारी

येत असे. अशीच वरील फळसाची रचना सुवर्णमय चित्रविचित्र अप्रातिम देखाव्याची केली होती. आणि त्या मंदिराचे बाहेरील मंडपाचे स्फटिकमय गाभाऱ्यांत जातांना तेथें ज्या ठिकाणीं पाणी खेळविलेलें होतें, त्या ठिकाणीं जमिनीचा भास व्हावा; व जेथें खरीच जमीन होती त्या ठिकाणीं उदक भासून कितीएक धूर्त मनुष्येंही चाचपडून पडत. त्या ठिकाणीं जागोजाग चौफेर चौकांत व बगीच्यांत हौद व कारंजीं तयार करून गोडेपाण्याचे नळ सोडून सर्वच जलभरित करविलें होतें. त्या मंदिराची जलमंदिरासह बागेची व सभोंवतालचे बाडीच्या आंतील संगमरवरी पटांगणाची रचना पाहूं गेल्यास सृष्टींतही दृष्टीस पडणें दुर्लभ.

असो, असें अप्रातिम मंदिर तयार झाल्यावर स्थापन केलेल्या मूर्तीची प्राणप्रतिष्ठा व ब्राह्मणसंतर्पण करावयाचा मुहूर्त लागलीच शास्त्री, व ज्योतिषी, यांच्या मतानें काढून पंचपक्वान्नांचे बेताचा दहा हजार पात्रांचा संकल्प करून मक्ते दिले. मध्यंतरीं एक दिवस ठरलासें पाहून प्रधानानें विनंति केली कीं, महाराज, या समारंभास आपले गुरुबंधु राजेसाहेब येतीलच; आणि आपकीही त्यांस सूचना झाली असेल.

**विश्वा०**—हें काय विचारावें ! हें त्यांचेंच कार्य. त्यांस तर अगोदर येऊन सर्व व्यवस्था ठेवणें प्राप्त आहे. पूर्वींच याविषयीं त्यांनीं सर्व बंदोबस्त ठेविला आहे. आह्मीही सन्मानार्थ आपले ह्मणण्याप्रमाणें त्यांस निमंत्रण करीत आहोंत. असें भाषण होऊन प्रधान उठून गेल्यावर **विश्वामराव** दोन घटकांपर्यंत विचारांत पडला. त्यास वाटलें कीं, हें कृत्य या वेळेस तर उघडकीस येण्याचा समय दिसतो. याचा कांहीं बचाव होऊन केल्याकर्माची साफल्यता अमूनें राहील अशी कांहीं तरी योजना केली पाहिजे. तितक्यांत मनांत उभारणी येऊन काय चिंता आहे ! परमेश्वरकृपेनें सर्व शेवटास निर्विघ्नपणें जाईल, असें ह्मणून अंतर्यामीं श्रीव्यंकटे-

शाची मूर्ति आणून प्रार्थना केली कीं, हे दीनदयाळ प्रभो मीं तुझा आश्रय करून आपल्यास तुझाच असें ह्मणविलें आहे. आणि त्याचप्रमाणें हे देवाधिदेवा! माझा सन्मानही तूं राखीत आहेस, अशीच या समयास आणि पुढें रक्षण करण्याची लज्या तुला असूं दे. ( असें ह्मणून गहिंवरून ) हे देवा! या संधीस माझी परीक्षा पहाण्याचा हा सर्वांचा उद्देश दिसतो. अशी स्तुति करीत असतां एकाएकीं त्यास युक्ति सुचून धैर्य आलें.

इकडे प्रधानांनीं कितीएक क्षेत्रस्थ ब्राह्मणांस 'सन्मानिक पत्र पाठवून संकल्पाप्रमाणें त्या शहरांतील ब्राह्मणसमुदायासह तयारी करविली. नेमल्या वेळेस ब्राह्मणसंतर्पणाची सर्व सिद्धता होऊन यजमान संकल्प सोडण्यास येतील, ते वेळेस सर्व ठिकाणीं सारखा वेत राहून कांहीं न्यूनता न पडावी, ह्मणून मक्ते घेणारांची एकच धांदल उडून गेली होती.

दुसरे दिवशीं तिसरेप्रहरीं मनांतील योजनेप्रमाणें **श्री व्यंकटेशाचें** ध्यान करून लागलीच **विश्वासरावानीं** चोवदारांसह आपली भर्जरी गोंड्यांची पालखी बोलाविली आणि उत्तम शुभ्र पोषाग करून डोकीस व्यंकटेशनामाचा बुट्टीदार मंदिल आणि कंठांत मौक्तिकमिश्रित जडावाचें पेंडें घालून, भर्जरी शालेसहवर्तमान पालखींत बसतांना देवास नमस्कार केला. आणि राजदरबारांत जाण्याविषयीं बरोबरीचे लोकांस सूचना केली. स्वारी बाहेर निघून पुढें भालदार, चोपदार, शिंगें, हलकारे, नौबदी, डंका व व्यंकटेश नांवाचें निशाण या सर्व लवाजम्यानिशीं पुकारत चालली आहे; तों ठिकठिकाणीं वाटेंत असलेले अत्र, स्वार, सिबंदी, जमा होऊन हत्तीघोड्यांसह येऊन मिळाले. अशा थाटानें गजेंद्रदरवाज्यापुढें येतांच एकदम तोफेची सरबत्ती देऊन गोलंदाजांनीं आवाज काढले. ते आवाज ऐकतांच राजा आपले मनांत एकदम चकीत होऊन शोध करणार, इतक्यांत भालदार गर्जनेसह **व्यंकटेशमहाराजांची** स्वारी दरबा-

रांत येऊन पोहोंचली. त्यांस पाहतांच सर्वांनीं एकदम उठून नम्रतेनें मुजरे केले. मानकरी, प्रधान अष्टउंवराव, कारभारी, महान् महान् पंडित, शास्त्री आणि वैदीक ब्राह्मण ज्यांजकडून कोणी कसाही थोर विद्वान् आला तरी असें नम्रतेनें उठून अशी योग्यतेची ताजीम घेणें कधींही झालेंच नाहीं! त्यांत कितीएक षड्शास्त्रांचीं धेंडें ज्यांचें इतरांस नुसतें आसन ढळणेंही दुर्लभ, त्यांसही याजकडील वेतन मिळत असल्यानें त्या प्रसंगीं उठणें भाग पडलें. सर्व लोक एकदम उभे राहिलेसें पाहून राजास असें वाटलें कीं, हा कोणी सर्वांस पूज्य असा महान् साधु आहे. ह्मणून राजा एकदम सिंहासनावरून उठून तो दूरच आहे, तोंच पुढें सरसावला आणि त्यांस साष्टांग नमस्कार घालून नम्रतेनें हातीं धरून सिंहासनावर आणून बसविलें. इतक्यांत धूर्त कारभाऱ्यांनीं पूजेची सिद्धता करून सोन्याचें तवक, योग्यतेप्रमाणें कंठी पोषाकासह आणलें. राजानें लागलीच यथाविधि पूजा करून मोत्याची कंठी व भर्जरी पोषाक त्यांस आर्पण केला. आणि नम्रतेनें हात जोडून तो पुढें उभा राहिला. हें **विश्वासरावानें** पाहून युक्तीनें कांहीं कानीं लागून बोलण्याचा भाव दाखवितांच राजानें वांकून त्यांजकडे कान दिला. तेव्हां **विश्वासरावानें** हळूच भाषण केलें कीं, उदईक **श्री व्यंकटेश**स्थापनेचें ब्राह्मणसंतर्पण आहे, हें आपलेंच असें समजून आपण सर्वांसह प्रसादास येऊन हें कार्य शेवटास न्यावें. यापूर्वीं राजासही समजलें होतें कीं, कोणी महान् व्यंकटेशभक्त साधु या शहरांत आला असून त्यानें अप्रतिम मंदिर बांधण्याचें काम चालविलेलें पुरें होत आलें आहे. तेच हे साधुमहाराज असावे असा त्यानें तर्क केला. मग मनांत ह्मणतो, फार दिवस दर्शन घेण्याची इच्छा होती, ती अनायासें पूर्ण झाली. आतां उदईक मंदिराचें काम पहाण्यांत येऊन, श्री व्यंकटेशाचेंही दर्शन होईल. **व्यंकटेशा**ची भक्ति राजास पूर्वीपासून होतीच, त्यांत या साधूची योग्यता आणि ब्राह्मणभोजनाचें श्रेयस्कर कार्य समजून

लागलीच राजानें प्रधानास आज्ञा केली कीं, उदईक महाराजांचे मंदिरांत ब्राह्मणसंतर्पण आहे, तर हें कार्य आमचेंच असें समजून जें काय सामानसुमान व द्रव्य लागेल तें बिनजेभाट हकडून देऊन तुह्मी स्वतः सर्व व्यवस्था ठेविली पाहिजे. उदईक दहा घटकेच्या अमलांत संकल्प सुटावा. असें बोलून इषारतीप्रमाणें कचेरी बरखास्त असें भालदार पुकारतांच सर्व उठून उभे राहिले. या सर्व गोष्टींमुळें प्रधानास विश्वासरावाची योग्यता ज्यास्तच वाटून त्याचे मनाची आधिक खात्री झाली. नंतर राजानें मोठ्या सन्मानानें बरावर जाऊन श्रीव्यंकटेश महाराजांस स्वतः आपले हातें पालखींत बसवून पोहोंचविलें.

आपल्या ऐश्वर्याचेंसर्वांवर तेज पाडून, चालविलेला क्रम कायम राखून, आपला कार्यभाग शेवटास नेण्याच्या योजनेचा तर्क व चतुरता, एका विश्वासरावावांचून अभ्यास येईल असें वाटत नाहीं.

दुसरे दिवशीं पूर्वीचे बेताप्रमाणें ब्राह्मणसंतर्पणाची सिद्धता होऊन दहा घटकेचे आंत नेमलेल्या जागेंतून हरिद्राकुंकुम मिश्रित रांगोळ्या, पाट व विस्तीर्ण केळीचीं पानें मांडून त्यांवर शाखा, कोशिंबिरी, पक्वानें आदीकरून वाढून तयारी झाली. ब्राह्मण समुदायास मोठ्या आदरानें भोजनास बोलावून आणलें. कोठेंही काहीमात्र कोणास कमी न पडावें यासाठीं त्यावरील मुख्य कारभाऱ्यानें सर्वांस सारखें वाढप पडण्याची उत्तम प्रकारें तजवीज ठेविली होती; व त्याप्रमाणें प्रत्येक पात्रीं मोहोर दक्षणेची आणि तांबुलाची योजना केली होती. श्रीव्यंकटेशाचे मंदिरांतील मुख्य दरबारीदिवाणखान्यांत राजाचे खाशेपंक्तीच्या मंडळीचीं पांचशें पात्रें बसण्याची योजना करून सर्व सिद्धता केली होती, मंदिरांत जिकडे तिकडे वेदघोष चालू होता; इतक्यांत राजाची स्वारी आपले खासे मंडळीसह तेथें येऊन पोहों-

चली. तेव्हां विश्वासरावांनीं मंडळीसह सामोरें जाऊन, जलमंदिरावरील तिसरे मजल्याचे कांचनमय आरसेमहालांत त्यांस अदबीनें आणून बसविलें. तो आरसेमहाल जाडी बिलोरीचा व पैलूदार असल्यानें जिकडे तिकडे हीच मंडळी वेगवेगळे महालांत बसली आहे असें सर्वांस वाटून ते चकित झाले. बाहेर पडण्यास मार्गही दिसेना. त्या जलमंदिराच्या व आरसेमहालाच्या रचनेची शोभा पाहून राजाही अतर्क्य झाला. नंतर राजा लागलीच तेथून उठून याहून आणखी कित्येक चमत्कारिक कामें असतील तीं पाहावीं, या हेतूनें खालीं बगीच्यांत आला; आणि पाहतो तों तेथील पुष्पवटिकेंत चमत्कारिक देशोदेशींचे शोभायमान फुलझाडांच्या हुंड्या चिनीच्या पैलूदार पेल्यांतून लाविल्या आहेत; व मधून मधून चैनीनें बसावयास कोंचें, खुर्च्या ठेविल्या आहेत; तसेंच हजारी कारंज्याच्या उतरणीचे वर्तुलाकार घेरावर लाविलेली हरळी कापून एकसारखी तीन हात रुंदींत व दीड हात उंचींत राखलेली हिरवीगार दिसत आहे; व पुढील हवाशीर जाळीदार शेवाळी बंगल्या सभोंवतीं नानातऱ्हेच्या पालेदार वनस्पतींच्या वेली, मंडपाकार वृक्षांस लपेटून त्यांवरून पसरल्या आहेत. अशा सर्व बागेची अद्भुत हिरवीगार शोभा पाहून तसाच पुढें अति हर्षानें व्यंकटेशमंदिरांत दर्शनास गेला. तों तेथें भगवंताची आर्चा. प्राणप्रतिष्ठा होऊन आर्ती चालली होती. ते वेळेस राजानें देवास पोषाग अर्पण करून जडावाचे सिंहासनावरील **श्री व्यंकटेशाचे** मनमोहक मूर्तीस साष्टांग नमस्कार घातला, आणि भोजनाची तयारी आहे. अशी वर्दी येतांच सर्व खासेमंडळीनिशीं मधील चौकांत पाय धुण्यास जाऊन उष्णोदकानें पाय धुतले. तों लागलीच शिष्यांनी मंदिरांतून आणून दिलेले एकसारखे भर्जरीचे नवीन तकतकीत पीतांबर नेसून त्या मुख्य दरबारी दिवाणखान्यांत सर्व सिद्धता असलेले ठिकाणीं राजासह सर्व येऊन पोंचले. तों तेथील संपत्तीचे

ऐश्वर्य व रेखलेली टापटीप पाहून सर्वांस तटस्थता आली. एकसारखे सुवर्णफुल्यांचे चंदनाचे पाट समांतर हारींनीं मांडलेले खुलत होते. त्यांचे पुढें आंखींव मेरापीदार द्रव्यमिश्रित रांगोळ्यांतून एक सांच्याचे चांदीच्या ओतींव केळीचे पानांवरून स्वादिष्ट पक्वान्नें व सुवर्णाचे द्रोणांतून तूप वाढलें होतें. प्रत्येक पाटाचे बाजूस नासिकचे घाटाचे चांदीचे तांबे, तशाच सुवर्णमिश्रित कोंदणयुक्त गंगाजमनी झाऱ्या, सुगंधोदकानें भरून ठेविल्या होत्या. दोन दोन पात्रांमधून चांदीच्या मोठमोठाल्या समया, व प्रत्येक पात्रासमोर सुवर्ण सोंगव्यांतून सुवासिक अगरबत्त्या प्रज्वलित केल्या होत्या; तसेच जागोजाग मधून मधून जडावाचे तबकांतून मोतिया, सदागुलाब, सुवर्णचंपक, मदनबाण, पारिजातक, निशिगंधादि पुष्पें; व मर्वा, दवणा, पाच भरून त्यांवरून बकुळी, अंबर, पाच, गुलाबी अत्तर मिश्रित गुलाबपाण्याचे तुषार देऊन टेविलीं असल्यानें जिकडे तिकडे त्यांचा परिमळ दरवळून गेला होता.

अशा थाटानें त्या चौसष्टी सुरूचे दिवाणखान्यांत केशरीगंध व कस्तुरीतिलक लावून, संकल्प सुटतांच आनंदानें मंडळी भोजनास बसली. तों अप्सरेप्रमाणें देदीप्यमान् अष्टप्रधानांच्या व मुख्य मुख्य कारभाऱ्यांच्या स्त्रिया, अंगावर जडावाचे दागिने घालून भर्जरी शालू, बुट्टेदार व फुटाण्या पैठण्या, नेसून व उंची उंची तटतटीत कंचुक्या अंगांत घालून पंक्तींतून वाढतांना विजलीप्रमाणें चमकत होत्या. त्यांकडे पाहतांच सर्वांचीं अंतःकरणें चित्रवत् तल्लीन होऊन कितीएकांचे हातांतील कवळही शुद्धि न राहून पात्रांवर पडूं लागले. कितीएक त्यांजकडे टक लागल्यामुळें खाण्याची शुद्धि न राहतां पात्रांतच हात घालून स्वस्थ बसले. यांत मुख्य प्रधानाची स्त्री सर्वांत अतिलावण्यवती **विद्युत्कांती** नामें कधीं कोणाचे दृष्टीस पडली नसून तीही त्या व्यंकटेशकार्यांत पतीच्या आज्ञेवरून आली होती. ते वेळेस असा एक चमत्कार पाहण्यांत आला कीं, त्या दिवाणखा-

त्याचे वरील सोनेरी छतामधील फुलांस अप्रतिम जडावाचें काम केलें होतें, त्यावर,त्या रूपवती स्त्रियांची कांति पंक्तींमधून फिरतांना अलंकारांचे तेजासह पडून, व चांदीच्या पात्रांच्या झिलईचें व रंगी-बेरंगी विलवरी तावदानांचें प्रतिबिंब, दीपप्रकाशानें एकवटून जाऊन एकदम लख्ख प्रकाश अद्भुत देखाव्याचा पडत असे.

याप्रमाणें **विश्वासरावाचें** ऐश्वर्य पाहून, आपला प्रमाद झाला, असें वाटून राजाचे अंतःकरणांत ते वेळेस मोठा राग आला. परंतु त्यानें विचार केला कीं, या प्रसंगीं यांचा विक्षेप करूं नये. राजवाड्यांत जाऊन काय ती तजवीज करावी; ह्मणून आपला हेतु कोणासही समजूं न देतां सर्वांबरोबर मोठ्या आनंदानें भोजन केलें. हा प्रकार **विश्वासराव** धूर्त असल्यानें पंक्तींत समाचार घेत फिरत असतां त्यानें मात्र ओळखून भोजन होऊन आंचवणें होतांच युक्तीनें राजाचा हात धरून एकांतीं त्यास अंतरगृहांत नेलें. आणि पुढें नम्रतेनें उभा राहून हात जोडून ह्मणालाः आज महाराजांच्या अंतःकरणांत श्री व्यंकटेशाविषयीं विपरीत भावना भासून, षड्गुणैश्वर्याच्या ऐश्वर्याचे तुर्यावस्थेचें कार्यपर्याय करण्याचें नृपवर्यांचे मनांत आलें असल्याचें समजलें. यामुळें हा व्यंकटेशदास दीनतेनें नम्र झाला आहे, तर इतकी द्वैत भावना न व्हावी ! मुळींच हें ऐश्वर्य, हें मंदिर व ही सर्व संपत्ति याच चरणाच्या कृपेनें उत्तेजनास आली असून आपलीच आहे. त्या अर्थी घरच्या ऐश्वर्याचें आश्चर्य कां वाटावें? अशी त्याची रस-भरित नम्र वाणी येऊन राजाच्या मनांतील विकल्प जाऊन त्यानें विचार केला कीं, माझे मनांतील गोप्य गोष्ट अन्यास न समजतां यासच समजली, त्या अर्थी या ठिकाणीं कांहीं तरी ईश्वरी तेजाची प्रेरणा खचित आहे. जाणून ह्मणाला कीं, तुह्मी इतके नम्र कां होतां? मी तुमचे वचनांतील पुरतेपणीं भाव समजलों नाहीं. तो सर्व उघड करावा.

**वि०**—अभय असेल तर बोलतों.

राजा—( अंतःकरण निर्वैर होऊन त्यास वचन देऊन ) जें असेल तें निष्कपटपणें सांगावें.

वि०—आपली कृपा ज्या लोहावर होईल, त्याचे अंगीं लागलीच सुवर्णत्व येतें त्या आपल्या कृपारूप परिसाचा एक सहस्रांश मला लाधला. त्या योगानेंच मी या ईश्वरी ऐश्वर्यास चढलों. मग आपली सगळी कृपा ज्याजवर होईल त्याची योग्यता वर्णनच व्हावयाची नाहीं, किंवा आपण या क्षितींतील नादनिधिच आहांत. ह्मणजे, ज्या पात्राचा नाद नादनिधीस ऐकूं जातो, तें पात्र तत्काळ सुवर्णच होतें. तसा माझे दोन बोटांचा नाद माझे दैववशात् आपली स्वारी सहज गजेंद्रदरवाज्यावर आली होती त्या वेळीं आपणास ऐकूं गेला. त्या योगानें, मी या दशेस पोहोंचलों. आज ह्मटलें तर, सर्व आपलेप्रमाणेंच माझे अंकित राज्य आहे. असें बोलून त्यांस ती खूण पटवून द्रव्यसंपादन, व अष्टप्रधानांची कृपा कोणते प्रकारें प्राप्त झाली, हें अवर्णनीय मंदिर कसें तयार झालें, आणि सर्व विद्वानादिकरून लोक मी 'राजसभेंत येतांच कसे नम्र झाले, व आपणही माझा योग्य सन्मान राखिला, अशी पूर्वीपासून योजनेची झालेली सर्व हकीकत सांगून ह्मणाला: मला आतां याचें काय कर्तव्य आहे! हें सर्व ऐश्वर्य, मंदिर, संपत्ति आपल्या करितांच या आपल्या गुरुबंधूनें निमित्तमात्र होऊन पूर्वी सांगितलेले योजनेनें सिद्ध करून ठेविलेली आहे. आतां मला आज्ञा व्हावी ह्मणजे एकवस्त्रानिशीं पूर्वीचे ऐश्वर्यानें ग्रामांतर करतों. शेवटचें हेंच मागणें आहे कीं, अशीच या दीनावर सदोदित कृपा असली ह्मणजे पुरे.

राजा—( विश्वासरावाचे लीनतेनें मनांतील सर्व विपर्यास जाऊन आनंदाचें भरतें आलें, मग त्याची पाठ थोपटून ) शाबास! शाबास! तुमचे सारखा धूर्त, निःस्पृही, चतुर, व तर्कज्ञ पुरुष मीं आजपर्यंत पाहिला नाहीं व ऐकलाही नाहीं. त्यास जी ही सर्व संपदा व ऐश्वर्य, आजच मी जप्त करणार होतों, ती सर्व

पूर्ववत् आपण संभाळून मुख्य दिवाणगिरीचें काम आजपासून तुह्मीं स्वतःपाहून मला सौख्य द्यावें. पहा, जी जी अमूल्य निवडक वस्तु आमचे दरबारांत नाहीं, ती ती या **व्यंकटेशद्वारीं** आज माझे पाहण्यांत आली. अशी संपदा आणि मजप्रमाणें लोकांची अनुकूलता तुह्मीं प्राप्त करून घेतली आहे. वाः! तुमची काय गोष्ट!

**विश्वा०**—मला आतां कारभाराची इच्छा नाहीं. इतकेंच कीं, जसा पूर्वीपासून लोकांत मी आपला गुरुबंधु ह्मणविलों आहें, असाच या पुढें प्रसिद्ध असलों ह्मणजे पुरे. राजानें **विश्वासरावास** बळेंच आग्रह करून त्याजकडून **व्यंकटेशमंदिर** व त्यांतील निम्मे संपदा घेण्याचें कबूल करविलें.

**रा०**—( विनोदानें ) ते दिवशीं मीं तुह्मास एक बोट दाखविलें त्याचा तुह्मीं काय अर्थ करून दोन बोटें दाखविलीं?

**विश्वा०**—आपण तें पक्कानाचें दुकान माझें समजून एक अंशास किती नफा होतो? असें विचारलें; त्यावरून दुप्पट नफ्याचीं मीं दोन बोटें दाखविलीं.

या उत्तरावरून धूर्तपणाविषयीं राजाचे अंतःकरणाची पूर्ण खात्री होऊन आनंदानें त्याचा हात धरून त्या आरसेमहालांत उभयतां आले. पुढें पानसुपारी, अत्तर, फुलें, नाच होऊन निघण्याचे संधीस प्रधानादि लोकांस मोठ्या आनंदानें राजा ह्मणाला: तुह्मीं सर्वांनीं आमचे हे गुरुबंधु **श्रीव्यंकटेश महाराज** ऊर्फ **विश्वासरावनाना** यांचा येथें आल्यापासून उत्तम प्रकारें समाचार घेऊन त्यांस या योग्य दशेस आणलें, यामुळें सर्वांचा मी मोठा आभारी आहें. व असेंच यांचें सदोदित चालवाल अशी आशा करतों. या वचनानें सर्वांचे अंतःकरणास फार आनंद होऊन ते **विश्वासरावाचें** वर्णन करीत आपआपले घरोघर गेले; व राजाही आपले मंदिरीं जाता झाला.

## भाग ९.

एके दिवशीं मुख्य प्रधान, दरबार बंद झाल्यावर राजवाड्यांतील मुख्य दिवाणखान्यांत राजाबरोबर एकटाच जाऊन एकांतीं राजकीय गोष्टी बोलत असतांना ह्मणाला, महाराज, आज मी सहज आमचे स्नेही **चंद्रचूड सावकार** ऊर्फ **बाबा साहेब** यांच्या घरीं गेलों होतों; तेथें दिवाणखान्यांत त्यांची अति लावण्या, मनोरमा, तारुण्यवती **मधुमालती** नामें उपवर कन्या मीं पाहिली. तिच्याप्रमाणें सौंदर्यवान् स्त्री आजपर्यंत माझे पाहण्यांत कधींच आली नाहीं. ती ज्यास प्राप्त होईल, त्यानें अनंत जन्मींच्या तपश्चर्येचें फल मिळविलें, असेंच समजलें पाहिजे. ती आपल्या मनाप्रमाणें आपणास पति मिळत नाहीं येणेंकरून रात्रंदिवस झुरणीस लागली आहे. परंतु तिचा, बापापुढें, कांहीं उपाय चालत नाहीं. मार्गशीर्ष मास संनिध येत चालला जाणून, तिचे बापानें योजिलेल्या वराच्या वडिलास मुद्दाम कित्येक सांडणीस्वार व कारभारी यांजबरोबर स्वदस्तुरचें पत्र पाठविलें कीं, पूर्वीचे तुमच्या पत्राप्रमाणें आह्मीं तुमचे पुत्रास कन्या देण्याचें कबूल केलें आहे. त्याप्रमाणें सर्व तयारी करून येथें यावें. आमचीही सर्व प्रकारें सिद्धता आहे. असें लिहून इकडे मंडप वगैरेंची तयारी करविली. व कित्येक शहरांतील इष्टमित्र, आप्तवर्ग, सोयरेधायरे, यांस मुद्दाम लग्नास येण्याविषयीं पत्रें पाठवून तो मोठ्या आनंदानें लग्नसमारंभास लागला. तों कारभारी व सांडणीस्वार त्या पत्राचें उत्तर घेऊन आजच परत आले. त्यांतील मजकूर, सालमजकुरीं मार्गशीर्षमासीं पुत्राचा विवाह करण्याचा आमचा मानस होता खरा, परंतु हल्लीं आह्मीं कांहीं जहागिरीचे हिश्शाचे कामांत गुंतल्यामुळें सालमजकुरीं लग्नाचा बेत रहित केला आहे. तें पत्र त्यांचे स्वदस्तुरचें पाहतांच, बाबा साहेबांचें अंतःकरण अतिशय खिन्न होऊन ते दुःखी झाले आहेत. आतां काय करावें; सर्वांत हंसें होण्याचा हा प्रसंग परमेश्वरानें मजवर आणला. एकुलती एक लाडकी कन्या जाणून ही सर्व

मंडपादि शोभा लाखों रुपये खर्च करून तयार केलेली आज व्यर्थ जाणार आहे. आपले इष्टमित्र, सोयरे धायरे, खर्च करून येतील; त्यांस काय सांगावें? या विचारसमुद्रांत ते बुडाल्यामुळें संतापानें माझा व त्यांचा इतका स्नेह व ऋणानुबंध असतांही मशीं एकही शब्द न बोलतां तसेच दिवाणखान्यांत उठून गेले. आतां तिला योग्य असा स्वरूपवान्, शहाणा व चतुर आपले **नानासाहेबा**वांचून अन्य वर कोणीही मला दिसत नाहीं. आणि त्यांचेंही लग्न होणें आहे. तस्मात् असा योग जमेल तर उभयतांचेंही भाग्य विशेष. त्या कन्येचें रूप व सौंदर्य देवांगनेप्रमाणें आहे हें राजास माहित असल्यावरून राजाचेही मनांत ही गोष्ट वागली. **चंद्रचूड सावकार** बहुतकरून आपलें वचन मोडणार नाहींत असें जाणून राजानें एक सूज्ञ कारभारी त्यांजकडे पाठविला, व असें कळविलें कीं, फुरसती अंतीं एकवार आमची भेट घ्यावी. हा निरोप पोंचतांच **बाबा साहेब** पालखींत बसून राजदिवाणखान्यांत राजासंनिध येऊन पोहोंचले. राजानें त्यांस योग्यतेप्रमाणें ताजीम देऊन बसविलें. नंतर राजा त्यांस ह्मणालाः—

**राजा**—चंद्रचूड, तुमचेपाशीं एक मागणें आहे, तें योग्य वाटल्यास द्यावें.

**चंद्र०**—महाराज, इतकें आर्जव कशाला? मी आपले कुटुंबांतीलच असल्यानें जी आज्ञा कराल तें मला शिरसा वंद्य आहे.

**राजा**—अशी आमचीही खात्री आहे. पण आजचा प्रसंग लीनतेचा, तो असा. आमचे गुरुबंधु जगप्रसिद्ध **श्रीव्यंकटेश**महाराज ऊर्फ **नानासाहेब** ऐश्वर्यसंपन्न, अल्पवयस्क, तरुण व चतुरस्र असून त्यांचा विवाह होणें आहे. तर आपले कन्येस त्यांजवांचून असा दुसरा वर या सृष्टींत मिळणें दुर्लभ. आपली कशी काय मर्जी आहे? जर रुकार असेल तर पूर्वीं आपण धरलेल्या पंचमीच्या मुहूर्तासच यांचें लग्न लागावें.

तुमची सर्व सिद्धता असल्याचें समजतें. त्याप्रमाणें आमचीही आहेच. असा प्रकार होईल तर आह्मां उभयतांस व सर्वांस ही गोष्ट लौकिकी सुखावह होणार आहे.

चंद्र०—( किंचित् विचार करून ) ज्यांत आमचें हित व लौकिक संपादन होईल, तेंच आपण मागतां. मग या कामीं आमचा नाहकार कसा पडेल? सर्व गोष्टींची काळजी व तजवीज पहाणें आपणासच आहे. तयारी व्हावी. आमचा रुकार आहे. असें ह्मणून लागलीच निश्चयाची सुपारी तेथेंच देऊन **बाबा साहेब** आपले वाड्यांत निघून गेले आणि पूर्वीं झालेलें मनांतील दुःख विसरून ही योजना त्याहून चांगली झाली, ह्मणून त्यांस अतिशय आनंद वाटला.

इकडे लागलेंच राजानें **श्रीव्यंकटेशाचे** मंदिरीं जाऊन एकांतीं **विश्वासरावास** त्यांचे लग्नाचा पंचमीस मुहूर्त ठरवून आल्याचें कळविलें आणि सांगितलें कीं, असलें वधूरत्नही करूं गेल्यास या भूतलीं मिळणेंच नाहीं. **विश्वासरावास** अशी उत्तम वधू मिळत असतांही तिजबरोबर लग्न करण्याचें योग्य वाटेना; व राजाबरोबर तो एकही शब्द बोलेना. कारण, त्याचे मनांत असें आलें कीं, पूर्वीं दैववशात् रत्नपरीक्षेचे संधीस जी वधू मीं पाहिली, व जिनें ऐक्यभावानें मला वरण्याचा निश्चय दर्शविला असतां तो योग दुर्दैवानें घडला नाहीं. तसाच माझाही देखिल तिलाच वरण्याचा दृढ निश्चय झाला आहे. तिजला सोडून मी अन्य स्त्री वरीन तर माझे अंगीं कृतघ्नता येणार आहे. तिला मी व मला ती प्राप्त होईल तरच आमचे आयुष्याचे दिवस नीट जातील. तिनें वचन देऊन मजला दिलेल्या चिठ्ठींत असें दर्शविलें कीं, मला तुमचे वांचून अन्य पुरुष बापाप्रमाणें आहेत. असें असतां आज हा प्रकार मजकडून घडल्यास तिचा सर्व जन्म वृथैव जाणार आहे. आजपर्यंत माझा मित्र **गोपीनाथ** मला भेटला असता तर कधींच उभयतांचा विवाह झाला असता.

पण उपयोग काय? आतां तो कशाचा भेटतो! व तिलाही स्य गडबडींत माझें नांव व ठिकाण समजलें नाहीं. एक मात्र कीं, तिनें माझी तसवीर तेव्हांच काढून घेतल्याचें त्या चिठ्ठींत लिहिलें आहे. आणि तिचीही तसबीर मजपाशीं आहे. अशा उभयतांच्या जवळ परस्परांच्या हुबेहूब तसबिरी आहेत; हाच काय तो शोध लावण्यास मुद्दा दिसतो. जिची मला प्रथम घरीं तसबीर मिळाली, तीच एक वधू. अन्य स्त्री कितीहि रूपवान् असो; परंतु तिजप्रमाणें मोहक सौंदर्य, चतुरता, गांभीर्य व सुहास्यमुख कोणाचेंही नसेल; यांत संशय नाहीं. कित्येक ठिकाणीं मजविषयीं शोध करून ती उदास झाली असेल. इत्यादि तिजविषयीं मनांतील विचार राजाग्रहास्तव संक्षेपांत सांगून तो राजास ह्मणाला:—महाराज! आपण या आग्रहांत पडूं नये. तिजवांचून परस्त्री मी वरणार नाहीं. कदाचित् तिचा शोध न लागला तर मी असाच ब्रह्मचारीव्रतानें राहीन; ह्मणजे दोषास पात्र न होतां परमार्थ साधेल. शेवटीं राजा ह्मणाला: असें जर मला पूर्वींच समजलें असतें तर मी आज त्या सावकारापाशीं आपला शब्द खर्च केला नसता. त्याजला रुकार देऊन सर्व तयारी करविली. आतां नाहीं ह्मणणें हें आह्मांसारख्यांस योग्य नाहीं. जर ही गोष्ट तुह्मी कबूल न कराल तर मला अन्नसाठीं स्थलांतर करणें भाग पडेल. राजास अतिशय संताप आलासें पाहून विश्वासरावानें विचार केला कीं, महाराजांचा अभिशाप आपले माथीं घेऊन सर्व प्रकारें आपली हानि होणार आहे. यासाठीं तूर्त तर यास रुकार द्यावा. असा विचार करून, त्यानें राजास विनंति केली कीं, असेंच जर ठरलें आहे तर मी आपले वचनाबाहेर आहें असें कशास समजतां? झाली ही गोष्ट बरीच आहे. हें ऐकून राजा आल्हादित झाला, आणि ह्मणाला: नानासाहेब, या आपल्या वचनमात्रें माझा संतापवायु हटून चिंता दूर झाली. असो, तुह्मी आतां स्वस्थ राहा, हें कार्य माझें आहे. मी याची सर्व तर्तूद

ठेवून श्री व्यंकटेशकृपेनें पार नेईन. असा संकेत होतांच आनंदानें लागलेंच महालांत जाऊन राजानें मुख्य प्रधान व कारभाऱ्यांस बोलावून मंडपादि सर्व साहित्याची तयारी पहिल्या प्रतीची करण्यास सांगितली. तसेच कितीएक राजे, मोठमोठाले गृहस्थ, विद्वज्जन, व सोयरे धायरे आदिकरून मंडळीस पंचमीचे मुहूर्तास येण्याविषयीं कुंकुममंडित पत्रिका पाठविल्या; व शहरांतील कितीएक वाजंत्री, चौघडे, माळी, गंधी, तांबोळी, आचारी, पाणक्ये, मक्तेदार, आदिकरून कारणिक लोकांस सुपारी दिली.

इकडे चंद्रचूड सावकार घरीं आल्यावर सर्वांस हा मजकूर समजतांच आनंद होऊन जे ते ह्मणूं लागले कीं, कन्येस फार स्थळ चांगलें मिळालें. प्रयत्नानेंही असा योग घडावयाचा नाहीं. अथले जन्मीं मुलीनें चांगल्या हरतालिका पुजल्या, यांत संशय नाहीं. ही शुभवार्ता लागलीच आईनें कन्येचे महालांत जाऊन तिला कळविली. परंतु हें ऐकतांच एकाएकीं डोळे आरक्त करून तिनें धरणीवर धाडदिशीं अंग टाकिलें, आणि प्रयासानें श्वासोच्छ्वास सोडूं लागली! आईनें तिला पोटाशीं धरून उठाविलें,आणि ह्मणाली: लाडके, अशी तुझी अवस्था कां बरें झाली? तुझा विवाह होऊन आह्मी कधीं आनंदानें सोहळा पाहूं; हा ध्यास आह्मास लागून देवानें तुझे सौंदर्याप्रमाणेंच रूपवान्, व ऐश्वर्यसंपन्न वर मिळत असून तुला त्याचा संतोष कां बरें वाटत नाहीं? तुझी ही म्लान मुद्रा पाहून मला फार वाईट वाटतें.

मधु०—आई, तुजवांचून हिताहित माझें कोण पाहील? वर कितीही स्वरूपवान् असो, परंतु आतां माझें तुला हृद्गत सांगणें हेंच आहे कीं, जो माझे मनांत वर वरायाचा आहे त्यावांचून दुसऱ्या पुरुषास मी कधींही वरायाची नाहीं. ( त्याविषयीं आणखी कांहीं जास्ती मजकूर सांगून ) तो सुंदर वर या वेळेस कोठें असेल हें माहित नसल्यानें मी फार दुःखित आहें. आतां इजबरोबर

काय अधिक बोलावें, ह्मणून तिची आई **देवसेना** तशीच खिन्न होऊन महालांत परत गेली.

**चंद्रचूड सावकारानें** स्त्री परत येतांच, तूं हा मजकूर कन्येस कळविलाच असशील असें विचारलें.

**देव०**—काय विचारावयाचें? जळलें मेलें सगळें आपलें असेंच, कधीं कोणता विचार ह्मणून पाहूंच कां नये? ज्या त्या कामांत आपलीच थोरवी मिरवावयाची. हा निश्चय करायाचे अगोदर तिचें थोडें तरी मत घेतलें असतें, तर त्यांत कांहीं पदरास खार लागला नसता. तिच्या मनाप्रमाणें न केलें, तर ती जन्मभर आपले नांवानें खडे फोडील. **नानासाहेबांस** वरण्याचा तर मुळींच तिचा मानस नाहीं.

**चंद्र०**—काय काय? तुह्मी दोघीही मूर्ख आहांत. तुमचे नादीं मी जर लागेन, तर मग आतांच सर्वांची आशा सोडून मला देशोधडीस जावें लागेल! अगे, तुला आणि तिला काय ह्मणावें? त्या **मधुमालती**च्या साम्पतेस असा वर पृथ्वींतही दिसत नाहीं. तिचे मनांत वरावयाचें तरी कोणास? अगर मुळीं लग्नच करावयाचें नाहीं कीं काय? हें तरी कळूं दे.

**देव०**—लग्न करावयाचें नाहीं असें नाहीं. परंतु तिणें आपले आजोळीं कोणीं एक सुकुमार, उदार व सुहास्यवदनाचा पुतळा पाहून तिला त्याचें वेड लागल्यासारिखें झालें आहे. आपणास समजूं देत नाहीं इतकेंच काय तें. पण तिनें तितक्या संधींत यंत्राचे साह्यानें त्याची हुबेहूब तसबीर चतुरतेनें काढून ती आपल्याजवळ जीवाप्रमाणें बाळगून ती रात्रंदिवस तिजकडे पहात बसते. आलीकडे कधीं कधीं त्या नादांत एक एक दिवस तिला अन्न पाण्याचीही शुद्धि राहत नाहीं. असा प्रकार मीं दोन चार वेळां पाहिला. पण काय सांगूं? खरेंच, कां बरें असें होणार नाहीं? होईलच. ती तसबीर फारच मोहक असून, मींही तिणें ठेवलेली खुंटीवरची ती काढून घेऊन एकवार पाहिली, तों अगदीं भांबावून

एक प्रहर तशीच पहात बसलें! ते दिवशीं एक बरें झालें कीं, सोमवार असल्यानें मध्येंच येणें झालें नाहीं; नाहीं तर लागलीच माडीवर येऊन काय करतेस ह्मणून विचारणें झालें असतें. आहाहा! काय ती तसबीर! जर ती पहाणें होईल, तर इकडे सुद्धां वेड लागेल! मग तर मुलीनें प्रत्यक्ष त्यास पाहिलें असून त्याची तसबीरही स्वतः काढून घेतली. मग कां तिची चित्तवृत्ति लुब्ध होणार नाहीं? आतां इतकेंच कीं, तो कोठील व कोण आहे हें ती उद्धट नसून मर्यादशील असल्यानें व आज्याच्या जरबेमुळें तिच्यानें त्याजपाशीं विचारवलें नाहीं.

चंद्र०——तें कांहीं असो. कोणास मर्यादा ह्मणून राहिलीच नाहीं. आतां आह्मी जें कांहीं करतों तें विचार पाहिल्याशिवाय करीत नाहीं असें समज. राजास रुकार देऊन पंचमीच्या मुहूर्ताची त्याजकडून तयारी करवून सुपारीही दिली. आतां तुमचे मनोरथ सर्व व्यर्थ आहेत. कन्येस जाऊन सांग कीं, उगेंच वेड्यासारिखें करूं नको. जेणेंकडून तुझें जन्माचें हित होईल, तेंच आह्मी करूं. लग्न झाल्यावर उलटें तुलाच वाटेल कीं, बरें झालें. तिणें एकवार नानासाहेबांस पाहिलें ह्मणजे तिला फारच आनंद होईल. जा, मध्यंतरीं आनंदांत विघ्न कां आणतेस? अवघे दोनच दिवस राहिले आहेत. तुमचेकडील बायकांस जें कांहीं सामान लागेल त्याची तजवीज करीव. बाकी सर्व सिद्धता मुनिमानें केलीच आहे.

यापुढें आपलें बोलणें व्यर्थ जाणार व जरी मुलीचें ह्मणणें कांहीं अंशीं खरें आहे तथापि, राजापाशीं कबूल करून पुनः नाहीं ह्मटल्यानें आपला सर्वस्वी राजक्षोभानें नाश होणार, असा विचार करून देवसेना फार बरें आहे असें ह्मणून महालांतून उठून घरांत गेली, चंद्रचूडही उठून इष्टमित्र, सोयरे धायरे, व श्रीमान् लोक, जे पत्रिकेच्या निमंत्रणानें आले, त्यांची योग्यतेनुरूप सर्व तर्तूद करण्यास गेला.

इकडे **मधुमालती** आपले महालांत एकटीच चिंतातुर होऊन खिडकीचे झरुक्यापाशीं उदास मुद्रेनें कपाळावर हात टेकून बसली आहे. इतक्यांत **बिंबाधरा, कनकमंजरी, विद्युत्प्रभा,** आणि **मथुरा** या चौघी जिना चढूं लागतात.

आतां या चौघी कोण हें आमचे वाचकांस समजलें पाहिजे, ह्मणून सांगतों.

| नांवें. | त्यांचा संबंध. |
|---|---|
| १. **बिंबाधरा.** | मधुमालतीची सखी. |
| २. **कनकमंजरी.** | प्रधानकुमारी. |
| ३. **विद्युत्प्रभा.** | एक सरदाराची कन्या. |
| ४. **मथुरा.** | उपाध्यायाची मुलगी. |

**मधुमाल०**—( जिन्यांत पाउलें वाजलेलीं ऐकून ) कोण आहेग तें जिन्यांत?

**कनक०**—( मैत्रिणींबरोबर वर येऊन ) कां ! आजच डोळ्यावर आलें! ठीक! आतां कशाचें बाई ओळखूं येतें!

**बिंबा०**—( जिना चढून वर येतांच ) खरेंच बाई, ओळखीचे कां आतां दिवस राहिले आहेत? आतांचें ऐश्वर्य व सत्ता कांहीं वेगळीच.

**मधुमा०**—जळलें मेलें तें ऐश्वर्य! तुह्मास काय वाटत असेल तें वाटो. मला तर बाई उलटा त्रास आला आहे. मेली उगीच थट्टा काय करावी ?

**कनक०**—असें कां आतां ह्मणतेस ! थट्टा कशाची, सगळेंच हातांत. आतां शेंकडों लोक मोठमोठाले विद्वान् असतांही पायांचे रज होतील. काय तुझें भाग्य ! मग आह्मी तुळशी, फुलें निवडावयास तुझेकडे येत जाऊं.

**बिंबा०**—बाई, जसें द्यावें, तसें घ्यावें. तुमचे आमचे कपा-

ळीं या जन्मीं तर नाहींच, पण अन्य जन्मींहि यावरून किती सुख लागेल हें उघडच दिसत आहे.

**मधु०**—एका जन्मावरून सात जन्म ओळखावे.

**विद्युत्प्रभा**—आज इतके तरी शब्द ही आपल्याशीं बोलते. एकदांकां भर्जरी शालू नेसून अंगावर जडावाचे दागिने घालून पालखींत बसून दासींसहवर्तमान पुढें भालदार, चोबदार, लकीबदार, ललकारत पुढें मागें स्वार, हत्यारबंद अरब यांसहवर्तमान मोठ्या थाटानें देवदर्शनास बाहेर निघत जाईल तेव्हां ही नुसत्या वांकड्या नजरेनेंहि आपल्याकडे पाहणार नाहीं; मग बोलणें तें लांबच.

**मथुरा.**—तुमचें सर्वांचें बरें आहे, पण बाई माझें लग्न झाल्यापासून एक दिवस देखील तिकडच्या मुखाचा वारा नाहीं. नेहमीं संहिता कां विंहिता, त्याचें बरोबर नांवही घेतां येत नाहीं, ह्मणत बसतात. काडीमात्र दुसरा उद्योगच नाहीं. मेली रात्रंदिवस फिरफिर माझे मागें लागली आहे. तुह्मांकडे काय? ज्याचें त्यानें आपल्या कर्मानें घ्यावें.

**विद्या०**—ज्याच्या परी त्यास आहेच. मी तर मोठ्याच्या घरीं पडलें आहेना? पण व्यर्थ. खायाला, प्यायाला, लेयाला सर्व आहे, पण करावयाचें काय? तिकडची नेहमीं प्रकृति बिघडलेलीच. एक दिवस देखील मेला काढ्यावांचून चुलीला विसांवा नाहीं. जेव्हां पाहावें तेव्हां कपाळीं आढी.

**कन०**—माझें तर असें नाहींना? हजार पांचशांत देखणे, गौरवर्ण, ती इभ्रत व तो कडकडीत पोशाग, जरबेचें बोलणें, नेहमीं अंगास उटण्यांचा सुवास, ह्यामुळें ज्याला त्याला पाहवेसेच वाटतात. पण कशाचें काय बाई! हातावर पाणी पडण्याचा मात्र अवकाश, कीं आलें बोलावणें. ती कोण मेली त्रिवशी गळां पडली आहेना तिचमुळें ह्मणून मला सुख नाहीं! एखादे दिवशीं घरीं राहणें झालें तर मी आपलेकडून पुष्कळ आर्जव करितें;

पण तिकडे पाहतो कोण? बाई चतुरमासांत मीं रोज विडा करून देण्याचा नेम केला आहे. पण कशाचें काय! डब्यांतले डब्यांतच तो विडा राहातो. त्याची शुद्धिही राहात नाहीं. बरें, कांहीं वेळ घरीं जर बसणें झालें, तर सतारीचा नाद!

विद्युत्०—जाऊं द्याग यांत काय आहे? आपण जिजकडे मोठ्या आस्थेनें आलों, ती तर मुळींच बोलतही नाहीं! चला द्या गोष्ट सोडून, घरीं नाहींका बोलायास जागा? येथेंच काय तुमचें पुरलें आहे?

मधु०—या वेळेस तुह्मी कांहींकां ह्मणानां, माझें चित्त तर बाई अगदीं स्वस्थ नाहीं! तुह्मी येऊन मीं बोलूं नये, असें कांहीं माझे अंगीं वारें आलें नाहीं. पण काय सांगूं? माझें दुःख मीच जाणें!

विबाध०—कां ताप कां येतो आहे?

मधु०—ताप कशाचा?

कनक०—तुह्माला इतकें नाहीं कांग समजत? यौवनभरानें इचा संताप होऊन पतिमुखामृताच्या सेवनेच्छेनें उद्विग्नता आली आहे. हें इची मुद्राच सांगते!

मधुमा०—कसची बाई इच्छा घेऊन बसलीस? जो ह्मणून एकदां देवभक्तीस लागला, तेथें कशीही चतुरस्त्र, सौंदर्यवान् तरुणी स्त्री असली तरी तिला त्याजपासून वांछित विलास व सौख्य कसचें प्राप्त होणार?! विधात्यानें तपश्चर्येच्या बळानें आपल्या हातून असल्या मोहक विलासी स्त्रिया उत्पन्न करते वेळींच आपली मूढपणाची थोरवी राखण्यासाठीं असल्याशीं गांठ न पडेल अशीच तजवीज करून ठेविली पाहिजे; अशी मागें तर कोणीं नाहींच पण आज मी त्यास शपथ घालतें. ही जर तो मान्य करणार नाहीं तर माझ्या सारिख्या कितीएक हतभाग्य स्त्रियांचे दुःखाचा त्यास वांटेकरी व्हावें लागेल.

बिबा०—पुरे पुरे या तुझ्या धर्मशास्त्राच्या गोष्टी. आह्मी

अशा पुष्कळ पाहिल्या आहेत. याहून दुसरा सौंदर्यवान् एक भगवान् मात्र आहे. तूं त्यांस पाहिलें नाहींससें वाटतें. तुला सांगून काय उपयोग? एकदां मी नुकतीच आपले काकासाहेबांबरोबर व्यंकटेशमंदिरीं गेलें होतें. तेव्हां ते नानासाहेब स्नान करून भर्जरी पीतांबर नेसून मंदिरांतील व्यासपीठाजवळ उघड्या अंगानें भगवद्ध्यान करीत उभे होते. तों मदनाप्रमाणें देदीप्यमान् कांती व सुहास्यवदन असून कंठांत पाचमिश्रित मोत्यांचें पेंडें, व हातांत रत्नमुद्रिका लखाकत असल्यामुळें त्यांचे सर्व अवर्णनीय अवयव पाहतांच माझी चित्तवृत्ति अगदीं चंचल होऊन, जीं त्यांणीं तेथील जलमंदिरादि चमत्कारिक शोभा, व दरबारमहाल, मनोरे, आदिकरून लाखों रुपये खर्च करून केलेलीं कामें दाखविलीं, तीं त्या भ्रांतींत कशीं आहेत हें पाहण्याचें मला अगदीं भान राहिलें नाहीं! व त्या वेळीं मीं काय पाहिलें याचेंही मला अगदीं स्मरण नाहीं! तेव्हां काकासाहेबांसही माझी चित्तवृत्ति व्यग्र झालेली समजलीसें वाटतें; कारण, लागलेंच त्यांनीं मला घरीं आणलें. हजारों वर्षें तपश्चर्या केल्यानेंही असा वर मिळणें दुर्लभ; असें तूं पक्कें समज. असें असून तुला काय ह्मणावें? ब्रह्मदेव का वेडा? त्यानें तुझ्या समतेचाच जोडा योजिला असून व्यर्थ त्याला दोष कां लावितेस? इतक्यावर जर त्यांस न वरशील तर तुझें प्रारब्ध! आणखी कोण तुला चांगला वर मिळेल हेंही आह्मी पाहूं. घोडा व मैदान पुढें आहेच!

मधु०—तुली बोलतां हें सर्व खरें. मी कां जाणत नाहीं? हें भाषण सहज मी विनोदार्थ बोललें. त्यांची योग्यता सर्व प्रकारें तशीच आहे. परंतु जी स्थिति परमेश्वरानें आपल्यास दिली आहे त्यांतच संतोष मानणें हें फार चांगलें. जन्मांतरीं केलेल्या पुण्यानें एखाद्याचें आपणापेक्षां शतपट ऐश्वर्य अधिक असलें तरी तिकडे मुळींच लक्ष्य न देतां ज्या स्थितींत आपण आहोंत त्याहूनही दुसऱ्याची कमी असेल, ह्मणजे आपले पायां

जोडा असून दुसरा अनवाणी चालतो आहे त्याजकडे पाहून त्यापे-क्षां तर आपण सुखी आहोंत, हाच सुज्ञांनीं मुख्य सूक्ष्म विचार करून निर्द्रोहतेनें सदैव आनंद मानावा. माझे अंतःकरणगंगेचा ओघ एकवार ज्या सुगुणसागरास मिळाला आहे तो माघारा कसा फिरेल? प्राणापेक्षां अधिक अशी नी पतंगाची प्रीति दीपक-ज्योतीकडे सदृढ जडली आहे, ती कितीही अमूल्य देदीप्यरत्न असलें तरी त्याकडे वळेल काय? ही दुर्लभ नरतनु क्वचित् प्राप्त होणारी ती क्षणभंगुर असतांही कित्येक लोक मा-येच्या भ्रांतीनें सत्य सोडून असत्यास प्रवर्तक होतात, हेंच आश्चर्य! कदाचित् तुह्मी ह्मणत असाल कीं, प्रत्यक्ष विवाह झाला नसून असा त्याजविषयीं निग्रह कां? पहा, पाणिस्पर्शादि आठ प्रकारचे विवाहांपैकीं मानसिकविवाह हा प्रत्यक्ष विवाहाप्रमाणें शास्त्रमान्य आहे. असें असतां, त्यातें त्यज्य करून जर अन्य पुरुषाचे ठिकाणीं मी प्रीति ठेवीन तर मला प्रतिव्रत्यभंगाचा दोष लागेल. सत्यनियमास अनुसरून वागणारी तीच एक साध्वी त्रैलोक्यांत धन्य होय, यांत संशय नको. ज्यास मीं वरण्याचा निश्चय केला आहे, तो कदाचित् न मिळेल तर माझें प्रारब्ध. हें दुःख हा प्राण आहे तोंपर्यंत मला काढणें भाग आहे! असेंच भाळीं असल्यास तेथें कोणाचा उपाय? या एका जन्मांत दुःख सहन करावें लागेल! काय चिंता आहे! (प्रारब्धं कर्मणां भोगादेव क्षयति!) संचित प्रारब्धकर्माचा भोगल्यावांचून क्षय होत नाहीं हेंच खरें. पहा, (श्लो०—पत्रं नैव यदा करीर-विटपे दोषो वसंतस्य किं? नोऽलूकोप्यवलोकते यदि दिवा सूर्यस्य किं दूषणं? धारा नैव पतंति चातकमुखे मेघस्य किं दूषणं? यत्पूर्वं विधिना ललाटलिखितं तन्मार्जितुं कःक्षमः?) **अर्थ**—सर्व वृक्षांस पल्लव फुटत असून करीर ह्मणजे नेप्तीडीचे वृक्षास एकही पान येत नाहीं, ह्मणून हा दोष वसंताचा कीं काय? सर्व पक्ष्यांस दिवसां दिसत असून दिवाभीत जातीचे पक्ष्यांस मात्र

अशा पुष्कळ पाहिल्या आहेत. याहून दुसरा सौंदर्यवान् एक भगवान् मात्र आहे. तूं त्यांस पाहिलें नाहींससें वाटतें. तुला सांगून काय उपयोग? एकदां मी नुकतीच आपले काकासाहेबां-बरोबर व्यंकटेशमंदिरीं गेलें होतें. तेव्हां ते नानासाहेब स्नान करून भर्जरी पीतांबर नेसून मंदिरांतील व्यासपीठाजवळ उघड्या अंगानें भगवद्ध्यान करीत उभे होते. तों मदनाप्रमाणें देदीप्यमान् कांती व सुहास्यवदन असून कंठांत पाचमिश्रित मोत्यांचें पेंडें, व हातांत रत्नमुद्रिका लखाकत असल्यामुळें त्यांचे सर्व अवर्णनीय अवयव पाहतांच माझी चित्तवृत्ति अगदीं चंचल होऊन, जीं त्यांणीं तेथील जलमंदिरादि चमत्कारिक शोभा, व दरबारमहाल, मनोरे, आदिकरून लाखों रुपये खर्च करून केलेलीं कामें दाखविलीं, तीं त्या भ्रांतींत कशीं आहेत हें पाहण्याचें मला अगदीं भान राहिलें नाहीं! व त्या वेळीं मीं काय पाहिलें याचेंही मला अगदीं स्मरण नाहीं! तेव्हां काकासाहेबांसही माझी चित्तवृत्ति व्यग्र झालेली समजलीसे वाटतें; कारण, लागलेंच त्यांनीं मला घरीं आणलें. हजारों वर्षें तपश्चर्या केल्यानेंही असा वर मिळणें दुर्लभ; असें तूं पक्कें समज. असें असून तुला काय ह्मणावें? महादेव कां वेडा? त्यानें तुझ्या समतेचाच जोडा योजिला असून व्यर्थ त्याला दोष कां लावितेस? इतक्यावर जर त्यांस न वरशील तर तुझें प्रारब्ध! आणखी कोण तुला चांगला वर मिळेल हेंही आह्मी पाहूं. घोडा व मैदान पुढें आहेच!

मधु०—तुह्मी बोलतां हें सर्व खरें. मी कां जाणत नाहीं? हें भाषण सहज मी विनोदार्थ बोललें. त्यांची योग्यता सर्व प्रकारें तशीच आहे. परंतु जी स्थिति परमेश्वरानें आपल्यास दिली आहे त्यांतच संतोष मानणें हें फार चांगलें. जन्मांतरीं केलेल्या पुण्यानें एखाद्याचें आपणापेक्षां शतपट ऐश्वर्य अधिक असलें तरी तिकडे मुळींच लक्ष्य न देतां ज्या स्थितींत आपण आहोंत त्याहूनही दुसऱ्याची कमी असेल, ह्मणजे आपले मागांत

जोडा असून दुसरा अनवाणी चालतो आहे त्याजकडे पाहून त्यापेक्षां तर आपण सुखी आहोंत, हाच सुज्ञांनीं मुख्य सूक्ष्म विचार करून निर्द्रोहतेनें सदैव आनंद मानावा. माझे अंतःकरणगंगेचा ओघ एकवार ज्या सुगुणसागरास मिळाला आहे तो माघारा कसा फिरेल? प्राणापेक्षां अधिक अशी जी पतंगाची प्रीति दीपकज्योतीकडे सदृढ जडली आहे, ती कितीही अमूल्य देदीप्यरत्न असलें तरी त्याकडे वळेल काय? ही दुर्लभ नरतनु क्वचित् प्राप्त होणारी ती क्षणभंगुर असतांही कित्येक लोक मायेच्या भ्रांतीनें सत्य सोडून असत्यास प्रवर्तक होतात, हेंच आश्चर्य! कदाचित् तुह्मी ह्मणत असाल कीं, प्रत्यक्ष विवाह झाला नसून असा त्याजविषयीं निग्रह कां? पहा, पाणिस्पर्शादि आठ प्रकारचे विवाहांपैकीं मानसिकविवाह हा प्रत्यक्ष विवाहाप्रमाणे शास्त्रमान्य आहे. असें असतां, त्यातें त्यज्य करून जर अन्य पुरुषाचे ठिकाणीं मी प्रीति ठेवीन तर मला प्रतिव्रतभंगाचा दोष लागेल. सत्यनियमास अनुसरून वागणारी तीच एक साध्वी त्रैलोक्यांत धन्य होय, यांत संशय नको. ज्यास मीं वरण्याचा निश्चय केला आहे, तो कदाचित् न मिळेल तर माझें प्रारब्ध. हें दुःख हा प्राण आहे तोंपर्यंत मला काढणें भाग आहे! असेंच भाळीं असल्यास तेथें कोणाचा उपाय? या एका जन्मांत दुःख सहन करावें लागेल! काय चिंता आहे! (प्रारब्धं कर्मणां भोगादेव क्षयति!) संचित प्रारब्धकर्माचा भोगल्यावांचून क्षय होत नाहीं हेंच खरें. पहा, (श्लो०—पत्रं नैव यदा करीरविटपे दोषो वसंतस्य किं? नोऽलूको प्यवलोकते यदि दिवा सूर्यस्य किं दूषणं? धारा नैव पतंति चातकमुखे मेघस्य किं दूषणं? यत्पूर्वं विधिना ललाटलिखितं तन्मार्जितुं कःक्षमः?) अर्थ—सर्व वृक्षांस पल्लव फुटत असून करीर ह्मणजे नेपाडीचे वृक्षास एकही पान येत नाहीं, ह्मणून हा दोष वसंताचा कीं काय? सर्व पक्ष्यांस दिवसां दिसत असून दिवाभीत जातीचे पक्ष्यांस मात्र

दिसत नाहीं. हा दोष सूर्याकडे काय? चातकाचे मुखांत स्वात्युदकावांचून पर्जन्याचें पाणीच पडत नाहीं. याचा दोष मेघाकडे लावून उपयोग काय? ब्रह्मदेवानें जें भाळीं लिहिलें आहे तें कोणच्यानेंही टाळवत नाहीं!

असें तिचें उपदेशपर भाषण ऐकून तिच्या समवयस्क सर्व मैत्रिणी गलिताभिमान होऊन आपापल्या घरोघर निमूटपणें जात्या झाल्या.

( नंतर दोन घटकांनीं तिची कंदला नामें दासी आली.आणि बाईसाहेबांची प्रकृति बिडलीसें पाहून ) **कंदला**—बाई साहेब! आतां स्वस्थ रहा, उगीच हट्ट धरून उपयोग काय? **बाबा-साहेबांनीं** तुमचे लग्नाची लाखों रुपये खर्च करून सर्व तयारी केली आहे. वाड्यांत काय! जिकडे तिकडे आनंदीआनंद होऊन गेला आहे! आपले खासपागेपुढें हत्ती, घोडे, पालख्या, मेणे, उंट व गाड्यांची एकच गर्दी होऊन, दुसरे चारही वाड्यांतून मोठ मोठाले सावकार, कारभारी, व तुमचे आजोळचें सर्व खटलें येऊन उतरलें आहे. आणखी कितीएक लोक येत असून सर्व वाडे गच्च भरून एकच गर्दी झाली आहे. घरांत कितीएक श्रीमान् लोकांच्या बायका आल्या असून त्यांच्याच तर्तुदीच्या गड-बडींत आईसाहेब गुंतल्या आहेत. लग्नमंडप फारच अपूर्व झाला आहे. जिकडे तिकडे आंतील बाजूस भर्जरी किनखाबी पडदे, हंड्या, सुवर्णपानें, झुंबरें, बिलवरी झाडें, व झालरा, वरील शुभ्र छतास शोभा आणीत आहेत. तशाच तळीं चमत्कारिक रीतीच्या बैटकी, वेगवेगळाल्या कारागिरांनीं साधलेल्या असून त्यांतच एक अप्रतिम जागा हजारमंडळी बसण्यापुरती राजमंड-ळीसाठीं तयार करविली आहे. कितीएक सुरूचीं झाडें खांबांस बांधून मश्रूनें मढविलेलीं आहेत. नगरखान्याचीही जागा अति उत्तम रमणीय झाली आहे. व सर्व मंडळी रात्रंदिवस याच कामीं खपत आहे. इतकें जरी आहे तरी तुमचें अंतःकरण स्वस्थ नसल्यानें मात्र उभयतां दुःखित आहेत! बाई साहेब, तुमचें

अकस्याण व्हावें असें त्यांचे स्वप्नांत तरी कधीं वाटेल ? याचा विचार आपणच करा.

मधु०——हे कंदले ? तूं सांगतेस हें सर्व खरें. पण बाई, काय करूं? जनीं, मनीं, ध्यानीं, स्वप्नीं, त्या सुकुमाराचा ध्यास लागल्यानें त्यास केव्हां पाहीन असें होऊन गेलें आहे! कायगे करूं बाई? मी आईबापांस दुःख द्यावें असाच वांटा उचलला कीं काय? मी ह्मणून त्यांजवांचून अन्यास वरणार नाहीं इतकें जरी चाललें आहे, तरी काय करायाचें ? त्या प्राणसख्यावांचून मला सारें हें जग शून्य भासतें! ( असें बोलतांना नेत्रांतून अश्रु येऊन, फारच कंठ दाटून) हे प्रियसखे कंदले! तुला मात्र मी आपल्या जीवांतली गोष्ट सांगतें. माझा या कामीं काय उपाय चालणार आहे? असो, ईश्वराची मर्जी! पण गडे, तूं कोणापाशीं ही गोष्ट बोलूं नको. उद्यां मी तुझे अथवा दुसरे कोणाचे दृष्टीस जिवंत पडेन, असें माझेंही मन मला ग्वाही देत नाहीं! काय सांगूं? बाई, इतकेंच मात्र वाईट वाटतें कीं, असाच त्यांचाही नियम आहे. कदाचित् माझा हा झालेला प्रकार त्यांस समजला, तर निःसंशय त्यांचीही मजप्रमाणेंच अवस्था होणार! तेही मजवांचून लग्न करणारच नाहींत. ( ती तसबीर हातांत घेऊन ) हे जिवलगा? आतां तुला वारंवार हातांत घेऊन कोण पाहील? तुला आतां मजप्रमाणें जडावाचे पेटींत प्राणापलीकडे कोण सांभाळील! तुशीं लडिवाळपणानें नित्यशः कोण गोष्टी सांगेल? मजवांचून दुसऱ्याचे हातीं रहाणें तुला आवडेल काय?

असे अनेक विचार मनांत आल्यावर ती धरणीवर वरळत पडली. अशी तिची अवस्था पाहून ती चतुरस्त्र कंदला लागलेंच खालीं येऊन आईसाहेबांस हा मजकूर कळवून ह्मणाली: आईसाहेब, यास काय करावें? मला तर तिचें निःसंशय ठीक चिन्ह दिसत नाहीं! या उपर आपणांस जें करणें असेल तें करावें.

देव०——मी तरी काय करूं बाई? तिकडेही पुष्कळ सांगितलें, पण उपयोग काय ? पालथ्या घागरीवर पाणी. दोहींकडून मेली

मला अडचणच. त्यांनीं तरी काय करावें? बरें करण्यास झटावें तों असें कर्म पुढें उभें रहातें. मला पूर्वींच समजलें आहे कीं, मधुमालती वेळेस कांहीं तरी अनर्थ करील! काय करावें या वेड्या मुलीला! तिच्या पुढें तर बाई बोलण्याचा उपायच राहिला नाहीं. कशा एकदां अक्षता त्यां उभयतांवर पडून ईश्वर कार्य शेवटास नेईल कोण जाणे! तो दिवस सुदिन! ( असें ह्मणून ती अगदीं घाबरी होऊन गेली. )

कंद०—आई साहेब, अशा घाबरूं नका. कांहीं तरी योजना आपण काढूं. सावध होऊन बसा, माझे मसलतीनें चलाल तर सर्व अनर्थ टळतील. मी त्यांतील गुह्य सर्व समजलें आहें. "

देव०—तूं तरी बाई याची कांहीं तजवीज कर. मला तर कांहींच सुचत नाहीं.

कंद०—मधुमालतीबाईसाहेबांची तसबीर दोन घटका मज-पाशीं द्या, मग तुह्मास सर्व सांगेन.

देव०—फार चांगलें. कोणीकडून तरी तिला गुण येवो म्हणजे झालें. मग तिनें लागलीच महालांत जाऊन तिची तसबीर दासीस आणून दिली. आणि लौकर परत आण, म्हणून सांगितलें. मग तत्क्षणींच कंदला आपले कार्यास निघून गेली.

नंतर ती मनोवेधक दासी कधीं कधीं देवळांत जाण्याचे नियमाप्रमाणें लागलीच तिसऱ्या प्रहरच्या समयास श्रीत्र्यंबकेश महाराजांच्या दर्शनास गेली. तिचा हा एक मोठा गुण असे कीं, कोणी कसाही असो, परंतु ती आर्जवशक्तीनें सर्वांचीं मनें आपलींशीं करून घेत असे. ती मृदुभाषणी, तरणी व रूपवती असून थट्टेखोर असे. अगोदर देवदर्शन घेऊन सहज नानासाहेबांच्या दर्शनास त्यांच्या खाजगी दिवाणखान्यांत गेली. तों नुकतेच नानासाहेब निजून उठून चूळ भरून कांहीं विचारांत तक्याशीं विडा खात बसले होते. त्यांनीं इला पाहतांच विचारलें कीं, कां कंदले, आज मध्येंच कोणीकडे येणें केलें?

कंद०—महाराजांच्या भेटीची उत्कंठा लागली ह्मणून! पण महाराजांचा आज चेहरा उतरलासा वाटतो. कां, आतां कां असें? श्रीव्यंकटेशाची आपणावर पूर्ण कृपा आहे. आधींच सर्व अनुकूल, तशांत जी मनोरमा माझी मुख्य यजमानीन, तिजकरितां किती एक मोठमोठाले ऐश्वर्यसंपन्न, तरुण, सुस्वरूप राजपुत्रादि जरी ता प्राप्त होत नाहीं, तरी एकवार तिचें नुसतें मुखकमल दृष्टीस पडावें, या हेतूनें भ्रमराप्रमाणें घिरट्या घालीत आहेत. पण तेंही कित्येकांस पाहावयास दुर्मिळ ! आणि प्रस्तुतकाळीं तीच वस्तु आपणास समारंभानें प्राप्त होणार, असें असून मग खिन्न कां? हें कांहींच समजत नाहीं बाई!

वि०—तूं ह्मणतेस हेंही खरेंच आहे. पण काय सांगूं याचें हृद्गतकारण मीच जाणें ! व्यर्थ बोलून वाफ कां दवडावी ? जर मनाप्रमाणें कांहीं होणार असेल तर उपयोग ! तसा योग या हतभाग्याचे कपाळीं कोठचा ?

कंद०—(थट्टेनें) बाई मी तरी तुमचे मनांतील काय सांगूं ? जर मला कांहीं समजेल तर ना ? मग तरी मेलें खरें ह्मणण्यास जागा झाली.

वि०—( ते वेळेस सारें लक्ष इच्छित स्त्रियेकडे असल्यानें ) तिजवांचून कितीही रूपवान् स्त्री असली तरी मला कर्तव्य काय? तुझे यजमाननीचें जे ते वर्णन करून मजपाशीं खात्री करितात; पण जसें मुखरोग्यापुढें मिष्टान्नपात्र, तद्वत् माझ्या कृतसंकल्पापुढें ही झाली आहे !

हें उदास वचन ऐकून तिणें ताडलें कीं, जशी मृगनाभींतच कस्तुरी, किंवा पुष्पांचेच अंगीं सुवास, अथवा भिंतीवरच चित्र, किंवा उदकावरच तरंग सिद्ध असून हीं सर्व आपआपलें स्थळ कोणतें, ह्मणून अज्ञानानें शोध करीत फिरतात; तद्वतच या उभयतांची स्थिति असून ती दृष्टिगोचर नसल्यानें असा हा प्रकार घडून आला आहे. त्यास आतांच मी आपलें गुरुत्व प्रकट करून

ज्याचें त्यास प्रत्यक्ष ब्रह्म दाखवून देतें. असें ह्मणून तत्क्षणीं तिची ती बरोबर आणलेली तसबीर भरजरी रुमालांतून काढून त्यांचे हातांत दिली. ती न्याहाळून पाहतांच **नानासाहेबांस** ओळख पटली. मग काय विचारावें! एकदम पोटांत आनंदाचें भरतें येऊन म्ह- णाले: ही दुर्मिळ वस्तु तुला कशी मिळाली? इचें मुख्य बिंब तुला माहित असावें. तें जर मला भेटवशील तर तुझे उपकार मी आजन्मपर्यंत विसरणार नाहीं.

**कंद०**—महाराज, अगोदर या दासीस आपल्या नांवाप्रमाणें इनाम काय देतां? तें मी आतां हक्कानें मागतें.

इतक्यांत **विश्वासरावानें** ( इच्या हातुन हें कार्य खचित हो- णार, अगर मला सांगून आलेली तीच वधू नसेल म्हणून कशा- वरून? असा तर्क बांधून ) लागलीच दुगोली शालू आणि हजार रुपये तीस बक्षीस दिलें.

**कंद०**—( तें घेऊन ) आतां आपण सर्व खिन्नता सोडून स्वस्थ असा. जी इतके दिवस भ्रांति होती, ती दूर करा. जी माझी यजमानीन, तिचीच ही तसबीर आपले हातीं असून तीच आपली वधू होणार.( हें ऐकून **विश्वासरावाचे** पोटांत आनंद मा- वेना, आणि केव्हां तिजला पाहीन असें होऊन गेलें. असें पा- हून पुनः )—

**कंद०**—महाराज, आतां कां घावरतां? जशी आपली अशी- च माझे बाईसाहेबांचीही अवस्था होऊन अन्नपाणीही वर्ज झालें आहे. ईश्वराची कृपा, म्हणूनच ही आपल्या दोघांची एकता घडली. नाहीं तर उद्यां त्या कोणाच्याच दृष्टीस जिवंत पडण्याचा संभव नव्हता !

**वि०**—हर हर! मजसाठीं असा अनर्थ होणार होताना? असो, **श्रीव्यंकटेशास** आमची काळजी होती, म्हणूनच त्यानें तुजकडून हा योग जमविला. नाहीं तर माझीही काय दशा

होती ती सांगवत नाहीं. असो, व्यंकटेशकृपेनें सर्व काळजी दूर झाली.

कंद०—महाराज, आतां मी बसून काय उपयोग? इतक्या वेळेंतच मागें काय अनर्थ झाला असेल कोण जाणे! हीच काळजी मला लागली आहे. आपली तेवढी तसवीर मजपाशीं द्या ह्मणजे झालें. त्यांस ती दाखवून त्यांची काळजी आतांच जाऊन दूर करतें. असें ह्मणून विश्वासरावानें आपली दिलेली तसवीर घेऊन ती मधुमालतीचे महालांत आली.

मधुमालती तळमळत पडली आहे, इतक्यांत दासी प्रफुल्लित मुखानें आलेली पाहून ह्मणते, कंदले, असा आनंदित चेहरा होण्यास अधिक काय झालें आहे? तें मला सत्वर सांग.

कंद०—तें कांहीं असो. अगोदर साखरपुडा आणि बक्षिसी येऊं द्या! मग पुढचा पुढें विचार.

मधुमा०—साखरपुडा आणि बक्षिसी काय माझे मरणाची?

कंद०—या मुखांतून आतां वाईट शब्द कां काढतां? इतका वेळ मीं तें कबूल केलें असतें. परंतु आतां ती वेळ जाऊन ईश्वरानें चांगले दिवस दाखविण्याचें मनांत आणलें आहे.

मधु०—असा योग एक त्यांचे भेटीवांचून तर यावयाचा नाहीं, आणि या प्रसंगीं तसा प्रकार कोठून होणार? असें कशाचें होतें? उगीच मेलें मन वेडें आहे!

मग कंदलेनें आतां हिला घोटाळ्यांत घालण्याची ही वेळ नाहीं जाणून, लागलीच नानासाहेबांची तसवीर काढून विनोदानें चाळवीत चाळवीत तिचे हातीं दिली.

मधु०—( ती पाहतांच ) शावास! कंदले शावास! या समयीं मी तुझी काय उतराई होऊं? कोठूनगे ही या माझ्या प्राण वांचविणाऱ्याची तसवीर तुला प्राप्त झाली? नको गडे आतां मला चाळवूं! सांग, सांग लौकर.

कंद०—मी काय सांगू बाई ! तुह्मी एवढ्या घाबरलां कां ? शेंकडों इजहून चांगल्या चांगल्या तसबिरी मीं आपले खोलीच्या भिंतीस टांगून ठेविल्या आहेत; त्यांतून ही एक सहज तुह्मास दाखविण्यास आणली आहे. पाहिजे असतील तर ही नेऊन दुसऱ्या आणून देतें, ही तर त्यांच्या पासंगास देखील तुळणार नाहीं.

मधु०—अजून किती बाई माझा अंत पाहतेस ? उगीच काय मेला एखाद्याचा जीव काळजींत घालावा ? ही ज्याची तसबीर आहे, त्याची व माझी लौकर भेट करून देशील, तर जें हवें तें तुला बक्षिस देईन. (असें ह्मणून ती काय उत्तर देते, त्याजकडे कान देऊन तिचे मुखाकडे दीनतेनें पाहूं लागली. )

कंद०—( आतां यांस चाळवून उपयोग नाहीं, असें जाणून) बाईसाहेब स्वस्थ असा. ज्यांची ही तसवीर आहे, तोच जोडा ईश्वरें आपणाला योजिला आहे. असें सांगून ती खालीं तिचे आईकडे गेली.

मधुमालती ही तिची अमृतवाणी ऐकतांच हर्षानें अगोदर मागेंपुढें न पाहतां धांवत जाऊन आईस कडकडून मिठी घालून भेटली. आणि ह्मणाली, आई आई ! येतेसनां माडीवर ? चल तुला कांहीं आनंदाची गोष्ट सांगावयाची आहे. तें मुलीच्या तोंडचें आल्हादयुक्त वचन ऐकून आईस वाटलें कीं, आलीकडे कधींच नाहीं, आणि आजच जेव्हां इला इतका आनंद झाला; त्या अर्थी या वेळेस ईश्वराची आह्मावर पूर्ण कृपा समजली पाहिजे!

आई—काय माझे लाडके, माझे आणि तुझे भाग्योदयाची ही संधि या तुझे आनंददायक भाषणानें आलीसें वाटतें. तु या भ्रांतिपिशाचाची झाडणी करून शुद्धीवर आणणारा, अ तुला महान् पंचाक्षरी कोण मिळाला?

मधु०—या कंदलेसारिखा पुरा गुणकारी दुसरा पंचाक्ष या सृष्टीवर कोण आहे ?

देव०—(कंदलेस हांक मारून) शाबास कंदले !! आज तं

आला सर्वांस थारीं बसवून इचेही प्राण रक्षण केलेस ! काय तुझी योग्यता सांगावी ! आमच्यानें तुझे हे उपकार कधींच फेडवावयाचे नाहींत. कशी काय तोड काढलीस तें सांग.

**कंद**०—आई साहेब, मीं जर हा घाट आज घातला नसता तर उभयपक्षींही ठीक नव्हतें. ईश्वर बुद्धिदाता आहे, हेंच खरें. ज्यां-विषयीं बाईसाहेबांस, व जिच्याविषयीं **नानासाहेबांस**, रात्रंदि-वस ध्यास लागून कांहींच सुचत नव्हतें, तोच प्रस्तुत हा होणारा वरवधूंचा जोडा ब्रह्मसूत्रानें नेमला गेला आहे; अशी परस्परांच्या तसबिरींवरून खात्री होऊन, केव्हां विवाहित भेट होईल अशी उत्कंठा लागून परस्परांस अत्यानंद झाला आहे. मीं तोंडानें सां-गावें असें नाहीं. परंतु योजिलेल्या कल्पनेनें ही आनंदवेळा प्राप्त झाली. **नानासाहेबांचीही** बाईसाहेबांप्रमाणेंच अवस्था झाली होती. आतां उभयतांचीं मनें साल्हादित झालीं आहेत. त्यांचें ईश्वर कल्याण करो.

ते वेळेस मनाप्रमाणें झालें ह्मणून मोठ्या आनंदानें **कंदलेस** तिचे इच्छेप्रमाणें बक्षीस देऊन **देवसेनेनें** बाहेरून यजमानांस ह्मणेनें बोलावून, सर्व हकीकत कळविली. तेणेंकरून सर्वांत एक-च मोठा आनंदाचा वर्षाव झाला.

याचप्रमाणें **विश्रामरावानें**ही राजास आनंदाची वार्ता सां-गतांच, त्यासही परमानंद होऊन मोठ्या उमेदीनें लग्नसमारंभाची त्यानें अधिकच तयारी केली. कितीएक जलद सांडणीस्वार पाठ-विल्यानें, मुख्य मुख्य नात्याचे स्नेही, संबंधी व नजिकचे राजेर-जवाडे, लग्नाचे आदले दिवशीं येऊन पोहोंचले. त्यांच्या योग्यते-प्रमाणें मुख्य कारभाऱ्यांनीं सर्व प्रकारें बंदोबस्त ठेविला. उभय-पक्षींही द्रव्याची कमताई नसल्यामुळें सर्वप्रकारें सिद्धता मोठ्या डामडौलीं थाटानें करविली. राजाकडे सर्व अनुकूल असल्यानें त्या-चा सर्व संगीन बेत थोड्या दिवसांत झाला. परंतु **चंद्रचूड** साव-काराच्या पिढीजात मुनीमानें हळूहळू राजापेक्षांही उत्तम बेत

ठेवला. नंतर उष्टीहळद होऊन मोठ्या थाटानें सीमांतपूजन झालें. मग दुसरे दिवशीं वराकडे हत्ती, घोडे, स्वार, पायदळ, वाजंत्री, ताशेवाले, आदिकरून मोठ्या समारंभानें मूळ पाठवून **विश्वासरावा**स देवदर्शनानंतर अंबारींत बसवून मोठ्या गजरानें आणिलें. ते वेळेस त्यास फारच वाईट वाटून जो गहिंवर आला, तो कांहीं केल्या आवरेना. आईबाप, भाऊबहिणींचें वारंवार स्मरण होई. आपला प्राणदाता, प्रियकर मित्र **गोपीनाथ,** तोही या संधीस हा सोहळा पाहण्यास नाहींना? असो, उपाय काय? असे विचार मनांत येऊं लागले, परंतु विवेकानें त्यानें आपले दुःखाचा परिहार केला. पुढें मोठ्या समारंभानें लग्न लागून अंतरपट सुटून उभयतां स्त्रीपुरुषांची नजरानजर होतांच परस्परांच्या सौख्यास काय विचारावें? आनंदीआनंद होऊन गेला! असो, मग तो अलौकिक लग्नसोहळा सोळा दिवसपर्यंत होऊन राजानें तसेंच **चंद्रचूड** सावकारानें सर्वांस इच्छेप्रमाणें देणग्या दिल्यामुळें त्यांची उभयपक्षींही मोठी कीर्ति झाली.

---

## भाग ६.

एके दिवशीं रात्रीं कधीं कधीं जाण्याच्या सलगीप्रमाणें मुख्य प्रधान **श्यामरावतात्या** आणि **विश्वासरावनाना** हे दोघे स्वच्छ चांदणें पडलेलें पाहून रथांत बसून हवा खाण्यास निघाले. चार घटका इकडून तिकडे फिरून परत येण्याच्या वेळेस सहज राजवाड्यांत गेले. हे दोघेही राजाचे प्रियकर असून एकांतरहस्यांतील असल्यानें लागलीच मुख्य दिवाणखान्यापाशीं जाऊन त्यांनीं आपण आल्याची राजास वर्दी कळविली. ते वेळेस सुमारें रात्रीचे अक्रा वाजले होते. राजा एकटाच एकांतांत बसला असून चिंताग्रस्त झाला होता. हे जातांच त्यानें यांस आंत बोलावून आपले शेजारीं बसविलें. परंतु औदास्य झाल्यानें नित्याप्रमाणें भाषण केलें नाहीं.

**विश्वास०**—( हें पाहून ) कधींच नाहीं आणि आजच सरकारची खिन्न मुद्रा झाल्यानें मी मोठ्या विचारांत पडलें आहे. आणि असें होण्यास कांहीं उघड कारणही दिसत नाहीं. कदाचित् कांहीं असल्यास सरकार, आपल्यान्यानें मला सांगितल्यावांचून राहवणार नाहीं. सदोदित आपले प्रेमसरोवरांत मदंतःकरणकमल डवरलें आहे. विभक्तभाव मुळींच नाहीं. अशीच तात्यांचेही ठिकाणीं आपली ममता आहे.

**राजा**—आमच्या गृहछिद्राची हकीकत तुह्मी दोघेही थोडी थोडी जाणत असाल. पहा, आजपर्यंत हें आयुष्य मीं राजसुखांत घालविलें. ईश्वरकृपेनें सर्व यथास्थित होऊन राज्यही शत्रुरहित झालें. दोन्हीही स्त्रियांस पुत्ररत्नें झालीं. आतां जरी माझी थोडीशी तारुण्यावस्था असून उमेद ताजी आहे तथापि, बरोबरीचे पुत्र होऊन त्यांस सर्व राज्यसंबंध कळूं लागून कारभार करीत आहेत, येणेंकरून मी कृतकृत्य झालों. आतां हा राज्यभार पुत्रांस देऊन आपण उरला काळ परमार्थसाधनीं घालवावा. असा विचार मनांत वारंवार घोंटाळत आहे; परंतु राज्यभार जर **चंद्रकांतास** द्यावा तर तो धाकटा व धाकटे स्त्रीचा असून त्याचा लौकिकांतही पूर्णपणें राज्यावर हक्क पोंचत नाहीं. आणि, थोरलीचे चिरंजीव **भानुकांत** यांची तर काय गोष्ट सांगावी! आज तीन चार वर्षांत त्यांची जी चित्तवृति होऊन गेली आहे, ती तुह्मांस विदितच आहे. रात्रंदिवस हलक्यांचे संगतीनें बिघडून मी असतांही राज्यांत कितीएक वखेडे वारंवार करून सावत्र भावाचें जेणेंकडून वाईट होईल तें करावें, अशी त्याची इच्छा दिसते. कितीएक वेळां त्याच्यावर गुप्त घाला घालण्यास तो प्रवृत्त झाला. परंतु, माझ्या दर्पामुळें तो बेत करण्यास कोणी धजलें नाहीं. कधीं त्याणें कळूं लागल्यापासून चांगले संभाषणानें मला आनंदित केलें असेंही आठवत नाहीं. सदोदित त्याची उमेद आपलाच हेका चालविण्याची असते. अशा दुर्मतीच्या हातीं ही राज्यसंपदा

दिली तर एक वर्षाचे आंतच तिचा शेवट लागेल, बोलावयास नको. या काळजीनें जरी मी तुह्मांमध्यें असून राज्यकारभार पाहतों तथापि, आलीकडे माझी चित्तवृत्ति भ्रांतिष्टासारिखी झाली आहे. याविषयीं स्त्रियांचीं जरी सम्मतें घेतलीं तरी आपापले पुत्राकडे कसेंही असलें तरी त्यांचीं मनें ओढणार. ( असें राजा बोलत आहे तों अंतरंग भालदार पुकारला).

रा०—भालदार, कोण येत आहे?

भाल०—महाराज, गुरुवर्य **वैजनाथभट** दीक्षित आणि **शं-करशास्त्री** बोवा आले आहेत.

इतक्यांत तेही अंतरंगांत येऊन शास्त्रीबोवा अशीर्वाद करतात.

**श्लोक.**

त्वं विश्वपालनकरः कमलानुषंगी ॥ संग्रामसिंह इह शंकरपादसक्तः ॥
कोदंडविश्वजितो भुवनाश्रयश्च ॥ शत्रुस्तथा तव परंतु गतद्यवर्णः ॥१॥

आशीर्वादाअंतीं राजानें उत्थापन देऊन त्यांस योग्यतेनुरूप बसविलें.

रा०—( श्लोकांतील कांहीं भाव समजून ) शास्त्रीबोवा या-आशिर्वचनानें मी फार संतोष पावलों. परंतु जें फल मला, तेंच शत्रूंस दिसतें, याचा निर्णय व्हावा.

शा०—श्रीमंतांनीं याचा पदशः पूर्ण विचार करावा. या श्लोकांतील प्रथम तीन चरणांचे प्रत्येक दोन दोन पदांतील अद्या-क्षरें भिन्न करून पाहिल्यास अपेक्षा पूर्ण होईल. यांतील अर्थ उघड करून दाखवितों. पहा महाराज! आपण विश्वपालन कर-णारे, शत्रू श्वपालन करणारा; आपण कमलानुषंगी, तो मलानुषं-गी; आपण संग्रामसिंह, तो ग्रामसिंह; आपण शंकरपादसक्त, तो करपादसक्त; आपण कोदंडेंकरून विश्व जिंकणारे, तो दंडें-करून विश्व जिंकणारा; आपण भुवनास आश्रय देणारे, तो वनास आश्रय देणारा. याप्रमाणें अंतरलापिकेंतील अर्थ करून दाखवितांच सर्वांनीं वाहवा केल्यावरून उभयतांस वस्त्रालंकारादि पोषाग दिले.

प्रधा०—कां शास्त्रीबोवा, कां दीक्षित, आज अनायासें एकाच प्रसंगीं आपली उभयतांची गांठ पडली. सहज येणें झालेंसें वाटतें?

शा०—वर्तमानकालीं महाराजांची चित्तवृत्ति स्थिर नसून, प्रवृत्तिमार्गांत मात्र गोचर आहे. सरकारास आलीकडे औदास्य भासल्यावरून हृद्गत प्रगट करून त्याचें विवरण व्हावें, अतएव उभयतांचें एकांत आगमन झालें.

प्रधा०—अशा संधीस आपलें येणें फारच चांगलें झालें. आपली धूर्तता वर्णन करवत नाहीं. आतांच याविषयीं कांहीं विचार चालू होता.

राजा—विश्वासराव, आतां आपली याखेरीज रहस्याची मंडळी कोण यावयाची? याच समयीं या गोष्टीचा विचार होऊन सर्वांचे विचारें काय तो पक्का निश्चय ठरवावा.

प्रधा०—( शास्त्रीबोवांकडे आणि दीक्षितांकडे पाहून )सरकारचा हेतु असा आहे कीं, सार्वभौमत्व कनिष्ठ पुत्रास देऊन आपण परमार्थसाधन उरले दिवसांत करावें.

शा०—काय काय? कनिष्ठास काय राज्यकारभार देणार? हा बेत सिद्धीस जाईलसें वाटत नाहीं.

प्र०—कां बरें काय कठिण?

शा०—श्रीमंतांनीं जरी असा विचार केला आहे, तथापि उपयोग काय? अशीच कांहीं गुप्त बातमी समजल्यावरून वाटतें. वडील भानुकांत दुर्मती राजपुत्रानें आज सुमारें एक वर्षभर अविचारी अष्टक मंडळीस साह्य करून त्यांच्या अनुमतानें आपल्या पक्षाचें सुमारें पन्नास हजार सैन्य, स्वार, शिबंदी, हत्यारबंद अरब, दारूगोळयाच्या सर्व तयारीसह जवळ ठेविलें आहे. याचें कारण हेंच कीं, जर आपण हें राज्य कनिष्ठ पुत्रास दिलें तर तो फौजेकडून त्याचा नाश करून आपणास देखील कैदेंत ठेवून आप-

ण स्वतः सर्व राज्यकारभार चालविणार, अशी गुप्त बातमी आ-ह्मांस लागली आहे; ही मी सरकारचे हितार्थ सांगतों. यासाठीं हा विचार सोडून त्यासच राज्य द्यावें ह्मणजे राज्यांत बखेडा न होतां राज्य सुरळीतपणें चालेल.

रा०—( आरक्त नेत्र करून )काय म्हणतां?काय शास्त्रीबोवा, त्या कारट्याच्यानें काय होणार? जरी त्याची अशी जय्यत फौज असली तरी माझ्या लाडक्या **चंद्रकांत** सुमतीचें त्याच्या बंडानें काय व्हावयाचें आहे. आणि मला कैदेंत टाकण्याचें त्याचें तोंड काय आहे? माझे मलाच परके होणार? असें होणार नाहीं समज-लांत? नासलीं मिरीं जोंधळयांस कधीं हार जाणार नाहींत.**श्याम-राव** तात्या, हें एक बरें झालें. कदाचित् शास्त्रीबोवांनीं जर ही गुप्तबातमी मला सांगितली नसती तर त्या कृतघ्न पोरट्यास राज्य द्यावें असेंही माझे अंतःकरणांत आलें असतें. परंतु आतां तर त्यास ती आशा मुळींच धरावयास नको. कां दीक्षित? माझ्या-च्यानें हा हेतु सिद्धीस जाणार नाहीं? कां शास्त्रीबोवा, कां **नाना-साहेब** कसें? बोलत कां नाहीं?

दी०—त्या जंबुकाची आपल्या पराक्रमसिंहापुढें काय तडप चालणार आहे? आपण धरलेला हेतु सिद्धीस न्याल तरच बरें; नाहींपक्षां तो राजा झाला तर थोडक्याच दिवसांत शत्रूंचा रिघाव राज्यांत होऊन दुर्नीतीच्या योगानें सर्व राज्य लयास जाणार. यांत काडीमात्र संशय नको.

म०—श्रीमंतांनीं जो बेत केला आहे हाच ईश्वरी कृपेनें श-वटास जावो. असें न होईल तर सर्व आतांचे कारभारी, मानकरी, वैदिक, शास्त्री, इत्यादिकांस व आह्मांसही अगोदर स्थलांतर करा-वें लागेल. कारण,आतांच **भानुकांत** नुस्ता कांहीं कारभार पाहत आहे यांतच कितीएक बखेडे करीत असल्यानें त्याच्या मताचे मंड-ळी खेरीजकरून सर्व लोक त्यास नाखुषी आहेत. परंतु सरका-रचे चिरंजीव पडल्यामुळें उपाय चालत नाहीं.

राजा०—(सुस्कारा टाकून) फार चांगलें! रे दुष्टा, रे कृतघ्ना! तुला तर मी धुळीस मिळवीन. तूं काय समजला आहेस? पाहूं कसा आतां गादीचा मालक होतोस तो! (असें क्रोधानें बोलून **विश्वासराव** व प्रधान यांस बोट दाखवून) हा बेत लौकर सिद्धीस नेणें तुमचेकडेसच आहे. (पुनः विचार करून) परवांचे दिवशीं अनायासें वर्षप्रतिपदा असून, तो दुष्टही आपले मंडळी· सह अन्यस्थळीं शिकारीस गेला आहे. निदान परत येण्यास त्याजला दोन महिने तरी पाहिजेत. याच मुहूर्तास **चंद्रकांतास** राज्याभिषेक करून पुढील बंदोबस्त नीट ठेवावा. जें होणार असेल तें होवो. परंतु ही बातमी गुप्त ठेवून कोणास परिस्फुट न होऊं देतां एकदम बेत सिद्धीस न्यावा.

याप्रमाणें सर्वांचा एक विचार होऊन सर्व आपापले घरीं निघून गेले.

दुसरे दिवशीं राजानें आपला मनोदय सिद्धीस नेण्याकरितां राज्यांतील मुख्य मुख्य कारभारी, मानकरी आदिकरून मंडळींचीं आपल्या मनाप्रमाणें वेगवेगळीं मतें, आपल्या कार्यास विघ्न न येण्यासाठीं गुप्त घेऊन **वसंततिलका** नामें धाकटे स्त्रीचे पुत्रास ह्मणजे **चंद्रकांतास** वर्षप्रतिपदेच्या सुमुहूर्तानें संकल्पानुरूप मनोत्साहें सिंहासनावर बसवून राज्यांत त्याचे नांवाची चोंहोंकडे द्वाही फिरविली.

तिकडे सुमारें आठ दिवस झाले नाहींत, तों एके दिवशीं राजाचे थोरले चिरंजीव आपले अष्टकासह नुकतेच रात्रौ भोजनोत्तर पानसुपारी होऊन एकांत बसले आहेत; इतक्यांत त्यांचे मंडळीपैकीं एकाकडून मुद्दाम पाठविलेल्या सांडणीस्वारानें येऊन **भानुकांतास** असें कळविलें कीं, तुमचा धाकटा बंधु **चंद्रकांत** यास तुमचे वडिलांनीं गादीवर बसविलें.

मग काय विचारावें? त्या **दुर्मतीचे** तळचीं आग मस्तकीं गेली. तो मोठ्या संतापानें सुस्कारा टाकून अष्टक मंडळीस

ह्मणाला काय हो? ज्या कार्याविषयीं आज दोन वर्षेपर्यंत आपली लाखों रुपये खर्च करून रात्रंदिवस खटपट चालली आहे, त्या हेतुदीपकाचे प्रज्वलतेस शत्रूत्कर्ष सूर्योदय खबरेनें निस्तेजता आणिली. आजपर्यंत तुमचे मतानें मी वागून शेवटीं स्वहस्तानें आपले पायांवर धोंडा पाडून घेतला. तुमची संगतीच मला प्रतिबद्धक झालीसें वाटतें!

**भानुकांत**महाराजांची खिन्न मुद्रा पाहून, सर्वांनीं त्याच वेळेस त्यांचें समाधान करून त्यांस सांगितलें कीं, जरी असा प्रकार झाला आहे तत्रापि आपण तिळमात्र दुःखी होऊं नये. याचा विचार परस्परांचे विचारांतीं एक दोन दिवसांत काढून आपणांस आमच्या साह्याच्या योगानें तेंच पद लवकर प्राप्त होईल असें करूं. असें पुष्कळ प्रकारें त्याचें सान्त्वन करून सर्वांनीं विचार करीत शयन केलें.

दुसरे दिवशीं प्रत्येकानें आपापले मनांत **भानुकांतास** राज्यावर बसविण्याची सुचलेली युक्ति योजिली. आणि रात्रीचे नऊ वाजण्याचे सुमारास एकांतीं सर्व जमले. ते वेळेस राजपुत्रही तेथें आला.

## भानुकांतादि अष्टक.

स्थळ—( बागेंतील मंदिर ).

| पात्रांचीं नांवें. | हुद्दा. |
|---|---|
| १. **भानुकांत** | राजपुत्र. |
| २. **रामचंद्रमामा** | कारभारी. |
| ३. **जगन्नाथजी** | दप्तरदार. |
| ४. **रामप्रसाद** | चिटणीस. |
| ५. **गंगाप्रसाद** | खुषमस्करे. |
| ६. **त्र्यंबकराव** | प्रधान. |
| ७. **गिरिधारीलाल** | सेनापति. |
| ८. **उधोसिंग** | सरसुभेदार. |

याप्रमाणें अष्टक जमल्यावर राजपुत्र ह्मणाला, सेनापति, आपण कशी काय योजना केली?

गिरिधारी—सरकार, आपणापाशीं जय्यत फौज पन्नास हजार एक दिलाची हत्यारबंद, उमेदवार व आवेशाची तयार असून हुकूम होण्याचा मात्र अवकाश पाहत आहे. शिवाय तोफखाना भरपूर सामानाचा आहे. तसेंच पायदळ आणि आमचीहि अनुकूलता आहे, यावरून असें वाटतें कीं, एकदम जाऊन हल्ला करावा. त्यांचीहि जरी फौज पुष्कळ आहे, तथापि ती असावध असून, जागोजागचे बंदोबस्तास पांगली आहे. या योगानें राज्यपद एकदम प्राप्त होईल यांत संशय नको.

त्र्यंबक०—असें करण्यापेक्षां आपणापाशीं इच्छेप्रमाणें द्रव्य आहे, तर राज्यांतील मुख्य मुख्य कारभारी आदिकरून मंडळीस लालुचीच्या योगानें फितूर करून वश करावें, ह्मणजे आपला हेतु सिद्धीस जाईल. आणि हें काम युक्तीनें आम्हीच करूं. येणेंकरून कित्येक स्त्रियांचे सौभाग्यदानाचेंहि श्रेय येईल.

गंगाप्रसाद—असें अयोग्य करणें उक्त नसून ईश्वराचे घरींहि घाताची गोष्ट रुजू पडणार नाहीं. तर माझा या कामीं असा सल्ला आहे कीं, फौजेची आणि द्रव्याची अनुकूलता असून इतका विचार कां? वडिलांकडे एक वकील पाठवून कळवावें कीं, आमचा हक्क असूनही न विचारतां तुह्मी कनिष्ठास राज्य दिलें, ही करणी फारच अयोग्य आपले हातून झाली. असो. पुत्रधर्माप्रमाणें एकवार कळवितों कीं, आमचें पद आमचे हवालीं करावें, नाहींपेक्षां युद्धास यावें. आपण ह्मणाल कीं, आमचेचकडे सर्व साह्य करणारे आहेत; असें होणार नाहीं. कितीएक आमचाही हक्क पाहून पापभीरु आह्मास खचित मिळतील. प्रस्तुत त्यांचीहि आह्मी गरज ठेवीत नाहीं. या वेळेस सर्व लष्कर, फौजफाटा, दारूगोळ्यासह आमची जय्यत तयारी आहे. विचार पाहून काय तें सत्वर कळवावें. असे प्रकारें अगोदर वकीलाकडून सू-

चना देऊन नंतर प्रसंगीं युद्ध करावें. या योगानें निःसंशय आपले हातीं राज्य येईल. कदाचित् युद्धाचाही प्रसंग न येतां राज्य आपोआप मिळेल.

**राजपुत्र**—मामा, तुमचाच विचार मला बरा वाटेल. तुह्मी रात्रभर विचार करून आमचे कल्याणार्थ कोणची कपटयुक्ति योजली आहे ? ती एकवार या आमचे हितेच्छु मंडळीस व आह्मास ऐकवावी; ह्मणजे त्याप्रमाणें करण्यास बरें पडेल.

**मामा**—माझे मसलतीनें आपणांस व इतरांस वाईट वाटून माझा निषेध कराल असें दिसतें, यामुळेंच मी थोड्याशा विचारांत आहें. ह्मणून हा काळपावेतों कांहीं एक बोललों नाहीं.

**राजपुत्र**—मामा, कांहीं एक शंका आपण मनांत आणूं नये. आह्मास खचित ठाऊक आहे कीं, तुह्मी आमचें ज्या योगानें हित होईल तीच गोष्ट कराल. जाणून कशीही गोष्ट असली तरी आह्मी तिचा अव्हेर करणार नाहीं. बोलावें.

**मामा**—आतां माझी शंका निवारण झाली. आपण या आपले अष्टकासह कपटगोसांवी बनून, हा मजकूर आपणांस समजलाच नाहींसें दाखवून, राजास पत्र त्याहावें कीं, आमची तुह्मी आशा सोडावी. आह्मास नर्मदातीरीं एका महान् तापशाच्या योगानें संसारसंबंधी सर्व प्रकारें नैराश्य प्राप्त होऊन प्रत्यक्ष ज्ञानाच्या दीपकज्योतीनें सत्य एक ब्रह्मस्वरूप, यावांचून सर्व मिथ्याभूत भासत आहे. आतां राज्योपभोगादि आशा उरली नाहीं. यासाठीं आमचे पूर्वाश्रमींचे कनिष्ठ बंधु **जगजीवनराव चंद्रकांत सुमती** यांस राज्यावर बसवावें. कदाचित् आपण शंका घ्याल कीं, राजहक्काप्रमाणें वडील पुत्रासच गादीवर बसविल्याविना हें करणें अनुचित होईल; तर असें मनांत आणूं नये. कांहीं दिवसांनीं आमचा मेळा आपले शहरीं **व्यंकटेश**दर्शनास येईल, तेव्हां आह्मी शहराबाहेर आमचे गोसांवीमंडळांत उतरूं. या

येणें ते अगदीं आनंदानें निर्शोक राहतील. आणि पुढें रचलेल्या युक्तिप्रमाणें आपला कार्यभाग साधेल.

**राजपुत्र**—पुढें काय योजना मामा?

**मामा**—आपण तीर्थयात्रा करीत थोडकेच दिवसांत दिल्लीस कांहीं बैरागी मेळ्यानें जाऊन शहराबाहेरील दवणबागेंत राहून बाह्यढोंग बरेंच माजवावें. पुढें आपणांतीलच कोणी सावकार शिष्या होऊन त्यानें त्या बागेंत मठ बांधण्याचें काम सुरू करवावें. व तो मठ बांधते समयीं सर्व आपणांकडूनच कामगार नेमून त्यांचे हातून आंतून गुप्तभुयार करवावें. पुढें भिंतींत व तळघरांत दारूचे भरलेले बुधले ठेवून गंधक, कापूर, सोरा, आदिकरून सामान घालून ठेवावें. नंतर राज्यांतील सर्व विश्वासरावादि कारभाऱ्यांची, राजाची, तशीच अष्टप्रधानांची, आणि सेनापति आदिकरून मंडळीची गोडी राखून त्यांस एके दिवशीं प्रसादास बोलवावें. ते तेथें त्या मुख्य मधील जागेंत बसतांच आंतील आपला सर्व समुदाय बाहेर ठेवावा, आणि मी सांगेन त्या वेळेस मठास आग लावून द्यावी. ह्मणजे सर्वांचा एकदम नाश होऊन राज्य तेच वेळेस आपल्या हस्तगत होईल.

**राजपुत्र**—मामा, यांतील तुमची कांहीं मसलत बरी दिसते. परंतु आग लावून पिता, बंधु, आप्तवर्ग, मित्र, आदिकरून लोकांचा जाळून नाश करावा, हें योग्य वाटत नाहीं. याजपेक्षां एकदम हातीं लागून कैद करण्याचा घाट जमला, तर या मसलतीसारखी दुसरी कोणतीही योजना नाहीं. या लोकांचा नाश करणें, हें कृत्य आमचे हातून घडणार नाहीं. आणि याससंमतही कोणाचें पडेल, असें तर मुळींच मला वाटत नाहीं.

**उधोसिं०**—महाराज, आज्ञा झाल्यास मी बोलतों.

**राजपुत्र**—बोलावें.

**उधोसिं०**—अनायासें याच योजनेप्रमाणें मुख्यमुख्य सर्व मेजवानीस एके ठिकाणीं जमल्यावर, गुप्तरूपी आपले सैन्याकडून श-

ह्यास वेढा घालून, आपण व आपणांकडील कपटरूपी ह्यारवंद एक सहस्र गोसांवीमेळा दर्शनास येईल, त्यांजकडून वागेतले वागेंतच सर्वांस कैद करून बंदोबस्त ठेवावा. ह्मणजे अर्थात्च राजासह सर्व हातांत येतील. हा दारूनें जाळण्याचा घाट मात्र नको. त्या लोकांस कैद करून बंदोबस्त ठेवण्याचें काम मी आपले फौजेकडून स्वतः करवून, आपणास राज्यावर बसवीन.

**राजपुत्र**—शाबास **उधोसिंग** ! ही योजना फार चांगली झाली. असा बेत झाल्यावर सर्व मंडळीस ते दिवशीं स्वस्थ निद्रा लागली.

दुसरे दिवशीं रात्रीं ठरलेल्या संकेताप्रमाणें लागलीच **भानुकांतानें** गौरवाचें पत्र मुद्दाम सांडणीस्वाराबरोबर **दिल्लीस** वडिलांकडे पाठविलें. तें राजा एकांतीं आपले महालांत कांहीं राज्यांतील बंदोबस्ताची व्यवस्था करण्याच्या विचारांत बसला असतां त्याच्या हातीं येऊन पोंहोंचलें. पुत्राचें पत्र कधींच नसून तें खदस्तुरचें आलेलें पाहून लागलीच उतावळे अंतःकरणानें त्यानें तें फोडलें. आंत अतिनम्र मर्यादशील कांहीं चमत्कारिक मजकूर असलेला पाहून त्यास कांहीं दुःख व सौख्य, तसेंच आश्चर्य वाटून लागलीच आपली **विश्वासरावा**सह मंडळी बोलावून आणून सर्वांस तें वाचून दाखविण्यास आरंभ केला.

“ तीर्थरूप धुरंधर सार्वभौम श्रीविराजित गुणैश्वर्यसंपन्न विश्वपालनकर्ते **बाबासाहेब**, राजधानी **हस्तनापुर**,

वडिलांचे चरणसरोजीं,

मकरंदेच्छु सच्चिदानंदस्वरूपसद्गुरूपदेशन सर्वव्यापिच भूतेषु यस्य ब्रह्मबुद्धिरुत्पन्नः असा जो विरक्त, आशानिर्मुक्त बालक, याचा शिरसाष्टांग नमस्कार. विनंति परिसावी, ती अशी कीं, प्रस्तुतकालीं **नर्मदातीरीं** आमचें वास्तव्य सदैव नित्य असून गुरु महाराजां-

च्या प्रमोदक उपदेशेंकरून, सर्व राज्यभोगादि मायिक मृगजलवत् भासलें. आतां कोणतीही इच्छा ह्मणून राहिली नाहीं. आजपर्यंत राज्योपभोगाची इच्छा पूर्ण असून त्या कामीं यत्नही करीत होतों. परंतु आतां तें सर्वोपरी नश्वर मानतों. आमचे प्रियकर बंधु **चंद्रकांत सुमती** यांस सुखेनैव सर्व राज्यकारभार देऊन आपण सर्व आशा सोडून परमार्थसाधनानें देह सार्थकीं लावावा. मीं सांगावें असें नाहीं. दृश्यमान् पदार्थ तितका मिथ्याभूत असून सत्य वस्तु एक ब्रह्म आहे. आपण कदाचित् मनांत आणाल कीं, वडील चिरंजीवाचा राज्यावर हक्क पूर्ण असून, त्यास वर्ज करून धाकट्यास राज्य कसें द्यावें? परंतु ही कल्पना मुळींच बाळगूं नये. कांहीं दिवसांनीं आह्मी तीर्थयात्रा करीत **हस्तनापुरास** व्यंकटेशदर्शनास येऊं. ते वेळीं आपली भेट होईल. तेथें आल्यावर आह्मी शहराबाहेरील दवणबागेंत राहूं. आमचे बरोबर गोसांवीमेळा स्वेच्छाचारी येईल. आतां विशेष लिहीत नाहीं; हें विज्ञप्ति."

हें पत्र पाहून सर्वांस मोठें आश्चर्य वाटलें. कितीएक ह्मणूं लागले कीं, **चंद्रकांताचें** भाग्य मोठें. कारण, आतां सर्व निर्वैर झालें. परंतु **विश्वासरावानें** ताडलें कीं, कांहीं तरी यांत कापट्ययोजना मामाचे मताची असावी. पुढें पाहतां येईल, असें मनांत ह्मणून त्यानें ती गोष्ट तशीच गौप्य ठेविली.

राजास पुत्राचा मोह उत्पन्न होऊन तो ह्मणालाः शाबास मुला ! तूं इतका शुद्धीवर येऊन असा होशील, अशी माझी तर नाहींच, परंतु कोणाचीही खात्री नव्हती. मीच तुजविषयीं कापट्यरूपी ठरलें. इतकी जर तुझी पूर्वीपासून लीन बुद्धि असती, तर तुला मागेंच सौख्यांत ठेवून राज्य अर्पण केलें असतें. आतां उपयोग काय? असो. हें पत्र ऐकून **भानुकांता**विषयीं सर्वांचीं अंतःकरणें निर्वैर झालीं. ह्याप्रमाणें **विश्वासरावासही** अनुमोदन देणें भाग पडलें. कारण, **विश्वासरावानें** विचार केला कीं, या वेळेस

सर्वांचीं मनें साधु राजपुत्र आशानिर्मुक्त होऊन त्याजपासून आतां या राज्यास धोका वसत नाहीं, याविषयीं सक्तबुद्धीचीं झालीं आहेत. आपली मसलत कदाचित् इतरांस रुचेल. परंतु राजास कधींही खरी वाटणार नाहीं. जाणून सर्वांच्या हेतूप्रमाणें त्यानेंही आपलें मत दिलें. मग दिवसानुदिवस राज्यांतील बंदोवस्ताचे कामीं हयगय होत चालली व जे ते आपापले ठिकाणीं निर्भयता मानूं लागले.

पुढें **भानुकांत कुमतीचे** मताकडील मसलत होऊन त्यांचें सर्व सैन्य **सुमतीचे** राज्यांत येऊन मिसळलें. आणि ज्या वेळेस **कुमतीचा** हुकूम होईल ती वेळ साधण्याचे कामीं लक्ष, व वेळेस धांदल न होण्यास आपल्या जय्यत सरंजामाची तयारी गुप्त ठेवून एक विचारें राहिले. त्यांनीं आपला हेतु कोणाचेही उघडकीस न येऊं देण्याविषयीं एकजूट केलें होतें. त्यामुळें त्यांचा कापटय़ वेत कोणाचेही समजुतीस आला नाहीं.

नंतर सुमारें तीन महिन्यांनीं वर्षाऋतूच्या आरंभीं आतां यात्रा करण्याचे दिवस नाहींत असें दाखवून पूर्वी सांगितल्याप्रमाणें **कुमतीनें** आपले अष्टकासह वैरागीवेष धारण करून बरोबर शंभर लोकांनिशीं हातांत सोटे व त्यांत गुप्त शस्त्रें घालून फिरतफिरत ते सर्व **हस्तनापुरास** येऊन पोहोंचले. वडिलांस आपण आल्याची वर्दी पोहोंचवून दवणवागेंतील प्रशस्त बगीच्यांत त्यानें तळ दिला. चिरंजीव पत्राप्रमाणें स्मरण ठेवून वैरागी बनलेला आपले मेळ्यासह भेटीस आल्याचें समजून, राजास, धाकटे भावास, दोघी राण्यांस आणि प्रधानादि पंचकांस अतिशय आनंद होऊन, राजानें नगरवासी जनांसह सुमुहूर्तानें महोत्साहेंकरून त्याची भेट घेतली. **भानुकांत कुमती** व त्याचे अष्टक मंडळीस अशी उपरती होऊन ते परमार्थसाधनीं निरपेक्ष काळ घालवीत आहेत, हें पाहून सर्वांस अतिशय आश्चर्य वाटलें. त्यांची ध्यानपूजनादि आराधना पाहून सर्व लोक वेडावून गेल्यामुळें प्रतिदिनीं देवदर्शनास स्त्रीपुरुषांची पुष्कळ दाटी

जमूं लागली. नित्यशः शहरांतील मोठमोठाले गृहस्थ, सावकार, मानकरी, कारभारी, प्रधान आदिकरून मंडळींचे घरोघर बोवांस मेजवान्या होऊं लागल्या. जिकडे तिकडे त्यांची प्रशंसा होऊन राजासहवर्तमान सर्व लोक आनंद मानून राहिले.

पुढें आश्विनमास येऊन पोहोंचला. ते वेळेस विजयादशमीचे मुहूर्तावर आपला हेतु सिद्धीस न्यावा हा पूर्वसंकेत मनांत आणून, त्या **कुमती**कडील मंडळींनीं राजास सांगितलें कीं, दसऱ्याचे मुहूर्तानें आह्मी आतां तीर्थयात्रा करावयास जाणार, तेव्हां आमचे येथें सर्वांनीं प्रसाद घेऊन आह्मास आज्ञा द्यावी. प्रधानासह सर्वांनीं ही गोष्ट मान्य करून राजाचेंही तीस संमत पडलें. नंतर दुसरे दिवशीं नवमीचे रात्रीं **कुमतीनें** प्रसादाचा बेत ठरवून तयारी करविली. आणि लागलेंच आपले सैन्यानें नगरचा बंदोबस्त नीट रीतीनें ठेवावा व दवणबागेंत एक हजार हत्यारबंद अरबांचे कडवे शिपाई यांणीं येऊन खूण होतांच सर्वांस वेढा घालून नाश न करितां एकदम कैद करावें, असा हुकूम दिला. **विश्वासरावास** हा प्रसादास जाण्याचा बेत समजतांच विचारांतीं पक्कें मनांत आलें कीं, **चंद्रकांत सुमतीचीं** व राजाचीं शंभर वर्षें पूर्ण भरलीं; यांत संशय नको. नंतर **विश्वासरावानें** राजाची एकांत राजवाड्यांत भेट घेऊन कळविलें कीं, आपण सर्व मीनरूपी त्या-**दुष्टभानुकांतकुमती**अष्टकबकाचे घशांत पडणार; हें मी त्यांचें कपटध्यान पूर्वींच समजून चुकलों आहें. तो त्यांचा हल्ला करण्याचा बेत या संधीस दिसतो. जरी ते आपणास नैराश्य दाखवून निष्कपटी दिसत आहेत, तथापि त्यांचे अंतरयामींच्या मसलतीचें सर्व बिंग मी जाणतों. यासाठीं आजचा तिकडे प्रसादास जाण्याचा बेत रहित करावा.

राजा तें ऐकून ह्मणाला, कां, **विश्वासराव**, आपण फारच खोलबुद्धीचे दिसतां! आपलीच कापट्यबुद्धि फार आहे. हा मला पूर्वींच अनुभव आला. रजाचा गज करून दाखविणें हें

आपल्यास सहज आहे. तुम्ही दोन वाटें मला दाखवून सर्व राज्य हातांत आणून कोट्यधीश झालां आहांत. यावरून सर्व लोक आपणासारिखेच असतील, असें जाणून कदाचित् शंका वाटत असेल खरी. परंतु आमचे चिरंजीवाचे हातून अशी गोष्ट आतां होणार नाहीं. आणि त्याजविषयीं असें विपरीत आमचे मनांतही आपण भासवूं नये. कितीही मला सांगितलें तथापि माझे मनांत त्याविषयीं आतां कितु यावयाचाच नाहीं. हें ऐकून **विश्वासराव** निरुपायास्तव ते वेळेस कुंठित झाला. त्यानें विचार केला कीं, येथें कांहीं आपलें चालावयाचें नाहीं. आतां यांजबरोबर आपणासही दुःख सोसणें भाग आलें. आज मी तिकडे न गेलों तरीही दुर्लौकिक होऊन पुनः हें स्थान दुर्मिळ होईल. दुसरीच एखादी युक्ति रचून आपला बचाव करून, पुढें कदाचित् हे संकटांत पडल्यास त्यांस दुःखांतून पार पाडावें. असा बेत ठरवून लागलीच **विश्वासरावा**नें सहज युक्तीनें एक पत्र लिहिलें आणि त्याचा लखोटा करून तो आपले विश्वासु चाकराहातें **कुमतीकडे** पाठविला. नंतर तो लखोटा खुद **कुमतीचे** हातीं दिल्याची खबर आणवून आपले कामास लागला.

इकडे तें पत्र राजपुत्र **भानुकांत कुमतीनें** वाचून पाहतांच आंत मजकूर कीं, " तुमची सर्व राज्य हरण करण्याची कापट्यमसलत जे दिवशीं तुह्मीं आपले वडिलांस निरीच्छतेचें पत्र पाठविलें तेच दिवशीं आम्हीं जाणली आहे. आपण मेजवानीचे वेळेस राजेसाहेब आणि राजपुत्र **चंद्रकांत** आदिकरून राजपंचक, आणि सर्व राज्यांतील मुख्य मुख्य सेनापतिसह हुद्देदार मंडळी यांची धुळधाण करून त्यांजला कारागृहांचें दुःख भोगावयास लावून उद्ईक विजयादशमीचे मुहूर्तानें आपण संकेत सिद्ध करून गादीवर बसणार आहांत, ही तुमची मसलत आजपर्यंत आह्मां खेरीज दुसरे कोणाचेच लक्ष्यांत आली नाहीं; व कोणास माहितही नाहीं. आतां या तुमचे कामास व्यत्यय आणून तुमचा बेत सिद्धी-

प जाऊं न देणें हें आमच्या हातांत आहे खरें, परंतु दुसऱ्याचे कार्यास विघ्न आणणें हें शास्त्रनियमास विरुद्ध आहे. ह्मणून सर्व गोप्य ठेवून तुमचा हेतु तुह्मास कळविला आहे. आतां सर्व मंडळी-बरोबर तुमचे मेजवानीस आह्मासही येणें भाग आहे, तरी आह्मां-विषयीं तिळप्राय शंका मनांत न आणतां करणें तें करावें."

हा मजकूर पाहतांच कुमतीचे मनांत आलें कीं, **विश्वासराव** आह्मांस साह्य आहेत. आणि आपणास राज्य मिळावें, हीही त्यांची पूर्ण इच्छा खरी. आह्मास त्यांचाच मोठा धाक होता कीं, कसें कार्य शेवटास जाईल तें जावो. आतां त्यांची अनुकूलता आहे, त्याअर्थी सहजपणें आपला हेतु सिद्धीस जाईल. आपल्यास त्याचें अंग आहे, हें न समजुतीस येण्याकरितां **विश्वासराव**ही येथें येणार असून त्यांनीं गुप्त पत्र लिहिलें आहे, तर मग आतां **विश्वासराव** जेणेंकडून बंदिस्थ न होईल, अशी तजवीज ठेविली पाहिजे. कदाचित् त्यांस एकंदरींत बंदिस्थ केलें तर आपले अंगीं कृतघ्नता येईल. असें जर न केलें तर आणखी कांहीं मसलतीनें ते विघ्न आणण्यास कधीं कमी करणार नाहींत. त्यांच्या मसलतीपुढें दुसऱ्यांची तोडच चालत नाहीं.

**मामा**—( हें ऐकून ) तो कपटी आहे. आतां तो असेंच आपल्यास वारंवार प्रेम दाखवून पुढें तोच हें राज्य हरमसलतीनें बळकावणार नाहीं कशावरून? त्यास तर अगोदर कैद केलें पाहिजे. जर माझें ह्मणणें न ऐकाल तर परिणाम शुद्ध न होतां दुसरेंच एकादें संकट मध्यंतरीं प्राप्त होईल.

ही गोष्ट खरी आहे, ह्मणून त्यासही कैद करण्याचा निश्चय करून सर्व आपआपले पुढील कृत्यास लागले.

इकडे आपलें वचन राजानें न ऐकल्यामुळें **विश्वासरावानें** त्या अष्टमीचे रात्रीं तेथून मंदिरांत येतांना आणखी एक मोहरबंद लखोटा करून आपले बरोबर आणला. रात्रौ संध्या, देवार्चन, फराळ झाल्यावर दोन घटका भगवत्ध्यान करून मंदिराचा, जाम-

दारखान्याचा, खजिन्याच्या कुलुपांचा व पाहऱ्याचा बंदोबस्त स्वतः पाहिला. नंतर किल्ल्यांचें जुडगें बरोबर घेऊन जलमंदिरावरील कांचनमय आरसेमहालांत सुमारें आकरा वाजतां निजावयास गेला, तों ती सौंदर्यलहरी कृशोदरी **मधुमालती** तेथील तऱ्हेतऱ्हेच्या रंगांचीं बिलवरी झाडें, आदिकरून रोषनाईच्या तेजांत भर्जरी बुट्टेदार तुती रंगाचा चंदेरी शालू नेसून कंठांत मौक्तिक पेंडें रत्नहारादि, तसेच सर्व जडावाचे शोभायमान दागिने अंगावर ठिकाठिकाणीं घालून विद्युत्प्राय लखाकत आहे. त्या ठिकाणीं सोनेरी नकशीदार छपरीपलंगावरील सौगंधिक पुष्पांचे मृदुशय्येभोंवतीचे कपाटांचे खुले पुडांतून चांदीच्या तबकांत तऱ्हेतऱ्हेचीं उंची फळफळावळ, मिठाई, तशाच वाद्यपेट्या, मोतिया, गुलाब, मजमुवादी पंचवीस प्रकारचीं अत्तरें वेगवेगळ्या जडावाच्या अत्तरदाण्यांतून भरपूर ठेविलेलीं, तसेच पुष्पांचे हार, गजरे, तबकांतून तयार असून त्या सुवासांत ती नवयौवनसंपन्न सुंदरी **मधुमालती** आपले अंतरंग दासीसहवर्तमान मोठ्या आनंदानें सुवर्णवर्खी त्रयोदशगुणी जाळीदार केलेले गोविंदविडे हातांत घेऊन आपली मार्गप्रतीक्षा करीत बसली आहे. असें पाहून त्यास फारच वाईट वाटून नेत्र सजलीत झाले. आंत येतांच ती चंद्रानना चंचलतेनें पदर सांवरून दासीसहवर्तमान मर्यादेनें उभी राहिली. इतक्यांत दासी आज्ञा घेऊन निघून गेली. नित्य येतांच मोठ्या प्रेमानंदानें आलिंगन होऊन कांहीं विनोदसंबंधाचीं भाषणें व्हावयाचीं, परंतु ते दिवशीं तसा प्रकार कांहीं नसून खिन्नवदन होऊन उदासीनतेनें **विश्वासराव** पलंगावर येऊन बसले, हें पाहून तिला फार वाईट वाटून विस्मयानें मनांत ह्मणते, आजच कां असें झालें कोण जाणे मजकडून तर कांहीं आज्ञाभंगादि अन्याय दिसत नाहीं. तथापि अतिशय घाबरून आपल्या लाडक्या मंजुळ भाषणानें ती त्यास ह्मणालीः सुमारें एक वर्ष या पायांचा सहवास झाल्यापासून एकही दिवस

अशी उदासवृत्ति झालेली माझे स्वप्नांत देखील पाहण्यांत आली नाहीं. परमेश्वरानें सर्व मनाप्रमाणें द्रव्य, थोरपणा, तशीच ही इच्छित दासी दिली आहे. असें असतां आज अशी खिन्नता कां? असें ह्मणून मोठ्या प्रेमानें त्याचे गळ्यांत मिठी मारिली. तेव्हां त्यास फारच गहिंवर आला.

**वि०**—प्राणसखे, तूं इतकी वेडावलीस कां? तुजकडून कांहींएक अन्याय झाला नाहीं. माझेच ग्रह या वेळेस अनिष्ट दिसतात. आतां तुला मी आपलें गुह्य सांगतों. कारण, सांगितल्यावांचून मलाच राहवत नाहीं. तें सर्व गुप्त ठेव. आईबापांस देखील कळवूं नको. परमेश्वराची कृपा आणि तुझें कुंकु बळकट असेल, तर पुनः उभयतांच्या भेटीचा योग होईल. पहा, उद्यां दवणबागेंत आह्मांसह राजास मेजवानी राजपुत्र **भानुकांता**कडून होणार आहे. परंतु त्यांत ते कपटी सर्वांचा राज्याशेकरितां नाश करतील, अशी खचित माझी मनोदेवता ल्वती. मेजवानींत न जाण्याविषयीं मीं राजास पुष्कळ उपदेश केला, परंतु तो त्यास रुचत नाहीं. त्याचे कर्मानें ओढ घेतली. आह्मी जर तेथें गेलों नाहीं तर सर्वांस आमचें कपट समजून ते आमचा नाश करतील; आणि आजपर्यंत तेथें राहून देखील कृतघ्नपणा अंगीं येणार आहे. यामुळें दुःख वाटून कांहीं सुचत नाहीं! बाकी आह्मी **श्रीव्यंकटेशाच्या** कृपेनें इतक्याही संकटांतून पार पडून जाऊं, यांत संशय नको. परंतु कोण वेळ कशी आहे याचा नेम सांगवत नाहीं. हे चंद्राननें, गजगामिने, तुझे रसभरित मंदहास्यवदनांतील मृदुभाषण, मृगनयनांतील धुंद दृष्टीवरील धनुष्याकृति भृकुटी, तप्तहेमकांति, सरळ नासिका, कुरळ केश, बोटें सरळ व नाजूक असून नखांवर चंद्रज्योत्स्नेचें आरक्त प्रतिबिंब जणूं काय ओतलें आहे! प्रिये, ही अंगुष्ठतर्जनीच्या मध्यभागीं समावेश होणारी तुझी कटी पुनः माझे दृष्टीस कधीं पडेल तो सुदीन! असो, आतां खेद करणें व्यर्थ. ह्मटलें आहे:—श्लोक "कर्मणो हि प्र-

धानत्वं किं कुर्वंति शुभा ग्रहाः ॥ वसिष्ठदत्तेलग्नेऽपि रामः किं भ्रमते वनम् ?" ॥१॥ भावार्थ–सर्वोपरी कर्म श्रेष्ठ आहे. चांगले ग्रह असले तरी उपयोग काय? पहा, प्रत्यक्ष वसिष्ठासारखे सद्गुरूंनीं राज्यावर बसविण्याचा श्रेष्ठ मुहूर्त सांगितला असूनही **अयोध्यापति दशरथनंदन श्रीरामचंद्र** यांस वनवास भोगणें चुकलें नाहीं. असो. जें होणार असेल तें होईल! हे शस्त्ररूपी शब्द त्या सुकुमारीचे जिव्हारीं भेदून तीस अतिशय व्याकुळ करते झाले. एकदम पुढें होणारें दुःख दृष्टीपुढें उभें राहिल्यामुळें तिनें त्याचे कंठास मिठी मारली. अश्रुपातानें उभयतांचींहि वक्षस्थळें वस्त्रांसह भिजून चिंब झालीं. मग मोठ्या दुःखानें ती ह्मणाली:—मत्सौभाग्यरक्षकमंडिता प्राणजीवना **विश्वासराया,** आपणास माहित असून प्राणनाशक सुरी वळेंच उरीं. कां घालावी? आपण जिवंत आहांत तर सर्व यथास्थित. मागें कितीहि सौख्य असलें तरी कर्तव्य काय? एक अशीच कवीराची ह्मण आहे: (आप मुंवे पिछे डुबगई दुनिया) इकडे लक्ष देऊन त्या प्राणनाशक दुःखाचे प्रसादास न जावें. इतरांस सांगितलें असून ते जाणार तर सुखें जावोत. अशा घातांच मरणास उभय लोकींही चांगली गति नाहीं. यापेक्षां सर्वांची आशा सोडून काय जें आपणापाशीं द्रव्य व मालमत्ता आहे, ती **बाबासाहेबांचे** स्वाधीन करून आपण गुप्तपणें हे दुष्ट नाश करतील, यासाठीं बाहेर पडून रातोरात घोड्यांवर बसून दोघेंही जलदीनें दुसरे प्रांतांत निघून जाऊं. पुढें पाहतां येईल. **बाबासाहेबांची** सरकारांत देवघेव नेहमीं असून वजन चांगलें आहे, यामुळें त्यांचे स्वाधीन संपत्ति झाल्यास काडीमात्र तिला धोका लागणार नाहीं. आणि जेव्हां पाहिजे तेव्हां घरांतच आहे. इतक्यावर हें न रुचेल तर ही आपली लाडकी दीन होऊन, इचा मागें काय परिणाम होईल हें सांगवत नाहीं!! जाणेंच असेल तर आपले हातानें या दासीची आतांच प्रीवाईट गोष्ट करून जावें. ह्मणजे पुनः मागची अ[illegible]

असें ह्मणून फारच गहिंवरली. तोंडावाटे शब्द निघेना. **विश्वासरावानें** तिची समजूत केली कीं, मला त्यांजकडून काडीमात्र उपद्रव न व्हावा असा मीं पूर्वींच बंदोबस्त करून ठेविला आहे. राजादि मंडळींचें काय होईल ही मात्र मला काळजी आहे. तूं वेडी आहेस. कोणास आपला जीव नकोसा आहे कीं काय? तुला उदाहरणार्थ एक ऐकिव गोष्ट सांगतोंः " पहा, बादशहापाशीं सहज बिरबल बोलला कीं, सर्व वस्तूंपेक्षां सर्वांस जीव प्यारा आहे. तें खरें करून देण्याविषयीं बादशाहानें त्यास तसदी लाविली. तेव्हां एके दिवशीं त्या धूर्तानें युक्ति योजून एक लहानसा हौद तयार करून त्यास पाणी येण्याचे नळ ठेविले. त्यांत एक वानरी तिचे पिलांसह उभी करून चारी बाजूंनीं ती इकडे तिकडे हलेल, यासाठीं तिच्या अंगास दोऱ्या बांधून त्या मनुष्यांच्या हातीं बळकट धरविल्या. आणि बादशाहानें समक्ष त्या हौदांत पाणी सोडण्यास प्रारंभ केला. तें पाणी जसजसें वर चढत चाललें, तस तसें तिणें ममतेनें आपलीं मुलें आपले अंगावर कंबरेपासून डोकीपर्यंत चढवून घेतलीं. पुढें पाणी तोंडांत जाऊन बुडून मरण्याचा प्रसंग जसा तिला दिसला, तशी ती लागलीच तीं जीवाचीं पिलें असतांही, अंतसमय जाणून त्यांची आशा न करितां लागलीच त्यांस पायांखालीं घालून त्या उंचवट्याचे आधारावर आपले प्राणरक्षणार्थ उभी राहिली. हें बादशाहानें पाहतांच बिरबलाचें भाषण खरें आहेसें समजून अगोदर त्या दोऱ्या सोडवून ती वानरी पिलांसह वांचविली. " प्रिये, याचा अंतर्यामीं शोध करून पहा. व्यर्थ दुःख कशास करितेस? सुखदुःखाची होणारी हकीकत तुजवांचून कोणास सांगावयाची आहे?

इतकें जरी धैर्य देऊन सांगितलें,तरी तिच्या चित्ताचा अगदीं धीर सुटून वेड्यासारखी होऊन ती त्या दुःखार्णवें विव्हळ झाली. वारंवार **विश्वासरावा**च्या मुखाकडे पुनः हें मुख केव्हां दृष्टीस पडेल ह्मणून पाहूं लागली. अशीच त्याचीही अवस्था झाली.

उभयतांचे निरनिराळे विचार चालल्यानें झोंप न लागतां सर्व रात्र सरली. उजाडतांच आपल्या स्त्रीस किंचित् डुकली लागलीसें पाहून, तिला हलवून त्याणें जागें केलें, आणि तो ह्मणाला: प्राणसखे, सावध हो. हा लखोटा घे, व तुझे वडील **बाबासाहेबांस** असाच बंद असलेला उद्यां दे. आज मेजवानींतून मला रात्रीं येण्यास सुमारें बाराही वाजून जातील, नेम नाहीं. याकरितां आजचे दिवस माहेरींच राहून उदईक मंदिरांत येण्याचें करावें. आतां स्वस्थ अंतःकरण करून परमेश्वरावर हवाला ठेव. तोच सर्व विघ्नें पार पाडून आपणांस सौख्य देणारा आहे. ( तिचे डोळ्यांतून प्रेमजीवन आलें पाहून तिचे गळ्यास मिठी मारून ह्मणतो: ) नको! नको रडूं! तुझे या दीन मुखाकडे पाहून माझें अंतःकरण अगदीं धीर सोडतें. किती सांगावें? मला त्याजपासून कांहींएक धोका नाहीं. अशा प्रकारें समजूत करून मेण्यांत बसवून तिला माहेरीं पोंहोंचवितेवेळेस त्याणें आपल्या जीवाच्या कारभाऱ्यास कांहीं बक्षीस देऊन तिचें रक्षण करण्यास व **बाबासाहेब** यांचे आज्ञेंत वागण्यास सांगितलें. मुख्य खजिन्याच्या व जामदारखान्याच्या किल्ल्यांचें जुडगें तशींच जवाहिराच्या डागिन्यांची याद त्या लखोट्याचे पोटीं घालून तिजपाशीं बंदोबस्तानें दिली.

पूर्वी ठरलेल्या बेताप्रमाणें राजा **चंद्रकांत**, अष्टप्रधान, **विश्वासराव**, व शिवाय मुख्य मुख्य राजकीय मंडळी, आदिकरून शंभर लोक ते दिवशीं मोठ्या आनंदानें अस्तमानचे सुमारास सरकारस्वारीसह दवणबागेंत येऊन पोंहोंचले. जातांना **विश्वासरावानेंही** आपलें प्रखर शस्त्र गुप्तपणें घेऊन आपले विश्वासू पांचशें त्रपक सैन्यास दवणबागेंतील बंदोबस्ताकडे पाठवून शहरचे बंदोबस्ताचें काम करवे त्यांस सांगितलें.

राजस्वारी दवणबागेंत गेल्यावर तेथील ठाकूरद्वारांतील, भजन, आर्ती, धुपार्ती, होऊन सर्वांनीं देवाचा तीर्थप्रसाद घेतला. नंतर बंदोबस्ताच्या तयार करविलेल्या मध्य दिवाणखान्यांत पात्रें वाढले-

लीं असून सर्व सिद्धता आहे, अशी सूचना होतांच सर्वजण जाऊन भोजनास बसले. संकेताप्रमाणें शहारांतील नाकेबंदीसुद्धां सर्व प्रकारें बंदोबस्त झाल्याची खबर स्वारानें येऊन **कुमतीस** दिली; आणि ह्मणाला: महाराज, स्वार, तसेच अरबांचे पहारे, दोन हजार हत्यारबंद पायदळ बंदुकींतून बार भरून पेटविलेल्या तोड्यांसहवर्तमान दवणबागेस वेढा घालून मोठ्या आवेशानें आपला हुकूम होण्याची वाट पाहत आहेत. तशाच शंभर तोफाही येऊन तयार आहेत. एकदम कत्तल अथवा कैद करावी ह्मणून हुकुमाचीच मात्र मार्गप्रतीक्षा करित आहेत. त्या मंडळींत **विश्वासराव**ही प्रसादास बसला होता खरा, परंतु त्याचें सारें लक्ष त्या प्रसंगीं काय अनर्थ होईल, याकडे लागून त्यास कांहींच चैन पडेना. तळमळ लागून गेली ! इतक्यांत **कुमतीचे** मंडळींत कांहीं मसलत होऊन सारी मंडळी हळूहळू त्या दिवाणखान्यांतून बाहेर पडली. हा कृत्रिम संकल्प कोणाचे लक्षांत न येतां उत्तम बेत झाल्याचें व पकानांचें वर्णन करण्याचे नादांत सर्व आहेत, तों त्याच संधीस **भानुकांता**चे हुकुमाप्रमाणें अरब लोकांनीं नग्न तलवारी कानांशीं चमकावीत एकदम दीन दीन शब्द करून, त्या **सुमती**सह सर्व मंडळीस वेढा. घालून नाकेबंदी केली. तितक्यांत **विश्वासरावाचे** पूर्वी सांगितल्याप्रमाणें पांचशें लोक तेथें तयारच होते, त्यांनीं ही गडबड होतांच तेथें येऊन मोठ्या चपलतेनें दोन चारशें लोकांस टार करून मोठी कत्तल उडविली. परंतु ते थोडे असून प्रतिपक्षाकडील सैन्य पुष्कळ असल्यानें यांचा त्यांपुढें कांहीं उपाय ,चालला नाहीं. **चंद्रकांता**कडील मंडळीही शूर होती. तथापि हा एकदम आकस्मित् घाला आला असून भोजनसमयीं बरोबर कोणापाशीं एकही शस्त्र नव्हतें. बाहेर पाहतात तों एकच कत्तक उडून गर्दी झाली आहे, यामुळें निरुपाय होऊन युद्धावांचून शत्रूच्या कारागृहांत सर्वांस राहणें भाग पडलें.

नंतर पाहतात तों **विश्वासरावा**वांचून सर्व मंडळी अटकेंत आहे. हें पाहून सर्व अटकमंडळीस मोठा आचंबा वाटून त्यांनीं बाहेर पुष्कळ शोधही केला, परंतु त्याचा कोठेंच कांहीं थांग लागेना; जाणून त्यांस अतिशय धाक पडला. शेवटीं निरुपायास्तव बाकी सर्व मंडळीस वेगवेगळे अटकेंत ठेवून, सभोंवतीं दोन हजार अश्व आणि हत्यारबंद स्वार रक्षणार्थ ठेविले. ते वेळेस राजास **विश्वासरावाचें** स्मरण होऊन, रडें कोसळलें. **विश्वासरावा**चा कोठेंच ठिकाण नसून तो कोणाचेही दृष्टीस पडला नाहीं. भोजनाच्या वेळीं मात्र पाहिला होता, पुढें काय झालें असेल तें असो. राजास वाटलें कीं, ज्या अर्थी त्याचा हे दुष्ट फारच हेवा करितात त्याअर्थी त्याचा आजच्या संधीस त्यांनीं खचित नाश केला असावा. आतां त्यासारखा पुनः चतुर, धूर्त व देखणा मोहोरा दृष्टीस कोठून पडणार?! जर जीवंत असेल तर तो थोड्याच दिवसांत याही संकटांतून आह्मास पार पाडील. पूर्वीच या दुष्टांचे कृतघ्नकर्माविषयीं त्यानें सांगितलें असतांही मीं त्याचा अव्हेर करून निर्भर्त्सना केली. याजमुळें त्यास अतिशय वाईट वाटलें खरें, परंतु तो मर्यादेनें मला एकही प्रत्युत्तर न देतां तसाच उठून गेला. असो.आतां बोलून काय उपयोग?इतकी पदरीं मंडळी आहे, पण त्याजवांचून राजकार्य करण्यास योग्य असा एकही नाहीं. आतां या माझ्या लाडक्या **चंद्रकांत सुमतीस** बंदीचें दुःख भोगणें प्राप्त आहे. असो. सर्वच विपरीत! **विश्वास-रावाचें** ऐकिलें असतें, तर हा प्रसंग आज आह्मांवर कशास गुदरला असता?याप्रमाणें मनास नाना प्रकारें दुःख व पश्चात्ताप होऊन राजादि सर्व मंडळी विपत्तींत पडली.

या इतक्या बंदोबस्ताचे कृत्यास सुमारें दोनप्रहर रात्र गुदरली. पुढें लागलीच मशाली पेटवून **भानुकांतानें** शहरचे बंदोबस्ताकरितां सेनापति व सरसुभेदार यांस बरोबर आणखीं सैन्य देऊन पाठविलें. ही वार्ता राजाच्या कडव्या स्वारांस (पूर्वीपासून वि-

श्वासरावाचें सांगणें होतेंच, यामुळें ) ते अगदीं तयारीनें शहरचा बंदोबस्त करीत असतांना स्वाराहातीं कळली. परंतु अगोदरच अष्टक मंडळींनीं ते दिवशीं पक्का बंदोबस्त ठेविला होता. ह्मणून मुख्य राजवाड्यांतील खजिना, ( दरबारदरवाज्यावर त्यांचेच फितुरी लोक असल्यामुळें ) विश्वासरावाचे कडवे स्वारांचे ताब्यांत राहण्यास त्यांचा कांहींएक इलाज चालेना. तथापि, सुमतीचें सैन्य रणशूर असल्यानें त्यानें राजवाड्यास घेरा घालून शहरांत जें शत्रूचें सैन्य व स्वार आले होते, त्यांजबरोबर लागलीच तयारी करून लढाईस आरंभ केला. त्या लढाईंत सुमारें कुमतीच्या दोन हजार सैन्याचा नाश करून धुमाकूळ करून दिली. त्यांणींहि गर्दी करून तेवढ्या वेळांत सुमतीचे सैन्याकडील एक हजार वीरांचीं शिरें धरणीवर पाडिलीं. शहरांत एकच हलकाकल्लोळ होऊन जिकडे तिकडे हाहाःकार उडाला. घायाळ झुमूं लागले. शत्रूकडील कोण व आपणाकडील कोण, हें सर्व फितूर असल्याचे योगानें न समजून एकच भडिमार झाला. मूळ बीज काय, हें कोणासच समजेना; घरोघर दरवाजे बंद करून लोक घाबरे होऊन सर्वांच्या तोंडचें पाणी पळालें; बायका, पोरें, आकांत करून रडूं लागलीं. रात्र असल्यामुळें कोणाचा नाश झाला, हें कांहींच समजेना! उजाडेपर्यंत एकसारखी शहरांत गर्दी चालू होती. दोन घटका दिवसाचे सुमारास लढाई शांत होऊन कुमतिअष्टकाचे सैन्यानें राजधानी काबीज करून दवणबागेंत वर्दी पोहोंचविली. ते वेळेस भानुकांतादिकुमतिअष्टकास आनंद होऊन वडिलादि मंडळी कैदेंत होती, त्यांचा त्यांनीं खाण्यापिण्याचा बेत उत्तम राखला. नंतर स्नानादि विधि आटोपून अलंकारभूषणेंमंडित तेजस्वी श्वेत गजावर बसून भानुकांताची स्वारी आपले अष्टप्रधानांसह मोठ्या थाटानें व मंगलवाद्यगजरानें शहरांत जाऊन सिंहासनारूढ झाली. मग विद्वज्जन विप्रांचे हातून राजास अमृताभिसिंचन करविलें. राजानें विप्रांस इच्छित

दान धर्म करून सवत्सभूषणमंडित वांछित सुदक्षणायुक्त गोप्रदानें देऊन आपले नांवाची द्वाही शहरांत व प्रांतांत फिरविली. असो. अशा कपटानें राज्य संपादन करून आपले अष्टकमंडळीसह इच्छेनुरूप **भानुकांत** ते वेळेस गादीवर वसला.

---

## भाग ७.

### ओंव्या.

हेतु नष्ट धरूनि चित्तीं, दंभें करूनि कपटयुक्ति,
राजा आणि तत्पुत्र**सुमती**, न धरोनि भीति धरियेले॥ १ ॥
विख्यात जे का मुख्य वीर, **विश्वासरावादि** थोर थोर,
त्यांसींही दावूनि निर्वैर, बंदागार दीधलें॥ २ ॥
श्वानरूपी हे अष्ट कुमति, राज्यहोमाग्नि ग्रास वांछिती,
जिरेल कैसें त्यांप्रती, वमन मागुती होईल॥ ३ ॥
सर्व परी कपटजाळ, घालूनि रण केलें तुंबळ,
तणें **सुमतीं**चें वीरदळ, असोनि बळ मंदावलें ॥ ४ ॥

### आर्या.

रात्रीं युद्धीं पडलीं, दोपक्षींचीं बहूत वीरशिरें ॥
क्षितिवरि दुःखदवार्ता, समस्त ही **हस्तनापुरांत** शिरे॥ ५ ॥
वक्षस्थळ पिटिती किति, कितिकांचे बंधु तात आप्त पती ॥
ऐकुनि त्यांत निमाले, ज्यांसीं प्राणाहुनी किती जपती॥ ६ ॥
चरणीं नृप लावित जो, ह्मणती **विश्वासराय** राज्याचा ॥
अग्रगणी तोहि कसा, सांपडला सिंह धाक बहु ज्याचा॥ ७ ॥
रिपु खळसाह्यप्रभवें, धन्यचि मानूनि **चंद्रकांता**चा ॥
वैसे **कुमती** राज्यीं, प्रथम धरूनि वेष तो महंताचा॥ ८ ॥
ग्रस्त करुनि पर दुःसह, मित्रकरा काजवे कसे हरिती ॥
विपरित हें आर्जें कशी, सर्वांची शून्य होय देहरिती॥ ९ ॥

### अश्वधाटी.

मोडूनि वंडप्रभातीं कळे वातमी चंद्रचूडाप्रती साग्र ही ॥
तो आसतां कामिनी आत्मजा पुत्र आप्तांत मानूनि सौख्यागृहीं॥
ऐकूनि हें गोड कोणा न लागोन दुःखेंच सर्वस्व भांबावले॥
वाटे परी एक विश्वास दुःखाब्धितारु[१] असे त्या जहाजावलें॥ १०॥

### पृथ्वी.

रती स्वपतिची फिरे ह्मणुनि होय ती घावरी॥
बहूत मधुमालती गति ह्मणे न आतां बरी॥
पराङ्मुखपरी कधीं न च सुकीर्ति मीं ऐकिली॥
असे कपटयुक्तिची सकळ ठाउकी त्या किली॥ ११॥

### उमा.

यापरि तर्क करूनि वदे मज टाकुनि जाय कसा असरा॥
होय युगक्षण त्याविण उत्सव दे न च त्या दिवशीं दसरा॥
आननतोय पळें मुखमार्जन शुद्ध उरे न च ती करणा ॥
वित्तम वृत्त समग्राचि वांछिति वाटुनि सर्व उदासपणा॥ १२॥

### विबुधप्रिया.

वर्णुनी गुण ओसरीवरि ती बसे मधुमालती॥
कोण काय कथील जाणुनि गात्रकंपित हालती॥
तोंचि ये घरचा गडी सुरसिंग तो गृहअंगणीं ॥
त्या अकस्मित घावरा अति पाहतां ग्रह हा गणी॥ १३॥

### शिखरणी.

रते कांतापायीं अतितर तिचें चित्त बरवें ॥
असा द्वारीं येतां क्षण न च तिला धीर धरवे ॥
तया वेण्याची ती मधिल अवधी ही विसरुनी ॥
पडे जो गवाळीं त्वरित पळतां पाय सरुनी॥ १४ ॥

---

१ दुःखसागरांतून तारणारा.

**यूथिका.**

देहभान विसरोनि च मागलें, ऊठली परि शिरीं जरि लागलें ॥
ती क्षिती न गणितांचवदे असें, सांग वृत्त पतिचें चव दे असें॥१५॥

**स्वागता.**

नावरे विरह दुष्कर मातें, त्याविणें करुं कसें करमातें॥
कालपासुनि न वृत्त कळालें, बोलतां नयनबिंदु गळाले॥१६॥

**ललित.**

रोधिले नृपासहित तीकडे, ऐकिलें ह्मणे पडत सांकडें॥
जें असें खरें सकल बोल तें, होउनी बहू विकळ बोलते॥१७॥

**शालिनी.**

सर्वांच्याहीं आज तोंडीं असेची, झाली माझ्या दुर्गती सदशेची ॥
नाहीं वाटे भीति त्या उत्तमातें, केव्हां भेटी होय हें सांग मातें॥१८॥

**इंद्रवज्रा.**

दारींच ऐके रव हा सतीचा, होता भरोंसा बहु त्या सतीचा ॥
तेथें नसेही धनि वैभवाचा,पाहोनि त्याची न फुटेचि वाचा॥१९॥

**मालिनी.**

शिरुनि शरिरिं त्याच्या कंप धैर्यास हांकी,
रडत ह्मणत बाई काय सांगूं अहा कीं॥
न दिसत सुखसिंधूची गती सत्पथींची,
जगतिवरुनि मूर्ती लोपली त्वत्पतीची॥ २० ॥
वरकड पडलेची शत्रुच्या बंधनीं ते,
नृपतिसहित जे कां मुख्य राज्या धनी ते ॥
परि न दिसत कोठें एक विश्वासराय,
ह्मणुनिच बहु दुःखीं टाकि निःश्वास राय॥ २१॥

**चामर.**

रिक्त सौख्य व्हावया कसेंचि दैव कोपलें,
शत्रुच्या पदींच वाटतें सुरत्न लोपलें ॥

भोजनांत मात्र तें सुरम्य मुख देखिलें,
मंदहास्य अंबुजाक्ष इंदुतेज रोखिलें ॥ २२ ॥

वसंततिलका.

सर्वप्रकार विपरीत पहाच काय,
वाटे दळींच पडला नरवीर काय ॥
कीं, होय ये स्थळिं तया बहु आस लागे,
जाणोनिया त्वरित पाठविलें मला गे ॥ २३ ॥

शार्दूलविक्रीडित.

बुद्धयां त्या [1]वैरटें मिळोनि कपटें हंसा तुझ्या मारिलें ॥
मातें हें स्वमतें असेंच गमतें राज्यादिही हारिलें ॥
ही वार्ता सुरसिंग सांग कथितां वेडावुनी धावरे ॥
खालीं घालित मान भान न उरे त्या खेदही नावरे॥ २४ ॥

साक्या.

डळमळलें मग धैर्य सतीचें, फोडितसे हांकेला ॥
ऐकानि हें दुर्वृत्त पतीचें, आत्मा ज्यास भुकेला॥ २५ ॥
मंडण सौभाग्याचें गेलें, ह्मणुनि स्फूर्ति निघाली ॥
मूर्छागत आक्रंदत पडुनी, क्षितिवर लोळण घाली॥ २६ ॥
[2]जुरत नसे कवणाची ज्यातें, लवही त्रस्त कराया ॥
ऐशा धूर्तांचें हें ऐकुनि, केली व्याकुळ काया ॥ २७ ॥

घनाक्षरी.

घोर हाचि मायतात, करित बैसले घरांत ॥
कंप होय त्या उरांत, दीर्घ शोक ऐकतां॥ १ ॥
नुरे त्यास देहभान, सर्व येत सन्निधान ॥
तिणें मांडिलें [3]निदानें, सर्वथैव देखतां॥ २ ॥
होत शरीराचे हाल, करीतसे उलाघाल ॥
भिजाति अश्रूनें गाल, कर्म ओघ सांगतां॥ ३ ॥

---

१ गांधिलमाशी. २ हिम्या. ३ आकांत.

तरी कुरवाळूनि माय, तिच्या नयनिं लावि तोय ॥
रडे मोकलुनी धाय, ह्मणे जाय भाग्यता॥ ४ ॥ २८ ॥

### अंजिनीगीत.

पायोपश्चाद्या उलटोनि, विश्राम प्रिय जैची मानी ॥
किंचित सावध ती होऊनी, अवलोकी वदन॥ १ ॥
ह्मणे ताता ! अगे माय ! जीवित माझें व्यर्थचि जाय ॥
सर्वस्वीं अंतरले पाय, सौख्याचें सदन॥ २ ॥
माया चैलपल्लवें वारा, घाली परि ती धिक् परिवारा ॥
मानी शोकें ह्मणेचि थारा, गेला तो मदन. ॥ ३ ॥
पूर्वी हें मीं भविष्य केलें, मातें निरखोनी पाठविलें ॥
काय तोंचि होतें आलें, बोलावूं निर्धन ॥ ४ ॥ २९ ॥

### दिंड्या.

रम्य गंभिर औदार्य आननातें,
सरे देखाया आजि सर्व नातें ॥
ह्मणे आहा ! हे तात ! मी बुडालें !
नार्थपंजरपंचत्व तें उडालें ! ॥ ३० ॥
चित्त सारें तें भ्रमुनि ह्मणे अंगीं,
असोनीया धूर्तता नित्य जागी ॥
कसा झाला कळुनीच देहघात,
अतां न प्रिय मज वांचणें जगांत ॥ ३१ ॥

### मंदाक्रांता.

सा दुष्टांची कृति समजुनी दीधलें पत्र वाटे ॥
ताता द्याया स्वकरिं मजशीं कावितां काल वाटे ॥
हाहा नाथा ! त्यजुनि मजशीं जाहला स्वर्गवासी ॥
दावूं कोणा वदन अपुलें या वयीं हें मवांशीं ॥ ३२ ॥

---

१ योषा ह्म० स्त्री. २ मृत्यु. ३ पतिविरहित.

### मध्यमा.

नेमें प्रेमें प्रियकरपदीं केली सेवा ॥
रुष्टप्रीती हरहर ! परी कां ही देवा ? ॥
आतां देयी तव चरणसरोजीं भक्ति ॥
नाहीं कांहीं नग, पट, धन, यांची भक्ति ॥ ३३ ॥

### इंद्रवज्रा.

केवीलवाणी अति होय ती सती, मिथ्या तिला सर्व सुखेंच दीसति॥
तोडीत कंठांतिल रत्नहार ती, ह्मणे कसे सर्वहि यत्न हारती॥३४॥

### अमृतध्वनि.

लेणें तसें विखरुनी या क्षितीं वारिच लोळे सुता विकळ ती ॥
पाहोनि ते रडति दुःखें तिच्या सकळही शुद्धिला विसरती ॥
कुर्वाळुनी उठवि माया तिला, ह्मणत कांहीं बये वद मशीं ॥
देशी अह्मां विरह हें काय, तूं सतत दुःखांत केंवि रमशी॥३५॥

### शुद्धकामदा.

इतुकियांत ये तो सहोदर, अनुज जो तिचा ऊजवा कर ॥
विकळ देखिलीसे क्षितीं सती, दुरुनि त्यासही लक्षि ती सती॥३६॥

### कामदा.

ऊठऊठगे ताइ तो वदे, बोबडे तिला शब्द मात्र दे ॥
सत्वभूषिते, कां विलाप हा? नेत्र ऊघडी बंधुला पहा! ॥३७॥

### स्रग्धरा.

तातानें कां बयेनें वद वद सुशिले ! मारिलें हें तुला गे ॥
कांहीं अन्याय केला असशिल गमतें कीं पतीहेतु लागे ? ॥
मातें नाहीं असें कां चुकतच मि जरी ताडिती तेथवां गे ॥
ताई, शोकासि सांडी हनु धरुनि ह्मणे कां मनीं क्रोध वागे!॥३८॥

### पंचचामर.

गळां पडोनि तो ह्मणे बळेंच काय हानि कां ? ॥
न जेवि तूजवीण मी न नेम काय हा निका ? ॥

नको पडूंच आग्रहांत दुःख हें उरीं सले ॥
अहा करीच काय शोक मायतात बैसले ॥ ३९ ॥

**द्रुतविलंबित.**

उपरमा परमावधि दीनता, प्रगटवी घटवीच सुदीनता ॥
सुगरे जें गरजेवि सती गणी, नवसला वसला हृदयीं गुणी॥४०॥

**मदिरा.** अ० सवाई १ ली.

क्लेश अशेष करूं प्रियबालक इच्छि परी न वळेचि तयातें ॥
शोकभरें धृतितंतु तुटे अतिकंप सुटे जननीपितयातें ॥
शांत अकांत न होय तया जरि शांतविती जन आप्तहि सारे ॥
नित्यानित्य विचार विलोकुनि मानिति मायिक सर्व पसारे ॥४१॥

**प्रमाणिका.**

वदे मुनीम आयका करितसां अनर्थ कां ? ॥
वळेच दुःख मस्तकीं धरितसां समस्तकीं॥४२॥

**अभंग** ( चाल, सुंदरतें ध्यान. )

**चंद्रचूडा**प्रती संबोखित हातें, द्यावया सुखातें मुनीम तो॥१॥
जो का पीढीजात वृद्ध कारभारी, तो ह्मणे उभारी चित्तीं धरा॥२॥
आपुली समजूत अन्य करी काय, मज हो उपाय एक दीसे॥३॥
आतां ईचे बोल शोकांत ऐकीले, जामातें दिधलें पत्र तुह्मां॥४॥
त्यांतील आशय सर्व पहा आधीं, तयाशीं उपाधी बाधीजे ना॥५॥
ऐकतां हे शब्द **मधुमालतीनें**, टाकीलें स्मृतीनें पत्र पुढें॥६॥४२॥

**अभंग** ( धेईधेई माझे वाचे. )

काय त्यांत इतिहास ॥ कळायाची लागे आस ॥१॥
ह्मणुनिया तो तातडी ॥ **चंद्रचूड** पत्र फोडी ॥२॥
आधि करीतां मनन ॥ स्थीर कांहीं होय मन ॥३॥
भिन्न एक लेख त्यांत ॥ असे जो का मुद्रांकित॥४॥
नसे कोणी तेथें पर ॥ सर्व मायेचा पदर॥५॥
पाहूनीया वाचूं लागे ॥ स्वतां पत्र अनूरागें ॥६॥४३॥

---

१. प्रतिलक्ष्मी. २. चांगलें ३. [illegible]

पद. ( चा० त्याचा हरी विकला. )

धरणें विश्वासा विश्वासा, किमपि न भय **विश्वासा** ॥धृ०॥
तीर्थस्वरुपददाब्जीं विनती प्रणतीसह ही माझी ॥ १ ॥
वाचूनि पत्र पहावें शेवटिं यास विसर्जन व्हावें ॥ २ ॥
ज्येष्ठ सुत राजाचा वांछी अभिलाषचि राज्याचा ॥ ३ ॥
उद्युक्त होय घाता सकलांच्या तो धरुनि अहंता ॥ धरणें० ॥ ४ ॥

पद ( उद्धवा शांतवन क. )

घालुनि हा ढोंग पसारा मेजवानि करणें लोकीं ॥
रायादि मुख्य जनांच्या घाता ही संधि विलोकी ॥ चाल ॥
सर्व हें कृत्य कपटाचें ॥ मी जाणें सोंग नटाचें ॥
जरी तेंची एकजुटाचें ॥ होय न परि साध्य तया मी ॥
**भानुकांत** कपटपटू या वर्ततसे दुर्धर कामीं ॥ धृ० ॥ ४५ ॥

पद ( रामचंद्र नाहिं घरीं ).

बोधितां नृपास पुत्रकपट यापरी ॥
व्यर्थ आमुची महान् हेळणा करी ॥
देत धन्यता तया स्वकीय अंतरीं ॥ चाल ॥
पृष्ठभेदुनीच उदरीं वेणुकोंब ये ॥
सुपुतींत जेवीं तेवीं तो गणी न हें ॥ ४६ ॥

ठुंबरी ( वैरागी मोरा राम ).

अनुसरणें भाग अतां, न जाय तंव ये कृतघ्नता ॥अनुस०॥धृ०॥
तया सर्व भोजना जावयाचे योजना, केली असे अंतरीं,
मज तारक एक **मुरारी**, न जाय तंव ये कृतघ्नता ॥ अनुस० ॥४७॥

कटाव.

स्मरुनि **व्यंकटेशासि** रहावें; कौतुक होइल तेंचि पहावें; दुःख न चित्तांत वागवावें; कांहीं दिवस असे लोटावे; ठावें होइल हें स्वभावें; कोणी आणिल विपरित चित्तीं, तुमचे, परि मज नाहीं भीति; सातीं हातीं एक रमापति, धरितां, करितील काय आराती; शेवी देइन सौख्य समस्ता; ध्रुव तो पावेल केवीं अस्ता; प्रस्तुत

दुःखद देति अवस्था, त्यांशीं नेमे होइन शास्ता; स्वस्थ असा, मन हेतु जसा—पुरवीन तसा; न वसांत रसा; अरिलागि पसा पसरवीन चरवीन खड, चरवींत रवी धरवीन पुढें, सरवीन पदावरुनी नगुढें, नुरवीन अहं; पढवीन दहं; भरवीन वर्नी; करवीन हजी; बुडवीन भजी, दुष्ट स्पष्ट मी, एक पाहिजे, दैव साह्य तें, पराधीन जे, परि हा प्रसंग दुर्घट जाणुनि, लगट करुनि चित्तांत आणुनी, ही जी लिहिली, अमर्याद विनंती ऐकावी; क्षमा असावी, सुकुमारीचें फार जपुनिया रक्षण करणें, दुःख न देणें, गोजिरवाणें, हें किलवाणें मुख कधीं तें होउं न देणें, ही मजवांचुनी गाय होउनी धाय मोकलुनि काय अनर्थ करील जिवाचा! खुंटुनि वाचा, दुःख हेंचि पोटांत कालवे, लिहितांना मत्सौख्य मालवे, असो काळजी कशा-स मातें? तुह्मीच इचे सुजन्मदाते; प्रेम सदोदित इयेवरी हो, तुमचें रातें, पावू न दे हें मज खेदातें. जगदीशकृपें, संकट सोपें, हो-उनि पुनश्च सौख्य पहाया, येईन त्वर मी भेटाया; माझी निर-पेक्ष वृत्ति झाली; सर्व संपदा तुह्मां हवालीं, व्यंकटेशमंदिरादि केली. येई तावद्दक्षिसपत्रीं मुदत राखिली. हा मत्करिचा लेख पाहतां कोणी यावरी न करी सत्ता. सर्व पूर्ववत् पहा व्यवस्था. वसोचि हृदयीं माझी आस्था. ॥ चाल ॥ पाहुनि हें चित्त सुखावे, कांहीं परि चैन पडेना, झालें तें वृत्त कळेना ॥ ध्रु० ॥ ४८ ॥

हा मजकूर साद्यंत पाहून विचारांतीं बाबासाहेबादि मंडळीस थोडासा धीर आला. परंतु **विश्वासरावांचें** काय झालें, अगर ते कोठें छपून राहिले, हें कोणास कांहींच कळेना; यामुळें सर्वांचीं मनें उदास होऊन जरी चित्तवृत्ति चमत्कारिक होऊन गेली; तरी ईश्वरावर पूर्ण भरंवसा ठेवून ते निरुपायास्तव आपआपल्या उद्योगास लागले.

इकडे **चंद्रकांतसुमती** आपले वडील व प्रधानादि करून सुमारें मुख्य मुख्य राजकीय पन्नास मंडळीनिशीं कैदेंत असून तेथें जरी त्यांचा ऐषआरामादि सर्व प्रकारें उत्तम बंदोवस्त होता, तरी

आपलें राज्य जाऊन दीन झाल्यामुळें अटकेंतील सर्व सौख्य विषतुल्य वाटून सर्वजण मोठे दुःखानें दिवस काढूं लागले. आतां या दुष्टाचे हातून सुटका होऊन पुनः सौख्य मिळेल ही आशाच नको. **विश्वासरावाचें** न ऐकिल्यानें हें संकट ओढवलें. असें वारंवार ह्मणून त्याचीही काय दशा झाली असेल ती असो ! या विचारांत रात्रंदिवस ते निमग्न झाले. **भानुकांतकुमतीस** दुर्घट यत्नानें राज्य साध्य होऊन वडिलादि मंडळी कैदेंत पडून या अष्टकाचे साह्यानें सर्व सौख्य हातास आलें, याचा अतिशय गर्व होऊन त्यानें राज्यांत अनेक तऱ्हेची धुंदाई मांडिली.

या अष्टकाचे कुविचारी मसलतीनें राज्यांत एकदम पूर्वीपेक्षां सर्व जिनस वर दुप्पट कर बसविला. बारा वर्षांचे आंतील प्रत्येक मुलीस एक व मुलास दोन रुपये व याहून अधिक वयाचे मनुष्यांस प्रत्येकास तीन रुपये; अशी कर घेण्याची वहिवाट नसतांही जुलमानें सालाबाद ठरविली. याचप्रमाणें, जमिनींवरील सारा दुप्पट ठरवून पूर्वींचे लोकांचीं वेतनें कमी केलीं. आणि आपलेकडील दुर्मति प्रधानादि सैन्यास अधिक वेतनें देऊन त्यांच्या हातानें राज्यांत अनेक तऱ्हेच्या पुंडाईनें लूट करवून सर्व लोकांस अतिशय त्रास दिला. सत्तेपुढें कोणाचें शहाणपण चालणार आहे ? **कुमती**कडील पन्नास हजार सेना एक जुटाची असून, तेवेळेस खजिन्यांत पांच कोट रुपयांचे तोडे शिलक असल्यानें त्यांचे दुष्ट कृत्यांस कोणाच्यानेंही प्रतिबंध आणवेना. कोणास ग्रामांतरही करणें झाल्यास बहुत करून हुकूम घ्यावा लागत असे. आणि राजा व **चंद्रकांतसुमतीची** कोणास भेट होऊं न देण्याविषयीं त्यांनीं पक्का बंदोबस्त ठेविला होता. दिवसेंदिवस राज्यांत अनन्वित कर्मे फार होऊं लागलीं. राजवाड्यांत नित्यशः वस्त्ररहित कळवंतिणीचे नाच, बैठकी, तसेच तमाशे दुवक्ता होऊन अनेक तऱ्हेच्या व्यभिचारांत विचारकर्म सुटलें. कितीएक संभावितांच्या स्त्रियांस लाखों रुपयांची व वस्त्रभूषणादि प्रकारची लालूच दाख-

ऊन भर रस्त्यांतून दिवसां राजवाड्यासमोरच शंभर हातांवर एक नवीन रमणीय विलासमंदिर विस्तीर्ण बांधलें होतें; त्यांत खुषमस्करे मंडळीचा हात धरून न्यावें व तो चमत्कार आपण स्वतः पहावा. कदाचित् कोणी राजाज्ञा मोडली तर त्या स्त्रियांस कैदेंत ठेवून अनेक तऱ्हेचे हाल करून त्यांचें पातिव्रत्य भंगवावें. कोणी या त्रासानें पळून जाऊं लागल्यास पकडून आणाव्या व त्यांच्या नवऱ्यांस सरकारांत चाकरी असल्यास ती बंद करून नजरबंद ठेवावें. शिवाय प्रत्येक शुक्रवारीं रात्रीं शहरांतील गृहस्थादिकांच्या तरुणी व रूपवती स्त्रिया जुलुमानें व कितीएक स्वसंतोषानें ज्या येणाऱ्या असतील त्या त्यांजवर ठेविलेल्या कामगार स्त्रियांकडून विलासमंदिरांत आणवून, नंतर आपल्या अष्टकादि दहा बारा खुषमस्करी मंडळीसहवर्तमान राजेसाहेबांनीं तेथें जावें!

प्रथमतः सुवासिक मसालेमिश्रित केशर कस्तुरी अरगज्याचीं उटणीं अंगास लावून त्या स्त्रियांसह त्यांनीं एकत्र बसून झुलाऱ्यावर त्यांचीं न्हाणीं व्हावीं. त्यांत पाहिजे त्या पुरुषांनीं व स्त्रियांनीं वाटेल त्यांच्या अंगावर गुळण्या, गुलाल व केशरी रंगाच्या पिचकाऱ्या भरून टाकून आनंद करावा. त्या विलासरमण्यांत द्वैतबुद्धि कोणाचीहि राहात नसे. कितीएक स्त्रियांस त्यांच्या हौसेनुरूप पतिसह आणावें. जरी त्यांचे समक्ष त्यांचे स्त्रियांनीं अन्य पुरुषांची थट्टा केली तरी निर्वैरतेनें त्यांस तो आनंद वाटून त्यांनींही तसेंच करावें. सारांश, सर्वच एकमय होऊन जात असल्यानें भिन्नता ह्मणून कोणाच्या स्वप्नींही रहात नसे! त्या रासन्हाण्याच्या सुगंधोदकाच पाटानेंच तेथील बगीच्यांतील सर्व बागाईत व्हावें. या थाटानें न्हाणीं झाल्यावर कामगारांनीं लागलीच सनगांचे बास्ते आणून पुढें ठेवावे. त्यांतून भरजरी शालू, फुटाण्या, पैठण्या, राघावळी, आदिकरून उंचीं वस्त्रें, जीं ज्यांस वाटतील तीं मनाच्या हौसेप्रमाणें, त्या तरुण स्त्रियांनीं घेऊन नेसावीं. तीं सर्व त्यांस बक्षीस होत असत. तसेच चंद्रहारादि जडावाचे डागिने ज्या काय

एक दोन नूतन स्त्रिया तेच दिवशीं आल्या असतील, त्यांचे येण्याचा आनंद व स्वरूपाप्रमाणें त्यांस तें बहाल करून इतर स्त्रियांस सरकारी जामदारखान्यांतील तसलमात दागिने घालावयास देऊन त्यांचें अप्सरेप्रमाणें अमूल्य नगमिश्रित वेणी आदिकरून नटणें झाल्यावर सर्वांनीं वड्ये, याकुती, दुधप्या, उंची प्रकारचीं मद्यें, कुसुंबा, मलायी, श्रीखंड, अफीम इत्यादि अमली पदार्थांचें मोठ्या आनंदानें सेवन करून, पूर्वीच सिद्ध असलेल्या रोषनाईचे जागेंत समया, पाट इत्यादिकांचा थाटमाट करून अगरबत्त्यांचे घमघमाटांत पंचपक्वानांचीं फराळांचीं पात्रें मांडून त्या नीतिविरुद्ध व मदांध **कुमति**अष्टकांनीं आवडेल त्या विलासवतीस आपले शेजारीं पाटावर घेऊन मोठ्या आनंदानें फराळास बसावें. नंतर त्या व्यभिचारकर्मप्रवर्तक, सौंदर्यसंपन्न, आणि वस्त्रालंकारमंडित, अशा अल्पवयस्क अंकाश्रित झालेल्या तरुण स्त्रियांसह त्या मेळ्यांत त्या कामांत **भानुकांतराजे**साहेबांनीं मध्यें बसून तो कौतुकचमत्कार, ( एकमेकांस घांस देणें, कामोद्भव करणारे विनोद, मंदहास्य, नेत्रकटाक्षादि विलास वगैरे ) पाहून अतिशय आनंदित व्हावें. त्या नादांत दीपप्रकाशतेजानें त्यांस अंमल चढून मधून मधून एकच हंशा उडावा. अशा प्रकारें फराळसोहळा झाल्यावर मुख्य आरसेमहालांत तिसरे मजल्यावर हंड्या झुंबर प्रज्वलित झाडांच्या रोषनाईचे ठिकाणीं सर्वांनीं जाऊन पानसुपारी व अत्तर घेणें झाल्यावर, स्त्रियांचे कंठांत शोभा आणणारे मोतियाचे कमालखानी बत्तीस लडी हार, व नगमिश्रित वेणींचे बुचड्यांभोंवतीं सुगंधी गजरे घालून कांहीं वेळ सारीपाटाचा डाव मांडून पुढें घटकंचुकीचा खेळ सुरू करावा. अशी एकच ते दिवशीं गर्दी होऊन अतोनात धुमश्चक्री सूर्योदयपर्यंत व्हावी!

असा क्रम सुरू झाल्यापासून कित्येक स्त्रियांनीं राज्यांत फार जुलूम होत आहे असें पाहून अब्रूस्तव विहिरींत उड्या टाकून व कितीएकींनीं विषप्रयोग करून आपले प्राण दिले. सर्व

राज्याचा बंदोबस्त सरसुभेदार व **रामचंद्रमामा** पहात असल्यानें सद्दीमुळें त्यांच्या कल्पनेपुढें कोणाचा कांहीं उपाय चालेना. कोणीं कांहीं मसलत अथवा राज्यसंबंधी उलाढाल करूं लागल्याचें समजल्यास, अथवा राज्यांत जुलूम आहे असें ह्मटल्यास, त्याजला पकडून आणून अंधारकोठडींत मारहाण करून ठेवावें. या धाकामुळें सर्वांचे उपाय खुंटून वीर असूनही हतवीर्य झाले. अशा यांचे त्रासामुळें मोठमोठाले लोक युक्तिप्रयुक्तीनें तें शहर सोडून हळू हळू आपल्या सोयींप्रमाणें रजा घेऊन खटल्यासुद्धां अन्य स्थलीं राहावयास गेले. एके दिवशीं राजादि अष्टक मंडळी अस्तमानाचे सुमारास हवा खाऊन मोठ्या लवाजम्यानिशीं शहरांत परत येतांना **व्यंकटेशदर्शनास** **विश्वासरावाचे** मंदिरांत आली. त्याच संधीस **विश्वासरावाची** स्त्री **मधुमालती** मंदिरांतून जलमंदिरांतील दिवाणखान्यांत तिचे आईसहवर्तमान जात असतां ( हे एकाएकीं तेथें आल्यामुळें ) सर्वांचे दृष्टीस पडली. तिचें तारुण्यभरांतलि अप्रातिम सौंदर्य, व सुंदर अवयव पाहून ते सर्व उन्मत्त दुष्ट राजानुयायी लोक अगदीं वेडावले. ती लहानपणापासून आजोळीं असून विवाहसमयीं मात्र एकवार कांहीं दृष्टीस पडली होती. जाणून हीच **विश्वासरावाची** स्त्री आहे, हें पुर्तेपणीं ते वेळेस कोणाचे लक्षांत आलें नाहीं.

नंतर त्या रात्रीं त्यांचे एकांत हर्टीत ती गोष्ट निघाली. तेव्हां ती **विश्वासरावाची** बायको असून महान् पतिव्रता आहे, असें कोणीं सांगितलें. अंधळे कोशिंबिरींत ती येणारी नव्हे. पूर्वी आपला धाकटा बंधु **चंद्रकांत** यास गादीवर बसविण्याचे कामीं मुख्य मत **विश्वासरावाचेंच** असून, अजून पुढेंहीं राज्यकामांत घोटाळा करण्याची त्याची इच्छा होती, परंतु तो त्या गर्दीत नाहींसा झाला यामुळें त्याचा उपाय खुंटला. हा द्वेष मनांत बाळगून त्या दुष्ट मंडळींत असें ठरलें कीं, तिलाही एकवार या विलाससरोवरांतील सुरतोदकीं क्रीडा करावयास आणून आपण धन्य

व्हावें. या कामास कितीहि खर्च पडला तरी चिंता नाहीं. असें ह्मणून कामगार चतुर स्त्रियांस बोलावून आणून त्यांनीं त्यांस गुप्तपणें मसलत सांगितली.

नंतर आज्ञेप्रमाणें त्यांनीं आपलें जाणेंयेणें मधुमालतीचे मंदिरांत ठेवून तिच्याशीं स्नेह पाडला. तिच्या चालचलणुकेवरून आणि पातिव्रत्य व क्रूर इभ्रतीवरून, जरी त्या दुराचरणी स्त्रियांनीं निश्चयेंकरून तिची मति भ्रष्ट करून आणूंच, अशी पैज गायली होती, तरी एकीच्यानेंहि तिच्याशीं त्या प्रकारचें भाषण करवेना. कांहीं विनोदसंबंधानें दाखले देऊन तिचे चित्तास विपर्यास करण्याचा वरचेवर आपलेकडून त्या योग आणीत, परंतु तिच्या तें लक्षांत देखील येईना. ती फार पापभीरु असल्यानें तशा संबंधाचें कांहीं भाषण निघालें तर उलटो ती त्याजविषयीं वारंवार निषेध करी. या त्रासानें पुढें पुढें तर त्यांच्याशीं स्नेहसंबंध सोडून ती एक भाषणही करीनाशी झाली. त्या कदाचित् आल्या तर दासीकडून बाईसाहेबांस या वेळेस भेटण्यास फुरसत नाहीं, असाहि निरोप येऊं लागला. त्यांनीं आपलें हवें तसें कसब व कल्पना लढविल्या, परंतु उपयोग काय? तिचे पातिव्रत्यापुढें त्यांचे अनेक तऱ्हेचे विकल्प मिथ्या होऊन गेले. शेवटीं मधुमालतीस वाटूं लागलें कीं, आतां आपली अब्रू राहणें कठिण. ह्मणून ती बहुतकरून कोणाशीं फारसा स्नेह न करतां औदास्यानें वर्तूं लागली.

अशा प्रकारें त्यांचा निरुपाय होऊन त्या स्त्रियांनीं राजाष्टकास सांगितलें कीं, ती पतिव्रता कोणत्याही प्रकारें हस्तगत होत नाहीं. कदाचित् तिजवर जुलूम केला तर निःसंशय ती प्राणत्याग करील. आजपर्यंत शेंपन्नास अशाच सुंदरी आह्मीं वश केल्या, पण इजसारिखें एकीचेंहि खरें निर्वाण आढळलें नाहीं. कोणी द्रव्याच्या लालुचीनें, कोणी पतीस अथवा भावास हुद्याची नौकरी अथवा जहागिरीच्या आशेनें, कोणी धमकीनें, कोणी बळेंच विलासमंदि-

रांतील अनेक कामोद्भविकचमत्कारसोहळ्याच्या हौसेनेंच, व कितीएक एकमेकांच्या संगतीनें, अशा मोठमोठाल्या संभावितांच्या तरुणी स्त्रिया बिघडून हस्तगत झाल्या आहेत, पण येथें आमचा कांहींच इलाज चालत नाहीं. यासाठीं आपण एवढा उतावेळपणा व आग्रह सोडून देऊन तिच्या नादीं लागूं नये. या कृत्यामुळें तिनें आपला प्राणत्याग केला, तर तिच्या खऱ्या पातिव्रत्यभंगाच्या अभिशापामुळें आपलें कल्याण न होतां उलटें या दुराचरणानें सर्व लयास जाईल. इतकें जरी त्या स्त्रियांनीं त्यांस सुचविलें, तरी त्या विषयांधसुरापी दुष्ट अष्टकांस तें न रुचून ते ह्मणाले:— अशा आह्मी पण भोगणाऱ्या स्त्रिया पुष्कळ पाहिल्या आहेत. आह्मी या राजमंडळांत तिजला आणल्याविना राहणार नाहीं. असा त्यांचा पक्का निश्चय टरला.

इकडे एके दिवशीं मधुमालती रात्रीं एकदम जागी होऊन पाहते, तों तें स्थळ अपरिचित असल्यानें अगदीं वेडावून आपण कोठें आहों, हें तीस कांहींच कळेना. इतक्यांत एक स्त्री तिचे कांहीं ओळखीची असलेली तेथें दृष्टीस पडली. तेव्हां निःसंशय तिला वाटलें कीं, मी या दुष्ट धीवरांचे जाळ्यांत सांपडलें. हर ! हर ! ईश्वरानें आज हा मजवर प्रसंग नीट आणला नाहीं. आतां येथून माझी सुटका होते कशाची ! तरी मनांत धैर्य धरून तिनें त्या स्त्रीस विचारलें कीं, मी येथें कोठें आलें? मला कोणीं आणलें आहे ? ती ह्मणाली: बाईसाहेब, आपण घाबरून, श्वासोच्छ्वासें धडकी भरून कांपतां कां ? तुमच्या सारिख्या मोठमोठाल्या बायका, येथें तर मोठ्या हौसेनें येतात. परंतु तुम्हांस येथील सौख्य दृष्टीस पडल्यावांचून हें गोड वाटणार नाहीं; हें वरिक खरें. राजादि कुमति अष्टकमंडळी तुमचे सौंदर्यास व यौवनास भुलून अगदीं वेडावली आहे. जसा एकादा अपरिचित पदार्थ चांगला अमृततुल्य असूनही त्याची रुचि ठाऊक नसल्यानें मात्र त्यास नाईटपणा दिल्यास चालतो. पण एकदां का त्याची गोडी

करून आली ह्मणजे त्यास पुनः वाईट ह्मणण्यास आपल्लेच अंतःकरणास लाज वाटते. तद्वत् या विलासफळाची रुचि अमृततुल्य आहे, ती घेणाराचे मात्र नशीबीं पाहिजे. तुह्मास आहे काय वाटत असेल तें असो. हें प्रत्यक्ष तुमचे भानुमती चुलत वहिणीस विचारावें, ह्मणजे समजेल. हा येथील सौख्यक्रीडेचा चमत्कार किंवहुना इंद्रभुवनांतील चमत्कारासही लाजविणारा आहे. पूर्वी तुमच्यासारिख्याच पुष्कळजणी ह्मणत होत्या, पण त्यांना एकदां चटक लागल्यापासून जसें अमली लोकांस अमलाची वेळ झाली म्हणजे चैन पडत नाहीं, तसें होऊन गेलें आहे. या मंदिरांत येणाऱ्या स्त्रियांस हा आठवे दिवशीं शुक्रवारीं अम्मलच असतो. वेळ येण्याची घटका मोजीत-असतात. आवडीप्रमाणें मिळत असल्यास कोण नाराजी होईल? येथील स्वेच्छाचारपणा, इच्छेप्रमाणें वस्त्रभूषणें नेहमीं बक्षिस मिळत असून राजवाड्यांतील रंगादि सौख्य, मनास वाटेल त्या पुरुषाबरोबर एकत्र भोजनास बसून घांस देणें,आदिकरून सोहाळे भोगण्यास पूर्वीचाच दैवयोग पाहिजे. तुम्ही आतांच पाहाल कीं, या मंदिरांत तरुण स्त्रीपुरुषांची गर्दी होऊन काय चमत्कार होतो तो! ! ब्रह्मदेवानें जीस सौंदर्य अनुकूल केलें आहे, तीसच हें स्थान सुलभ आहे. त्यांतूनही ज्या स्त्रियांवर सरकारची मर्जी नाखुष झाली, त्यांस हें स्थान पुनः प्राप्त व्हावें म्हणून जरी उत्कंठा आहे तरी दुर्लभ. मग इतरांचा कथा काय? आज तुमचेच वहिणीनें तुम्हास अमली पदार्थ देऊन भूल आल्यावर मेण्यांत घालून आमचेकडून येथें आणविलें आहे. जसें एकादे रोग्यास आरोग्य करणारें औषध मिळत असूनही तो त्रास मानून तें न घेतां, तसाच व्याधीनें दुःखांत पडतो, तद्वत् ह्या तुमच्या तारुण्यसौख्यास, पतिविरहरोगानें ग्रस्त केलें आहे. ह्याणूनच भानुमती वैदिणीनें आज तुम्हास घरीं बोलावून आणून अन्नांत अम्मलरूपी औषध घालून केवळ कृपाळूपणानें येथें तो रोग बरा करण्याच्या उद्देशानें आणलें आहे. आतां नाहीं ह्मणू-

न उपयोग काय? औषध तुमचे रोगास मिळालें. आतां निःसंशय तुमची प्रकृति बरी होणार. येथून सुटका होईल असें किमपिही मनांत आणूं नये!

हें ऐकून ती **मधुमालती**, कधींच नाहीं आणि एकदम आजच असा भयंकर प्रसंग आपणावर आला असें पाहून, अतिशय घाबरी झाली. तशांत आणखी पतीचें स्मरण होऊन तिला रडें कोसळलें. मग दुःखानें म्हणते, ह्या प्रसंगी ते असते तर या हतभागीचे कपाळीं हा आजचा दुर्धर प्रसंग कशास येता? हर! हर! ! परमेश्वरा! आजपर्यंत माझें पातिव्रत्य रक्षण करून आतां शेवटीं त्याचा भंग करण्याचा हा अनिवार्य प्रसंग त्वां कसारे आणिलास? नारायणा! या दुष्ट भ्रष्ट उन्मत्त वृकांच्या डावपेंचसाधणुकींतून मला अचुक सोडीव. माझी सर्वपरी लाज तुला आहे. तुलाही काय ह्मणावे! दैवगतिच विचित्र! सर्वस्वी आतां या जगांत निष्कलंक तोंड ह्मणून दाखविणें उरलें नाहीं! प्राणपतीची काय दशा झाली असेल ती असो! ! पुष्कळ लोकांच्या मुखीं ते जीवंत असावेत असें आहे. परंतु प्रस्तुतच्या कर्मदशेवरून माझें नशीब फुटलें, असें खरें. त्यांचीही आशा मला सांप्रतकाळीं धरवत नाहीं. त्यांचा निःसंशय घात झाला असावा. काय करावें? प्राणत्याग करावा तर आत्महत्येचें जन्मोजन्मीं अघोर पातक भोगावें लागेल.आतां हा देह मला क्षणभरही नकोसा झाला. देवा! ! या समयीं काय करावें, हें मला कांहींच सुचत नाहीं! प्राणपतिरहित, मला पाहतांना आईबापांस फार वाईट वाटून मी फार शोक करीन, याकरितां ते आपलें सर्व दुःख पोटांत गिळून माझे दृष्टीआड होतात; व असा वरचेवर त्यांस प्रसंग येत असल्यानें, माझेही दुःखानें त्यांचें काळीज करपून गेलें आहे. इतकेंही करून आतां आईबाप आणि माझा लाडका भाऊ **विश्वंभर** माझे विरहेंकरून आपला क्षणभरही प्राण ठेवणार नाहींत. मला कोणी या संकटांतून सोडवील, तर त्यास मी पाहिजे तें बक्षीस देईन. असें ह्मणून

वरचेवर निश्चेष्ट पडूं लागली. तेथें ते वेळेस दोघीच स्त्रिया होत्या. त्यांस तिची अशी अवस्था पाहून दया आली. आणि त्या ह्मणाल्या, बाई, आह्मी अशांतूनही तुमची सुटका करूं. आह्मास आपण बक्षीस काय द्याल? हे मधुर शब्द ऐकून तिला थोडा धीर येऊन तिणें लागलीच गळ्यांतील जडावाचा चंद्रहार[१] काढून त्यांस बक्षिस दिला. तो उंची दागिना पाहून त्यांचे मनास फारच लालूच लागली. मग त्यांनीं तशाही पाहऱ्यांतून, मसलतीनें तिला एका साधारण कुणबिणीचा वेष देऊन आपले बरोबर बाहेर आणिली, आणि घरापर्यंत पोहोंचवून त्या परत आल्या. मग तेथें ते दिवशीं हौसेनें येणाऱ्या एका नवीन तरुण व रूपवती स्त्रीस तितक्यांत गांठून भुलथापीनें तिला कांहीं अम्मल चारून ह्या ठिकाणीं आणून निजविलें.

इतक्यांत तिकडे फराळाची तयारी होऊन खुषमस्कऱ्या ( गंगा प्रसाद ) संकेताप्रमाणें त्या जागीं तिला न्यावयास आला. मग त्यानें अद्याप ही बेशुद्धच आहे हें पाहून तिला हलवून उठविलें. तों ती अमलांत चूर असलेली दुसरीच रूपवती दृष्टीस पडली. मग ही कोण आहे? ह्मणून त्या कामगार स्त्रियांस विचारिलें. त्यांनीं सांगितलें, हें कसें झालें कोण जाणें!! आह्मी आज अम्मल फार घेतल्यानें इला तीच समजून, तिचे बहिणीचे येथून संकेताप्रमाणें आणिली. तेव्हां तोही खुषमस्कऱ्या धुंदींतच होता. तो ह्मणाला: आज नाहीं तर नाहीं, ती जाते कोठें? पुन्हां सावधगिरी ठेवून दुसरे वेळेस तीसच आणूं. असें सांगून त्या मंडळींत तीस त्यांसह घेऊन आला आणि ह्मणाला.:—आज **मधुमालती** आणावयाची असून सरकारांनीं या स्त्रियांस बळेंच आग्रह करून दोनप्रहरीं अधिक अम्मल दिल्यानें शुद्धि न राहून यांनीं धुंदींत ही दुसरीच स्त्री आणिली आहे. यांत यांची काडीमात्र कसूर नाहीं. तेव्हां सर्वच धुंदींत असल्यानें ह्मणूं लागले, काय चिंता आहे! तिला पुनः यत्न करून येथें आणावी. तिला आणणें हें

आपले हातचें काम आहे. सर्व राष्ट्रांतील लोक आमचे आधीन आहेत. असें बोलून त्या नूतन आलेल्या तरुण स्त्रीस त्यांनीं आपले समाजांत घेतली.

इकडे **मधुमालती** अस्तमानचे दोन घटका दिवसापासून महालांतून कोठें बाहेर गेली ती रात्रीचे आठ वाजून तिची भोजनाची वेळ झाली तरी घरीं न आल्यामुळें तिची आई घाबरी होऊन तिनें चोहोंकडे घरांत, शेजारीं,बगीच्यांत, वगैरे ठिकाणीं पुष्कळ शोध केला, परंतु तिचा ठिकाण लागेना. दीड प्रहर रात्रही लोटलीसें पाहून कदाचित् **भानुमतीचे** येथें गेली असेल, असा तर्क बांधून ती आपले कुणबिणीसह जलदीनें अगोदर तिचे घरीं गेली. तेथें कोठेंच दिसेना ह्मणून सर्व घरभर वेड्यासारिखें पाहून **भानुमतीस** विचारतां ती ह्मणाली, आज तर मुळींच ती सकाळपासून मजकडे आली नाहीं. कधीं कधीं येत असते, पण बाई, आलीकडे चार पांच दिवसांत तिची माझी थट्टेवरून कांहीं विनोदानें बोलाचाल झाली, यामुळें तिणें आतां कधींच येणार नाहीं अशी शपथ वाहून माझें घर वर्ज केलें. मेली कोण वेळ कशी असते आणि तोंडांतून काय निघतें याचा नेम नाहीं. तिची मर्जी बाई! ! गरीबास कोण विचारतो ? बहुतकरून घर सोडून ती कोठें जाणारी नव्हे. मग आजच काय झालें असेल तें असो. असें तिचेंही भाषण ऐकलें. मग काय विचारावें ? **देवसेना** अतिशयच घाबरी होऊन मोठ्या चिंतेंत पडली. निःसंशय कांहीं तरी दगा झाला असावा; अथवा पतिविरहाचें दुःख न साहून तिनें कोठें प्राण दिला कीं काय ? अशा दुःखानें तिचें देहभान नाहींसें होऊन ती रडूं लागली! आतां तिचा शोध कसा लागेल ? तिजवांचून त्यांची काय अवस्था होईल ? पूर्वींच तिच्या पतीची काय गति झाली असावी, याचा आजपर्यंत कांहींच शोध नसल्यानें तिकडचें रात्रंदिवस डोळ्यांचें पाणी खळत नाहीं. नेहमीं झुरणीस लागल्यानें शरीर फारच वाईट दिसूं लागलें आहे.

अन्नपाणी चौथ्या हिश्यानेंही जात नाहीं. मी तिचें दीनवदन पाहिलें ह्मणजे, आपलें दुःख पोटांतले पोटांत गिळून तीस वाईट वाटेल जाणून डोळ्याचें पाणीहि विचारानें आवरतें. सदोदित आनंद दाखवून जेणेंकरून तिची वृत्ति स्थिर राहील असें आज-पर्यंत चालविलें होतें. ( दुःखाचे उमाळे पोटांत उभे राहून ) बाई **मधुमालती**! तुजसारखी सत्यव्रता, मनधरणीची, व रूपयौ-वनसंपन्न कन्या कोठेंही कोणास मिळणार नाहीं. जरी पति-विरहाचे दुःखानें तुझें काळीज अगदीं करपून गेलें आहे, तरी तूं आह्मास या वयांत वाईट न वाटावें ह्मणून, आंतले आंत दुःख गिळून उपदेशपर गोड गोड भाषणानें माझे लाडके! आमचे चित्तांस वरचेवर आनंदवीत होतीस. असें असून शेवटीं आज तूंच इतकें मन कठोर करून तुला आमचा त्याग करणें हें सुखकारक वाटलें ना? आलीकडे एक क्षणभरही आमच्यावांचून तुला दूर राहवत नव्हतें. आतां मी तिकडे जाऊन काय सांगूं? जेव्हां तूं घरीं नाहींस असें समजलें तेव्हांपासून तिकडची, व माझी आणि तुझा लाडका भाऊ **विश्वंभर** आदिकरून घरांतील मनुष्यांची चमत्कारिक अवस्था होऊन तूं केव्हां भेटशील, असें तुझें सर्वांस वेड लागलें आहे. तूं जर न भेटशील, तर थोडक्याच काळांत आतां तुझे विरहानें तिकडचे प्राण राहणें कठिण ! !

अशा दुःखविलापांत ती **देवसेना** पडून कांहीं शुद्धीवर येतांच, घरीं तरी इतक्यांत कोणीं शोध लावून तीस आणिलें असेल, अशी आशा लागून मोठ्या उत्कंठेनें दासीसहवर्तमान परत आली. इतक्यांत तिचें मुख उदास झालेलें पाहून सर्वच रडूं लागलीं. तीं उभयतां स्त्रीपुरुषें तर बेशुद्ध होऊन अनावर दुःखानें आक्रंदत धरणीवर निश्चेष्ट पडलीं. कोणीच तेथें समजूत करावयास उरलें नाहीं. **मधुमालती**चा स्वभाव बाळपणापासून फारच चांगला असून कोणासही आठवत नव्हतें कीं, कधीं चाकरमा-

णसास तरी एक शब्द तिरस्कार करून अथवा ऐश्वर्याचे डौलानें धमकी देऊन बोलली असावी. सदोदीत आनंदमय चेहरा असे. तिनें अतिथीअभ्यागतांचा, तसाच चाकर व कुळंबिणींचा, मुख्यत्वें खाणेंपिणें आदिकरून चांगले प्रकारचा समाचार रोजचे रोज घेत असावा. चाकरांस कां होईना, कोणास दुखणेंबाणें आलें तर वैद्यास लागेल तो पैसा खर्चास देऊन पथ्यापाण्याची खटपट जातीनें करीत असावी. जुनींपानीं वस्त्रें गरिबगुरीबांस त्यांचे हाल पाहून वरचेवर देत असावीं. एकांतीं अथवा लोकांतींही परपुरुषाशीं थट्टामस्करीचें भाषण न करण्याविषयींचें तिला मौनव्रत असे. रस्त्यानें कधीं देवदर्शनास अथवा मैत्रिणींच्या घरीं जाणें झाल्यास कोणाकडेही न पाहतां सदोदित पायांवर दृष्टि ठेवून ती चालत असे.

सारांश, लहानापासून थोरापर्यंत तिची समदृष्टि होती. सर्वांशीं आनंदमय बोलावें. कोणाचें काम आपले हातून होण्यासारिखें असून योग्य असल्यास परोपकारार्थ हस्तें परहस्तें तें करून देत असावें. जरी बापानें अथवा पतीनें कोणा कारकुनास, चाकरास, अपराधामुळें कदाचित् कामावरून रुसकत दिली असेल, तरी त्यांची समजूत करून पुनः त्यास कायम करावें. सदोदित आपल्या पातिव्रत्याचें रक्षण करून ईश्वरचिंतनांत, व व्रतंउद्यापनें करण्यांत ती वेळ घालवीत असे. ज्यांणीं ज्यांणीं तिला पाहावें त्यांस त्यांस वाटावें कीं, ही सौभाग्यमंडिता प्रत्यक्ष केवळ जगदंबाच आहे. अशा प्रकारें त्या मर्यादशीलेवर सर्वांची प्रीति अतिशय मनोभावानें बसली होती. ती नाहींशी झाली असून कोठेंच ठिकाण लागत नाहीं. असें पाहतांच सर्वांस वाईट वाटून रडूं लागलीं. आपले हातीं वेळचे वेळीं खाण्यापिण्याचा बंदोबस्त राखून नित्यशः पहाटेस उठून गायनादि प्रकार, भाषापरिज्ञान मोठ्या मेहनतीनें शिकविलेले अशा मैना, राघू, चंडोल, मयूर, तित्तिर, आदिकरून तऱ्हेतऱ्हेच्या रंगांच्या मिजाशीत ठेवलेल्या पाळींव

प त्यांनीं हा जेव्हां **मधुमालती**विषयीं दुःखकारक गलबला ऐकिला तेव्हां त्यांनींही आपल्या कोमल दीनस्वरानें रुदनास आरंभ केला. तसेंच अंगण्यांत लाविलेले आणि स्वहस्तानें वाढविलेले वृक्ष देखील आपले पुष्पाश्रु टाकूं लागले. अशा दुःखांत ती सर्व रात्र गेली. उजाडतांच कांहीं संशय राहिला होता, ह्मणून अगोदर **श्रीव्यंकटेश**मंदिरांत शोध घेऊन येण्यास कारकुनास पाठविलें. आणि शहरांतील आप्तवर्ग इष्टमित्रांचे घरोघर, शिवाय विहिरी, तलाव, उसवास, आणि कांहीं खोल खोल भुयारांकडे चाकरमाणसें शोधास पाठवून, **बाबासाहेब** आपले स्त्रीसहवर्तमान कोठें तरी तिचा शोध लागेल, अशा कांहीं आशेवर बसले होते. परंतु शोध करून शेवटीं कोठेंच थांग न लागल्याची जे ते येऊन खबर देऊं लागले. काल अस्तमानचे चार घटका दिवसापुढें तिला कोणींच पाहिलें नाहीं, असें कळतांच त्यांची अगदीं निराशा झाली!

हीं वार्ता सर्व शहरभर लागलीच पसरून **मधुमालती**विषयीं नगरवासी जनांस फार दुःख वाटलें; आणि **बाबासाहेबांचे** वाड्यांत ते समाचारास आल्यामुळें स्त्रीपुरुषांची एकच गर्दी झाली. त्यांतील तिच्या मैत्रिणींस व **विश्वासरावाचे** मित्रांस पाहून उभयतांस अधिकच रडें कोसळलें. आतां तीं दोघें भेटण्याची वाट खुंटली, असें निश्चयानें वाटून त्यांचें सौंदर्य व सद्गुणांचा आठव करून वरचेवर शोकग्रस्त होऊं लागलीं. हें पाहून जी समाचारास मंडळी येत जात असे, त्यांसही दुःख होऊन जे ते ह्मणूं लागले कीं, या विचाऱ्यांचे पदरीं परमेश्वरानें इतके दिवस सौख्य देऊन शेवटीं दुःखाचा पर्वत यांचे मस्तकीं दिला. ती कोठें गेली असावी हेंही कोणाचे लक्षांत येईना. तथापि, आपापले कल्पनेनें त्या दीन झालेल्या उभयतांचें सान्त्वन करून ईश्वरकृपेनें तीं उ. उभयतांही लौकरच भेटतील, असेविषयीं अनेक उदाहरणांनीं धीर देऊन घरोघर विस्मय करीत जाऊं लागले.

हें वर्तमान राजपुत्रादि कुमतिअष्टकास समजतांच, **मधुमा-**

लती आपल्यास आतां मुळींच प्राप्त होण्याची आशा नसल्याचा व आपल्या त्रासानें कोठें तरी तिणें प्राण दिला असावा, याचा प्रत्येकाच्या अंतःकरणास खेद वाटून तिच्या पातिव्रत्याविषयीं वर्णन करूं लागले. आतां तिची ह्मणून आशा करणें नकोच. त्या उभयतांची सुखावह प्रापंचिक संगती स्वप्नवत् क्षणिक झाल्यानें वारंवार तिचे आईबापांस दुःख होऊन त्यांचें अन्नपाणीही दिवसेंदिवस तुटत चाललें. यांच्या ध्यासानें नित्यशः रात्रीं कदाचित् कांहीं झोंप लागली तरी, त्यांत मनोविकाराप्रमाणें चमत्कारिक स्वप्नें पडून दचकून वरळत असावें. भोजनास वसलें ह्मणजे **मधुमालती**चें लहानपणचें सेजारीं बसणें, व बोवडे बोवडे लाडके शब्दांचा आठव होऊन एक दिवसही त्यांच्या डोळ्यांचें पाणी तुटेना. कदाचित् तिचे खोलींत जाणें झालें, तर तिच्या बाळपणच्या खेळांतील बाहुल्या, सागरगोटे, चुली, भातुकलीचीं चिमकुलीं भांडीं, तिचा रिकामा विसखळीत झालेला बिछाना, उंची उंची हौशीच्या चिरड्या, कांचोळ्या, इत्यादि वस्तु पाहून त्या उभयतांचें पोटांत ढवळे. तसेंच कधीं **व्यंकटेश**मंदिरांत जाणें झालें ह्मणजे, **विश्वासरावा**चें स्मरण होऊन दुःख होई ! तिचे संवयीचे पिंजऱ्यांतील मैना, रावे आदिकरून, पक्ष्यांचेपुढें फळफळावळ खाण्यास नेली ह्मणजे तिचें स्मरण होऊन त्यांनींहि दीन स्वरानें ओरडून वरचेवर डोळ्यांतून आंसवें टपटप् धरणीवर टाकावीं. आणि वारंवार **मधुमालती! मधुमालती!** या शब्दांचा साद घालावा. मग उदरशांतीस्तव त्यांनीं आणलेल्या फळांतून कांहीं चाखतमाखत खावें. पाळींव हरणांचे पाडसांनीं व पूजनाच्या गार्यींनींहि नित्य घरांत ती दिसत नसल्यानें भलत्याच वेळीं हंबरत असावें. सारांश, **मधुमालती** नाहींशी झाल्या दिवसापासून मनुष्य, पक्षी, पशु, आणि वृक्ष या कोणाचेही अंगावर तेज ह्मणून राहिलें नाहीं.

## भाग ८.

आतां **विश्वासराव** त्या गर्दीत एकदम नाहींसा झाला, असें मागें सांगितलें आहे. परंतु, त्या ठिकाणीं मेजवानीसमयीं त्यांच्या मसलतीविषयीं कांहीं कुजबुज चालून बंदोबस्त होत आहे, व कुमतीचे मताची कांहीं मंडळी युक्तियुक्तीनें बाहेर पडत आहे, इतक्यांत **विश्वासराव** त्याच गर्दीत सर्वांची नजर चुकवून संधि राखून त्यांचे मेळ्यांत मिसळून आपले शस्त्रानिशीं कोणास समजूं न देतां हद्दीपार निघून गेला. जिकडे तिकडे बाहेर एकच गर्दी होऊन गेली. हातांत नागव्या तरवारी घेऊन स्वार, शिबंदी व अरबाचे पाहरे यांणीं एकदम नाकेबंदी केली, व त्याचप्रमाणें सर्व शहरांत बंदोबस्त झाला. आतां आपला हेतु सिद्धीस न्यावा, अशी कोतवालानें आंत वर्दी दिलेलीही **विश्वासरावाचे** कानीं आली. इतक्यांत पांच असामी त्याजवर नजर ठेवून त्या गर्दीत त्यास धरण्याकारितां सशस्त्र आडवे आले. परंतु त्या समयशूर **विश्वासरावानें** चलाखीनें त्यांचा एकही वार आपले अंगास लागूं न देतां त्या पांचांचींहि शिरें शस्त्रकौशल्यानें धरणीवर पाडिलीं. चोहोकडे एकच गर्दी झाल्यानें हा प्रकार कोणाचे समजुतीस आला नाहीं. पुढें **विश्वासरावानें** ईश्वराचें नामस्मरण करून विचार केला कीं, कदाचित् आतां शहरांत गेलों तर आपणास कांहीं दगा होईल. आणि आपण जर एक जिवंत असलों तर पुनःथोडेच दिवसांत सर्व सौख्य दृष्टीस पडेल. आतां आपल्यास या गर्दीत जरी कोणीं ओळखिलें नाहीं, तरी अंत बोभाट होऊन आपणास बाहेर धरणें येईल;असा विचार करून जरी प्रपंचसुखाचें स्मरण होऊन मोहपाशानें त्याचे मनास वेढिलें होतें, तरी निरुपायास्तव विवेकरूप शस्त्रानें त्याचें छेदन केलें. आणि शहरांत परत न जातां त्यानें धैर्यानें तितक्या संधीस तेथें एक अर्बी घोडा सरंजामानिशीं एके झाडास बांधला होता तो पाहतांच त्यास युक्तीनें सोडिलें; आणि त्यावर लागलाच स्वार होऊन परभारें आडमार्गानें रातोरात

सुमारें तीस कोस निघून गेला. वाटेनें क्षणोंक्षणीं, माझे मागें पुष्पमालतींची काय दशा होईल? मी या दंग्यांत नाहींसा झाल्यानें कदाचित् कांहीं विपरीत समजून ती आपला प्राण ठेवणार नाहीं! मजवांचून तिचे आईबापांस किती दुःख होईल ! असे अनेक संशयाचे तरंग त्याचे अंतःकरणाब्धीवर उभे राहून त्यास वरचेवर रडूं येऊं लागलें. त्या दुष्टांची अनीतीची वर्तणूक मनांत येऊन त्यास वाटे कीं, कदाचित् त्यांजपासून तिजला त्रास होईल कीं काय ! या प्रसंगीं मी जिवंत असल्याचीही खबर तिला देववत नाहीं. असो; तिचें पातिव्रत्यच तिचें रक्षण करो. तसेंच तिचें अपूर्व सौंदर्य, अंतःकरणास रंजविणारें मर्यादशील मृदु भाषण, व दुसरे अपूर्व गुण त्याचे मनांत येऊन तिचें रक्षण करण्याविषयीं तो वारंवार ईश्वरास आळवीत असे. उजाडल्यावर त्यास मार्गांत एक खेडेगांव लागलें. तेथें गुप्तपणें तिसराप्रहरपर्यंत विश्रांति घेऊन तो तसाच पुढें चालला. लांब जाऊनही उपयोग नाहीं, ह्मणून हस्तनापुरापासून सुमारें साठ कोसांच्या अंतरावर एक शहर होतें तेथेंच आपला एक मित्र राहात आहे असें त्यास स्मरण झालें; ह्मणून त्याचे येथें गुप्तपणें जाऊन तो आनंदानें राहिला, आणि कांहीं कारणिक हकीगत सांगून आपण येथें आहोंत ही गोष्ट गोप्य ठेवण्याविषयीं त्याजपासून कबूल करून घेतलें.

तेथें कांहीं दिवस विश्रांतीचा वारा घेतल्यावर एके दिवशीं चित्ताग्रस्त करमेना ह्मणून शहराबाहेर सहज हवा खाण्यास गेला. परत येतांना शहरासंनिध एक रमणीय वर्तुलाकार पायऱ्यांचा चिरेबंदी तलाव त्याचे दृष्टीस पडला. तेथें चूळ भरून नेत्रांस स्पर्श करून क्षणैक तेथील पटांगणावर एका हवाशीर वृक्षाखालीं सुमारें अस्तमानचे पांच वाजतां विश्रांति घेत बसला आहे तों त्यास आपलें घरचें व मित्राचें स्मरण झालें आणि चिंतातुर झाला आहे, इतक्यांत एकाएकीं कोणीं एक स्त्री येऊन त्याचे गळ्यास प्रेमानें मिठी मारून गहिंवरली. तोंडांतून एकही शब्द फुटेना तें ....

विश्वासराव घाबरून ती कोण असावी ह्मणून तिजकडे निरखून पाहूं लागला, तों ती आपली स्त्री आहे, असें त्यानें निश्चयानें ओ-ळखलें. मग काय विचारावें! ती दीनासारखी मलीन वस्त्र नेसले-ली आहे, व तिचे नेत्रांतून अश्रु चालले आहेत, व दुःखानें अ-गदीं कृश झाली आहे, असें पाहतांच विश्वासरावास फार वाईट वाटून जो गहिंवर आला तो कांहीं केल्या आवरेना. तरी विचार करून उभयतांनीं लौकरच आपले शोकास आवरण घातलें. विश्वासराव तिणें बोलावें ह्मणून कांहीं वरचेवर तीस विचारी, तरी तिचे तोंडांतून एकही शब्द न निघतां तीस राहून राहून रडूं येई! तें कांहीं केल्यानें बंद होईना. आपले दुःखानें या सुंदरीस अशी दशा प्राप्त होऊन आपले शोधार्थ ही भटकत फिरत आहे, असें विश्वासरावास वाटून, आपले हातानें तिचे नेत्र पुसून त्याणें तीस पोटाशीं धरिलें. इतक्यांत दिवे लागण्याची वेळ झाली. मग ती मोठ्या दुःखानें ह्मणाली: ज्यानीं मनीं स्वप्नींही आशा नसून माझे सद्भाग्यानें आज हे आपले पाय दृष्टीस पडले. आतां माझे सर्व दुःखाचा नाश झाला, परमेश्वरानें दिव्य चक्षु देऊन माझें अदृश्य सौभाग्यकुंकू दृश्य केलें. असो. प्राणपति! हें गंभीर सुहास्य मु-ख दृष्टीस पडण्याची मला मुळींच आशा नसून आज आपली गांठ अकस्मात् पडली; तस्मात् ईश्वरकरणीच अगाध आहे! त्याचेच कृपेनें हा आजचा आनंददायक भेटीचा योग आला. आतां आ-पण संनिध असून कितीहि दुःखें आलीं तरी तीं मी तृणवत् मानीन. आपण जिवंत आहों ही शुद्धि जर माझे आईबापांस न समजली तर त्यांचा प्राण राहणें नाहीं!

असें तिचें पाषाणासही द्रव आणणारें मंजुळ भाषण ऐकून विश्वासराव तीस ह्मणाला, प्राणसखे! तुला फार श्रम होऊन तूं फार क्षुधित आहेससें वाटतें. आतां शहरांत माझे मित्राचे घरीं चलावें. तेथें एकांतीं सर्व उभयतांची परस्परांस हकीकत निवेदन करूं. तेव्हां विश्वासरावास कांहीं वेळ येथेंच बसावें, मला येथें,

थोडेसें काम आहे; असें सांगून मधुमालती तेथून समोरचे बाजूस कांहीं वाटसरू लोकांचें खटलें व गाड्या उतरल्या होत्या तेथपर्यंत जाऊन त्या मंडळीस भेटून लागलीच माघारी आली. नंतर विश्वासराव तिला बरोबर घेऊन कांहीं काळोख पडत आहे इतक्यांत आपल्या मित्राचे येथें येऊन पोहोंचला. त्या रात्रीं त्यांची एकांतीं गांठ पडल्यावर उभयतांस आनंदाचें भरतें येऊन वाटूं लागलें कीं, आजचे आमचे भाग्याप्रमाणें कोणाचेंच भाग्य नसेल. कांहीं सुकृत पदरीं होतें ह्मणूनच भेटी झाल्या. विश्वासरावानें त्या सुंदरीचे मुखाकडे पाहिलें तों तिचें शरिर अगदीं कृश होऊन आपले दुःखानें तोंडावर निस्तेजता आली आहे, व ग्लानीमुळें एक एक शब्द मोठ्या प्रयासानें तिचे तोंडांतून निघत आहे; असें पाहून:—

**विश्वास०**—हे मृदुभाषणी, तुला असा प्रवास सुखावह वाटून अशा दुःखांत कोणीकडे किती दिवस व कशास्तव तूं फिरत आहेस! अशा स्थितींत वेळचे वेळीं मधुरान्न, व सुवासिक जल कशाचें मिळतें? तुला ऊन, वारा, कसा सहन झाला असेल? पुरतें शीत निवारणार्थ अंगावर वस्त्रही नाहींना? घरीं एखादे दिवशीं जेवण्यास किंचित् उशीर झाला तर लागलीच तुझी प्रकृति बिघडून पित्तांशानें मस्तक दुखूं लागत असे! तुझ्या या मृदु पायांस रुजाम्यावरीलही बारीक पडलेले कण खुपत असत! असें असतां मजप्रमाणें तुझ्याही कपाळीं वनवास आलाना? हर हर! कोणते वेळेस कोणास कसा प्रसंग येईल याचा भरंवसा लागत नाहीं! असो. तुझी भेट झाली हेंच विशेष मानतों. हे प्रियभामिनी मधुमालती! तुला असा प्रसंग येण्याचें कारण काय? (तें ऐकून).

**मधुमा०**—प्राणप्रिया, आपण माझें दुःख वर्णून इतके कां कष्टी होतां? पतीवांचून सर्व सौख्य स्त्रियांस विषतुल्य आहे. आपणच हातचें सोडून दिलें, मग या देहाची मिजास कशास पाहिजे? इतकेंच धन्य मानतें कीं, आपली कांहीं जिवंत असण्या-

ची आशा असल्यावरून तरी आजपर्यंत हा देह वांचून आपले दृष्टीस पडला. मला कांहीं दुःख झालें नाहीं. आपणच आतां या दीनावर कृपाळू होऊन, अगोदर नाहींसे झालां असून कसे येथें आलां; हें सांगून माझी आशा पूर्ण करावी.

वि०—(विशेष आग्रह पडला जाणून)हे गजगामिनी, प्रियंवदे! तो प्रसंग माझ्याच्यानें वर्णन करवत नाहीं. परंतु तूं विचारलेंस त्याअर्थी सांगतों. असें ह्मणून मागें झालेला भेटीपर्यंतचा सर्व इतिहास कळवितांच तिचे डोळे अश्रूंनीं भरून आले. मग तीही त्या दुष्टांचे हातून बाहेर पडेपर्यंतचा आपला मजकूर सांगून ह्मणाली: ते वेळेस घरीं जाऊन गुप्त राहावें असें मनांत आलें होतें. परंतु ते दुष्ट, राज्याचे सत्ताधिकारी असल्यानें मला बलात्कार करून पुनः नेतील, व मजकरितां वडिलांचे आणि आपले नांवास त्या योगानें काळिमा येईल. असें जाणून अस्तव आणि कदाचित् कोठें आपली कांहीं तरी शुद्धि लागेल या आशेनें अंगावरील दागिन्यांचें एका लुगड्यांत गांठोडें बांधून तशीच दीनवेषानें तितक्या रात्रीं देहाची आशा सोडून शहराबाहेर काळोखांत पडलें. पुढें एक वाख लागली. तेव्हां तेथेंच प्राणत्याग करावा असें एकवार माझे मनांत आलें; परंतु आपल्या भेटीचे उत्कंठेनें तशीच धैर्य धरून दोनप्रहर रात्रीचे सुमारास परमेश्वराचें स्मरण करीत एकटीच आडमार्गानें चाललें. काय चमत्कार पहा ह्मों, जरी मला कधीं चालण्याचा प्रसंग नव्हता व बाहेरचें नुसतें वारें देखील माहित नव्हतें, तरी निराश्रित व पतिविरहरोगानें ग्रस्त होऊन दीन झालेली जी मी पंचाननाची स्त्री यःकश्चित् त्या दुष्ट लांडग्यांच्या जाळींत सांपडून त्यांचे भक्षस्थानीं पडणार होतें, त्या मला तें फारच सुखावह झालें. अनंत जन्मांचे सुकृतेंकरून हा मनुष्यदेह एकवार प्राप्त होणार, त्यांत पास भ्रष्टता आणणें यापेक्षां मरण बरें. हा विचार पुरतेपणीं मनांत येऊन सर्व प्रकारें घराची व देहाचीही आशा सोडून, जरी काळो-

ख पडल्यामुळें मार्ग दिसत नव्हता तरी दुष्टांचे भयामुळें उजाडे-पर्यंत चार पांच कोस मार्ग कंठला. पुढें पायांत गोळे येऊं लागले, पाउलें सुजलीं, तळव्यांचीं रक्तें निघालीं, एक पाउलही पुढें टाकवेना; कांहीं रानजनावरें ओढ्यांत अगर वाटेंत भयंकर शब्द करीत, त्यांचे भयानें काळिजांत धडकी भरे; मार्गांत कोठें कोठें अडखळून पडल्यानें सर्वांग ठेंचून बहिरावलें; थंडीनें हाता-पायांचीं वेंगडीं वळलीं. पोटत क्षुधा लागली व झोकांडे जाऊं लागले. पण उपयोग काय? घरीं नुसता पायास खडा रुतला तर चार दासी धांवून येत असत. प्रारब्धदशेनें कोणास सोडलें आहे? " प्रारब्धकर्माचा भोगल्याविना क्षय होत नाहीं, " असें तत्त्वबोधांतील वाक्य मनांत येऊन त्याचा कांहींएक खेद वाटला नाहीं. जरी देहाची आशा सुटली होती, तरी वरचेवर मनांत येई कीं, माझें जर आतां अशा दुःखांत कांहीं विपरीत झालें, आणि आपण सुरक्षित असून ही वार्ता जर आपले कानीं गेली तर मजवांचून आपली दशा काय होईल? सहवासांतीं मजवरील आपलें प्रेम कसें हें मला माहीत असल्यानें वाटे कीं, फार दिवस माझे विरहदुःखानें आपला प्राण कशाचा वांचतो? वारंवार आपली मूर्ति दृष्टीपुढें उभी राहून पोटांत कालवून माझे डोळ्यांचें पाणी तुटेना! मग निरुपायास्तव ग्लानीनें तशीच त्या रस्त्यांत अंगावरील अर्धें लुगडें हंतरून हातपाय पोटाशीं धरून गुडघ्यांत हें गांठोडें न दिसेसें ठविलें. आणि पडलें न पडलें तोंच दुःखा-ची झोंप तेथेंच लागली. पुढें काय झालें याची मला कांहीं एक शुद्धि नाहीं.

असें तिचें दुःख ऐकून विश्वासरावास फार वाईट वाटून रडें कोसळलें. परंतु तें कांहीं विवेकानें आंवरून तो ह्मणाला: हर हर ! ! ऐश्वर्यसंपन्न या कुमारीची अशी दशा व्हावीना ! धिक् जिणें त्या पुरुषाचें कीं, ज्याच्यानें आपले स्त्रीचेंही रक्षण करवत नाहीं. हें ऐकून त्याचें समाधान करून ती त्याम —

ईश्वर तारता असला ह्मणजे अशीं हजारों संकटें निवारण होतात. पुढें काय झालें तें ऐकावें: मध्यंतरीं कांहीं वेळ लोटला न लोटला इतक्यांत एकाएकीं कोणी मला तेथें हांक मारली, त्यायोगानें मी दचकून जागी होऊन पहातें तों, सूर्योदय नुकताच होऊन सर्व जंगलभर त्याचे किरणांनीं आपली आरक्त प्रभा पसरली आहे. चांगली शुद्धीवर येऊन कोणीं एकाएकीं मला हांक मारली ह्मणून घाबरी झालें, आणि पाहूं लागलें तों एक वृद्ध श्रीमान् गृहस्थ मजपुढें उभा आहे. मग तो मला म्हणाला, बाई, तुझे मुद्रेवरून तूं कोणा गर्भश्रीमंताची कन्या असावीस असें मला वाटतें. परंतु दीनासारखी येथें तुला पडलेली पाहून मला फार वाईट वाटून मीं तुला जागें केलें. घाबरी होऊं नकोस. तूं माझे कन्येप्रमाणें आहेस. तुला कोणीं दुष्टानें दुःख देऊन निःसंशय तुझी ही अशी दशा केली असावी. ऊठ, सावध हो. हें तुझें गांठोडें एकीकडे पडलें आहे तें आपलें सांभाळून घे. बरें झालें तुझें भाग्य मोठें म्हणून आमचीच गांठ पडली; नाहीं तर तूं वाटेंतच अशी पडलेली पाहून एखादा दुसरा कोणी आमचे अगोदर येता तर हें तुझें गांठोडें नेऊन तुझ्या मोहक रूपास भुलून तुला कोणीकडे घेऊन जाता त्याचा पत्ताही लागला नसता. असो. आतां तुझी कांहीं हकीकत आम्हांस ऐकीव. त्याप्रमाणें तुझी नीट व्यवस्था करून दिल्याखेरीज आह्मांस येथून जाववत नाहीं. त्या दयाळू भाषणानें मला कांहीं धैर्य येऊन मी त्यास ह्मणालें: आपण मला ईश्वरच भेटलां. आपण कोण व कोणीकडे जात आहां, हें या दीनास कळविण्याची कृपा व्हावी. तेव्हां त्यांनीं सांगितलें: आह्मी कर्नाटकांतून येऊन खटल्यासुद्धां महायात्रेस जात आहोंत. जातीचे ब्राह्मण सावकार असून बरोबर पोरांबाळांचें खटलें आहे. तेव्हां मला ते अनाथासें पुण्यमार्गांत साह्य झाले. जाणून मी लागलीच आपली थोडीबहुत हकीकत त्यांस सांगून त्यांचे पाय धरून ह्मणालें, जशी मला आपण कन्या ह्मटली तसेंच मला

आपण बरोबर घेऊन चलावें. तुमचे योगानें माझें रक्षण होऊन कदाचित् कोठें माझे पतीचाही वाटेंत शोध लागेल. अशा माझे कनवाळू भाषणानें त्या दयाळू सावकाराचे मनास संतोष वाटून मोठ्या आनंदानें आपले कन्येस, सुनेस, कुटुंबास व मुलास ही माझी धर्मकन्या आहे असें सांगून बरोबर गाडींत बसवून इतर मुलांप्रमाणें माझा प्रतिपाळ करीत त्यांनीं मला येथपर्यंत आणिलें. तों त्या सरोवरावर हे आपले अवचित् पाय पाहून त्यांस आपली भेट झाल्याचें सुचवून लागलीच येऊन आपणास भेटलें. नंतर या शहरांत येतांना एकवार त्यांस भेटून सर्व वर्तमान निवेदन केलें. तेव्हां त्यांस बहुत संतोष होऊन माझे वियोगाचे दुःखानें त्यांस फार वाईट वाटलें. मग त्यांचें समाधान करून तशीच परत येऊन आपणांबरोबर येथें आलें. असो, ईश्वराची कृपा सबळ ह्मणूनच हा सर्व योग घडून आला.

पुढें कांहीं दिवस त्या मित्राचे घरीं तीं दोघें आनंदानें सर्व आपलीं दुःखें विसरून राहिलीं. एके दिवशीं रात्रीं **विश्वासराव** निद्रेंतून उठून सहज बसला आहे तों त्याचे मनांत अनेक विचार येऊं लागले, **चंद्रकांतादि** मंडळीची सुटका त्या दुष्टांचे कैदेंतून केली पाहिजे. त्यावांचून पुनः आपल्यास दुर्घट यत्नानें मिळविलेलें **व्यंकटेशमंदिरादि** सौख्य मिळावयाचें नाहीं. आतां ही वामांगी बरोबर असून असा प्रयत्न होण्यास महत् प्रयास पाहिजेत. त्याअर्थी एकवार आपले **जनस्थानीं** इच्यासहवर्तमान जावें. कदाचित् मित्राचीही कोठें शुद्धि समजेल; आणि आईबापांस आपल्या वियोगामुळें दुःख झालें असेल तेंही नाहींसें होऊन त्यांचे भेटीचा लाभ होईल व हिचेंही रक्षण तेथेंच होईल. मग पुढें त्यांची आज्ञा घेऊन या कामीं बाहेर पडण्यास ठीक पडेल. असा विचार करून तिचे मतानें त्या मित्रास आपलें गुह्य सांगून दुसरे दिवशीं मित्रानें दिलेला एक व आपणाजवळील एक अशा दोन घोड्यांवर हीं दोघें बसून त्याची आज्ञा घेऊन गांवीं जाण्यास निघालीं.

बरोबर एक विश्वासू हलकारा आणि खिजमतगार असे दोघे मित्रानें पोहोंचविण्यास दिलेले घेतले. घरांतून निघतांना त्याचे उपकार स्मरून **विश्वासराव** त्यास ह्मणालाः या वेळेस तुह्मीं आमची बाजू राखिली. तुमचे योगानें ही माझी सुंदरी मला प्राप्त होऊन आनंदानें आह्मी घरीं जात आहोंत. असेंच सदैव प्रेम असूं द्यावें. पुनः ईश्वर लौकरच भेटीचा योग आणील. हे शब्द ऐकून त्यासही फार गहिंवर येऊन उभयतांचे डोळे वियोग-दुःखानें भरून आले.

असो. याप्रमाणें मित्राची आज्ञा घेऊन तीं मार्गस्थ झालीं. एके दिवशीं प्रातःकाळापासून सर्वांस दिशाभूल होऊन मार्ग चुकून एके महारण्यांत डोंगरकिनाऱ्यानें जात आहेत तों गांव कोठेंच लागेना. जिकडे तिकडे मोठमोठाले भयंकर पहाड असून त्यांचे खोल दऱ्यांतून किर्र झाडी वसली आहे; आंतून व्याघ्र, अस्वल, लांडगे, भालू, रानबोके, आदिकरून घातुक जनावरांचे शब्द कानीं येत आहेत; तिकीएक उंच उंच पहाडांतून तळीं पडत असलेल्या जीवंत पाण्याचे धो धो शब्द चालू आहेत; अरण्यपक्ष्यांचे किलकिलाट व उदास शब्द कानीं येत आहेत; अशा वेळीं सर्वांस वेड्यासारखें होऊन कोणीकडे व कोणत्या दिशेस आपण चाललों आहोंत हें मुळींच कोणाचे लक्षांत येईना. **मधुमालती** तर अतिशय घाबरी होऊन रडूं लागली. घोड्यांचे पाय उंच उंच पहाड चढतांना व उतरतांना थकले. पुढें कोणीकडे जावें हें सुचेना. असें होतां होतां तिसरे प्रहरचा सुमार झाला. तितक्यांत दोन मोठाले पटाईत वाघ एका दरींत दूर अंतरावरून इकडून तिकडे जातांना प्रत्यक्ष दृष्टीस पडले. तेव्हां तर सर्वांच्या देहांची आशा सुटली. भयानें अंतःकरणें कांपूं लागलीं. घोडेही कावरेबावरे होऊन त्यांचा चालण्याचा वेग कुंठित झाला. आज संकटांतून प्राण वांचतील असें कोणाचेंही मन धीर देईना. मग त्यासह तसेंच हळू हळू तीं खोल दरी

मोठ्या धैर्यानें उतरून खालचे डोंगराचे माचीचे मैदानांत ते सर्व आले. तेथें एक दळवटलेला लहानसा मार्ग त्यांचे दृष्टीस पडला. तेव्हां सर्वांस थोडासा धीर आला खरा, परंतु अस्तमान होण्याचा समय असून गांव किती लांब असावें याचा कोणास कांहींच अजमास लागेना. तरी ईश्वरावर भरंवसा ठेवून त्यानें दाखविलेल्या मार्गानें नामस्मरण करीत ते तसेच पुढें चालले आहेत तों अस्तमान झाला. इतक्यांत त्या ठिकाणीं मार्गांत कोणीं एक श्रीमान् गृहस्थ भेटून ह्मणालाः मलाही दक्षिण हिंदुस्थानांत जावयाचें आहे. चला बरोबरच जाऊं, अनायासें सोबतीचें काम झालें. आह्मी आपलें खटलें पुढें लावून या जवळच्या माहितगारीचे मार्गानें चाललों आहों. या राहाळांत थोडी आमची ओळख आहे. असें बोलत चालले आहेत तों दूर अंतरावर दिव्याचा उजेड दृष्टीस पडला; तेव्हां त्या गृहस्थानें सांगितलें कीं, येथें वस्ती आहे, आणि चाललेला मार्गही तिकडेसच जात आहे. तेव्हां त्या धोरणानें जाऊन दोन घटका रात्रीं चांदण्यांत ते वस्तीस येऊन पोहोंचले. तेथें एक मोटा वाडा असून सभोंवतीं डोंगरांची ओळ होती. तेथील लोकांस विचारतां येथून बारा कोसपर्यंत सभोंवतीं दुसरी वस्ती याखेरीज चांगली नाहीं. याहीपेक्षां पुढें मार्ग बिकट आहे. तुह्मी इकडे कसे आलां? आतां येथेंच वाड्याचे पडवींत वस्तीस रहा. चांगलें उजाडलें ह्मणजे मार्ग विचारून मार्गस्थ व्हावें. येथील यजमान वाड्याचे मालक श्रीमंत आहेत; येथें तुमची चांगली बरदास्त राहील. असें बोलत आहेत तों दोघेजण वाड्यांतून बाहेर आले. ते सभ्य गृहस्थ पाहून या सर्वांस समाधान वाटलें. त्यांणीं पडवींत आनंदानें रहा आणि रात्रीं येथेंच सर्वजण भोजन करा; अथवा शिधासरंजाम, घोड्यांस दाणावैरण जशी इच्छा असेल तसें सांगा. असें ह्मणतांच त्यांचे मधुर वाक्यानें त्यांस अत्यानंद होऊन हे तेथें उतरले; रात्रीं वेळेच त्यांचे आग्रहास्तव सर्वांनीं थोडासा फराळ केला. दिवसभर ऊन ला-

गून श्रम झाले होते, त्यामुळें सर्वजण बाहेरील चौकाचे ओटीवर बिछाने टाकून लौकरच निजले. आणि ही निर्भय जागा आहे असें वाटून सर्वांस तेव्हांच गाढ झोंप लागली. मोठ्या पहाटेस **विश्वासराव** नित्यनियमाप्रमाणें उठून पहातो तों **मधुमालती** बिछान्यावर नाहीं ! तेव्हां एकदम त्याचे काळिजांत धस्स होऊन चाकरांस तिजविषयीं विचारूं लागला. तसेंच त्यांस चोहोंकडें शोधास पाठविलें, तथापि तिचा कोठेंच ठिकाण लागेना. मग काय विचारावें; निःसंशय कोणी दगा केला असावा, असें वाटून **विश्वासरावाचें** देहभान नाहींसें झालें. मोठ्यामोठ्यानें रडूं लागला. इतक्यांत पहातो तों एक घोडा व बरोबरील गृहस्थही नाहींसा झाला आहे. तेव्हां तर तिचे विरहानें त्याची कंबर बसली. बोबडी वळून वेड्यासारखें करूं लागला. त्या दोघां चाकरांचीही आपण असतांही यजमानीन नाहींशी झाली यामुळें अशीच अवस्था होऊन गेली. **विश्वासरावाचे** काळजाचा धीर सुटून तो ह्मणूं लागला: हे प्राणसखे! हे मनोरमे! मुझी काय अवस्था झाली? तूं यास दीन करून कोणीकडे गेलीस? अशा आरण्यांत शोध कशाचा लागतो? येथें आतां विचारावें तरी कोणाला? अथवा रात्रौ तूं उठून बाहेर कदाचित् आली असल्यास घातुक जनावरांनीं तुला नेलें असेल कीं काय? मी येवढा आपले ठिकाणीं धूर्त म्हणवितों; परंतु या ठिकाणीं माझी अक्कल गुंग झाली. आतां येथून मी सर्वस्वीं संसारसुखास मुकलों. ( डोळ्यांस पाणी आणून ) मोठ्या आशेनें तुला बरोबर घेऊन इकडील सर्वस्वाचा त्याग करून आईबापांस भेटावयास जात होतों. आतां घरीं व तुझे माहेरीं मला तरी जाऊन कर्तव्य काय? जितकें सौख्य भोगलें तितका मी दुःखांत पडलों. या वेळेस तूं कोठें असशील? मजवांचून आतां मात्र निःसंशय तुझे प्राण राहतील असें वाटत नाहीं. सखे! स्वप्नवत् स्वर्गसुखाप्रमाणें तुझी संगती झाली. तुझे मुखचंद्रांतील वचनामृत या विरही चातकाचे कर्णमुखीं पडण्याची असंभवता दिसती! बहुतकरून हा चो-

रांचा वाटा असावा. तुझ्या मोहक स्वरूपास भुलून येथील यजमानानींच तुला नाहींसें केलें असावें. असें खचित माझे बुद्धीस वाटतें. कारण, येथें आल्यापासून तुला पाहतांच तो मधुक्षिकेप्रमाणें लुब्ध होऊन त्यानें आमचा फराळाचा व दाणावैरणीचा चांगले रीतीनें समाचार घेतला. तेव्हांच असें कांहीं मनांत आलें होतें. असें ह्मणून तो अगदीं शोकाकुल झाला. इतक्यांत वाड्याचे मालकही बाहेर येऊन विचारूं लागले. काय आहे हो? तुमची स्त्री नाहींशी झाल्याची कांहीं गलबल ऐकली. येथून तर आमचे आज्ञेखेरीज काडीहि हालणार नाहीं. तो तुमचेबरोबर दुसरा एक गृहस्थ आलेला कोठें आहे? व तुमचा एक घोडाही येथें दिसत नाहीं. यावरून स्त्रियांचा काय नियम आहे? कदाचित् त्या उभयतांची मार्गांत कांहीं मसलत होऊन संकेतानें रातोरात निघून गेलीं नसतील कशावरून? आपण मात्र आपले जागीं खात्रीनें म्हणत असावें कीं, आमचे बायकोसारखी पतिव्रताच नाहीं. परंतु तें व्यर्थ. वेळ आल्यावर त्या प्राणघात करावयासही चुकणार नाहींत. तो परका गृहस्थ रात्रींच आम्हास समजला. कारण, त्याची चंचलवृत्ति कांहीं वेगळीच होती. तेव्हांच आम्हीं आपले जागीं भाकीत केलें कीं, हा मैंद कधीं तरी तुम्हास कांहीं दगा देईल. परंतु आम्हीं तरी कशावरून म्हणावें? आमचेपेक्षां त्याचा तुमचा परिचय व सहवास ज्यास्ती. असो. किती जरी खेद केला तथापि उपयोग काय? गेल्याचा शोक कधींही थोरांनीं करूं नये. बरें झालें, तुमचें नशीब मोठें कीं, आजपर्यंत त्याचा दम झाला नाहीं. नाहींपेक्षां स्त्रीरत्नास्तव त्यानें तुमचे प्राणाचा वाटेंत गुप्तघात केला असता तर दाद न लागती. असें मोठ्या गांर्हिवरानें त्यांणीं त्याचें समाधान केलें. परंतु विश्वासरावास तें सत्य वाटेना, तरी कर्तव्य काय! ईश्वराचेच मनांत असें मला दुःख देण्याचें आलें. आतां या घोरारण्यांत तिचा काय ठिकाण लागणार? म्हणून तसाच, सर्व उदास वाटलें तरी, त्या दोघां शिपायांस

घोड्यावर बसून सुमारें आठ दिवस जीवावर उदार होऊन डोंगरां-च्या कड्यांतून, दऱ्यांतून, आसपास दहा बारा कोस चोहोंकडे तिचा त्यानें पुष्कळ शोध केला; परंतु कोठेंच कांहीं सुगावा ला-गेना. ह्मणून निरुपाय होऊन घराकडे जाण्याचा मार्ग सोडून पुन: तो निराशेनें आल्या मार्गानें परत चालला. पूर्वी एक मित्राचा विरह होताच आणि हा दुसरा घोर प्राप्त झाला. रात्रंदिवस अरण्यांतून फिरतांना प्राणसखे! **मधुमालती! मधुमालती!** मला सोडून जाणें तुला सुखावह वाटलेना? तुझ्या विरहानें मला सर्व त्रिभुवन शून्य भासत आहे. वारंवार तुझें सुहास्यवदन दृष्टीपुढें उभें राहून मी वेडा झालों आहें कांहीं माझी तुला दया येऊन भेट दे. अशीच तुझीहि अवस्था माझ्या विरहानें झाली असेल. तूं या हतभाग्याचा मुळींच अंगीकार केला नसतास तर फार बरें होऊन आपले घरीं सुखांत असतीस. आजचा आणि पूर्वीचा प्रसंग तुला कशास येता? हे शुद्ध पतिव्रते! त्या दुष्टांनीं मजसाठीं तुला अपशब्दांनी दूषण दिलेंना? आणि मींहि ते शब्द ऐकून घ्यावे काय? असा सदोदित विलाप करीत असल्यानें त्याचें शरीर झिजत चाललें. अपरात्रींच उठून तिचें स्मरण झालें ह्मणजे मोठ्यानें देहाचीहि शुद्धि सोडून बिछान्यावर रडत बसावें. हें पाहून बरोबरील चाक-रांनीं त्याचें वारंवार सांतवन करावें. मार्गांत एखादें सरोवर अथवा शीतल अंबराई, व हवाशीर बागबगीच्या दृष्टीस पडला ह्मणजे ह्मणावें: सखे! अशी ही उत्तम जागा असून तुजवांचून स्मशान-वत् भासत आहे. तूं बरोबर असतीस तर अशा या ठिकाणाहून मला दोन चार दिवस जाऊं दिलें नसतेंस. मला क्षुधा फार लव-कर लागते जाणून तूं ताजें ताजें अन्न वेळचेवेळीं करून देत होतीस! आतां तीन तीन दिवस अन्नही मिळत नाहीं. किंचित् श्रमामुळें मुखावर घर्मबिंदु आले तर आपले कोमल करपदरानें पुशीत होतीस! हर हर!! सर्व दिवस सारखे राहतील असा को-णीहि भरंवसा बाळगूं नये.

असो याप्रमाणें विश्वासराव मधुमालतीचे विरहानें दुःख करीत फिरत असतां कांहीं दिवसांनीं वराच शुद्धीवर आला. मग घोडा, मोतदार, आणि हलकारा यांस मित्राचे येथें परत लावून आपण जटाधारी गोसांवी बनून स्वेच्छाचारपणानें मेदिनीवर फिरूं लागला.

---

## भाग ९.

इकडे भानुकांतादि कुमति अष्टकांचा पूर्ववत् क्रम सुरू असून सद्दीचे योगानें राज्याची विशेष वहडती होत चालली. सैन्य व द्रव्यसंचय पुष्कळ झाला. परराष्ट्रांत नेहमीं मामाचे कपटमसलतीनें स्वाऱ्या करून द्रव्य लुटून आणावें. असे प्रकारें कित्येकांचीं राज्यें हरण केलीं; त्या योगानें सर्वच अतिशय त्रासून गेले. एके दिवशीं मंडळीचे हर्टीत ठरलें कीं, लखनौचे वादशाहाचे खजिन्यांत सुमारें दहा कोटीची रोख शिलक नेहेमीं आहे. यास्तव तेथील वादशाहास युक्तीनें कैद करून त्याचें सारें द्रव्य लुटून त्यास येथें आणावें. त्याजवरून मामा ह्मणालेः हें काम दुसऱ्याचे हातून होणार नाहीं, आह्मी व सरसुभेदार (उधोसिंग) करूं. तेथील वंदोवस्त जय्यत आहे. एकाएकीं लढाई करून अथवा घाला घालून हेतु सिद्ध होणार नाहीं. आह्मास एक युक्ति सुचली आहे, ती अशी कीं, आपल्या रमण्यांतील अप्रतिम दहा पांच सुंदर स्त्रियांस वरोवर घेऊन जावें. आणि त्या वादशाहास युक्तीनें त्यांचे नादीं लावावें, व त्यास अगदीं स्त्रीलुब्ध करून एके दिवशीं संधि साधून रथांत घालून कोणास न कळतां कैद करून आणावें. तुह्माकडील साह्याचा मात्र पुरावा पाहिजे. आह्मी अगोदर तेथें सुभेदारासह जाऊन युक्तीनें जवाहिराच्या व्यापारसंवंधानें हें काम स्त्रियांकडून करवूं. आणि तो हस्तगत होण्याचे संधीस तुह्मास पत्र पाठवूं, त्याप्रमाणें गंगाप्रसाद, रामप्रसाद, गिरीधारीलाल यांसह राजरथ घेऊन त्या शहरावाहेर आह्मी लिहूं त्या ठिकाणीं ने-

मऱ्या दिवशीं रातोरात सुमारें हजार अरबांसह तुह्मीं येऊन हुशारीनें राहावें. ह्मणजे बादशाहास फसवून हा थाट सिद्ध करूं. बहुतकरून तुह्मीं शिकारीचे मिषानें त्या शहराचे आसपास वारीवर असून नेहमीं गुप्तपत्रव्यवहार चालू ठेवावा. ही मामाची युक्ति सर्वांस अतिशय मान्य होऊन ते ह्मणाले: मामासाहेब, तुमचेच मसलतीनें हें राज्य हातास येऊन **विश्वासराव** एवढा धूर्त असतांही नाहींसा झाला. त्याअर्थीं तुमचे शहाणपणाची धन्य आहे. असा संकेत ठरवून मुहूर्तानें कारणकि दोन असामी आणि दहा स्त्रिया असें घेऊन मामासाहेबांनीं प्रयाण केलें.

इकडे त्या शहरांत आल्यावर आह्मीं सावकार असून मोठे व्यापारी आहोंत असें नांव गाजवून मामानीं कांहीं व्यापारही सुरू केला. इकडून माल भरून नेहमीं दुसरीकडे लावावा. तसाच दुसरीकडून आणून तेथें विकावा. जवाहिराचे देवघेवींत बादशाहाचीही चांगली ओळख करून रोजचें एक तास दरबारीं जाणें ठेविलें. एकेदिवशीं युक्तीनें गोष्टीवरून गोष्ट काढून व बादशाहाचे मर्जीचा कल पाहून, आपला उद्देश साधण्यास प्रारंभ केला; आणि सहज हवा खाण्यास रात्रीं जातांना गोष्ट काढली कीं, महाराज, आमचेपाशीं स्त्रीरत्नें अपूर्व असून त्यांजप्रमाणें सौंदर्यवान् दुसऱ्या कोठेंही नसतील. इच्छा असल्यास सरकारास प्राप्त होतील. हें ऐकतांच बादशाहाचें मन लालचावलें. अशा कामास कोण लुब्ध होणार नाहीं? विश्वामित्र, पराशर, वातांबु, पर्णाशन करणारे, असेही तपस्वी तपनिग्रह सोडून स्त्रीपाशांत बद्ध झाले. मग बादशाहाची कथा काय? त्याचें हें भाषण ऐकून तो लागलाच ह्मणाला: दाखवा तर आह्मास. मग मामानीं त्या स्त्रिया दाखवितांच त्या आधींच रूपयौवनसंपन्न असून त्यांत वस्त्राभरणांनीं मंडित असल्या कारणानें त्यांस पाहून बादशाहा अगदीं वेडा होऊन त्यांसहवर्तमान रतिसुखास निमग्न झाला. अशा पांच चार स्त्रिया नूतन नूतन देऊन त्यांणीं त्यास तर अगदीं आपलासा करून घेतला. जेव्हां पाहिजे

तेव्हां मामाचे वरीं पडला आहेच. रात्रंदिवस दुसरा उद्योग नाहीं. असें होतां होतां त्याणें राज्यकारभारही सोडून दिला.

एके दिवशीं पूर्वसंकेताप्रमाणें **भानुकांतादि** मुख्य मंडळी राजरथासह सांगितलेल्या फौजेनिशीं शहराबाहेर रातोरात येऊन पोहोंचली, अशी मामास खबर कळतांच तुमची तयारी असावी, आह्मी लवकरच येतों. असा निरोप पाठवून त्यांनीं बादशाहास नित्याप्रमाणें बाहेर फिरावयास आणून संकेतस्थळीं नेलें, आणि बादशाहाबरोबर एकही जीवाचें माणूस नाहीं असें पाहून एकदम शत्रूचे सैन्यानें त्यासभोंवतीं वेढा घालून त्यास बंदिस्थ केलें. तो बादशाहा जरी मोठा शूर व पराक्रमी होता, तरी ते सुमारें पन्नास असामी हातांत नागवे तलवारीचे उभे पाहून तो अतिशय घाबरून ह्मणालाः असा गुप्त घाला करणें हें वीराचें काम नाहीं. षंढाचें आहे. अशीच मर्जी होती तर समर करून राज्य घ्यावयाचें होतें. परंतु त्याचें तें बोलणें ऐकतो कोण? पुढें कांहीं वेळानें त्यास फार पश्चात्ताप होऊन तो मनांत ह्मणतोः मी स्त्रीसुखास भुलून आज सर्वस्वास मुकलों. आतां या कपट्यांनीं मला कैद केलें आहे, त्याप्रमाणें धरूनही नेतील. असो. बोलून उपयोग काय? येथें एकही आपलें माणूस नाहीं. असे उद्गार वारंवार येऊन अंतर्यामीं खिन्न होऊन अशा कामीं फसल्यामुळें तो आपणास धिःकार देऊं लागला.

मग त्यांणीं लागलीच बादशाहास उचलून त्या राजरथांत आपले मंडळाबरोबर बसवून वेगानें रथ हांकण्यास हुकूम दिला. तो रथ सुमारें एक कोस शहर सोडून जात आहे तों इतक्यांतच एक स्वार येऊन ह्मणालाः मामासाहेब, या मार्गानें आपणांस दगा आहे. आपण वांचून आज पार पडूं असें वाटत नाहीं. पुढें बादशाहाचें दोन हजार सैन्य आपण येण्याची वाट पाहून आहे. हें मी प्रत्यक्ष पाहून येऊन आपणास कळविलें. एक मार्गावर मात्र कोणी नाहीं. तर विलंब न करतां माझे पाठीमागून रथ

येऊं द्यावा. तरच सर्वांचे प्राण वांचून हेतुही सिद्धीस जाईल. आपण आपल्याकडून निर्भय मानतों, पण शत्रु आपले पाठीवरच आहेत. हें ऐकतांच सर्वांस मोठी भीति उत्पन्न होऊन ज्या मार्गानें आपला हा स्वार जाईल तिकडून रथ जाऊं द्यावा अशी आज्ञा दिली. मग लागलीच त्या स्वारानें आडमार्गानें कोणास न समजूं देतां ज्या ठिकाणीं पूर्वींच बंदोबस्त करून फौज व पहारा ठेविला होता त्या ठिकाणीं तो रथ वेगानें आणून घातला. तेव्हां त्या लोकांनीं तोफेचा अवाज काढून रथास लागलीच गराडा घालून सर्वांस एकदम कैद केलें, आणि एकटे बादशाहास खुलें करून बाकीच्या लोकांच्या मुसक्या बांधून पायांत शृंखळा घातल्या. ते वेळेस तो स्वार **भानुकांता**दि आठ असामींपुढें उभा राहून ह्मणाला: कर्माप्रमाणें फळ लागलेंच प्राप्त होतें. मला आपण ओळखलें कां पुरतें, मी कोण आहें तो? त्यांनीं त्याचा शब्द ऐकून पुरतेपणीं पाहतांच हा **विश्वासराव** आहे असें त्यांस पक्कें समजलें. मग तर अगदीं लज्जित होऊन सर्वांनीं माना खालीं घातल्या. हा जिवंत आहे असें स्वप्नींही नसून एकदम या ठिकाणीं यानें येऊन आपला सूड उगविण्यासाठीं हें कृत्य केलें तरी कसें? आतां आपली येथून सुटका न होतां सर्व जन्म येथेंच जाणार आहे. असो. बोलून उपयोग काय? असें ह्मणून निरुपायास्तव ते सर्व किल्ल्यावर नेऊन ठेवलेले ठिकाणीं जाऊन अटकेंत राहिले. बादशाहानें लागलेंच "हा स्वार आपला किमयागार आहे, या माझ्या प्राणमित्र बोवानीं आज मला जीवदान देऊन सर्व प्रजेस सुखी केलें. याचे उपकार माझ्यानें कधीं फिटणार नाहींत." असें ह्मणून मोठ्या आनंदानें त्याची पाठ थोपटून पुनः ह्मणाला: इतके आमचे दरबारांत अष्टउमरावादि मंडळी असून त्यांस काडीचाही धूर्तपणा नाहीं. तुह्मी होतां ह्मणूनच मीं पुनः सर्व सौख्य पाहिलें. नंतर सर्वजण राजवाड्यांत आल्यावर पुनः बादशाह **विश्वासरावास** ह्मणाला: ही वातमी तुह्मास समजली

तरी कशी? असें ऐकतांच विश्वासराव ऐकावें सरकार, असें ह्मणून त्या दुष्टांची कृति साद्यंत सांगून आपलें नांव, आपला व स्त्रीचा वियोग झाल्याची सर्व हकीकत बादशाहास निवेदन करून पुढील हकीकत सांगावयास लागतो—"तसाच पुढें स्त्रीवियोगजन्य-दुःखांत गोसावी होऊन भटकत फिरत असतां एके दिवशीं या दुष्टांचे राजधानीस गुप्तपणें गेलों. तेथें ही मंडळी नसून आपल्या राज्याचे हद्दीवर शिकारीस आल्याची बातमी लागल्यावरून मीं आपले धूर्तपणानें यांच दुष्ट मामाचे सगळ्या कृतीवरून खचित् जाणलें कीं, हे या राज्यांत दुष्ट स्त्रियांसह आले आहेत, त्या-अर्थीं आपणास विषयासक्त करून नक्त खजीन्याचे प्राप्तीस्तव मक्कारणा दाखवून कांहीं तरी अपाय आणतीलच. मग हीच संधि आपला इच्छिलेला हेतु सिद्ध होण्यास बरी आली आहे, व या कामांत सरकारांस साह्य झालों तर परोपकार साधून सरकार-ची कृपाही संपादन होईल, अशी योजना मनांत आणून त्या शहरांत येऊन बातमी घेऊन गेलों, हें कोणासही समजूं न देतां तसाच निघून आपले राजधानीस आलों. परंतु आपले भेटीचा योग असाच बसलों तर बारा वर्षांतही दाद लागून घडून येणें कठिण, ह्मणून दाद लागण्यासाठीं कल्पनेनें ती किमयेची युक्ति योजली. अनायासें माझे योजनेस माझा बनलेला वेषही साह्य झा-ला. मग या शहरांतील मोठमोठाले सावकार, कारभारी यांस आह्मी मोठे किमयागार आहोंत असें शिष्याचे हातें प्रसिद्ध कराविलें. पुढें कित्येकांची आर्जवभक्ति विशेष पाहून त्यांजकडून कांहीं नाणें आणवून त्याचें सोनें बनवून दिलें. यामुळें जिकडे तिकडे शहरभर आमची कीर्ति पसरली. हजारों लोकांची गर्दी आमचे मठांत दर्शनास येऊं लागली. हें आपल्यास विदीतच आहे. ह्मणूनच एकवार आपण आमचे भेटीस येऊन बळेंच आग्रहानें मला आपले वाड्यांत आणिलें. येथेंही आपणास माझे किमयेचा पुरा अनुभव येऊन आपण माझी सर्वांत प्रशंसा केलीच आहे.

या कामांत सर्व शहरभर सुमारें एक लक्ष रुपयांचें सोनें मीं पस-रून आपली कृपा संपादन करून घेतली. मामा आपणास स्त्री-पाशांत बद्ध करून रोजचे रोज एकटे बाहेर नेऊं लागल्यापासून मीं आजपर्यंत आपले शिष्यांकडून गुप्त पाळत राखिली होती. आज सरकारस्वारी स्त्रीलंपट होऊन शहरचे हद्दीबाहेर मामा-बरोबर एकटीच रात्र करमण्यास जाणार आहे व मामाचीहि स्थानभ्रष्ट करण्याची गलबल दिसत आहे, अशी जेव्हां दहा घटका रात्रीं बातमी ऐकिली, तेव्हां आजच कांहीं विपरीत घाट आहे, हें समजून या चौकीदारास हत्यारबंद लोकांसह तेथें सावधपणें हजर राहण्यास सांगितलें. आणि येथीलच स्वाराचा पोशाख व घोडा घेऊन आपणास येऊन आटोपलें. आणि युक्तीनें त्यांचे स्वारांप्रमाणें ओळखीचीं भाषणें बोलून आपला हा स्वार आहे, असा भास दाखविला. व त्यांचे कृतीस यथा-न्याय युक्तीनें जरब देऊन सहजी येथें आणून आपणास त्यांचे हातून मुक्त केलें आहे."

हें ऐकतांच बादशाहास मोठा गहिंवर येऊन त्याणें **विश्वास-रावाचे** महदुपकार मानिले. आणि ह्मणाला कीं, ही किमयेची कृति तुह्मास कशी साधली? तेव्हां **विश्वासराव** ह्मणाला: महारा-ज मी किमयागार कशाचा? मला कांहीं येत नाहीं. परंतु तें सर्व आपले भेटीस्तव ढोंग केलें होतें. किमयेचें ह्मणून जें मीं सोनें प्रसिद्धतेनें दिलें, तें सर्व पदरचेंच खरेदी घेऊन त्याच्या प्रथमतः कांहीं लहान लगडी मुशींत तयार करविल्या. नंतर शिष्याचे हा-तानें गाईच्या ताजे शेणाचे कांहीं गोळे बनविले. ते तयार कर-तांनो ओलेपणींच, त्या प्रत्येक गोळ्याचे पोटीं ती एकेक सोन्या-ची लगड घालून ते वाळवून एकंदर गोऱ्यांचे राशींत खुणेनें ठेवि-ले. किमयाचे कामीं मोटमोटाले लोक नादीं लागून सक्त अंतः-करण झालेले कित्येक पाहून निरापेक्षतेनें त्यांजकडून कांहीं तांबें आणवावें, आणि त्यांचे समक्ष तांब्याचे मानाचे गोळ्यासह एकंदर

राशींतून गोवऱ्या व गोळे काढून त्यांची भट्टी रचून ती पेटवावी. व तें तांबें त्यांचेच हातानें तींत घालावें. कांहीं वेळानें आतां भट्टी पूर्ण रसास आली, असें ह्मणून लोकांची विशेष मनीषा वसण्यासाठीं, भलत्या एका झाडपाल्याचा रस हातानें तिजवर पिळून, तशीच कांहीं वनस्पतीची भुकटी टाकावी. पुढें घटकेनें मूस बनली असें सांगून तेथेंच एका भांड्यांत दधिमिश्रित मिठाचें पाणी करून ठेविलें असे तें शांत होण्यासाठीं तिजवर सिंचन करून व तोच ओला हात त्या धगधगीत भट्टींत घालावा, आणि पूर्वींच एक लहानशी खळगी तिचे खालीं करून ठेवलेली असे तींत तें तांबें हातचलाखीनें वसवून गोळ्यापासून भिन्न झालेली सतेज सोन्याची लगड वेतानें काढून त्यांचे हातीं द्यावी. यामुळें हा प्रकार कोणाचे लक्षांत न येतां सर्वांत आमची विशेष प्रशंसा झाली. आणि आपणही मान देऊन मला राजवाड्यांत आणिलें. असो. याप्रमाणें कितीएक लोक बहुतकरून वास्तविक किमयेचा खरा प्रकार नसतांही नादीं लागून फसतात. किमयागार मात्र थावळा देऊन वेळ काढणारा पुरा कसबी पाहिजे. पहा ज्यास खरोखर किमयेनें सोनें बनवतां येईल, त्यास असे अजेवशक्तीनें बाह्य ढोंग माजवून कर्तव्य तरी काय आहे? याचा विचार कोणीच करीत नाहीं.

हें ऐकतांच बादशाहा ह्मणालाः शाबास शाबास! तुजसारखा शक्तिवान् पुरुष तूंच. नंतर बादशाहानें त्याचे उपकार मनांत आणून आपले ताब्यापैकीं मुलूख त्यास जहागीर करून द्यावा असा निश्चय ठरविला, आणि लागलीच दरबार भरवून त्यांत त्याची मोठी प्रशंसा केली. नंतर सर्व अयोध्याप्रांत इक्कानिशीं जहागिरी दिल्याबद्दल एक सनद लिहून तिजवर मानकरी, अष्टउमराव यांच्या व आपली शिक्कामोरतबमुद्रां सही करून ती सनद व तेथील गादीची वस्त्रें सोन्याचे तोड्यासुद्धां सन्मानानें त्यास दिली. व आपली दिवाणगिरीही पाहण्यास सांगितलें. असा

प्रकारें त्यास दैवाची अनुकूलता पुनः होऊन राज्यहि मिळालें. पुढें तेथील बंदोबस्त उत्तम प्रकारें राखून कांहीं दिवसांनीं बादशाहाचे परवानगीनें इच्छेप्रमाणें बरोबर सैन्य घेऊन **विश्वासराव हस्तनापुरास** आला.

इकडे **भानुकांता**दि पंचक, सैन्यासह शिकारीचे मिषानें **लखनौ**चे हद्दीवर गेलें होतें; त्या सर्वांस कैद करून त्यांची कांहींच बातमी **दिल्लीस** पोंचूं दिली नाहीं. यामुळें कैदेचा वगैरे कांहींच सुगावा न लागल्यानें त्यांचे लोक गैरसावध असून निर्धोक होते. **विश्वासरावानें** प्रथमतः गुप्तपणें एकटेंच येऊन सासूसासऱ्यांची भेट घेतली. आणि सुख व दुःख, स्त्रीची भेट, व तिचा पुनः वियोग त्यांस कळवून सांगितलें कीं, ईश्वराची कृपा असली तर शोधास लोक पाठविले आहेत, त्या योगानें लौकरच **मधुमालती**ची भेट होऊन आपणा सर्वांस सौख्य मिळेल. असें नाना तऱ्हेनें त्या वृद्धांचें सांतवन् करून आपला **चंद्रकांतास** गादीवर बसविण्याचा हेतु, व **भानुकांत** आणि मामादि मंडळीसह कैदेंत घालून **अयोध्या** प्रांताचें राज्य मिळविल्याची हकीकतही त्यांस कळविली. ते वेळेस त्यांस कन्येचें स्मरण होऊन अशा सौख्यांत ती असती तर आमचें केवढें भाग्य! असो आज हा तरी आनंददायक दिवस पाहिला. अशीच कन्याही एके दिवशीं परमेश्वर भेटवील ह्मणून समाधान मानितीं झालीं.

नंतर **विश्वासरावानें** युक्ति योजून ज्यांचीं मतें **भानुकांता**चे तर्फें कारभार पहात असूनही **चंद्रकांतास** राज्य मिळावें अशीं होतीं, ते ते लोक बोलावून आणून त्यांचाही यास पूर्ण सल्ला मिळतांच त्यांचेकडून सर्व राज्यकीय सैन्याची अनुकूलता करून घेतली. बाकी जे **भानुकांता**चे मताचे आहेत असें सहवासानें कळून आलें, त्यांस ही बातमी मुळींच कळूं न देतां एके दिवशीं सर्वांनीं मसलत करून राजादि पंचक, व जे सरदार, मानकरी वगैरे पन्नास मुख्य मुख्य लोक **भानुकांता**चे कैदेंत होते त्यांस बंदमुक्त

करून एकदम **चंद्रकांतास** सुमुहूर्तानें राज्यावर बसविलें. ह्या कृत्यास बहुतकरून सर्वांची अनुकूलता मिळाली; कारण **भानुकांत** राज्यावर बसल्यापासून सर्वांस हरएक प्रकारें अतिशय त्रास झाला होता. जे जे लोक यास विघ्न आणणारे आहेत असें पुरतेपणीं समजुतीस आलें त्या त्या लोकांस लागलेंच बंदोबस्तानें धरून आणून कैद केलें. असें सर्व यथास्थित झाल्यावर सर्व लोक **विश्वासरावाची** कीर्ति गाऊन मोठ्या आनंदांत राहूं लागले. तथापि **भानुकांताचे** मताचे कांहीं लोक कारभार पाहण्यांत इकडील मत दाखवून गुप्त रीतीनें राहिलेच होते. जिकडे तिकडे धन्य धन्य **विश्वासराव** कीं, ज्याणें राजादि दुष्ट अष्टकास युक्तीनें कैदेंत घालून सर्वांस पूर्ववत् सौख्य दिलें, असे ज्याचे त्याचे तोंडांतून उद्गार येऊं लागले. हें सर्व पाहून सासूसासऱ्यांस महदानंद झाला, पण एक कन्या नाहीं येणेंकरून तीं रात्रंदिवस झुरणीस लागलीं. **विश्वासरावास** जरी **अयोध्येचें** राज्य मिळालें होतें तरी **चंद्रकांतास** व. सासूसासऱ्यांस सोडून त्यास तिकडे जाववेना. **मधुमालतीचा** कोठेंच कांहीं शोध लागत नसल्यानें त्यासहीं तें सर्व सौख्य विषवत् वाटून दिवसानुदिवस औदास्य येऊं लागलें. त्यास इतकेंच धन्य वाटे कीं, परमेश्वरानें आपले हातून बोलल्याप्रमाणें पुनः **चंद्रकांतास** गादीवर बसविलें. पुढें राजाचा व सासऱ्याचा फारच आग्रह पडल्यामुळें कांहीं दिवस लखनौ शहरीं न जातां **दिल्लींतच व्यंकटेशासन्निध** राहिला. जे लोक **अयोध्येंतून** बरोबर आणिले होते, त्यांस कारभाऱ्यासह तिकडील बंदोबस्तास परत पाठवून दिलें. व आपण नित्य **व्यंकटेशपूजा**, स्नानसंध्यादि कर्मे निष्ठेनें करून मागत्यास इच्छिलेलें अन्नवस्त्रादि देऊन कालक्रमण चालविलें. बहुतकरून तो रात्रीं राजवाड्यांत **चंद्रकांताचे** आग्रहामुळें राहत असे.

एके दिवशीं दोनप्रहर रात्रीचे सुमारास राजवाड्यांतील तिसरे मजल्याचे दिवाणखान्यांत एकाएकी कोणीं मोठ्या दीन स्वरा-

नें आक्रोश करून ओरडून ह्मणाला: " धांवा धांवा कोणी लौक-र धांवा. विश्वासरावनाना राजा चंद्रकांत याचा घात करून मा-झाही करित आहेत." हे शब्द राजवाड्यांतील सर्व पहारेकरी आ-दिकरून मंडळींनीं व चंद्रकांताची आई व स्त्री, यांनीं एकतांच त्या ठिकाणीं तीं सर्व एकदम चंद्रकांताचा नाश झाला ह्मणून घव जमा झालीं. आणि पाहतात तों विश्वासरावाचे हातास, वस्त्रांवर आणि बिछान्यावर सर्व रक्ताचा शिडकाव होऊन त्या ठिकाणीं चंद्रकांताचा मेहुणा सर्वोत्तमराव याचें शीर व धड शस्त्रघातानें भिन्न होऊन पडलें आहे. आणि चंद्रकांताचा ही तेथें कोठेच पत्ता नाहीं. विश्वासराव तर एका बाजूस त्या अघोर कृत्यानें भयभित होऊन उभा होता, आणि त्याचे पुढें एक नग्न तरवार रक्तानें भरून पडलेली होती. इकडे तिकडे पाहतात तों तेथें दुसरें कोणीच दृष्टीस पडेना. कधींच नाहीं आणि आज अशी बुद्धि होऊन विश्वासरावाचे हातून असा घात कसा झाला? असें राजासह सर्व ह्मणूं लागले. मागील सर्व कृत्यांवरून तर त्याजविषयीं अशी शंकाही कोणाचे अंतःकरणांत येऊं नये; परंतु प्रत्यक्ष असा प्रकार पाहिल्यानें कोणे वेळेस कोणास काय बुद्धि होईल कोण जाणें? असेंच सर्व बोलूं लागले. महाल आदिकरून ठिकाणीं धुंडाळून पाहतां चंद्रकांताचाही कोठें ठिकाण लागेना. तेव्हां तर सर्वांच्या तोंडचें पाणी पळून गेलें. राजा, राणी, आणि चंद्रकांताची स्त्री ह्यांचें तर देहभान नाहींसें होऊन मोठ्यानें त्याचे गुणानुवाद वर्णन करून तीं रडूं लागलीं नवरा आणि धाकटा भाऊ ज्यास नुकतेंच कारभार पाहण्यास सांगितलें होतें, यांचा नाश झाला पाहून चंद्रकांताचे स्त्रीस तर दुप्पट दुःख झालें. ती तेथेंच आक्रंदत पडली. वाडाभर एकच गर्दी व हाहाकार होऊन राहिला. विश्वासरावास याविषयीं विचारतां तो ह्मणाला: हें कृत्य कांहींच मी जाणत नाहीं. व कोणत्या दोषानें आज मजवर हा गहजब

आला असेल तो मला समजत नाहीं! हें ऐकून सर्वांचे मनांत अनेक तऱ्हेचे विचार आले. तेव्हां करणें असेल तें चौकशी-अंतीं पाहतां येईल, असें बोलून तेथील कारभाऱ्यानें लागलींच **विश्वासरावास** विचार न करितां एकदम चतुर्भुज करून कैद केलें. असाही प्रसंग गुदरला तरी धैर्य न सोडतां त्याचें त्यानें विशेष दुःख मानिलें नाहीं. अशांतूनही युक्तीनें सुटका करून जाणें ही जरी **विश्वासरावास** हातची गोष्ट वाटली, तरी **चंद्रकांतास** इतका प्रयत्न करून राज्यावर बसविलें, आणि आज तोच नाहींसा झाला पाहून पुढील सर्व उमेद खचून त्याविषयीं **विश्वासराव** दुःख करूं लागला. आतां पुढें यत्न करून सौख्य मिळवून तरी कर्तव्य काय आहे? माझा एक **चंद्रकांत** व स्त्री **मधुमालती** यांजवांचून आतां हें सर्व जग मला शून्य भासत आहे. हें घाताचें कृत्य कशापासून उत्पन्न होऊन कोणी केलें असावें, हेंही त्या आरोपभ्रमामुळें त्याचे लक्षांत येईना. ज्यानें इतका यत्न करून पुनः राजास बंदमुक्त करून सौख्य दिलें अशा **विश्वासरावाचे** हातून ही गोष्ट खचित् झाली नसावी, असें बहुतकांस व राजास वाटलें. परंतु यथा नीतिनें इनसाफ न होईल तर आपले न्यायास बाध येणार आहे, असें त्यास वाटलें. कारण **चंद्रकांताचे** राज्यांत इनसाफाचे कामीं बापाचीही भीड धरूं नये, असा कायदा ठरला होता. सर्व शहरभर शोध केला, परंतु **चंद्रकांताचा** कोणीच कांहीं पत्ता सांगेना. ह्यावरून कित्येक **भानुकांताचे** पक्षांतील लोक ह्मणूं लागले कीं, एक राज्य यास मिळालें असेंच हेंही सर्व हस्तगत व्हावें अशी आतां यास इच्छा झाली नसेल कशावरून? या सर्व कल्पनेवरून व पुत्रशोकामुळें राजाचीही अक्कल गुंग झाली. काय चौकशी करणें असेल ती कायद्यानें करा, मला कांहीं या कामांत बिचारूं नका, असा हुकूम त्यानें दिला. नंतर दुसरे दिवशीं वारकाईनें चौकशी सुरू झाली. ही बातमी **बाबासाहेबांस** समजतांच त्यांस अतिशय दुः—

त्यांणींही या कृत्यांत मुख्य कोण असावा याचा तपास केला, परंतु कांहींच थांग लागेना. शहरांत **विश्वासरावा**विषयीं जे ते दुःख करून ह्मणूं लागले कीं, चौकशीअंतीं काय निष्पन्न होऊन अखेर याचा परिणाम कसा होईल तो होवो. कित्येक वकील आपसांत ह्मणूं लागले कीं, यापासून **विश्वासराव** वांचणें कठिण दिसतें. त्याजकडील कांहींच साक्षीपुरावा नसून त्यास मुद्यानिशीं खुनासहित धरला आहे. परमेश्वरच एक काय रक्षण करील तें खरें. अशा वार्तेनें त्या वृद्ध स्त्रीपुरुषांचीं अंतःकरणें गलबलून अन्नपाणीही वर्ज झालें.

या खटल्याची चौकशी एकसारखी एक महिनापर्यंत सुरू होती. त्यांत सर्व प्रकारें **विश्वासरावा**वर खून केल्याची शाबिती होऊन, त्याची सुटका होण्याचा कांहींच पुरावा दिसेना. त्यावरून सर्वांचे मनाची खात्री झाली कीं, इतकेंही करून शेवटीं **विश्वासराव** आतां वांचत नाहीं. त्या वेळेस गुन्ह्याचें स्वरूप पाहून **विश्वासरावा**सही असेंच वाटूं लागलें. प्रतिज्ञा घेऊन राजासमोर कोणीही खोटी साक्ष देत नसे. एकट्या मेहुण्याचाच खून झाला असता तर हरएक प्रकारें सुटका झाली असती, परंतु मुख्य गादीचे मालकाचाच खून केल्याचा गुन्हा **विश्वासरावा**वर शाबीद झाल्यामुळें कोणाचाच उपाय चालेना. आणि कांहीं दंगा करून तेथून निघून जावें तर त्या वेळेसच कर्मगति फिरल्यानें या कामीं कोणाचेंही संमत पडेल असें दिसेना. आणि या राज्याचा सर्व प्रकारें फार मोठा विस्तार असल्यानें या वेळेस असें केल्यास, हाल होऊन शेवटीं अपकीर्तीनें मृत्यु येईल असें वाटून, **विश्वासराव** चतुर असतांही कुंठित झाला. अशांतूनही ईश्वर खऱ्याखोट्याचा निवाडा करून वांचविता आहे; असें मानून आल्या दिवसास सादर होऊन खेद न करितां कैदेंत राहिला. तथापि त्यानें आपले धूर्त कल्पनेनें तसा प्रसंगच आल्यास आपले रक्षणार्थ कांहीं गुप्त तजवीज करून ठेविली होती. एक महिन्यांतही

**चंद्रकांता**चा कांहींच शोध नाहीं, असें पाहून **विश्वासरावा**नेंच खचित दगा केला, असें इनसाफांत पंचांनीं ठरवून पुढें आठ दिवसांचे मुदतीनें गुन्ह्याचे स्वरूपासह सर्वांस कळविण्याकरितां एक जाहिरनामा लाविला. आणि खटल्याच्या शेवटनिकालाचा दिवस नेमून प्रसिद्ध केला. तेव्हां तर बरोबर बायका, पुरुष व मुलें, **विश्वासरावा**ची पूर्वस्थिति आणि गुण आठवून दुःख करूं लागलीं. नेमलेले दिवशीं दरबारांत दहा वाजतां बरोबर, सर्व मोटमोठाले सावकार, मानकरी, वकील, हुद्देदार आदिकरून मंडळी जमली. दरबारांत आणते वेळेस सासूरवाडीस जाऊन **बाबासाहेबां**स भेटल्यावांचून त्यास राहवेना, ह्मणून **विश्वासरावा**नें मुख्य इन्साफ करणाऱ्या मंडळीस अर्ज करून त्यांजकडे जाण्याची परवानगी मागितली. त्यांनीं बंदोबस्तानें नेऊन लौकर परत आणण्यास वरील हुद्देदारांस सांगितलें. ते लोक जरी **विश्वासरावा**चे प्रियकर होते, तरी त्या वेळेस त्यांस आज्ञेप्रमाणें हुकूम बजावणें भाग आलें. तिकडे जातांना रस्त्यांतून नग्न तलवारीचे सभोंवतीं स्वार, शिपाई असून, मध्यें **विश्वासराव** दीनमुखानें चालतांना पाहून त्याचें पूर्वींचें ऐश्वर्य एकदम दृष्टीपुढें उभें राहून सर्वांचे नेत्र जलभरित झाल्यानें ते ढसढसां रडूं लागले. कोणाच्यानेंही त्याचे मुखाकडे पहावेना. तसाच **बाबासाहेबां**चे वाड्यांत आणिला. त्यास पहातांच आज हा अमूल्य दुर्मिळ आमचा प्राणमोहरा आह्मास सुटून या सृष्टींतूनही नाहींसा होणार! असें बोलून मोठ्या गहिंवरानें उभयतांनीं येऊन **विश्वासरावा**चे गळ्यांत मिठी मारिली. कांहीं केल्यानें शोक आवरेना. त्या वेळेस त्या वृद्धांची अवस्था पाहून **विश्वासरावा**चे पोटांत फारच ढवळूं लागलें आणि तो मनांत ह्मणतोः अशीच जन्मदात्या वृद्ध आईबापांची मजवांचून अवस्था होत असेल! हर हर! धिक् संसार! यांत काडीमात्र देखील सौख्य नाहीं. असें असून सर्व माझें माझें ह्मणून मायापाशांत गुंतून शेवटीं सर्व जेथल्या तेथेंच राहून एकट्या-

स जावें लागतें. कोणाचाही तेथें उपाय चालत नाहीं. पहा, मी मोठ्या प्रयासानें जीस प्राप्त करून घेतलें, तीही या माझ्या अंतकाळीं माझी प्रियकर **मधुमालती** भेटण्यास नाहींना! कांहीं तरी आजपर्यंत भेटण्याची आशा होती, परंतु ती आतां समूळ नाहींशी झाली. असो. माझें मला दुःख वाटत नाहीं. पण तिला ही दुःखवार्ता कोठें असेल तेथें समजल्यावर तिची काय अवस्था होईल? तसेंच माझा प्राणमित्र **गोपीनाथ** व आईबाप यांची मजवांचून काय दशा होईल? हे प्राणसखे, हे प्राणमित्रा **गोपीनाथ**राया, हे आई, अहो **अप्पासाहेब,** या तुह्मां सर्वांस विरह देणाऱ्या, जन्मास आलेल्या घातकी **विश्वासरावा**चा प्राण तुह्मांस भेटल्यावांचून आज आपले देहाचा कंटाळा मानून नाहींसा होणार नाहीं काय? असें ह्मणून त्यानें दुःखानें धरणीवर अंग टाकिलें! त्या वेळेस जे जे लोक तेथें उभे होते त्यांच्याही पोटांत दुःखानें कालवून ते रडूं लागले. पुढील होणारें कृत्य सर्वांस ठाऊक असल्यानें जरी ते त्रिवर्ग कांहीं शुद्धीवर आले तरी, कोणाच्यानें कोणतेही प्रकारें समजूत करून त्यांचें सांत्वन करवेना. तितक्यांत **विश्वासराव**ही शुद्धीवर येऊन लागलीच त्या उभयतांचे पायांवर मस्तक ठेवून गहिंवरून ह्मणाला: आतां या बालकास प्राणमोचनाची आज्ञा असावी. इतकेंच दुःख वाटतें कीं, माझे हातून माझ्या लाडक्या प्रियेचे हौशीप्रमाणें कांहींच सोहाळे पुरले नाहींत. असो. ती जिवंत राहिल्यास तुह्मास भेटल्यावांचून राहणार नाहीं. जेव्हां येईल तेव्हां तिजला माझें दुःख वाटूं न देतां सौख्यांत ठेवून यावज्जीव तिचें पालन करावें.. किंचित् तिचा स्वभाव, खोटें आवडत नसल्यानें तापट असल्याचें आपणास माहितच आहे. ह्मणून तिजवर त्या त्या वेळेस रागावत जाऊं नये. ही शेवटची प्रार्थना आहे. तिचे संगोपनाचे व्यवस्थेकरितां आपल्यास व्यंकटेशमंदिरासह बक्षिसपत्र पूर्वींच दिलें आहे. आतां जी मागें हकीकत होईल ती एकवार माझे मातापितरांस लिहून

कळवावी, ह्मणजे त्यांची मजविषयीं आशा सुटेल! असें ह्मणून तो दीनमुखानें त्यांचेकडे एकवार सजल नयनांनीं पाहून तेथून निघाला. तेव्हां त्या बापड्यांची बोबडी वळून आक्रोश करीत तीं तेथेंच पडलीं. एकही शब्द बोलवेना!

पुढें **विश्वासरावानें** श्री व्यंकटेसमंदिरीं जाऊन भगवंताचें दर्शन घेतलें. आणि तुजवांचून या दीनास रक्षणकर्ता कोणींच नाहीं असें बोलून अंतरयामीं श्रीवत्सलांछन मूर्तीचें स्वरूप साठवीत धैर्यानें दरबारांत येऊन पोंहोंचला.

तो येतांच सर्व सभा त्याजकडे पाहून गलबलली; आणि जो तो आपापले ठिकाणीं दुःख करूं लागला! एकाच्यानेंही डोळे पुसल्यावांचून राहवेना. लागलीच खटल्याचे साक्षीदार वगैरे लोकांची हजिरी घेऊन न्यायाधीशानें त्यांस प्रतिज्ञा देऊन सर्वांसमक्ष त्यांच्या जबान्या खऱ्या करून खटला तयार केला. इतक्या कृत्यास सहज बारावर तीन वाजले. एकाचेंही चित्त त्या खटल्यापासून वेगळें होईना. व कच्चे चौकशीपासून सर्व मजकूर मनांत आणितां कोणत्याही प्रकारें सुटका होण्याचा मार्ग आहे असें कोणास वाटेना.

नंतर सर्व गडबड बंद करून न्यायाधीशानें सर्वांस सावंत निकाल ऐकण्याचें सुचविलें. एकटा **विश्वासराव** नग्न तलवारीच्या पाहऱ्याचे पिंजऱ्यांत उभा असून बाकी सर्व वकीलादिकरून लोक काय निकाल तोंडांतून निघतो याजकडे चित्त लावून विलायतीवर बसले होते. न्यायाधीशानें खटल्याचा सारांश वाचून दाखविण्यास आरंभ केला. तो असाः—

या कज्याचें पूर्ण स्वरूप पाहतां तुह्मीं युक्तीनें हें राज्य संपादन करून घ्यावें या हेतूनें मार्गशीर्ष शुद्ध प्रतिपदा, रोज गुरुवार, या दिवशीं दोन प्रहर रात्रीचे अमलांत सरकारचे राजवाड्यांतील बैठकीचे तिसरे मजल्यावरील सब्जा दिवाणखान्यांत एकांत संधि गांठून कठोर हृदयानें **श्रीमन्महाराज छत्रपति जगजीवनराव**

**चंद्रकांत सुमति** राजेसाहेब गादीचे मालक यांस जिवें मारून ती आपली गोष्ट उघडकीस न यावी यासाठीं, गुप्तपणें तो मुद्दा तुह्मी छपवीत असतां, त्या संधीस राजेसाहेबांचे मेहुणे **सर्वोत्तमराव** कारभारी हे सहज तेथें आल्यावरून तुमची ही अघोर कृति त्यांचे दृष्टीस पडली असावी, तेव्हां आतां या कृत्याची परिस्फुटता होऊन आपला नाश खचित होणार हें मनांत आणून तुह्मी त्यांचाही खून त्याच वेळेस त्याच ठिकाणीं विचार न करतां हल्लीं येथें मुद्यास रक्तानें भरलेली जी तलवार दरबारांत हजर आहे इणें केला; असें सरकारतर्फे निशाणी ५।६।१२।१५।१७।२५ चे साक्षीदार पाहरेकरी, जमादार, व इतर लोक यांच्या जबान्या आमचे समोर प्रतिज्ञेवर झाल्या त्यांवरून, व तेच वेळेस तुह्मी खून पडले ठिकाणीं तुमचे अंगावरील दुपेटा व बिछान्यावरील सरपोस, ( जीं रक्त लागलेलीं वस्त्रें हल्लीं दरबारांत हजर आहेत त्यांसहित ) व सदर तलवारीनिशीं मिळालीं; व तुमचे हातास त्या वेळेस ताजें रक्तही लागलें होतें, यावरून आणि मृत **सर्वोत्तमराव** यांस तुह्मी जिवें मारीत असतां त्या संधीस तो " **विश्वासराव**ही राजा **चंद्रकांत** याचा नाश करून माझाही करीत आहे " असें, सर्वांस श्रुत होण्याकरितां दीन वाणीनें ओरडून बोलला; त्याचे ते शब्द प्रत्यक्ष वरील निशाणी पैकीं ५।१५।२५ चे साक्षीदार यांणीं ऐकून पुकारा केल्याचें ते आपल जबानींत लिहून देत आहेत. या सर्व कारणांवरून चौकशीअंतीं पंचानुमतें आज तुह्मी वर लिहिलेप्रमाणें खुनी गुन्हेगार ठरून, सरकार ठरवितील ती शिक्षा भोगण्यास पात्र आहांत. जरी तुह्मी ह्या गुन्ह्यास नाकबूल असून तुमचेकडील साक्षी निशाणी २६।२७।२९।३१।३२ यांचे जबाबावरून पाहतां फक्त तुमचे मागील वहिवाटीचे स्थितीवरून तुमचे हातून खचित हें अघोर कृत्य झालें नसावें, असा पुरावा सरकारास मिळतो, तरी, तुह्मीं प्रत्यक्ष हें कृत्य केलें नाहीं, अशी एकही साक्ष अगर दुसरें योग्य कारण सरकारास

मिळत नाहीं; यावरून ही गोष्ट तुमचे हातून राज्याशेकरितांच खरोखर झाली असावी, असें वरील बलवत्तर पुराव्यावरून नजरेस येतें. आतां कोणतेही प्रकारानें तुमची मुक्तता करण्यास आधार पोहोंचत नाहीं. तुमचेकडील व सरकारी वकीलांनीं तुह्मावर गुन्हा शाबीत न होण्यासाठीं पष्कळ तऱ्हेनें कायदे कानू दाखवून आपलेतर्फे खात्री केली, त्यावरूनही तुमचेवरील दावा उडत नाहीं. यामुळें सरकारासदेखील अतिशय वाईट वाटतें. कारण तुमचे सारखा परोपकारी, चतुर, तर्कज्ञ, सौंदर्य–धैर्य–ऐश्वर्यसंपन्न पुरुष पुनश्च मिळणें नाहीं. असो. यास नाइलाज आहे. यथारीतीनें इनसाफ सर्वांसमक्ष कागदोपत्रीं कायद्यान्वयें ठरला तोच प्रमाण. तत्रापि, आणखी एकवार सरकारास तुमची दया येऊन पुनः हुकूम होतो कीं, हरएक प्रकारें तुह्मास आपली या गुन्ह्यापासून मुक्तता होण्यास आणखी कांहीं दृढतर पुरावा देणें असल्यास याच वेळेस द्यावा.

हें ऐकून विश्वासराव सर्वत्र सभेकडे दीन मुख करून मोठ्यानें म्हणाला:—या प्रसंगीं एक परमेश्वर श्री त्र्यंकटेशाचीच अवकृपा मजवर झाली. खरें खोट्याचा निवाडा या दरबारांत मुळींच राहिला नाहीं. ज्या अर्थी माझा प्रियकर चंद्रकांतच नाहींसा झाला, त्या अर्थी आतां मला तरी जगून कर्तव्य काय आहे? तथापि या वेळेस एक माझा मित्र प्राणदाता गोपीनाथराव जर असता तर त्याणें आपला प्राण पुढें करून अशाही संकटांतून मला मुक्त केलें असतें. असें बोलतांना त्यास त्या मित्राचें अंतर्यामीं स्मरण होऊन नेत्रांतून अश्रु वाहूं लागले इतक्यांत कोणी एक तेथें दिव्य मोहरा सर्वांदेखत आवेशानें त्या सभेंतून उठून ओरडून बोलला. "हे माझ्या जिवलगा विश्वासराया, भिऊं नको! भिऊं नको! ज्याचें अंतर्यामापासून तूं स्मरण करीत आहेस तोच हा तुझा मित्र गोपीनाथ या प्रसंगीं तुला या संकटांतून मुक्त करून सौख्य देण्यासाठीं आला आहे." असें बोल-

तांना त्याचे नेत्रांतून प्रेमाश्रु लोटले. आणि जीवाची आशा न धरितां एकदम पिंजऱ्यांत जाऊन त्याचे कंठास त्यानें मिठी मारिली. कांहीं केल्या उभयतांचा गहिंवर आवरेना. हें पाहून सर्वांस व न्यायाधीशासही मोठें अतर्क्य आश्चर्य वाटलें. स्मरणावरोबर ओ देऊन याच्या मित्रानें धांव घेतली, त्याअर्थी कांहीं तरी याचे ठिकाणीं ईश्वरी अंश खचित असावा. आतां बहुतकरून **विश्वासरावाची** सुटका होईल असें जे ते ह्मणूं लागले. मग लागलाच **गोपीनाथ** तेथून बाहेर पडून **चंद्रकांताचे** वडील राजेसाहेब मुख्य सिंहासनावर पुत्रशोकानें दीन होऊन बसले होते, त्यांस हेच मुख्य राजे असें धूर्ततेनें ओळखून त्यांचे पुढें उभा राहून ह्मणाला: "सरकार आपल्या दरबारांत कोणींच शहाणा पुरुष दिसत नसून सर्व अनान्वित इनसाफ होत आहे. आपली सर्व न्यायरीत बुडाली काय? माझ्या **विश्वासरायाच्या** हातून अशी गोष्ट होईल तरी कशी? याचा विचार मुळींच कोणीं केला नाहीं. ज्याअर्थी पुरावाच मागतां त्या अर्थी मी सर्व अव्वलपासून **विश्वासरावाचे** मुक्ततेचा पुरावा आतांच करतों. परंतु माझें एक सरकारापाशीं मागणें आहे.

मुळींच **विश्वासरावाचा** नाश न व्हावा अशीच राजेसाहेबाची इच्छा होती, परंतु इनसाफापुढें उपाय चालत नसून पुत्रशोकामुळें तिकडे मन नव्हतें ह्मणून इतक्या थरास गोष्ट आली. परंतु **गोपीनाथाची** ही विनंति ऐकून राजास फार उत्तेजन आलें आणि ह्मणाला: बोलावें काय असेल तें.

हें ऐकून **गोपीनाथ** ह्मणाला:—अगोदर या दरबारांतील मंडळीस बाहेर जाण्याची बंदी करावी. असें ह्मणतांच राजानें दरबारांतून कोणासही बाहेर जाऊं देऊं नये असा हुकूम केला. आणि जिकडे तिकडे नाकेबंदी करविली. तेव्हां जे ते ह्मणूं लागले, काय आहे कोण जाणें; कोणावर कसा प्रसंग येईल तो येवो. न्यायाधीशाचे अंगावर तर कांटाच उभा राहिला.

इतक्यांत **गोपिनाथ** ( खिशांतून एक याद काढून ) राजास ह्मणालाः **मुकुंदरावदादा** या सभेंत कोण आहे? तेव्हां राजानें मुख्य न्यायाधीशाकडे बोट दाखविलेसें पाहून तो त्यास ह्मणालाः अगोदर यांस कोठें न जाऊं देण्याची तजवीज करावी. हे गुन्हेगार आहेत. याविषयीं मी पुरावा करीन. न केल्यास मला जी शिक्षा सरकार ठरवितील ती कबूल आहे. असें सांगतांच राजानें त्यांची भीड न धरितां त्यांस कैद करविलें. तसेंच **प्रतापसिंग** जमादार, **भवानसिंग** दफेदार, **त्र्यंबकरावजी** आणि **लालाछतुराम** यांचीं नांवें पृथक् पृथक् विचारतां तेही तेथें आलेच होते, त्यांजलाही बंदोबस्तांत ठेवण्याचें सांगितल्यावरून त्यांसही राजानें कैद करविलें. तेव्हां कित्येकांस वाटलें कीं, ही या बकासुराची पाळी आतां कोणकोणावर येईल ती येवो. अटक कशाकरितां करविली हें कोणास कांहीं कळेना. नंतर त्याणें सांगितलें कीं, न्यायाधीशाचे वाड्यांत एकदम जाऊन विश्वासुक माणसांचे हातून जप्ती करवावी. आणि तेथून एकही माणूस बाहेरचें आंत व आंतील बाहेर पडूं देऊं नये. इतकें व्हावें ह्मणजे आतांच पहा काय चमत्कार दाखवितों तो. असें ह्मणतांच राजानें आपले विश्वासुक पांच असामी बरोबर शंभर लोक व हत्यारबंद स्वार देऊन लागलेंच वाड्याभोंवतीं बंदोबस्तानें जप्ती बसविली. इतकें कृत्य झाल्यावर दुसरा एक कागद काढून सर्व सभेसमक्ष तो पुनः राजास ह्मणालाः ह्या गुन्ह्याचा मुख्य कर्ता कोण आहे, व राजपुत्राची काय व्यवस्था करून माझ्या **विश्वासरावावर** कोणीं आरोप कशाकरितां आणिला आहे, याचा आतांच स्वदस्तुर मुद्रापत्यानिशीं पुरावा सरकारासमोर हजर करतों. हें ऐकतांच सर्व आपआपले जागीं चपापून गेले. ज्यांस कैद केलें होतें, त्यांचे मनाची तर खात्री झाली कीं, आजच हा यमस्वरूपी काळ आपणासन्निध येऊन पोहोंचला!

सर्व सभा मुकाट्यानें असून पुढें काय चमत्कार होतो हें प

हाण्याकडे लक्ष लावून बसली होती. मुख्यस्थानीं राजा, सन्निध **गोपीनाथ** उभा राहून तो सावंत पुराव्याचा कागद वाचूं लागला. तो असा:—

"श्रीमन्महाराज **भानुकांता**दि मित्रपंचक मुक्काम लखनौ यांस.

विज्ञाप्ति अशी कीं, आपलीं दोन गुप्त पत्रें कारागृहांतून आलेलीं पावलीं. तेव्हांपासून अनेक कल्पना रचून आजपर्यंत **चंद्रकांता**चा व **विश्वासरावा**चा जेणेंकरून नाश होईल अशी आह्मी संधि पाहत होतों, परंतु त्याच्या शहाणपणापुढें पुष्कळ दिवस आमचा उपाय चालला नाहीं. आतां **प्रतापसिंग, भवानसिंग, त्र्यंबकरावजी** आणि **छटुराम** हे आपले हेतूस साह्य झाल्यामुळें मनोदयानुरूप हेतु सिद्ध झाला आहे. तो असा:— गेले गुरुवारचे रात्रीं राजा **चंद्रकांत** यास कांहीं भुलीचे पदार्थ मिठाईंत घालून आह्मीं ती त्यास खावयास दिली. व भूल आल्यावर त्यास आपले या मंडळीशिवाय कोणास न समजूं देतां गुप्तपणें राजवाड्यांतून बाहेर काढून आमचे खासगी वाड्यांत मध्यघरांतील तळघराचे मर्धाल कोटडींत नेऊन बंदोबस्तानें कैद करून ठेविलें आहे. आणि तेच दिवशीं जमादार आणि दफेदार हे राजवाड्यांतील मुख्य पाहऱ्यावर ठेविले असतां त्या शूरांनीं आमचे आज्ञेवरून व द्रव्याशेकरितां **विश्वासरावा**चा नाश करावा असा इरादा बाळगून राजवाड्यांतील दिवाणखान्याचे पश्चिम बाजूचे आरसेमहालांत **विश्वासरावा**चें रोजचें निजणें होतें, तेथें जाऊन त्या ठिकाणीं धैर्य धरून तलवारीनें त्या निजलेल्यास ठार केलें आणि पाहतात तो तेथें आपल्यास त्रासदायक जो **विश्वासराव** तो त्याचे बिछान्यावर नसून **चंद्रकांता**चा प्रियकर मेहुणा **सर्वोत्तमराव** ते दिवशीं तेथें निजलेला होता त्याचा घात झाला. तेव्हां तर हें आपले हातून अनन्वित कर्म होऊन भलत्याचाच घात झाला ह्मणून ते फार बावरले. परंतु तितक्यांत युक्तीनें धैर्य धरून चोहोंकडे पाहतात तों हुजी दिवाणखान्यांत **विश्वासराव** निज-

केला त्यांचे दृष्टीस पडला. पण एक खून झाल्यावर पुढें त्यास मारण्याची त्यांची उमेद होईना. तरी त्यांनीं जलदी करून **सर्वोत्तमरावाचें** प्रेत तेथून उचलून, तेथील सर्व मुद्दा मोडून **विश्वासरावाचे** बिछान्यापुढें आणून टाकिलें. आणि त्यांचे हातावर, वस्त्रांवर व चोहोंकडे दिवाणखान्यांत रक्त शिंपडून **विश्वासरावाची** तलवारही रक्तानें भरून ठेविली. आणि लागलीच बाहेर येऊन आपलीं अंगें स्वच्छ केलीं. इतक्यांत **प्रतापसिंग सर्वोत्तमरावा**-सारखा शब्द काढून दीन स्वरानें ओरडला. आणि ते दोघे लागलीच आपले पाहऱ्यावर रुजू झाले. " हें ऐकतांच मंडळींत गलबल झालीसें पाहून **गोपीनाथ** ह्मणाला, अद्यापि पत्र पुरें झालें नाहीं. कृपा करून पुढील मजकूर ऐकावा: "पुढें तो दीन स्वर ऐकतांच राजवाड्यांतील सर्व मंडळी जागी होऊन दिवाणखान्यांत ववघव जमा झाली. आणि मुद्यानिशीं **विश्वासरावास** पकडून त्याजवर खटला चालू केला. सर्व प्रकारें आह्मीच न्यायाचे कामावर असल्यानें निस्पृहता दाखवून शाबिदी करविली. निकालाचा दिवस त्रयोदशी सोमवारीं जाहिरातीनें नेमून ते दिवशीं त्यास मृत्यूची शिक्षा देण्याचें आह्मीं पक्कें मनांत ठरविलें आहे. कदाचित् राजेसाहेब त्याचेकडील असल्यानें असें होऊं न देते, पण **चंद्रकांत**च नाहींसा झाला ह्मणून त्यांचें चित्त उदास होऊन पुत्रमोहानें ते अगदीं ग्रस्त झाले आहेत. आतां हें कृत्य झाल्यावर इकडून आपले लिहिण्याप्रमाणें फौज पाठवून आपल्यास मुक्त करून पुनः गादीवर बसविण्याचें आह्मीं मनांत आणिलें आहे. आजपर्यंत आपलेकडील आमचें अंग आहे असें मुळींच न दाखवितां येथें प्रेम दाखवून आहोंत. आतां स्वस्थ असावें. **चंद्रकांत** कैदेंत आहे. एक **विश्वासराव** नाहींसा झाल्यावर तुमचा सर्वथैव कांटा उपटला. हें पत्र आपले विश्वासूक **रमणगीर** स्वाराबरोबर बंदोबस्तानें पाठविलें आहे. पाहतांच याचें विसर्जन होऊन नष्ट दिवस गेले असें समजून कांहीं काळ स्वस्थ

रहावें. आतां पत्र पुरे करितों ; सेवेशीं तसदी दिली याची माफी असावी, ही विज्ञप्ति. मुक्काम **हस्तनापुर**, मित्ती मार्गशीर्ष शुद्ध ९ मी रोज शुक्रवार.

**मुकुंदरावदादा** न्यायाधीश. "

याप्रमाणें साद्यंत पत्र वाचून सर्वांस त्या न्यायाधीशाचा सही-निशीं स्वदस्तुर लेख दाखविला. तेव्हांच सर्व इन्साफ होऊन लोक स्वस्थ बसले. त्या दुष्टांनीं निरपराध **विश्वासराव** याची छलना करून मलाहि दुःख दिलें, ह्मणून **चंद्रकांताचे** वडिलांस ह्मणजे राजास अतिशय संताप येऊन त्या पांचांस याच वेळेस देहांत-प्रायश्चित्त द्यावें असें त्याचे मनांत आलें. नंतर पूर्वी जे लोक कैद केले होते, त्या प्रत्येकास कहाडणीनें खांबाशीं तेथेंच बांधून टाकिलें. व पुर्तेपणीं या प्रकरणाचा निकाल झाल्यावांचून आज या दरबारांतून कोणींहि हलूं नये, अशी सर्वांस बंदी केली. नंतर **विश्वासरावास** लागलेंच बंदमुक्त करून उत्तम पोषाख देऊन आपले शेजारीं सिंहासनावर बसविलें. तेव्हां अशा समयास माझा मित्र कशी धांव घेऊन स्मरणाबरोबर पुराव्यासुद्धां आला, याविषयीं अतर्क्य आश्चर्य वाटून तो वारंवार **गोपीनाथाचे** प्रीतीचा विस्मय करूं लागला. असा अद्भुत खटला कधींच पाहण्यांत आला नाहीं, असेंच जे ते ह्मणूं लागले. हें मुद्याचें पत्र कसें मिळालें ह्मणून राजानें **गोपीनाथास** विचारिलें. तेव्हां तो ह्मणाला :—जो स्वार हें पत्र घेऊन जलदीनें जात होता, त्यास एके वारींत वाघानें मारून टाकिलें होतें ; आणि आह्मी इकडे त्या वाटेनें फिरत येत असतां त्या ठिकाणीं हें आह्मांस दैवयोगानें सांपडलें. ह्मणूनच हा आजचा सुदिन पाहिला. या कामांत मुख्य **विश्वासरावाची** स्त्री **मधुमालती** इची मला मदत असून तिणेंच हें पत्र तेथून धैर्यानें आणून मजकडून आज हा पुरावा करविला. तीहि आजच्या प्रसंगीं येथेंच आहे.

तेव्हां विश्वासरावास तर होईलच, परंतु सर्वांस अत्यानंद होऊन परमेश्वराची लीला अगाध आहे असें ते ह्मणूं लागले!

चंद्रकांताची भेट झाल्यावांचून विश्वासरावास आणि रा. ज्यास चैन पडेना; ह्मणून गोपीनाथास बरोबर घेऊन तिघेही दरबारचा बंदोबस्त करून कांहीं सैन्यासह न्यायाधीशाचे वाड्यांत जावयास निघाले. दरबाराबाहेर येतात तों कोणी एक देखणा व सदृढ पठाण अंगावर उत्तम पोषाख असून घोड्यावर बसलेला बरोबरील पांचशें अरबी स्वारांनिशीं एकाएकीं पुढें येऊन मोठ्या नम्रतेनें विश्वासरावास सलाम करून ह्मणाला:—

" खावंद, आपके जुबानका हुकूम सुनेकी मै रहा देखताहूं. जिने आपकु तखलीप दिई है उसकी कुछ परवा न रखके परवानगी होय तो ये वखत गठडी बनाके आवकु मै छुडाताहूं. आपने मथुरादास सवारके हातसे संदेशा भेज दिया, उसी माफक ओ बडे सरकारनें आपके दिवानसाबकू जरूर जरूर हमे इधर भिजवानेके वास्ते पतिया लिखकर भेज दिया. उसी वखत मै आपने अजुध्या राजधानीके सवार और अरब लेकर बादशाहाके फौजमे आके मिला, और रातका दिन बनाके सब मिलकर ए शहरके नजीक मैदानमे आनकर पोंचा, तो आवके निकालका दिन यजीका सुना. फेर तो बहोत जलदी करके सब शहरकू दस हजार जवानके हातसे घेरा डारकर, ये पिछले सवार लेकर आपनी खबेर लेनेकूं अब्बी आके आपकू मिला. क्या हुकम है ? सरकार, आपतो बडे ख्याली हैं. आपकी रखवाली कोय नै करेगा ? ये शहरमे हमे आनेकूं कोइ हरकत करे उसीखातर आपने मथुरादास सवारके साथ, यै राजधानीका सुनेकी हरफ उपर कियेली है ये निशानीका झंडा भिजवाया; वो देखके कुई एहातलग हमे आनेकू अटक किई नहीं. देखो ओई हमारे हातमे ये हाल है. "

हें ऐकतांच विश्वासराव ( हा आपलेकडील खवाजखान सरदार आहे असें ओळखून ) ह्मणाला:—शाबास

दर **खवाजखान**, तुझी साह्य होऊन आह्मावर प्राणांताचाही समय आला असतां युद्धप्रसंग करून आमचें रक्षण करणारे आहांत अशीच माझी खात्री आहे. या वेळेस तसाच प्रसंग येणार होता, परंतु ( **गोपीनाथा**कडे बोट दाखवून ) या माझ्या प्राणमित्रानें आज दुष्ट लोकांचे कृतीचा संपूर्ण पुरावा दाखवून मला सोडविलें. आतां तसें मुळींच कारण राहिलें नाहीं. मात्र हें करा कीं, तुह्मीं जो शहरास वेढा घातला आहे तो उठवून एक दोन दिवस आनंदानें येथेंच तळ देऊन राहावें; आणि मग शहरीं परत जाण्याचें करावें. अशी परवानगी होतांच तो पठाण राजास व **विश्वासरावास** आदवीनें सलाम करून आपले छावणीकडे परत गेला. हें राजादि मंडळींनीं पाहून त्यांस **विश्वासरावा**चे धूर्ततेचा मोठा अचंबा वाटला. या पुरुषाची कृतिच कांहीं विलक्षण आहे. अशाही संकटांत असतां किती धोरणानें कोणास न समजूं देतां आपल्या प्राणरक्षणास ही साह्याची तजवीज त्याणें करून ठेविली होती! यापुढें त्या दुष्टांच्या कृतीचें काय तेज पडणार आहे? असें बोलून राजा व **विश्वासराव** मंडळीसहित तसेच पुढें न्यायाधीशाचे वाड्यांत गेले. आणि पत्रांत लिहिल्याप्रमाणें तळघर शोधून दारांचीं कुलुपें तोडून आंत जातात तों, "गर्दी कशाची? आंत कोण येत आहे! मला जिवें मारणार कीं काय? आतां मी मेल्याहून मेला झालों आहें. अजूनही किती छळ करणार? माझा अन्नपाण्यावांचून प्राण कंठीं उरला आहे. ज्याअर्थी असेंच तुमचे मनांत आहे त्यापेक्षां एकदम माझा शस्त्रानें शिरच्छेद करा; ह्मणजे मी या यातनेंतून सुटेन! वारा नसल्यानें सर्व शरीर कुजून उबगलें आहे. आतां माझा त्राता **विश्वासराव** कशाचा मला भेटतो? आईबापांस ही खबर कोण कळवितो? मजवांचून ते प्राण ठेवणार नाहींत! या दुष्टांनीं असा गुप्तघात करावयाचा नव्हता.असो. परमेश्वराची मर्जी!" असे दीन स्वरानें तुटक शब्द बोलून **चंद्रकांता**नें मोठ्यानें आरोळी मारली.ती ऐकतांच

सर्वांचे पोटांत एकदम ढवळून आलें. राजानें तर तेथेंच अंग टाकिलें. तितक्यांत **विश्वासराव** आपला गहिंवर आवरून राजास सावध करून **चंद्रकांतास** ह्मणाला: बा मित्रा, भिऊं नको. तुला सोडविण्यासच तुझे वडिलांस घेऊन मी **विश्वास** आणि माझा प्रिय मित्र **गोपीनाथ**, येथें आलों आहोंत. ज्या दुष्टांनीं तुझी अशी अवस्था केली त्यांस प्रस्तुत खांबांशीं आवळून टाकिलें आहे. मग लागलेंच **विश्वासरावानें** त्यास उठवून पोटाशीं धरिलें. आणि तसेंच त्या वंदांतून उजेडांत आणल्यावर पाहतात तों त्याची प्रकृति अतिशय क्षीण होऊन तो अगदीं मरणोन्मुख झाला आहे. तरी राजानें तो जिवंत दृष्टीस पडला, हीच ईश्वराची कृपा मानून त्यास मेण्यांत बसवून अगोदर राजवाड्यांत नेलें. आणि **विश्वासरावा**बद्दल झालेला सर्व मजकूर सांगून त्याचे चित्तास धीर दिला.

नंतर लागलेंच दरबारांत येऊन त्या दोघां खून करणारांस मिठाचें पाणी अंगावर टाकून मार देवविला. तेव्हां ते कबूल झाले. आणि ह्मणाले कीं, **मुकुंदरावदादा** न्यायाधीशाचे सांगण्यावरूनच आह्मीं हें सर्व कृत्य केलें आहे. मग करतात काय, मुद्यानिशीं शाबिदी झाली; हें पाहून माराच्या भयानें त्या तिघांसही कबूल करणें आलेंच. यावरून त्या दोन खून करणारे असामीस त्याच वेळेस राजवाड्यासमोर हत्तीचे पायाशीं बांधून पापमोचनार्थ देहांत प्रायश्चित्त दिलें. आणि न्यायाधीशासह तिघांस जन्मपर्यंत पायांत शृंखला घालून कैदेंत ठेवण्याचा हुकूम करून किल्ल्यावर पाठविलें; व त्यांस या कृत्याचें स्मरण राहण्यास्तव आठवे दिवशीं प्रत्येकास पंचवीस फटक्यांचा मार देण्याचा ठराव करून कचेरी बरखास्त केली.

पुढें राजाची व **चंद्रकांताची** आज्ञा घेऊन आज सुदिन पाहिला ह्मणून **विश्वासराव** व **गोपीनाथ**, **बाबासाहेब** हें वर्तमान ऐकून आनंदानें तेथें आलेच होते, त्यांजबरोबर त्यांचे वाड्यांत

सुमारें दोन घटका रात्रीं निघून गेले. घरीं जातात तों मधुमालतीनें मोठ्या प्रेमोत्साहानें विश्वासरावाचे कंठास मिठी मारली. मग काय विचारावें? जिकडे तिकडे सर्वांत आनंद पसरला.—कन्येची व जांवयाची गांठ, संकटें निर्मुक्त होऊन एकेच दिवशीं पडली; आणि त्याचा मित्रही भेटला. या योगानें बाबासाहेबांचे अंत:करणाब्धीवर सौख्याचे तरंग वारंवार उभे राहून ते दिवशींची रात्र आनंदांत उजाडली.

## भाग १०.

दुसरे दिवशीं सर्व मंडळी आनंदांत गोष्टी बोलत बसली आहे, इतक्यांत विश्वासराव गोपीनाथास ह्मणाला: मित्रा, तुझा वृत्तांत ऐकण्याविषयीं आमचें मन फार उत्सुक झालें आहे, तर तो सांगून आमची इच्छा पूर्ण करावी. हें ऐकून गोपीनाथ ह्मणतो:—मित्रा, जे दिवशीं तूं कारागृहांतून सुटून मला भेटणार होतास तेच दिवशीं सहज अस्तमानचे वेळेस त्या शहरांत करमेना ह्मणून छगन लालास विचारून मी फिरावयास निघालों. तों एकाएकीं कांहीं हत्यारबंद स्वार व शिपाई येऊन त्यांणीं मला पाहतांच पकडून चतुर्भुज केलें. हे कोण असून कांहीं एक मागील अथवा नूतन अपराधाचा संबंध नसतां विनाकारण मला धरून कैद करून नेत आहेत; असें मीं मोठ्यानें ओरडून, रस्त्यांतून जाणाऱ्या, कितीएक राजकीय व मोठमोठाले संभावित लोकांस कळविलें; परंतु अपरिचित व स्थानभ्रष्ट झालेल्या दीनाची दाद कोण ऐकतो? कोणीच कांहीं मनावर न घेतां ज्याचा त्यास आज बंदांतील शिक्षेचा पळालेला कैदी मिळाला, बरें झालें, असें जे ते म्हणूं लागले. तें ऐकून तर माझी कंबरच बसली. आणि देहभान अगदीं नाहींसें होऊन मी निरपराधी असतांही सर्वस्वास मुकलों याविषयीं दुःख वाटूं लागलें. पुनः माझा तूं प्राणसखा भेटण्याची मुळींच आशा

उरली नाहीं. हे लोक मला आतां कोठें नेऊन माझी काय दशा करतील याविषयीं होणारें दुःख पुढें उभें राहून रडें कोसळलें. घराचें आणि सर्व प्रकारें तुझे वियोगाचें दुःख वाटून नेत्रांवाटे अश्रुधारा चालल्या. तरी त्या निर्दय लोकांस माझी तिळप्राय दया न येतां उफराटे माझें पाऊल पुढें जलदीनें पडावें म्हणून ते वरचेवर पाठीवर व कंबरेवर बंदुकीचे दस्ते हाणीत; त्या योगानें माझें सर्वांग कांपित होऊन आंतून शिणका निघूं लागल्या. कोणीच रक्षणास वाली नसल्यानें व सभोंवतीं स्वार व शिपायांचा गराडा पडलेला पाहून ते लोक मला काळाप्रमाणें भासूं लागले. हर हर! तो प्रसंग मनांत आला म्हणजे शतधा काळीज कांपित होतें! तितक्यांत त्यांतील एक स्वार राजवाड्यांत जाऊन त्यानें सरकारास, आमचा कैदी आम्हास आपले शहरांत मिळाला, तो घेऊन जाण्यास आम्हास परवानगी व्हावी, अशी वर्दी दिली. तेव्हां त्या सुभे सरनायबानेंही कांहीं विचार न करतां लागलीच चवकीदारांस कैदी जाऊं देण्याविषयीं परवाना दिला. तो परवाना त्यांणीं नाक्यावर दाखवून मला शहराबाहेर आणिलें. मी कांहीं बोलेन जाणून वरचेवर मला निमूटपणें चालण्याची ते धमकी देत; त्यामुळें कांहींच उपाय चालेना. नंतर त्यांनीं माझे हातांत बिड्या घालून मला सात आठ दिवसांचे वाटेवर नेलें. चालण्याची संवय नसल्यानें माझे पायांत गोळे येऊन एकही पाऊल पुढें टाकवेना. तरी त्यांनीं मजल खुंटविली नाहीं. पुढें प्रसंगानुसार पाय अगदीं निरढावून गेले. ते अन्नसामग्री देत ती घेऊन या जठराग्नीस सरासरी आहुति द्यावी लागत असे. कित्येक दिवस असा मार्ग क्रमीत असतां एके दिवशीं समुद्रतीरास जाऊन पोहोंचलों. तेथें त्यांनीं मला एके जहाजांत बसवून त्यावरील हुद्देदारास हा बंडांतील लोकांपैकीं जन्मटेपेचा पळालेला कैदी आहे; यास **कंतान** बंदरावर चीन देशांत पोहोंचवून आमचे राजास वर्दी पाठवावी, याप्रमाणें सांगून कांहीं रक्षणार्थ लोक देऊन त्या जहाजांत मला

रवाना केलें. जातांना मीं त्यावरील एका शिपायाचे आर्जव करून त्यास विचारिलें कीं, माझा अपराध तरी काय आहे? तो ह्मणाला, तुजवर राजकार्यांत फितूर केल्याचा गुन्हा असून तुजबरोबरील दहा असामी आज चार महिने झाले, जन्मपर्यंत शिक्षा भोगण्यास त्याच ठिकाणीं पाठविले आहेत. तूं मात्र पळून गेला होतास तो आज सरकारच्या नशीबानें पुनः सांपडलास. "जसें कर्म करावें तसें भोगावें." आतां रडून उपयोग काय? हा सारा जन्म परकीय देशीं अटकेंत काढणें तुझे कपाळीं आहे हेंच खरें. तुझे हातून हें कार्य होऊं नये असें तुझे मुखचर्येवरून तर दिसतें; परंतु कर्मानुसार तुला बुद्धि झाली त्यास कोणाचा उपाय? आह्मी पोटाचे चाकर, वर्दीप्रमाणें काम बजाविणें हें आमचें काम आहे त्यांत मात्र जर आमचेकडून काडीभर कमतरता होईल तर आह्मांस आमचें डोकें द्यावें लागेल. तेव्हां मीं विचार केला कीं, ही तोहमत मजप्रमाणेंच चेहऱ्याचा दुसरा कोणी मनुष्य असेल त्याकरितां मजवर आली असावी. असो. ईश्वराचेच मनांत ही गोष्ट आली, आतां खरें खोटें याजपाशीं तरी सांगून याच्यानें काय परिहार होणार? जें कपाळीं असेल तें होईल. पुढें त्या **कंतोन** बंदरीं गेल्यावर त्यांनीं मला तेथील अधिकाऱ्याचे ताब्यांत देऊन पूर्वीचे लोकांबरोबर अटकेंत ठेविलें; आणि कैदी येऊन पोहोंचला अशी परवानगीचिठ्ठी त्यापासून घेऊन ते लोक आपले देशीं परत गेले. तेथें तरी दाद कशाची?"

अशी त्याची ही दुःखवार्ता ऐकून **विश्वासरावाचें** काळीज करपून जाऊन तो ह्मणाला, मजपेक्षांही यास महत् संकट भोगावें लागलें. परमेश्वरलीलाच कांहीं विलक्षण आहे. दीन झालेल्याचाच अधिक छळ करावा असें त्यास आवडतें. असो. अशाही काळसर्पाच्या मुखांतून सुटून, मित्रा, कसा या सुकुमारीसह तूं येथें आलास? तें सादंत आह्मास ऐकीव, मन अगदीं उतावळें झालें आहे. तें ऐकून **गोपीनाथ**.—" पुढें कांहीं दिवस तसाच त्या

बंदरीं नित्यशः इकडील सर्वांचें स्मरण होऊन आतां पुन्हां भेट कशाची होते? अशा वारंवार दुःखानें ग्रस्त होऊन राहिलों होतों. परंतु कांहीं पूर्व सुकृत उभें राहिल्यानें, तेथें सर्वांस फिरण्यास बहुतकरून मनाई नसल्यामुळें नित्यशः समुद्रतीरीं येऊन कर्मणुकीसाठीं समुद्रांत चार चार घटकांपर्यंत तेथील लोकांसह पोहण्याचा मला छंद लागून थोडकेच दिवसांत चांगलें पोहतां येऊं लागलें. एकेक कोसपर्यंत पाण्यांत बुडी मारून जावें इतका सहवासानें अभ्यास झाला. कधीं कधीं तोच छंद असल्यानें एकटेंही जात असावें. त्याप्रमाणें एके दिवशीं तिसराप्रहरचे सुमारास मी एकटाच पोहत होतों, तों दूर अंतरावर एक तुफान झालेलें जहाज कांहीं माणसें आंत असून झपाट्यानें समुद्रांतून येत आहे, असें दृष्टीस पडलें. तें पाहतांच मीं मनांत विचार केला कीं, एवींतेवीं येथें तरी संकट भोगून शेवटीं एकटेंच कुजत मरणें आहे, त्याअर्थीं जें होईल तें होवो, एकवार प्रयत्न करून नशीबाची परीक्षा पाहावी. अनायासें आज दुसरें कोणींही आपलें कृत्य पाहण्यास येथें नसून, अशी वेळ पुनः कधींच यावयाची नाहीं. असा पक्का विचार ठरवून मनाचा धडा करून त्या जहाजाचा सुमार बांधिला; आणि तें समुद्राचे कडेपासून सुमारें दोन हजार हातांवरून जाईल हें पक्कें धोरण ठरवून त्याचे येण्याचे मार्गावर ' जयश्रीसच्चिदानंद' अशा गर्जनेनें उडी टाकून पुढें पोहत जाऊन त्यास नेमकें आटोपलें. त्यांतील लोक तर अगदीं घाबरून जाऊन जहाज अनावर झाल्यानें चिंतातुर बसले होते. तोंच मी त्यांची नजर चुकवून त्या जहाजाच्या कडेचे फळीवर युक्तीनें चढून एकदम आंत गेलों. मला पाहतांच प्रथमतः सर्व लोक घाबरून गेले. एकाएकीं तुफान झालेल्या जहाजांत हा परका मनुष्य कोण चढला असून येथें कसा आला असावा; असा सर्वांस विचार पडला. हा कोणी लुटारू अथवा जहाज बुडव्या आहे कीं काय ? आणखीही याचे साह्यास किती लोक असतील कोण जाणें ! असें

आतां तुम्ही निर्भय असा. कसें तरी ईश्वरकृपेनें हें मी पैल तीरास नेईन. तुमचेबरोबर या स्त्रिया आहेत, परंतु मी असल्यानें तुम्हास कोणी आतां प्रतिबंध करूं शकणार नाहीं. हें माझें वचन त्या सर्वांस अतिशय संतोषकारक झालें. नंतर मीं युक्तीनें त्यांस विचारलें कीं, तुमचे या जहाजाचे मुख्य अधिकारी कोण असून त्यांची व तुमची कशी चुकामुक पडली? व या रूपवती राजकन्या दिसतात, या कोणाच्या असून यांस एकाच जहाजांत बसवून आणण्याचा त्यांचा उद्देश कोणता होता? तसेंच यांचें मूळ ठिकाण कोणतें असावें? हें कृपा करून सांगितल्यास माझी इच्छा तृप्त होईल. ते म्हणाले: तुमचा आमचा आतां कांहीं परकेपणा नसल्यानें तुम्हास सर्व हकीकत सांगतों. ऐकावी. "आमचे यजमान लाखों रुपयांचे धनी असून पांचजण भाऊ आहेत. आणि त्यांचीं अशींच व्यापाराचीं आणखीं पांच जहाजें बंदरोबंदरीं असून त्यांत या जहाजांत तर बहुतकरून उत्पन्न फारच होतें. कारण, त्यांचा एका अरण्यांत विस्तीर्ण मैदानांत वाडा असून त्यांत कित्तिएक गुप्त भुयारें केलीं आहेत; व हे जे जहाजावर घोडे बांधले आहेत हे सुमारें दिवसरात्र मिळून साठ कोस मजल करणारे आहेत. यांच्या जीवावर ते पांचजण पृथक् पृथक् मोठमोठाल्या राजधान्या फिरून त्यांत एखादी अति लावण्यवती सोळा वर्षांचे आंत राजकन्या किंवा सावकारकन्या दृष्टीस पडल्यास, अथवा, शोधांतीं कांहीं पत्ता लागल्यास हरयुक्तीनें, अगर द्रव्यसाह्यानें, ज्या यत्नानें प्राप्त होईल तसतशी कपटानें साध्य करून रातोरात त्या वाड्यांतील कोणासही ठिकाण लागणार नाहीं अशा गुप्त भुयारांत नेऊन ठेवतात. आणि तिचा खाण्यापिण्याचा आदिकरून चांगला बंदोबस्त राखतात. अशा स्त्रिया वारंवार मिळतात असें नाहीं. चार पांच वर्षांनीं चार पांच जमल्या म्हणजे भाग्य समजावें.ही त्यांची पांचवी खेप आहे.पुढें अशा पांच चार स्त्रिया जमल्या म्हणजे त्यांचे दागिने काढून घेऊन त्यांस परराज्यांत नेऊन एकेकीस निदान लाख लाख

वाटून ते फारच घाबरून गेले. मित्रा! त्यांतच ही तुझी प्रियभामिनी मधुमालती होती." इतक्यांत मधुमालती डोळ्यांस पाणी येऊन सुस्कार टाकून ह्मणते: " भावोजी, तें दुःख नका आतां वर्णन करूं!" इतक्यांत गोपीनाथ विश्वासरावास ह्मणाला: "मित्रा, अशी त्यांची चर्या दीन पाहून मी त्यांस ह्मणालों: तुह्मी घाबरूं नका. मी कोणी लुटारू नसून तुमचा नाश करावयास आलों नाहीं. परंतु मीही तुमचेसारखाच दुःखी प्राणी तुमचे आश्रयानें सौख्यांत पडावयास आलों आहें." असें त्यांजबरोबर बोलत आहें इतक्यांत, तें जहाज सहज सुमारें पंचवीस कोस पलीकडे निघून गेलें नंतर त्या संधीस ते मला ह्मणाले: "तुह्मी आमचा आश्रय पाहून या जहाजावर चढला आहांत, येणेंकरून आह्मी दोवे पुरुष आणि या पांच स्त्रिया, यांस तुमची मदत होऊन अनायासें ईश्वरानें सोबत दिली. परंतु हें जहाज तुफान होऊन, आह्मास याची पुरतेपणीं माहिती नसल्यानें अनावर झालें आहे. आतां जें होणें तें सर्वांस होईल. तुह्मी मात्र येऊन उलटे या संकटांत पडला आहांत. या वेळेस जर याजवरील खलाशी आणि यजमान असते तर इतकें जरी हें जहाज तुफान झालें आहे तरी त्यांनीं यास आंवरून धरून केव्हांच सुरळीत मार्गानें चालविलें असतें. आणि तुमचाही आदरसत्कार चांगला केला असता. आह्मी चाकर लोक आहोंत.त्याअर्थी, तुह्मीच आतां आमचे धनी होऊन आह्मास संभाळून घेऊन चला." मीं जहाजावर सर्व निरखून पाहिलें, तों त्यांत इच्यासह पांच स्त्रिया अति लावण्यवती व तरुणी असून मजकडे पाहतांच लज्जित होऊन दीन वदनानें एके बाजूस निराश्रित बसल्या होत्या. आणि एका बाजूस सर्व सरंजामयुक्त पांच अरबी घोडे व दोन चाकर उभे होते. तेव्हां मी त्या दोघांस ह्मणालों; बाबारे, आतां या संकटांत तुह्मीं आह्मास व आम्हीं तुम्हास आश्रय देऊन आनंदांत वेळ काढल्याखेरीज उपयोग नाहीं. मला जहाज चालविण्याची थोडीबहुत माहिती आहे.

रुपये तरी घेतल्याखेरीज विकीत नाहींत. या खेपेस अवचित ही समोर लाजून बसलेली अति लावण्यवती गरीब बिचारी घर चालत लक्ष्मी येऊन त्या दुष्टांचे हातीं पडली ! इची हकीकत आह्मास ठाऊक असल्यानें फारच वाईट वाटतें. पण आह्मी चाकर माणसें, आमचे हातीं काय ? ही गहिंवर युक्त रडण्यांतही कधीं कधीं दुःखानें आपले पतीचें नांव **विश्वासराव** असें घेते. आणि त्याचे गुणानुवाद वर्णन करून, स्मरण झालें ह्मणजे चार चार घटका धरणीवर लोळण घेऊन निश्चेष्ट होत असते !" मित्रा ! हीं तुझे नांवाचीं अक्षरें माझे कर्णरंध्रीं पडतांच माझा त्या वेळेस एकदम कंठ भरून येऊन सद्गदित झाला. देहभान ठिकाणीं न राहून वा **विश्वासराया** ! तूं कोठें आहेस ? तुझ्या स्त्रियेची ही अशी दशा व्हावी काय ? हर हर ! ! तुझें नांवच ऐकून या दीन **गोपी-नाथा**ची कर्णतृप्ति झाली! हे शब्द बोलून मी निश्चेष्ट पडलों' त्या वेळेस या बिचारे **मधुमालती**स तर दुप्पट दुःख होऊन रडें को-सळलें;आणि ती ह्मणूं लागली कीं, "ज्या **गोपीनाथा**साठीं प्राण-पतीस रात्रंदिवस अन्नपाणीही गोड न लागून ते उद्विग्न आहेत, तोच हा आज या अशा संकटांत प्राणपतीचे स्मरणानें दुःखित झाला आहे. असो. आज माझें भाग्य मोठें. ईश्वरास या दीनाची करुणा येऊन या अचेतन देहांत **गोपीनाथरूपी** वायूची प्रेरणा करून मला सजीव केलें. आतां कसें तरी याचे आश्रयानें माझे मला प्राणपति भेटतील." तितक्यांत मी शुद्धीवर येऊन ही दीन झालेली पाहून हीस ह्मणालों:—बाई, तूं कांहीं आतां काळजी करूं नकोस. हे तुजबरोबरील दोन असामी दयाळू असल्यानें आज ही तुझी तरी शुद्धि समजली. असो. हेच आपले प्राणदाते आहेत. असें त्यांणीं ऐकून त्यांसही आमच्या दुःखानें गहिंवर आला.आणि ते पुनःह्मणाले:"एके दिवशीं ही आणि इचा पति असे दोघे सहज सरंजामासह कर्मगतीनें त्या आमचे यजमानाचे येथेंच रात्रीं मार्ग चालून येऊन उतरले. यांचा खाण्यापिण्याचा बंदोबस्त

त्यांणीं चांगला राखला. रात्रीं हीं उभयतां एके पडवींत निजलीं, तोंच यांस श्रमामुळें गाढ झोंप लागली. असें पाहून त्यांनीं पूर्वी हे येतांच इजला हरण करण्याचा संकेत केल्याप्रमाणें आमचेच हातून युक्तीनें इची झोंप न मोडतां खोल व गुप्त तळघरांत या चौघी पूर्वींच जेथें मिळवून ठेविल्या होत्या त्यांचे शेजारीं ईस मऊ बिछान्यावर नेऊन ठेवविलें. नंतर ही जागृत झाली तरी उपयोग काय ? त्या वाड्यापासून दूर अंतरावर एके डोंगराचे दरींत तें स्थान असल्यानें कितीही आक्रोश केला तरी ऐकूं येण्यास मार्ग नव्हता. कदाचित् कोणास ऐकूं जाईल, पण या विचारीस बोलूं देतो कोण ? एकदम झोंपेंतून उठून तें भयंकर पतिव्यतिरिक्त स्थान पाहून ही अगदींच गर्भगलित झाली. तेथें या चौबीजणी स्त्रिया होत्याच. यांणीं इला सांगितलें कीं, बाई, तूं या व्याघ्रदरींत आह्मांसारखीच बकरी पडली आहेस.' आतां व्यर्थ रडून ओरडून जीवास कष्ट देणें इतकेंच. बाकी हा सर्व जीवाचा अट्टाहास कोंडा, ज्यास खेदाचें कांडण किती जरी केलें तरी सुटकारूपी कण ह्मणून हातीं लागणेंच नाहीं. तेव्हां विचारी करते काय ? सांपळ्यांत सांपडल्यामुळें निरुपाय होऊन ईश्वरावर हवाला ठेवून तळमळत तशीच तेथें पडली!

"दुसरे दिवशीं इचा नवरा **विश्वासराव** पहाटेस उठून पाहतो तों ही शेजारीं नाहीं. मग काय विचारावें ? तो अतिशय घावरा होऊन चोहोंकडे शोध करूं लागला. परंतु इचा कोठेंच शोध लागेना. तसेंच घोड्यांकडे पाहिलें; तों त्यांपैकीं एक सरंजामानिशीं घोडाही नाहीं. तेव्हां तर तो अतिशय वेड्यासारखा होऊन त्यानें पुष्कळच बारकाईनें शोध केला. तथापि उपयोग काय ? वाड्याचे मालकास विचारतां, घोडा घेऊन कोणीकडे गेली असेल ती असो; स्त्री जातीचा काय नेम आहे? अशी गुंगारा देणारी स्त्री माहित असून तिचे नादीं लागून तुह्मी इकडे कशास आलां? असेंच उलटें ते त्यास फजीत करूं लागले. तेव्हां तो बिचारा

उपायरहित व हिर्मुष्टी होऊन तेथून निघून मार्गस्थ झाला. नंतर आणखी एखादी स्त्री मिळेल या हेतूनें कांहीं दिवस त्यांचा दुसरा एक भाऊ देशाहून येईपर्यंत त्यांनीं वाट पाहिली. आणि मिळत नाहीं असें झाल्यावर या स्त्रियांस जहाजमार्गें त्रिकावयास घेऊन येत असतां पुढें समुद्रांत एके रमणीय बेटांत ( तें येथून सुमारें पांच हजार कोसांवर असेल ) एक संगमरवरी दगडाचें अपूर्व मंदीर समुद्रकिनाऱ्यावर दृष्टीस पडून कांहीं लखाकत होतें, तेथें कांहीं तरी चमत्कार असेल तो पाहावा या हेतूनें निर्भय- पणें समुद्रांत त्या ठिकाणापासून एका मैलावर त्यांनीं हें जहाज नांगरलें. आणि आह्मां दोघांस या पांच स्त्रियांचे रक्षणार्थ ठेवून यावरील खलाशांसह ते पांचजण तो चमत्कार पाहण्यास, यांत एक लहानशी होडी होती तींत बसून गेले. तों माग एकाएकीं तुफान होऊन हें जहाज समुद्रांत वाहवलें. परंतु आह्मास खलाशाचे कामाची बिलकुल माहिती नसल्यानें हें अनावर होऊन भडकलें. आह्मीं पुष्कळ आरोळ्या मारल्या तरी उपाय काय? त्यांसही हें असाध्य होऊन निराशेनें तेथेंच राहणें भाग आलें. मागें आज चार दिवसांत काय त्यांचें झालें असेल तें असो. पुढें हें जहाज रात्रंदिवस चालून आज तुमची अशी ईश्वर कृपेनें सहज गांठ पडली. आतां तुह्मीच आमचे यजमान होऊन आमचें रक्षण करावें. "

"विश्वासराया, असें आह्मीं बोलत आहोंत तों तें जहाज व- रेंच अंतरावर जाऊन एके मोठे, खडकास लागणार, इतक्यांत त्यांत दुर्बिण असलेली मी घेऊन तिच्या योगानें त्या खडकाचा सुमार चुकवून युक्तीनें तें पलीकडचे बाजूस नेलें. तरी तें एका लहान खडकास लागल्यामुळें एके बाजूस थोडेंसें फुटून पाणी आंत शिरूं लागलें. हें पाहून सर्वांचा धीर सुटून एकच हाहाः कार झाला! आतां वांचक ठीक चिन्ह नाहीं, जाणून स्त्रियांनींही रडण्यास आरंभ केला. या **मधुमालतीस** तर अतिशय वाईट

वाटून माझे पायांवर लोळण घेऊन ती ह्मणाली: " भाऊजी, आ-
तां या समुद्रोदरांत सर्वांची एकदम आहुति होण्याचा प्रसंग ये-
ऊन गुदरला! आतां कशाची प्राणपतीची भेट होते ? तुह्मीही
येऊन या ठिकाणीं फसलां. " याचप्रमाणें या बाकीच्या स्त्रिः-
यांनींही अट्टाहास करून रुदनास आरंभ केला. त्यावरील
चाकर तर अगदीं गर्भगलित होऊन आतां निःसंशय प्राण
वांचत नाहींत म्हणून अतिशय घाबरून गेले. माझीही तीच
अवस्था झाली. तत्रापि,मी सर्वांस धीर देऊन म्हणालों: रडूं
नका, ईश्वर कृपेनें यांतूनही पार पडून लौकरच सौख्य दृष्टीस
पडेल. ते सर्व म्हणाले: आतां या मृत्युलोकींचें तर नाहीं,
पण स्वर्गसुख लवकरच दृष्टिगोचर होईल एवढें मात्र खरें दिसतें.
इतक्यांत तें जहाज पाण्यानें अर्धें भरून त्या खडकास वरचेवर
लागत असल्यानें आधिकच फुटूं लागलें. तरी मी धीर न सो-
डतां जेणेंकरून तें आलीकडचे कडेस लागेल तो यत्न त्याचे
शिडास व सुकाणूस धरून करूं लागलों. त्या योगानें, आणि
वायूचीही हेतुइच्छित प्रेरणा वेळेस सुरू झाल्यानें जरी पाणी
आंत भरत होतें तरी, तें अवचित कडेस येऊन थोडे पाण्यांत
एकदम नांगरून खुंटविलें. परंतु आम्हांस पाण्याचा अजमास
न कळून रात्र झाल्यानें कोठें व किती पाण्यांत आहोंत हें कांहीं-
च कळेना. यामुळें सर्वांचा उपाय खुंटला. मग काय विचा-
रावें ? निरुपाय होऊन त्यावरच ती रात्र दुःखांत काढणें भाग
आलें. सर्वांस दुःखांत निद्रा लागली. पण मला अगदीं तळमळ
लागून निद्रा येईना. पाणी किती आहे याचा कसा शोध
काढावा? याविषयीं विचार पडला. भूक लागली होती तरी
उपयोग काय? नंतर सुमारें बारा घटका रात्रीं चंद्रोदय झाल्या-
वर स्वच्छ चांदणें पडलें. त्या योगानें दूरांतरावर कांहीं झाडें
दृष्टीस पडलीं. त्यामुळें व जहाजांतील पाणीही कमी होत चा-
ललें होतें, त्यावरून तेथें खाचित थोडें पाणी असावें, असा तर्क

बांधून कोणाचा निद्राभंग न करतां ईश्वराचें चिंतन करून मी खालीं उतरलों. तों कंबरेबरोबर पाणी लागलें. नंतर हळू-हळू अजमासानें जसजसा पुढें चाललों तसतसें पाणीही कमी-कमी लागूं लागलें. मग तर चांगलाच धीर येऊन तसाच समुद्राचे कडेपर्यंत गेलों. तेथें एक मोटी उंच दरड असून तिवर सर्व किर्र झाडी दिसूं लागली. तेव्हां संकटांतून पार पड-ल्याविषयीं मनाची पक्की खात्री होऊन पुढें वर चढण्यास धीर पोहोंचेना, ह्मणून तसाच जहाजावर परत येऊन सर्वांस जागें केलें. आणि त्यांस धीर देऊन सांगितलें कीं, तुम्ही स्वस्थ असा. सूर्योदयाबरोबर तुह्मास तीरावर घेऊन जातों. आपलें हें जहाज कडेसच लागलें आहे. पण रात्रीमुळें समजलें नाहीं. पाणीही थोडें असून जवळच ती पहा कड दिसते. ती मी प्रत्यक्ष धैर्यानें जाऊन पाहून आलों आहें. मग काय विचारावें ? सर्वांस एकदम आनंदाचें भरतें येऊन माझी ते अतिशय प्रशंसा करूं लागले. आणि ह्मणाले: " आज तुह्मी होतां ह्मणू-नच आह्मी वांचलों. नाहींपेक्षां अपघातानेंच आमचे प्राण गेले असते. मग समुद्र बुडविता तें तर लांबच. " असो. याप्रकारें सर्वांस आनंदीआनंद होऊन आह्मी ती सर्व रात्र जा-गृतपणें सौख्यांत काढिली. केव्हां उजाडेल असें होऊन गेलें. त्या रात्रीं या सर्व स्त्रियांनीं मला आपापली कच्ची हकीकत सांगि-तली. यांत ह्या दोन कुमारिका राजकन्या असून थोर घराण्यांती-ल आहेत, आणि या दुसऱ्या दोघींचे विवाह नुकेच झाले असून यांस पतिसौख्यापासून भ्रष्ट करून त्या दुष्टांनीं आणिल्या आहेत. परंतु एकीचेंही पातिव्रत्य भ्रष्ट झालें नाहीं हीच अधिक गोष्ट आहे. असो. थोडक्याच वेळानें रात्रीचा कालिमा कमी होऊन सूर्य-किरणांचा प्रकाश आकाशभर पसरला. सूर्योदय होऊन स्वच्छ दिसूं लागलें. मग काय विचारावें ? सर्वांचे हृदयांत आनं-दाच्या उकळ्या येऊं लागल्या. मी लागलीच जहाजाखालीं

उतरून रात्रीचे मार्गानेंच अगोदर कडेपर्यंत जाऊन परत आलों. तेव्हां सर्वपरी त्यांची खात्री होऊन सर्व स्त्रियांस अगोदरच कडेवर नेऊन बसविलें. मग आह्मीं तिघांनीं आंतील कापडाचे पांच वास्ते, व द्रव्याच्या कांहीं असलेल्या संदुका बाहेर काढल्या. नंतर तक्ते लावून सरंजामासह ते पांच अरबी घोडेही कडेवर नेले. आणि जहाज खुलें करून त्याची सर्व प्रकारें आशा सोडिली. " हें ऐकतांच सर्वांस मोठें आश्चर्य वाटलें. इतक्यांत पुनः गोपीनाथ ह्मणाला: " असे प्रकारें समुद्रांतून आमची सुटका झाल्यावर पुढें काय विचार करावा; आह्मीं कोणींकडे जावें; या स्त्रियांनीं गुप्तपणें कसें राहावें; कोणीं आह्मांस मार्गांत आडवील अथवा काय होईल याविषयीं त्या चाकरांस मोठा विचार पडला. हें पाहून मीं पूर्वींच योजना करून ठेविल्याप्रमाणें त्या चाकरांस त्या संदुकींतील एक लक्ष रुपयांपैकीं निम्मे रुपये देऊन तुमचें जन्मपर्यंत रक्षण करूं असा करार केला. तेव्हां त्यांणींहि आपण सांगाल त्या रीतीनें वर्तूं असें लागलेंच आनंदानें कबूल केलें, आणि ह्मणाले: " आज तुह्मीं आह्मास प्राणदान दिलें. आतां सर्वस्वी आम्ही तुमचे दास आहोंत. जें सांगाल तें न ऐकल्यास आमचे अंगीं कृतघ्नता येईल. ते यजमान अन्नाचे होते; तुम्ही जीवदानाचे आहांत. " याप्रमाणें ह्या चौघीही स्त्रियांनीं मदंकित होऊन जी आज्ञा कराल ती मान्य आहे असें कबूल केलें. असा आमचा सर्वांचा एकविचार ठरल्यावर ते कापडाचे वास्ते चाकरांकडून सोडविले आणि पाहूं लागलों तों त्या पांचीही वास्त्यांतून प्रत्येकाचे मंदील, दुपेटे, किनखावी निमेजामे, आदिकरून उंची उंची पोषाख वेगळाले आहेत; व तसेच पेट्यांतून प्रत्येकीचे सर्व दागिने भरलेले आहेत असें दृष्टीस पडलें. मग काय विचारावें? दुधांत साखर मिळाली. तेव्हां लागलाच माझे कल्पनेस तो पोषाख साह्य झाल्यानें या पांचांजणींस तो सर्व मर्दानी वेष देऊन त्यांच्या ढाला, तलवारी, जंबिये, कट्यारी वगैरे हत्यारें यांजपाशीं दिलीं.

आणि गळ्यांत मौक्तिकपेंडीं घालून यांचे अंगीं सर्व प्रकारें सरदारी बाण्याची ऐट आणिली. व यांचे पूर्वींचे स्त्रीजातीचे पोषाख पेट्यांतून घालून ठेविले. हें पाहून या सर्वांस ती अतर्क्य कल्पना वाटून त्या माझे फार आभार मानूं लागल्या. नंतर ते अनायासें सरंजामासह सिद्ध असलेले पांच घोडे पांचजणींस बसावयास देऊन बरोबर मी व दोन चाकर असे त्रिवर्ग पादचारी ईश्वराचें नामस्मरण करीत तेथून निघालों. आणि सुमारें दहा कोसांवर एक शहर लागलें त्या ठिकाणीं जाऊन शहराबाहेर एके रमणीय बगीच्यांत उतरलों. प्रथमतः मला संशय होता कीं, हे घोडे खंदे व चपळ असल्यानें या पांचजणींस कसें बसतां येईल? परंतु एकीपेक्षां एक चढाई बसणारी असून यांणीं त्यांस नानातऱ्हेचे कलावे देऊन सातरंगी, बाजी, आदिकरून मंडळावर दडवावें. भरधांव प्रतिज्ञेनें काढावें. तेव्हांच माझे मनाची खात्री होऊन निर्भयपणें मार्ग क्रमावयास आतां कांहीं एक धोका नाहीं असें वाटलें. त्या शहराजवळ गेलों तों सर्वांस या पांचजणींस पाहून मोहित होण्याचा प्रसंग वरचेवर येऊं लागला. आधींच सौंदर्य, त्यांत पांचजणींची चित्तवेधक मर्दानी व सरदारी इभ्रत, तसाच शिपाईबाणा, विशाळभाळावर केशरीगंध, कस्तुरीतिलक, हातांत सलकडीं, मनगटांत पोंच्या, पायांत तोडे, कंठांत मौक्तिकपेंडीं, व सुहास्यवदन पाहून हे मदनरूपी राजपुत्रच आहेत कीं काय असेंच सर्व शहरांतील मंडळीस वाटूं लागलें. पुष्कळ राजपुत्र पाहिले, परंतु असलें मोहक सौंदर्य व इभ्रतीचा बाणा, कधींच पाहिला नाहीं. ती वार्ता त्या शहरांत पसरून मुख्य अधिकारी, शेट, सावकार आमचे भेटीस येऊं लागले. अशा प्रकारें आह्मी सुमारें आठ दिवस तेथें विश्रांतीसाठीं राहून तेथील कारखानाकडून आणखी तीन घोडे सरंजामासुद्धां सुमारें सहा हजारांचे किमतीचे विकत घेतले. आणि तेथें कांहीं दानधर्म करून दुसरे दिवशीं सर्वजण तेथून निघून तुमचा शोध करीत अनेक देश पहात चाललों.

प्याकरमाणसें ही वातमी कोठें न फुटावी यासाठीं ज्यास्ती टेविलीं नाहींत. वाटेंत पुष्कळ तऱ्हेनें तुमचा शोध केला, परंतु कांहींच पत्ता लागेना. यामुळें वरचेवर तुमचें स्मरण होऊन सर्व उदास भासूं लागले. परंतु मजवांचून तुह्मी एकटे कधींही **जनस्थानीं** जाणार नाहीं अशी पक्की खात्री वाटून तसाच पुढें शोध करीत करीत काल रोजीं या शहरीं येऊन पोहोंचलों. आणि तुह्मास त्या कालचे संकटांतून तुमचे पत्नीचे साह्यानें मुक्त केलें. येतांना जवळ पैसा पुष्कळ असल्यानें पुनः नष्टदशा आली नाहीं." हा साद्यंत **गोपीनाथानें** सांगितलेला मजकूर ऐकून सर्वांस अतिशय आश्चर्य वाटून, ईश्वराची करणीच अगाध आहे याविषयीं सर्व त्यास अनन्यभावें आळवूं लागले!

त्या वेळेस ती **मधुमालती** पतीचे दुःखानें अगदीं दीन होऊन त्या मध्यघरांत एके बाजूस बसली होती. आणि तेथेंच त्या चौघीही नवयौवनसंपन्नसुंदरी होत्या. तिच्यानें एक शब्दही बोलवेना. आजपर्यंत मी यांस अंतरलें आणि काय दगा घडून नाहींशी झालें, या मानसिक दुःखानें **विश्वासरावाची** निस्तेज अवस्था पाहून तिला फार वाईट वाटलें. वरचेवर दुःखाचे उमाळे पोटांत उभे राहून अश्रूंनीं नेत्र भरून येत. तसेंच तिचा वियोग व तिनें समुद्रांत भोगलेलें दुःख वारंवार मनांत येऊन **विश्वास-रावाचीही** तिला पाहून तिजप्रमाणेंच अवस्था होऊन गेली. आणि तो ह्मणतो: ही मजपेक्षांही चतुर, तर्कज्ञ व धैर्यवान् असून पतिहितेच्छु आहे. याविषयीं काडीमात्र शंका नको. प्रसंगानें कळतें. पुढें तिचा मजकूर समजण्याविषयीं फार उत्सुक होऊन तिला उद्देशून **विश्वासराव** ह्मणाला: हे मम प्राणरक्षके, प्रियंवदे, चंपकहेमवर्णे, कामिनी, तुझें रसभरित स्वात्योदकरूपी भाषण मदंतःकरणांतील आशाशुक्ति प्रफुल्लित होऊन वांछित आहे; तर तिजवर त्याचा संतोषकारक वर्षाव करून आनंदरूपी पाणीदार अमोल्य मौक्तिकें निपजवून मदाशास शोभवावें. आणि माझ्या

प्राणांताचे समयीं माझ्या प्राणमित्राचे हातें मला पत्रवटां तील इतिहासामृत पाजून कसें वांचविलेंस ? व आजपर्यंत तुझा कोठेंच ठिकाण नसून आशाही उरली नव्हती, तथापि एकाएकीं कालचे समयीं स्मरणाबरोबर कसा **गोपीनाथ**चंद्राचा उदय करून तूं माझी कालिमा दवडलीस? हें संपूर्ण वर्तमान एकवार मला आणि या सर्व वांछितांस ऐकवावें. तें ऐकून **मधुमालती** ह्मणते: "प्राण-पति, आज उभयतांचें पूर्वार्जित सुकृतच या समयीं कामास येऊन **गोपीनाथ** भावोजींच्या कृपेनें आज हे मीं पाय पाहिले. आपण **हस्तनापुरास** आलां असाल हें कोणाच्या ध्यानीं मनींही नव्हतें. परंतु कांहीं तरी येथें माझे माहेरीं शोध लागेल यामुळें, व तशीच आई, बाप, भाऊ, बहिणी यांची मागें काय अवस्था असेल हें समजण्याची व त्यांचे भेटीची मला फार उत्कंठा लागल्यानें, अगोदर भावोजींचे विचारें इकडे येण्यास निघालें. मजबरोबर ह्या ज्या रूपवती चौघी स्त्रिया आहेत त्यांत **उन्मिळा** आणि **चंद्रसेना** या दोघी **शृंगारपुरी**च्या राजाच्या कन्या सावत्र बहि-णी असून यांचा विवाह होणें आहे. व या दुसऱ्या दोघी **कामदा** आणि **ललिता** सावकारकन्या असून यांचीं नुकतींच लग्नें झालीं आहेत. यांचें सासर माहेर **उज्जनींत** असून प्रस्तुत तीं घरें गर्भ-श्रीमंत व चांगलीं नांदतीं आहेत. त्या दुष्टांनीं या चौघींसही मज-प्रमाणेंच हरण केलें होतें. यांच्या आईबापांस, भाऊ वहिणींस, आप्तवर्गास व पतींस यांच्या विरहानें नित्यशः स्मरण होऊन किती दुःख होत असेल?" ते वेळेस त्या चौघी फारच दुःखी होऊन अधोवदन करून एकीकडे बसल्या आहेत, असें पाहून त्यांच्या दुःखानें सर्वांचे नेत्र भरून आले. इतक्यांत **मधुमालती** ह्मणाली: ऐकावें पुढें काय झालें तें. तेव्हां सर्वजण स्वस्थांतःकरणें करून ऐकूं लागतात. हें पाहून **मधुमालती** ह्मणाली: प्राणनाथ, यांनींच मला तशा संकटांत धैर्य देऊन वांचाविलें. यांचे मजवर महदुप-कार आहेत. असो. " पुढें यांसहवर्तमान आह्मी आठजण अ-

सा मार्ग कंठीत इकडे येत असतां बहुतकरून अरण्यांतील डों-गर व जागोजागची मजा, तशींच गांवें, नद्या, तलाव, झाडें वगैरे अनेक चमत्कार पहाण्याची पूर्वीपासून मला हौस आहे जाणून मीं आपला घोडा कधीं कधीं दोन दोन कोसपर्यंत सर्वांचे पुढें एकटाच अरण्यांत मौजेनें काढावा. परवांचे दिवशीं सुमारें प्रहर दिवसास ही सर्व मंडळी मागाहून येत होती. इतक्यांत एका डोंग-राचे तळचे कड्याचे दरींत कांहीं हवाशीर वृक्ष असून पाणीही स्वच्छ वाहत आहे असें दुरून पाहून मीं आपला घोडा तृषानि-वारणार्थ तिकडे चालविला असतां एकाएकीं त्यास कांहीं वास लागून तो अगदीं चंचळ झाला. पुढें बिलकुल चालेना. तेव्हां या ठिकाणीं कांहीं घातुक जनावर खचित असावें असा मीं तर्क बांधिला. आणि त्या प्रसंगीं माझा मर्दानी बाणा असून कमरेस नग्न तलवार लटकलेली, पाठीस ढाल, हातांत बरची थसल्यानें ज्यास्ती धैर्य येऊन् काय चिंता आहे कांहीं कां असेना, वेळच आल्यास यःकश्चित् जनावराची कथा किती; असें वाटून तेथेंच तो घोडा एका झाडास काहाडणीनें बांधिला. आणि हळू हळू झा-डाचे बाजूनें पुढें जाऊन चोहोंकडे निरखून पाहिलें. तों एका द-रींत एक मनुष्य झाडास लटकलेला असून त्याचें सर्व डोकें वा-घानें चावून छिन्नभिन्न केलें होतें. तशीच त्याचीं कांहीं पांघरुणें तेथेंच अस्ताव्यस्त पडलीं होतीं. व पलीकडचे बाजूस एक मोटा घोडाही सरंजामानिशीं मेलेला पडला असून त्याचे पाठी-वर पंजे मारल्यानें रक्त निघून गोठून गेलें होतें. तेथें जरी ज-नावर वगैरे कांहीं नव्हतें तरी हा अपघात दोन चार दिवसांतच झाला असावा, असें त्याचे व घोड्याचे मृतचिन्हांवरून मीं जा-णिलें. काय सांगूं ! पहा तें भयंकर कृत्य पाहून माझे अंगास तर कांटाच आला. इतक्यांत नीट न्याहाळून पहातें तों त्या स्वा-राचे गळ्यांत एक कातड्याची थैली लटकावलेली असून तिलाच त्यानें दोन्ही हातांनीं उराशीं बोटांत बोटें घालून घट्ट धरिलें

होतें. तेव्हां या थैलींत कांहीं तरी गुह्यवस्तु असावी असें अनुमान करून तशीच त्या शवासन्निध गेलें. आणि धैर्यानें ती थैली त्याचे गळ्यांतून काढून पहातें तों तींत एक लखोटा कुमती राजपुत्राचे नांवाचा जरूर जरूर अक्षरांचा मोहोरबंद असलेला दृष्टीस पडला. यांत कांहीं तरी राज्यप्रकरण असावें असा तर्क बांधून युक्तीनें त्यावरील मोहोर कायम राहण्यासाठीं त्यास पाणी लावून तो फाटूं न देतां फोडून पाहिला. त्यांतील मजकूर आपणास विदित झालाच आहे. असा आपला घात ऐकल्यावर मग कशाचें चैन पडतें? तशीच मागें वाटेवर परत आलें. तों ही मंडळीही मागून तेथें येऊन पोहोंचली. त्या वेळचें दुःख काय वर्णन करूं? माझें तोंड उतरून जाऊन अगदीं चमत्कारिक वृत्ति झाली आहे असें पाहून सर्वच घाबरले. तरी हा मजकूर मी त्यांस न समजूं देतां कोठेंच पतीचा शोध लागत नाहीं व माहेरींही कधीं जाऊन पोहोंचूं असें झालें आहे, इत्यादि कारणानें त्यांची समजूत केली. आणि तसेंच कांहीं कारण आहे, आपणास परवांचे दिवशीं सकाळीं प्रहर दिवसाचे आंत हस्तनापुरास गेलेंच पाहिजे, असें सर्वांस सांगितलें. मग आह्मी सर्वजण तसेच भरधांव घोडे टाकीत रात्रीचाही दिवस करून काल प्रातःकाळीं शहराबाहेरील त्र्यंबकेशबगीच्यांत सर्वजण येऊन पोहोंचलों. वाटेनें भावोजींस मात्र ही हकीगत कळविली होती. हरहर ! ! वारंवार आपलेवरील प्राणनाशक खटल्याची वेळ दृष्टीपुढें उभी राहून क्षणभरही चैन पडेना ! पुढें आमची सूचना येईपर्यंत आज येथेंच राहावें असें सर्वांस सांगून सुमोर सकाळचे आठ वाजले असतील कीं नसतील तोंच त्यांचा मागें चांगला बंदोबस्त ठेवून आह्मी दोघे घोड्यांवर स्वार होऊन दरबारांत येण्यास निघालों. वाटेनें शुभ शकुन होऊन माझी डावी बाही तसीच भोंवयी उडूं लागली. तरी धैर्य कशाचें? तशीच जलदी करून दरबारचौकांत येऊन पोहोंचलों. तेथें

आल्यावर कोणाशीं एकही शब्द न बोलतां केवळ या चरणांची वाट पहात होतों, तों कितीएक या जीवासाठीं हळहळून सभोंवतीं रडत होते. इतक्यांत नग्न शस्त्रांचे घेऱ्यांत आपलें हें आवचित दीन व अधोवदन पाहिलें. " असें बोलतांना तिचा कंठ दाटून येऊन ती सद्गदित झाली. हें पाहून **विश्वासरावानें** तिला उचलून घेऊन आपले सदयकरांनीं आलिंगन देऊन शुद्धीवर आणिलें. पुढें ती तशीच गहिंवरून ह्मणते: "तो कालचा प्रसंग वैऱ्यासही आलेला पाहूं नये! त्यांनीं जसें आपल्यास आंत नेलें तसें लागलीच मीं **गोपीनाथ** भावोजींस तो प्रसंगसाक्षतेचा पुरावा देऊन दरबारांत इनसाफाचे जागीं पाठविलें. आणि यांचा घोडा बाहेरील एके झाडास बांधून हे बाहेर येईपर्यंत कांहीं पैसे देऊन एका मजूराकडून रक्षण करविला. मला तरी चैन कशाचें पडतें? मीहि बाहेर तशीच, आंत काय निकाल होतो, हें समजण्याचे आशेनें घोड्यावर बसून होतें. पुढें आपण जेव्हां राजा आणि भावोजी यांजबरोबर मोठ्या आनंदानें दरबाराबाहेर आलां, व जेव्हां आपण सुप्रसन्न चेहऱ्यानें त्या कल्पद्रुम **खवाजखानाशीं** भाषण केलें, तेव्हांच संकटहरण झालें ह्मणून **ईश्वराचा** स्तव करीत तेथून निघून मी इकडे येतांना अगोदर **व्यंकटेश**बगीच्यांत जाऊन या मैत्रिणींसह या दोघांस झालेली सर्व हकीकत सांगितली आणि यांस येथें उत्साहानें घेऊन येतें तोंच आपलेंहि येणें वाड्यांत झालें. "

हें ऐकतांच **विश्वासरावादि** मंडळीनें तिच्या धैर्याची व कल्पनेची प्रशंसा करून तिला मोठी धन्यता दिली. आणि त्या दिवशीं जो आनंदाचा सोहाळा केला तो कोणासही वर्णन व्हावयाचा नाहीं!

त्याच वेळेस ( **विश्वासरावाचे** प्रश्नावरून ) **गोपीनाथ** ह्मणाला: खरेच माझी पूर्वींची थोडीशी हकीकत सांगणें राहिली आहे ती सांगतों, ऐकावी: "पहा, ज्या दिवशीं आपण प्रदर्शन पाहून **मथुरा-**

नगरींत गेलों, त्याच रात्रीं तेथें एका धर्मशाळेंत निजलों असतां एकाएकीं मध्यरात्रीचे सुमारास विश्वासघात झाला, असें कोणी ओरडल्यानें मी जागा होऊन पाहतों, तों आपणही बिछान्यावर नव्हतां. तेव्हां त्या दीन स्वरावरून आपलाच कोणीं घात केला असावा, असें पक्कें वाटून, कशाचें काय! बरोबरील मनुष्यांस मागें जवाहिराची संदुक वगैरे असलेलें सामान रक्षण करावयास सांगून देहभान नाहींसें झाल्यानें तसाच मी शोधार्थ बाहेर पडलों. ते चाकरही काळजीचे असल्यानें मला फार वेळ लागला पाहून बरोबर चीजवस्त घेऊन माझा शोध करीत माझे मदतीस आले. काय आहे हें कोणास कळेना. व कोण ओरडलें याचाही पत्ता लागेना. पहाटपर्यंत चोहोंकडे फिरून पुनः धर्मशाळेंत परत आलों; तरी व्यर्थ. आपली काय गति झाली असेल एतद्विषयीं महादुःख वाटून त्याच शहरीं बारकाईनें शोध काढावा ह्या हेतूनें एक बिऱ्हाड घेतलें. आणि तेथेंच थैल्यानिशीं सर्व सरंजाम नेऊन ठेविला. शोधांतीं ज्याचे येथें आमचें बिऱ्हाड होतें तोच सहज गोष्टीवरून गोष्ट काढून ह्मणाला: गुरुवारीं रात्रीं कोणीएक सरकारी तुरुंगांतील कैदी भिंतीवरून उडी मारून तेथील एका जमादाराचे साह्यानें बाहेर पडला. परंतु त्याच जमादारानें कृतघ्नपणानें कांहीं सरकारी मदत घेऊन धर्मशाळेसन्निध ज्या घरांत पूर्वी कैदीस छपून राहण्यास आपणच सांगितलें होतें, त्या ठिकाणीं आपली शिफारस सरकारास दाखविण्यासाठीं अवचित जाऊन कपटानें त्यास धरिलें. आणि बरोबरचे अन्य लोक त्यास मारहाण करीत तुरुंगांत नेत आहेत तों त्यास तें सहन न होऊन तो त्या दुःखवेदनेंत असतां, तोच जमादार त्या कृत्यास सामील असलेला त्याचे दृष्टीस पडला. तेव्हां त्यास तर अतितर पश्चात्ताप होऊन विश्वासघात झाला! विश्वासघात झाला! हेंच वारंवार दुःखानें परमेश्वराची आठवण करून ओरडून ह्मणूं लागला. परंतु ऐकतो कोण? बिचाऱ्याचे स्वप्नींही पळून जावें असें नव्हतें. आणि पूर्वीची कैदही तीन महिनेच उरली

होती. त्या जमादाराचे कपटाची ही गुह्य वातमी बहुतकरून सर्वांचे उघडकीस येऊन मुद्यापर्यंत पोंचली आहे. पुढें काय होईल तें पहावें. स्वार्थाकारितां कोण काय करील याचा नेम नाहीं जाणून कोणींही पुरतेपणीं आदिपश्चात् विचार केल्यावांचून एकाएकीं कोणाचे वचनावर भरंवसा ठेवूं नये. पहा, त्या विचाऱ्याचे इतके हाल झाले तरी पहिली शिक्षा भोगून पुनः या पळालेल्या गुन्ह्याचीही त्या बापड्यास आणखी सजा भोगलीच पाहिजे!" असो. अशी त्याचे तोंडची इत्थंभूत वातमी ऐकल्यावर आपणाविषयीं माझा संशय फिटला. तरी अनेक तऱ्हेचे विकल्प मनांत येऊन तेथून निघून जाऊन पुनः शोध लावीत **माणिकलालाचे** साह्यानें तेथेंच भेटण्यास आलों. परंतु तेथूनही दुर्दैवानें गोता दिलाच होता. तो आतांच निवेदन केला आहे."

**विश्वासरावानें**ही रत्नपरीक्षेचे संधीस **मधुमालतीची** प्रथम भेट, तिचा आपणास वरण्याचा मानस, **हस्तनापुरांत** आल्यावर धूर्ततेनें साधलेलें **व्यंकटेश**मंदिर, प्रधानादि अधिकाऱ्यांची व राजाची प्राप्ति, **मधुमालतीचें** पाणिग्रहण, तसेंच राजकारणीं आलेले **मधुमालतीसह** आपणावरील प्रसंग, आदिकरून भेटी होईपर्यंत मागें झालेली सर्व हकीकत **गोपीनाथासह** सर्व मंडळीस सांगितली. आणि ठिकठिकाणीं शोक, विनोद, हास्य, शृंगार, वीर, करुणादि रस उत्पन्न केले. असो. शेवटीं सर्व दुःख परिमार्जन होऊन सर्वांच्या भेटी एकत्र झाल्यानें **मधुमालतीचे** आईबापांस, आणि राजास परमावधीचा आनंद झाला.

पुढें **चंद्रकांतास** सुमुहूर्तानें पुनः **विश्वासरावाचे** साह्यानें राज्य प्राप्त झालें, ते वेळेस राजानें **विश्वासरावाचें** मत घेऊन **चंद्रकांता**चा प्राण रक्षण केला म्हणून स्वसंतोषानें आपले राज्यापैकीं **मथुरा**प्रांताचें सुमारें पंचवीस लक्षांचें राज्य **गोपीनाथास** देऊन सन्मानानें त्यास सनद करून दिली. तसेंच **विश्वासरावास** आशा नसतांही त्याचें मुख्य राहण्याचें ठिकाण जें **गुल-**

र ( नाशिक ) त्या प्रांताचीस र्व जहागीर वळेंच व्यंकटेश-
करितां करून दिली. त्या विवाहोत्कांटित राजकन्यांपैकीं
चा गोपीनाथास पूर्वींपासून वरण्याचा मानस असून
थुरासंस्थानचें राज्यही मिळालें. त्याजवरून तर तिची
विशेष भक्ति वसली आहे, असें मधुमालतीचे सांगण्या-
जास कळतांच त्याणें लागलींच तिचे बापास ( चंद्रपूरचे
) मुद्दाम सांडणीस्वाराबरोबर सुवर्णरेखांकित कुंकुममंडित
र्तिक शुद्ध ९ मी रोज गुरुवारचें पाठविलें. आणि त्यांत
ो कन्या सुखरूप असल्याची हकीगत लिहून चंद्रसेनेचा
दर्शविला.

पत्र पहातांच मुळींच भेटण्याची आशा नसून अकस्मात्
ठिकाणासह कुशल समजलें; या योगानें त्या राजास जो
झाला तो गगनीं मावेना. तसेंच दुसरी कन्या उन्मिळा
होण्यापूर्वींच कांतिपुरीचे राजाच्या पुत्रास देण्याचें ठरलें
ानेंही अद्यापपावेतों लग्न केलें नाहीं; असें समजतांच
त्याचे सर्व कुटुंबास आणि आप्तवर्गास त्यासमयीं
ानंद झाला असेल याचा विचार आमचे सुज्ञ वाचकच
आनायासें लग्नाचे दिवसही जवळ आले आहेत जाणून
ागलींच साहित्यासह सर्व तयारी करविली. आणि आ-
इष्टमित्र, यांस बरोबर घेऊन मोठ्या लवाजम्यानें तावडतोब
दोन्ही कुटुंबांसह हस्तनापुरास आला. कन्येच्या भेटी
त्याचे नेत्रांतून अनावर अश्रुपूर लोटून सौख्यतरंगीं ग-
े. व सर्व मजकूर श्रुत झाल्यानें वारंवार गोपीनाथाचे
धुमालतीचे उपकार मनांत आणून तो मोठे आभार मानूं
व हा लावण्यसंपन्न गोपीनाथ मथुराधिपति होऊन
होत आहे हें पाहून आपणास धन्य मानूं लागला. व-
गणमैत्री पाहतां पूर्ण गुणासह सारे गुण उतरले. दै-
ानुकूलता झालयावर येवढेंच कां कमी पडेल? असो.

उभयपक्षींही कांहीं कमी नसल्यानें लग्नसमारंभसोहाळा मोठ्या थाटानें होऊन **गोपीनाथास** ती **चंद्रसेना** पूर्वभाग्यानें नोवरी मिळाली. तसेंच दास, दासी, हत्ती, घोडे, रथ, पालख्या, गांवें आदिकरून जामातास इच्छिलेलें आंदण देऊन **उन्मिळेच्या** कुटुंबास बरोबर घेऊन सर्व खटल्यानिशीं तो राजा **शृंगारपुरास** परत गेला.

पुढें एकवार **लखनौचे** बादशाहास भेटून तसाच **अयोध्येचे** राज्याचा चांगला बंदोबस्त ठेवून आईबापांस मंडळीनिशीं भेटण्यास जावें असें मनांत आल्यावर **गोपीनाथास** बरोबर घेऊन लवाजम्यानें **विश्वासराव लखनौ** शहरीं गेला. आणि तेथें बादशाहाप सर्व हकीकत सांगून त्याजकडून आपणास धन्य ह्मणवून घेतलें.

**विश्वासरावनाना** आल्याची बातमी **भानुकांतास** लागून त्यानें एकवार भेटीची इच्छा आहे असें कळविलें. त्यावरून **विश्वासरावांनी** त्याची एकांतीं भेट घेतली. ते वेळेस तो अगदीं दीन होऊन ह्मणाला:—मला आतां हें दुःख सोसवत नाहीं. मीं दुष्टांचे संगतीनें आपले वाइटाची इच्छा धरून कृतघ्नपणें आपल्यास अतिशय दुःख दिलें; त्याची क्षमा करून या हतभाग्यास बंदमुक्त करावें. मी सर्वस्वी आपला अपराधी आहें. तथापि एकवार नम्र झालों. आतां पूर्वीचें कृत्य मनांत न आणतां मला सौख्य द्यावें. मी निश्चयानें **श्रीव्यंकटेशाची** शपथ वाहून सांगतों कीं, पुनः अशी कोणतीही गोष्ट न करतां आपले आज्ञेबाहेर बिलकुल चालणार नाहीं. असें त्याचें निष्कपटभाषण पाहून त्या परोपकारी हृदयास द्रव आला. आणि आतां तूं स्वस्थ ऐस, कांहीं काळजी करूं नको, असें **विश्वासरावानें** त्यास सांगितलें. तसेंच, मामादि मंडळीही कैदेंत त्रस्त झाल्यानें गलितअभिमान होऊन शरण आली. तेव्हां त्यांचे अंगांतील मस्तपणा गेल्यानें त्यांचे चित्तास स्वस्थता देऊन तसाच

परत बादशहाकडे गेला आणि त्याचा हेतु नसतांही विनंति करून कैद्यांस सोडविण्याची परवानगी घेतली. लागलीच त्या सर्वांस बंदमुक्त केलें.

कांहीं दिवस बादशहाचे आग्रहामुळें तेथें राहून विश्वासराव आणि गोपीनाथ भानुकांतादि मंडळीसह अयोध्यापुरींत आले. तेथें राजनीतीचे सन्मार्गाचे कायदे घालून, परत येईतोंपर्यंत दिवाणास कारभाराची व्यवस्था ठेवण्यास सांगितलें. मागें फौजेचा चांगला बंदोबस्त ठेवून खवाजखानास सेनाधिपत्य देऊन त्याचे फौजेनिशीं त्यास बरोबर घेतलें. येतांना गोपीनाथाचे मथुरा संस्थानचा असाच बंदोबस्त ठेवून हस्तनापुरास सर्वजण परत आले. विश्वासरावानें सांगितल्यावरून राजाची चिरंजीवाविषयींची द्वेषबुद्धि गेल्यामुळें व चंद्रकांताचाही रुकार दिसल्यावरून त्यानें भानुकांतास नर्मदेच्या आलीकडच्या दक्षिण बाजूचें दोन कोटींचें राज्य देऊन तेथील बंदोबस्तास सारे नवीन व सुज्ञ कारभारी विश्वासरावाचे परीक्षेनें नेमिले. आणि प्रजेस मान्य असे नवे कायदे घालून देऊन-पूर्वींची मामादि दुष्ट मंडळी कारभारांत न ठेवितां प्रत्येकास फक्त प्रतिवर्षी दोन दोन हजार रुपयांची नक्त नेमणूक करून दिली. आणि पुनः असा कांहीं बखेडा केल्यास तुमची क्षमा न होतां एकदम देहांतप्रायश्चित्त मिळेल अशी त्यांस सक्त ताकीद केली.

याप्रमाणें इकडील सर्व व्यवस्था करून गोपीनाथ आणि विश्वासराव हे दोघे आपले कुटुंबांसह, वंशवर्धन राजाचे आणि बाबासाहेब ( सासरे ) आदिकरून मंडळींचे विचारें त्या दोघी सावकारकन्या बरोबर घेऊन खवाजखान सरदाराचे दहा हजार फौजेनिशीं, व शिवाय खजिना, कांहीं हत्ती, घोडे, मेणे, व रथ बरोबर घेऊन मोठ्या समारंभानें सर्वांस विचारून आपले गुलछनाबाद ( नासिक ) शहरीं आईबापांस भेटण्याचे उद्देशानें जावयास निघाले. मार्गांत मध्यंतरीं उज्जनीस जाऊन त्या दोघी

सावकारकन्यांच्या घरांचा शोध लाविला. आणि त्यांस त्यांचे आईबापांचे हवालीं सर्व चीजवस्तेनिशीं करून पतींच्याही भेटी करविल्या; व तेव्हांच त्यांची झालेली हकीकत साद्यंत सांगू- त्यांचे अंगीं पवित्रता असल्याचेंही सर्वांस जाणविलें. त्या योगें माहेरच्या आणि सासरच्या मनुष्यांस आणि आप्तवर्गास परमावधि आनंद होऊन सर्वजण **विश्वासरावाचे** फारच आभार मानूं लागले. पुढें त्यांचे सत्कारयुक्त आग्रहामुळें कांहीं दिवस त्यांचें तेथेंच राहणें होऊन त्या **छगनलालाचे** भेटीचाही लाभ मिळाला. असो. पुढें एके दिवशीं मेजवानी झाल्यावर हे तेथून निघून जलदीनें सुमारें पंधरा दिवसांत आपले शहरासंनिध येऊन पोहोंचले. तेथें आल्यावर पंचवटीचे मैदानांत **श्री गोदावरी** तटाकीं तंबू, डेरे, व राहुट्या ठोकून सर्व खटल्यासुद्धां प्रातःकाळचे प्रहर७ दिवसास तळ दिला. आणि लागलेंच आपले वडिलांस **श्री व्यंकटेश**कृपेनें आनंदांत सुखरूप आल्याचा निरोप कारभाऱ्याचे हातें पाठविला. पुढें भरजरीचे किनखाबी दलबादल डेऱ्यांत त्या दोघींस बरोबरील दासींसह ठेवून खजिन्याचा वगैरे बंदोबस्त **खवाजखान** सेनाधिपतीचे हातें करविला.आणि **विश्वासरावनाना** आणि **गोपीनाथराव** हे उभयतां जगदुद्धारिणी गंगेचे स्नानास गेले. तेव्हां हा फार दिवसांनीं पावन जलौघ दृष्टीस पडला ह्मणून त्यांस जो गहिंवर आला तो कांहीं केल्यानें आवरेना. नंतर तटाकीं विधियुक्त दानधर्म करून श्री जगन्निवास राजाधिराज **रामचंद्रजीचे** मंदिरांत जाऊन मोठ्या प्रेमानें दर्शन घेतलें.

इतक्यांत हा मजकूर श्रुत होऊन मोठ्या उत्कंठेनें आनंदगजरांत तीं उभयतां मातापितरें पुत्रास भेटावयास आलीं. त्यांस दुरून पाहतांच उतावेळ अंतःकरणानें हे सामोरे जाऊन उभयतांनींही देहभान विसरून वडिलांचे चरणांवर लोटांगणें घातलीं. आणि हे पाय फार दिवसांनीं दृष्टीस पडले ह्मणून नेत्रांतील अस्खलित प्रेमाश्रुजीवनांनीं त्यांचें क्षालन केलें. तीं जरी पुत्रांविषयीं आशा-